
हैदराबाद
विमोचन आणि विसर्जन
नरहर कुरुंदकर

## आमची संग्राह्य प्रकाशने

✦ हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन
- नरहर कुरुंदकर

✦ गवाक्ष
- प्रा. डॉ. यशवंत साधू

✦ अंतर्वेध
- डॉ. दीपक कासराळीकर

✦ झणत्कार
- सौ. मीनल वसमतकर

✦ केवळ तुमच्यासाठी
- व्यं. ना. वळसंगकर

✦ अबोली
- सौ. मंगला अवलगावकर

✦ इंद्रधनु
- उद्धव भयवाल

✦ योगेश्वरीचा नंदादीप
- सुलोचना खडगीकर

✦ मृदगंध
- अरुण भावसार

✦ सांजतरंग
- जगदीश अभ्यंकर

✦ संध्याछाया
- राजाभाऊ भोंजाळ

✦ निमित्त
- भगवान अंजनीकर

✦ चक्रव्यूह
- गेणू गोपीनाथ शिंदे

✦ विध्वंस पर्यावरणाचा
- भालचंद्र देशपांडे

✦ पाथेय
- प्रा. शारदा देवदत्त तुंगार

खास वाचकांसाठी
सवलतीचे मूल्य रु. ____

# हैदराबाद :
# विमोचन आणि विसर्जन

लेखक

**कै. प्राचार्य नरहर कुरुंदकर**

संपादक

**प्रा. द. पं. जोशी**

(मराठा साहित्य परिषद, हैदराबाद)

**रजत प्रकाशन, औरंगाबाद.**

✧ हैदराबाद विमोचन आणि विसर्जन ✧
कै. प्राचार्य नरहर कुरुंदकर
(Hyderabad : Vimochan Ani Visarjan)
Late Prin. Narhar Kurundkar

✧ प्रकाशन क्र. ३२ ✧

✧ सर्वाधिकार ✧
श्रीमती प्रभावतीताई नरहर कुरुंदकर,
५६, भाग्यनगर, नांदेड.

✧ प्रकाशिका
सौ. अनिता अ. कुमठेकर
रजत प्रकाशन,
४६२, आविष्कार कॉलनी,
सिडको, एन-६, औरंगाबाद.

✧ अक्षरजुळणी
प्रविण ज. शिंदे
साई कॉम्प्युटर्स
४७, नवभारत सोसायटी,
एन-८, सिडको, औरंगाबाद.

✧ मुद्रक
राजमुद्रा ऑफसेट,
जी-२४, एम.आय.डी.सी. चिकलठाणा,
औरंगाबाद.

✧ मुखपृष्ठ
व्यंकटेश देशपांडे
१८ (अ), समाधान कॉलनी,
जिल्हा न्यायालयाच्या मागे,
औरंगाबाद.

✧ प्रथम आवृत्ती : २३ मार्च १९८५ ✧
✧ द्वितीय आवृत्ती : ७ सप्टेंबर १९९८ ✧
✧ मूल्य २५० रुपये ✧



हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामाचे नेते स्वामी रामानंद तीर्थ

# द्वितीय आवृत्तीच्या निमित्ताने

कै. प्राचार्य नरहर कुरुंदकर यांच्या "हैदराबाद-विमोचन आणि विसर्जन" या ग्रंथाची दुसरी आवृत्ती वाचकांच्या हाती देतांना आम्हाला विशेष आनंद होत आहे. प्रकाशन व्यवसायात उतरल्यानंतर अल्पकाळात आम्हाला कुरुंदकर गुरुजींसारख्या प्रख्यात विचारवंताचा ग्रंथ प्रकाशनाची संधी मिळाली ही घटना आनंददायक आहे. कुरुंदकर गुरुजींचा जुना परिचय आणि त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांशी असलेले आमचे जिव्हाळ्याचे संबंध यामुळेच हे शक्य झाले आहे.

आमच्यासारख्या नवोदित प्रकाशकाच्या कामावर विश्वास ठेवून श्रीमती प्रभाताई कुरुंदकर वहिनींनी सरांच्या पुस्तकाच्या प्रकाशनाचे अधिकार आम्हाला देऊन दाखविलेला विश्वास, आम्हाला भविष्यात प्रेरणादायी ठरणार आहे. त्याचबरोबर मराठी साहित्य परिषद आंध्रप्रदेशचे प्रा. द. पं. जोशी व प्रा. डॉ. पद्माकर दादेगावकर यांनी प्रेमाने या आवृत्तीचे अधिकार आमच्याकडे सोपविण्याबद्दल संमती दर्शविली त्याबद्दल त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.

या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाच्या निमित्ताने कांही गोष्टी प्रारंभीच स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे आम्हाला वाटते. त्या म्हणजे प्रा. द. पं. जोशी यांनी जो ग्रंथ संपादित केला तो आम्ही अगदी जसाच्या तसा पुनर्मुद्रित केला आहे. त्यात कुठेही फेरबदल केले नाहीत. यासंदर्भात श्री जोशी सरांशी चर्चा झाली तेंव्हा त्यांनी या विषयावर गेल्या १५ वर्षांत झालेल्या नवीन संशोधनाचा, प्रकाशित ग्रंथांचा आढावा घेऊन परिशिष्टात ती माहिती द्यावी म्हणजे नव्या परिस्थितीत जुने नवे संदर्भ अधिक स्पष्ट होतील असे सांगितले होते. हा आढावा त्यांनीच घेण्याचे मान्यही केले होते. परंतु त्यांची प्रकृती ठीक नसल्याने "त्यांना सहा महिन्यात ही आवृत्ती संपून जाईल. आपण तिसऱ्या आवृत्तीत परिशिष्ट जोडू" असे सांगून सदिच्छाही व्यक्त केल्या.

याशिवाय स्वातंत्र्य. सेनानी गोविंदभाई श्रॉफ यांनी उदार मनाने आम्हाला सदिच्छा दिल्या. प्रा. भुजंग वाडीकर, प्रा. दत्ता भगत, प्रा. फ. मु. शिंदे, श्री. महावीर जोंधळे, श्री. चक्रधर दळवी, श्री. सूर्यकांत सराफ, श्री. भालचंद्र देशपांडे, ॲड. शेषराव मोरे, प्रा. सौ. श्यामल कुरुंदकर-पत्की, प्रा. सौ. तेजस्विनी देव, श्री. विश्वास कुरुंदकर (किर्लोस्कर, पुणे), श्री. सुरेश सावंत, प्रा. डॉ. दीपक कासराळीकर, प्रा. माधव कृष्ण सावरगावकर, श्री. प्रभाकर रावके, श्री. सुधाकर डोईफोडे, श्री. एल. के. कुलकर्णी, प्रा. राम जाधव, प्रा. भगवान काळे यांनी वेळोवेळी प्रोत्साहन दिले. याशिवाय मराठवाडा वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष ॲड. प्रताप बांगर, उपजिल्हाधिकारी दिलीप शिंदे, स्वा. सै. नाथप्रसाद दीक्षित, प्रा. प्रकाश कामतीकर, डॉ. मनसुख आचलिया यांनी अनमोल सहकार्य केल्यामुळेच हे ग्रंथरूप

साकार झाले आहे. तसेच आमचे ग्रंथप्रकाशक व वितरक सर्वश्री निर्मलकुमार सूर्यवंशी, जयप्रकाश सुरनर, दत्ता डांगे, मधुकर कोटलवार, डी. बी. देशपांडे यांनी ग्रंथवितरणातील सहभागाची शाश्वती दिल्यामुळेच आम्हाला बळ मिळाले.

यानिमित्ताने एक गोष्ट स्पष्ट करावीशी वाटते ती ही की, या ग्रंथातील कुरुंदकर गुरुजींची भाषणे व लेख १९८१ पूर्वीची आहेत. गेल्या १५-१६ वर्षात हैदराबाद मुक्तिलढ्यावर अनेकांनी पुस्तके लिहिली, संशोधन केलेले आहे. त्याचा आढावा घेणे आम्हाला जमले नाही. मात्र कुरुंदकर गुरुजींनी त्या त्या काळात व्यक्त केलेले मत जसेच्या तसे आम्ही वाचकांपर्यंत पोहचविण्याचे काम केलेले आहे. वाचकांनीही गुरुजींचे विचार त्या त्या संदर्भात लक्षात घ्यावे ही विनंती. अभिप्रायात आदरणीय गोविंदभाईंनी म्हटल्याप्रमाणे नवीन माहिती पुढे आलेली असली तरी जुने विचार, संशोधन चिकित्सा याचे मूल्य घटत नसते हे खरे !

आमचे मोठे दीर प्रा. डॉ. विलास कुमठेकर व जाऊबाई प्रा. सौ. ज्योती कुमठेकर यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. त्यांचे प्रयत्न नसते तर हे पुस्तक आम्ही प्रकाशित करू शकलो नसतो एवढे सांगितले तरी पुरेसे आहे. या ग्रंथाचे सुबक मुद्रण अल्पावधीत करून दिल्याबद्दल राजमुद्रा ऑफसेट परिवाराचे हार्दिक आभार. तसेच हा ग्रंथ सिद्ध करण्यासाठी ज्या ज्या व्यक्ति, संस्थांनी प्रत्यक्षाप्रत्यक्षरीत्या मदत केली आहे. त्या सर्वांचे मनःपूर्वक आभार मानून मी हे निवेदन संपविते.

आमचे काही हितचिंतक गेल्या १०-१२ वर्षांपासून समग्र कुरुंदकर वाङमय या प्रकल्पावर विचार करीत आहेत. प्रा. माधव कृष्ण सावरगावकर यांनी एका लेखात उल्लेख केल्याप्रमाणे कुरुंदकर गुरुजींचे एकूण साहित्य जवळजवळ सहा हजार पृष्ठांचे आहे. यातील बहुतांश ग्रंथ पुणे येथील ख्यातनाम ग्रंथ प्रकाशन संस्था देशमुख आणि कंपनी व इंद्रायणी साहित्य यांनी प्रकाशित केलेले आहेत. प्रस्तुत प्रकल्पात या संस्थांनी मनःपूर्वक सहकार्य केल्यास प्रकल्प सिद्धीस जाणे सहज शक्य आहे. या प्रकल्पासाठी जे संपादक मंडळ नेमण्याचा आम्ही विचार करीत आहोत त्यांत या संस्थांचे प्रतिनिधी तर असतीलच शिवाय गुरुजींना जाणणारे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्रप्रदेशातील ख्यातकीर्त साहित्यिक असतील. हा प्रकल्प येत्या ५-६ वर्षांत सिद्धीस जावा अशी आमची परमेश्वरास प्रार्थना आहे. सदर ग्रंथाच्या रसिक वाचकांस आम्ही वरील प्रकल्पात सर्वतोपरी सहकार्य व आशीर्वाद देण्याची आम्ही अतिशय नम्रतेने प्रार्थना करीत आहोत.

धन्यवाद!

**सौ. अनिता अ. कुमठेकर**

(प्रकाशिका)

# पहिल्या आवृत्तीच्या
# प्रकाशकाचे निवेदन

*साधारण दीड वर्षापूर्वी नांदेड येथे कै. नरहर कुरुंदकरांच्या निवासस्थानी कागदपत्रांची छाननी करताना भांगडिया स्मारक व्याख्यानमालेतील व्याख्यानांचे हस्तलिखित नजरेस आले. ही व्याख्याने कुरुंदकरांनी १९७८ मध्ये दिली होती व ती सेलू येथील मित्रांनी शब्दशः उतरून घेतली होती. मजकूर महत्त्वाचा होता. पण तो परिष्कृत करणे व कुठेतरी प्रसिद्ध होणे इष्ट एवढेच त्या क्षणी वाटले. याच विषयावर कुरुंदकरांनी वेळोवेळी केलेले स्फुट लेखन नजरेसमोर होतेच. मित्रांशी विचारविनिमय करताना हा लेखसंग्रह मराठी साहित्य परिषद, आंध्र प्रदेश या संस्थेने प्रकाशनासाठी घ्यावा ही कल्पना पुढे आली. या ग्रंथात कुरुंदकरांनी १९३८ पासूनच्या इतिहासाची मीमांसा केली आहे. १९२० - १९३८ या कालखंडाचा इतिहास परिषदेने वेगळा सिद्ध केला आहे व तोही याच ग्रंथाच्या समवेत प्रकाशित करण्याचे ठरत आहे. हे दोन्ही उपक्रम एकाच वेळी पूर्ण होऊन एक ऐतिहासिक कार्य परिषदेने पूर्ण केले आहे. मराठी वाचक तसेच जाणकार या उपक्रमाचे यथोचित स्वागत करतील असा भरवसा वाटतो.*

*हा ग्रंथ सिद्ध करताना अनेकांचे साहाय्य घ्यावे लागले. ह्या पुस्तकाची कल्पना स्फुरण्यापासून ते त्याच्या पूर्ततेपर्यंत आमचे मित्र श्री.आनंद साधले यांनी भरपूर परिश्रम घेतले. विशेषतः ध्वनिफितीवरील व्याख्यानांचे परिष्करण त्यांनी प्रकृती ठीक नसतानाही शुद्ध प्रत तयार केली. त्याबद्दल परिषद त्यांची ऋणी आहे. सेलू येथील नूतन विद्यालयाचे प्राचार्य श्री.द.रा.कुलकर्णी यांनी व्याख्याने प्रसिद्ध करण्यास अनुमती दिली व ध्वनिफीत कागदावर उतरण्याची आरंभीची जबाबदारी त्यांनी सांभाळली. श्री.जोगदंड (मुंबई) यांनी आमची निकड लक्षात घेऊन त्वरित मुद्रणप्रत करून दिली. या सर्वांचे आम्ही आभारी आहो.*

*हा ग्रंथ प्रकाशनासाठी परिषदेकडे सोपविला याबद्दल आम्ही श्रीमती प्रभा कुरुंदकर यांचे ऋणी आहो.*

गुढी पाडवा
२३ मार्च १९८५

**द.पं.जोशी**
कार्यवाह

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| प्रस्तावना | | | |
| प्रकरण १ ले | : | माझा मराठवाडा | ०१९ |
| प्रकरण २ रे | : | माळरानावरील कवडसे | ०२५ |
| प्रकरण ३ रे | : | १९३८ चा हैदराबाद लढा | ०३५ |
| प्रकरण ४ थे | : | कै. स्वामी रामानंदतीर्थ - एक पत्र व चर्चा | ०५३ |
| प्रकरण ५ वे | : | एक राजकारणी संन्यासी - स्वामीजी | ०५८ |
| प्रकरण ६ वे | : | अध्यात्मवादी स्वातंत्र्याचे उपासक - स्वामी रामानंद तीर्थ | ०६१ |
| प्रकरण ७ वे | : | कुरुंद्यात स्वातंत्र्य आले | ०६९ |
| प्रकरण ८ वे | : | नांदेडचे झेंडा प्रकरण : रझाकार नेत्यांचा तिरंग्यास प्रणाम | ०८२ |
| प्रकरण ९ वे | : | वेड्या राजकारणाचे आभार | ०९० |
| प्रकरण १० वे | : | शेवटचा निझाम | ०९८ |
| प्रकरण ११ वे | : | एजंट जनरल | १०३ |
| प्रकरण १२ वे | : | हैदराबादचे विलीनीकरण | १२२ |
| प्रकरण १३ वे | : | हैदराबाद मुक्तिसंग्रामातील काही कथा या पुस्तकाची प्रस्तावना | १३६ |
| प्रकरण १४ वे | : | भांगडिया स्मारक व्याख्यानमाला पहिले व्याख्यान | १५६ |
| प्रकरण १५ वे | : | दुसरे व्याख्यान | १८४ |
| प्रकरण १६ वे | : | तिसरे व्याख्यान | २१२ |

# प्रस्तावना

हैदराबादच्या स्वातंत्र्य-संग्रामाच्या संदर्भात कै. प्रा. नरहर कुरुंदकर यांनी वेळोवेळी लिहिलेल्या स्फुट लेखांचा व सेलू येथे त्याच विषयावर त्यांनी दिलेल्या भांगडिया स्मारक व्याख्यानमालेतील तीन व्याख्यानांचा हा संग्रह 'मराठी साहित्य परिषद, आंध्रप्रदेश' या संस्थेच्या वतीने प्रसिद्ध होत आहे. 'हैदराबाद-विमोचन आणि विसर्जन' असे जरी या पुस्तकाचे नामकरण केले असले तरी त्यात केवळ संग्रामाचा संपूर्ण इतिहास नाही. तसेच संग्रामाव्यतिरिक्त इतर अनुषंगिक घटना व व्यक्ती यांचे निर्देश आहेत व प्रामुख्याने चर्चा आहे. या संग्रामाच्या मीमांसेत अनुस्यूत घटनांचा क्रम आपण किती मागे न्यायचा हा एक प्रश्न या पुस्तकाच्या निमित्ताने उपस्थित होतो. तसेच जो काही आरंभ गृहीत धरला जाईल तेथपासून संग्राम संपूर्ण सिद्धीपर्यंतच्या सर्व नसल्या तरी ठळक घटना, प्रमुख प्रवाह, भिन्न गटात, भिन्न स्थळी वावरलेल्या अनेकविध व्यक्ती यांची ओझरती का असेना नोंद असल्याची अपेक्षा अशा लेखनाच्या वेळी स्वाभाविक मानावी लागते. कै. नरहर कुरुंदकरांनी ज्या परिस्थितीत, ज्या संदर्भात हे लेखन केले तो संदर्भ ध्यानी ठेवला तर ही अपेक्षा हा ग्रंथ पूर्ण करणार नाही हे आरंभीच नमूद करायला हवे. कुरुंदकरांना जे अभिप्रेतच नाही ते कार्य त्यांनी केले नाही म्हणून हेत्वारोप होऊन अन्याय होऊ नये म्हणून आम्ही ही बाब आरंभीच नोंदवू इच्छितो. संपूर्ण पुस्तकात हैदराबादच्या मुक्तिसंग्रामाच्या संदर्भात विवेचन असल्यामुळे ते नाव पुस्तकाला आम्हांला द्यावेसे वाटले. त्याची जबाबदारी आमची आहे, कुरुंदकरांची नाही. शिवाय संग्रामाचा इतिहास म्हणजे काय, तो कोठून आरंभ करायचा, त्यात कोणता दृष्टिकोण स्वीकारायचा याबाबत अद्याप पुरेशी चर्चा नाही, माहिती नाही, प्रसिद्ध साधने नाहीत. काही चरित्रग्रंथ, आठवणी, संघर्षाच्या सुट्या हकिकती, काही जुजबी मीमांसा जरूर उपलब्ध आहेत. पण ती सामग्री पुरेशी नाही म्हणून म्हणा वा अन्य कारणाने म्हणा, या विषयावर व्यवस्थित अभ्यास नाही ही

वस्तुस्थिती आहे. वस्तुतः ह्या विषयावर माहितीचे अगणित भांडार आता उपलब्ध आहे, पण त्याचा उपयोग करण्यासंबंधी कुणाजवळ समग्र योजना नाही. म्हणजे एका बाजूने या विषयाबद्दल अभ्यासकांची अनास्था व दुसऱ्या बाजूने समाजात ह्या विषयाबद्दलचे प्रचंड कुतूहल असे मोठे विरोधाभासाचे चित्र हैदराबादच्या संदर्भात दिसत आहे. हे चित्र पालटावे, जास्तीत जास्त साधने, माहिती पुढे यावी, चर्चा व्हावी व इतिहास विषयाचे एक मौल्यवान दालन प्रकाशाने उजळून निघावे यासाठी आम्ही स्वतः गेली आठ-दहा वर्षे कार्यशील होतो. ते कार्य पूर्ण झाले नसले तरी मोठ्या प्रमाणात मोकळे झाले आहे, होणार आहे. या साधन-सिद्धीच्या प्रयत्नात कुरुंदकरांचा ग्रंथ हा मौल्यवान ठरणार आहे. तो कसा आणि किती याचा थोडा ऊहापोह करणे उपलब्ध स्थलमर्यादेत इष्ट ठरेल.

आपल्या लेखनात कुरुंदकरांनी १९३८ हा स्वातंत्र्य-संग्रामाचा आरंभबिंदू मानला आहे. ती तारीख आहे २४ ऑक्टोबर १९३८. काँग्रेसने त्या वेळी सत्याग्रहाची तुतारी पू. स्वामीजींच्या नेतृत्वाखाली फुंकली. काँग्रेसचा लढा म्हणायचा पण ही हैदराबाद स्टेट काँग्रेस जन्माला येण्यापूर्वीच निझाम सरकारने तिच्यावर जातीय संघटना म्हणून बंदी घातली होती. त्यापूर्वीच १९३७ ला कुप्रसिद्ध गश्तीक्रमांक ५३ काढून निझाम सरकारने हैदराबाद राज्यात कुठेही परवानगीशिवाय सभा, संमेलन, मेळावा घ्यायचा नाही हे घोषित केले होते. तरीही लढा आरंभ झालाच. काँग्रेसच्या लढ्याच्या आसपासच आर्य समाजानेही आपले आंदोलन सुरू केले होते व हिंदू महासभेनेदेखील आपले आंदोलन स्वा. सावरकरांच्या प्रेरणेने आरंभिले होते. हे लढे दीर्घकाळ चालले नाहीत. नेते, कार्यकर्ते तुरुंगास गेले. त्यानंतर उपस्थित झाले ते १९३९ चे वंदे मातरम् प्रकरण. ते वर्ष दोन वर्षे सर्वांनाच पुरले. त्यानंतर १९४२ च्या लढ्याच्या वेळी हैदराबाद राज्यात सत्याग्रह झाला. त्यानंतर १९४६ पर्यंत अन्य कुठला लढा वा सत्याग्रह नाही. स्टेट काँग्रेसवरची बंदी उठली ती ३ जुलै १९४६ ला व येथून नवे पर्व सुरू झाले. भारतातही वेगाने घटना घडल्या. या वादळात हैदराबादेतील चळवळ हेतुपूर्वक व सगळ्यांच्या संमतीने सशस्त्र लढ्यात रूपांतरित झाली; व १७ सप्टेंबर १९४८ ला ती सफल झाली. म्हणजे हैदराबादचा लढा म्हणून म्हणायचा तर तो १९३८ ते १९४८ या नऊ वर्षे ११ महिन्यांचा आहे. पण लढा, लढा म्हणून महत्त्वाचा असला, रोमहर्षक असला, वंदनीय असला तरी तो सगळा संपूर्ण इतिहास नाही. हैदराबादचा इतिहास हे एक वेगळेच गुंतागुंतीचे जबरदस्त प्रकरण आहे व या प्रकरणात लढ्याचे योगदान ठसठशीत असले तरी या इतिहासाला वेगवेगळ्या पातळ्या

आहेत, पदर आहेत. त्यांच्या संपूर्ण आकलनातूनच हैदराबादच्या इतिहासाचे वेगळेपण प्रगट होणार आहे. किंबहुना या इतिहासाचे पहिले वैशिष्ट्यच असे की हे भिन्न भिन्न घटक परस्परांवर सतत परिणाम घडवीत असताना दिसतात. लोकजीवन, समाज हा एक घटक, संस्था, व्यक्ती, कार्यकर्ते हा दुसरा घटक. हैदराबाद राज्यातील मुस्लिम समाज, त्याच्या चळवळी, नेतृत्व हा तिसरा घटक. निझाम व निझामची परंपरा चौथा घटक. दिल्ली, लंडन येथून सूत्रचालन करणारे इंग्लंडचे साम्राज्य व भारत सरकार हा पाचवा घटक. सबंध भारतातील जागृत भारतीय हिंदू समाज हा सहावा घटक. भारतातील व अंशतः भारताबाहेरील मुस्लिम समाज व सत्ता हा सातवा घटक. भारतात कार्यशील असणारी प्रामुख्याने काँग्रेस संघटना, तिचे ध्येयधोरण, नेते, कार्यकर्ते हा आठवा घटक. असे हे आठ घटक, हे हैदराबादच्या इतिहासात एकत्र आलेले आहेत. सबंध भारताचे संतुलन साधणारा भवितव्य घडविणारा कटिप्रदेशी स्थिरावलेला हा हैदराबाद प्रांत, हा भारताच्या विसाव्या शतकाच्या इतिहासाचा महत्त्वाचा पदर आहे. हैदराबादच्या होकार-नकारावर भारताचे भवितव्य दोलायमान झालेले काही क्षण इतिहासाने स्वातंत्र्याच्या उदयकाळी पाहिले आहेत. त्यातील यातना सोसल्या आहेत; आनंद अनुभवला आहे. एवढे अनन्यत्व या इतिहासाला मिळाले त्याचे महत्त्वाचे विवेचन ह्या ग्रंथात आहे. कुरुंदकरांनी कळत नकळत उत्तरकालीन घटनांची मीमांसा केली. आमच्यासमोर मात्र केवळ तेवढाच व तोच पट नाही. कुरुंदकरांचे विवेचन स्वीकारूनही त्यांनी स्वीकारलेली चौकट त्यांना अभिप्रेत आहे. त्या चौकटीपेक्षा आणखी मोठी व संमिश्र आहे, अशी आमची भूमिका आहे. कुरुंदकरांनी १९३८ नंतरच्या घटना विचारात घेतल्या.

योगायोग असेल पण १९२० पासूनच प्रथम निझामाने एक्झिक्युटिव्ह कौन्सिल स्थापन करण्याची घोषणा केली. त्यामुळे १९२० पासून हैदराबादेतील कार्यकर्त्यांनी सातत्याने जनजागृतीचे राजकीय कार्य सुरू केले. अ.भा. काँग्रेसच्या अधिपत्याखाली वेळोवेळी स्टेट परिषदेच्या सभा तर भरतच पण शिक्षण, साहित्य, ग्रंथालये, सामाजिक सुधारणा या विषयांच्या संदर्भात कुठेही कोणतीही संधी मिळाली की ही मंडळी सभा, संमेलने भरवीत, व्याख्याने देत, छोट्यामोठ्या पुस्तिका काढीत, ठराव पास करीत, गावोगाव हिंडत व प्रत्यक्ष सरकारशी हेतुपूर्वक संघर्ष टाळून जनतेत जागृतीचे कार्य धडाडीने व निष्ठेने करीत. याची अनेक उदाहरणे उपलब्ध आहेत. तीन उदाहरण देतो.

२ ऑक्टोबर १९२१ ला महात्माजींचा ५३ वा वाढदिवस हैदराबादेत मोठ्या

उत्साहाने साजरा झाला. मोठी सभा झाली व ह्या गोष्टीची सरकारने एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये दखल घेऊन वामन नाईकांना तंबी द्यावी असा ठराव केला होता.

दुसरी घटना म्हणजे त्याच वेळेला आरंभ झालेल्या खिलापत चळवळीला हैदराबादेत व्यापक पाठिंबा मिळाला होता. सभा तर अनेक झाल्या, पत्रके निघाली. इंग्रज सरकारने मध्ये पडून निझामाने काहीतरी करावे असे सुचवावे लागले, इतपत तिचा ताण व दाब जाणवला.

तिसरी घटना म्हणजे ५ व ६ सप्टेंबर १९३० ला प्रजाशिक्षण परिषदेचे दुसरे अधिवेशन झाले. त्या सभेचा वृत्तान्त मुद्दाम डोळ्याखालून घालण्याजोगा आहे. त्या वेळी सभासंमेलनांवर कडक निर्बंध असताना ही परिषद घेतली होती व तरीही ह्या सर्व मंडळींनी सरकारी धोरणाला विरोध केलाच. त्या सभेत पं. केशवराव कोरटकर म्हणाले होते की, "ह्या परिषदेच्या मते शिक्षणप्रगतीत किंवा सभा भरविण्यात कसलेही अडथळे आणले जाऊ नयेत. असे असून नं ५३ च्या ज्या सरकारी हुकमाने अशा सभा भरविण्यास बंदी घालण्यात आली तो हुकूम परिषदेला असंमत आहे म्हणून तो सरकारने मागे घ्यावा. या हुकमाने सार्वजनिक काम करणाऱ्यांची पंचाईत, कुचंबणा होत आहे. बरे सार्वजनिक सभेची व्याख्याही कोठे केली नाही. आमच्या येथे एका इसमाचीही सार्वजनिक सभा होऊ शकते. मला वाटते सर्व जगात अशा तऱ्हेचा चमत्कारिक हुकूम कोणत्याही सरकारने काढला नसेल." हे त्या वेळचे प्रातिनिधिक मत होते व सकृद्दर्शनी बंधने पाळूनही माणसांचा प्रक्षोभ निरनिराळ्या ठिकाणी निरनिराळ्या पातळीवर संघटित होत होता. १९३८ ला त्याचा स्फोट झालेला दिसला. कारण त्याला मिळालेला अ.भा. काँग्रेसचा आशीर्वाद. पण जोपर्यंत अंतर्गत कार्याचा प्रश्न होता तेव्हा येथे ही झुंज चालूच होती. १९२० ते ३८ ह्या कालावधीत हैदराबादेत व जिल्ह्यातून जनजागृतीच्या दृष्टीने सभासंमेलनांची संख्या तर आमच्या अंदाजाप्रमाणे ५० तरी असेल. त्यात काही सभासंमेलने उघडपणे राजकीय म्हणून घेतलेली आहेत. तर आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक नावाने घेतलेल्या अशा मोठ्या सभा आहेत. त्या होण्यापूर्वी वाद झालेले आहेत व झाल्यावर चर्चा झालेल्या आहेत. त्यातून नव्या संघटना निर्माण होत गेल्या, काही मोडून गेल्या, काही पुन्हा निर्माण होत गेल्या. हे मोठ्या सभांचे, परिषदांचे झाले. मग लहानमोठ्या स्थानिक तर दर आठवड्याला होत गेल्याची नोंद उपलब्ध आहे. महापुरुषांच्या जन्ममृत्यूने हे खाद्य हैदराबादकरांना सतत पुरविले. सर्वांचा उद्देश एकच म्हणजे एक आपल्या समाजाची जागृती व उन्नती व त्यासाठी चळवळ. 'आकाशात् पतितं तोयं यथा गच्छति सागरम् । सर्व देवनमस्कारम्

केशवं प्रतिगच्छति' या न्यायाने हेही मुक्तिआंदोलनाचेच अंग होते. हे अंग बलवान होते म्हणून लढ्याची हाक काळाने देताच तोही समाज निमिषार्धात उभा राहिला. या सगळ्या प्रयत्नांचा जाणीवपूर्वक आरंभ १९२० मध्ये झालेला आम्हाला दिसतो. म्हणून आम्ही हैदराबादच्या संग्रामाचा आरंभबिंदू १९२० मानतो.

१९३८ ला लढा उभा राहिला व तोही लवकरच संपला. कारणे सुविदित आहेतच. मग त्यानंतर येतात वाटाघाटी. त्याही नेटाने घडल्या. १९३९ ते १९४६ पर्यंत. इतिहास म्हणून त्यातील प्रत्येक घटना, प्रत्येक व्यक्ती ही अभ्यासविषय झाली पाहिजे. आमच्या दृष्टीने ती झाली आहे. कुरुंदकरांशी मतभेद म्हणून नव्हे पण त्यांचे गमतीदार उदाहरण म्हणून जाता जाता एका व्यक्तीचा निर्देश करावासा वाटतो. कुरुंदकरांनी 'एजंट जनरल' या लेखात जी. रामाचार यांचा खोचक उल्लेख केला आहे. मुन्शी यांचा उपहास करताना त्यांनी रामाचार यांची "कुठला कोण सोम्या गोम्या" अशा भावनेने त्यांची संभावना केली आहे. रामाचार हे पात्र जुने आहे. १९३७ च्या सुमारास इत्तेहादुल मुसलमीनच्या बहादूर यार जंगाचे दडपण एकीकडे तर तत्पूर्वी वामन नाईक (मृ.१९३६) व अन्य चळवळींच्या सतत दडपणामुळे दुसरीकडे, तर १९३५ चा कायदा पास झाल्यानंतर फेडरेशनच्या योजनेत हैदराबाद सामील व्हावे म्हणून भारत सरकारचे दडपण तिसरीकडे अशा चौफेर दडपणातून पळवाट शोधण्यासाठी निझामाने अक्कलहुशारीने एक वाट शोधून काढली होती. ती म्हणजे अय्यंगार कमिटीची स्थापना. या कमिटीतून निष्पन्न काहीच झाले नाही, व्हायचेच नव्हते. पण त्या कमिटीच्या व हैदराबादच्या राजकीय सुधारणाविषयक ऊहापोह गृहीत होता. अपेक्षेप्रमाणे कमिटीचे काम फसल्यानंतर इत्तेहादुल मुसलमीन व काँग्रेस यांच्यात राजकीय सुधारणांच्या संदर्भात बऱ्याच वाटाघाटींच्या फेऱ्या झाल्या. बहादूर यार जंग यांच्यानंतर इत्तेहादुल मुसलमीन या संस्थेचे अध्यक्ष होते. मौ.अबुल हसन सय्यद अली. ते सौम्य प्रकृतीचे गृहस्थ होते. ह्यांनी संस्थानातील मुस्लिम राजकारणाला निराळे वळण देण्याचा प्रयत्न केला. या त्यांच्या प्रयत्नांना सर सालार जंग (तृतीय) यांचा मनापासून पाठिंबा होता. यातून थोडेफार राजकीय नवनीत उत्पन्न झाले होते व बऱ्याच मुद्द्यांवर काँग्रेस व इत्तेहादुल मुसलमीन यांच्यात समझोता झाला होता. तो निझामाने १९४१ च्या सुमारास स्वत: उधळून लावला. ह्या वेळी काँग्रेसच्या वतीने काशिनाथराव वैद्य, नरसिंगराव व रामाचार ह्या तिघांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. हा करार अमलात आला असता तर पुढचे रामायण वेगळे झाले असते. ते असो, पण अय्यंगार कमिटीच्या आधीपासून ते या वाटाघाटींच्या वेगवेगळ्या फेरीत जो रामाचार

होते, हे नोंदविणे महत्त्वाचे ठरते. त्यात हे गृहस्थ होते, ते कसे वागले, का वागले, हा प्रश्न वेगळा. पण कुरुंदकरांनी आपल्या विवेचनात उत्तरकालीन घटनांवर भर दिल्यामुळे संबंधित असा नजीकच्या इतिहास व व्यक्ती यांच्यावरही अन्याय होऊ नये म्हणून एक उदाहरण दिले एवढेच. लक्षात घ्यावयाचा भाग असा की १९३८ पूर्वीच्या हैदराबादचा इतिहास हे एक उद्योगपर्व होते. १९३८ ते १९४६ हे आंदोलन पर्व होते. १९४६ ते ४८ हे प्रक्षोभपर्व होते. प्रक्षोभपर्वाच्या शेवटच्या अंशाला मुक्तिपर्व म्हणण्यास अडचण पडू नये. या महाभारतातील प्रत्येक पर्व हे एकात एक अडकलेले होते. उभ्या आडव्या धाग्यांनी आठ घटकांचा निर्देश मागे आला आहेच. या उभ्या आडव्या धाग्यांचा इतिहास व त्याचा पट मोठा आहे व रोमहर्षकही आहे. या उभ्या आडव्या पटतंतूवर कुरुंदकरांनी मोठे मार्मिक विवरण या ग्रंथात केलेले आढळेल.

या घटकात कुरुंदकरांची लक्ष्यवेध झालेली व्यक्ती म्हणजे निझाम. निझाम म्हणजे सातवे निझाम मीर उस्मानअलीखां वयाच्या २५ व्या वर्षी १९११ ला तक्तनशीन झाले व शेवटपर्यंत त्यांनी आपल्या राज्याची सूत्रे आपल्या हातात ठेवली. त्या व्यक्तिमत्त्वाच्या आकलनाच्या आवश्यकतेवर कुरुंदकरांनी खूप भर दिला आहे. निझामाचे व्यक्तिमत्त्व हे बहुरंगी व बहुढंगी. आपला पिता महबूबअलीखां याच्यापेक्षा संपूर्णतः निराळे, गहन, गूढ, संमिश्र व अत्यंत महत्त्वाकांक्षी व पाताळयंत्री देखील. ह्या महत्त्वाकांक्षी स्वभावरचनेत हैदराबादच्या पारंपारिक इतिहासाची काही सूत्रे होती व तीच त्याने प्रभावीपणे रेटण्याचा प्रयत्न केला. त्यांपैकी महत्त्वाचे सूत्र म्हणजे हैदराबाद हे स्वतंत्र राज्य व्हावे ही आकांक्षा-इतिहासकाळातील वेळोवेळी इंग्रज सरकारशी झालेल्या व्यवहाराने, करारमदाराने ही स्वतंत्र राजवटीची कल्पना सीमित झालेली होती, हे खरे. या आकांक्षेचे व्यावहारिक प्रतिबिंब म्हणजे वऱ्हाडाचा प्रश्न. वऱ्हाड हा हैदराबादला भिडलेला भाग. तो निझामच्या हातून १९ व्या शतकाच्या मध्यावर इंग्रजांनी तैनाती फौजेच्या खर्चासाठी घेतला व पुन्हा काही परत केला नाही. त्या वेळचे निझामचे पंतप्रधान चंदुलाल यांची ती कर्तबगारी (?). त्यानंतर उद्‌भवले १८५७ चे युद्ध. त्या वेळी निझामाने इंग्रजांना खूप मदत केली व त्याच्या मोबदल्यात हा प्रांत परत मागितला. केवळ या मागणीचा पाठपुरावा करण्यासाठी पहिले सालार जंग १८७६ ला इंग्लंडला जाऊन आले, पण व्यर्थ! नंतर या बाबतीतला दुसरा महत्त्वाचा प्रयत्न झाला तो म्हणजे १९०२ मध्ये. त्या वेळी ६ मार्च १९०२ त्या वेळचे व्हाईसराय लॉर्ड कर्झन स्वतः हैदराबादेत आले होते व त्यांनी आपल्या व मीर महबूब अलीखांच्या भेटीत अक्षरशः दादागिरी करून त्यांनी विशिष्ट पद्धतीने वऱ्हाड इंग्रजांकडे राहण्याच्या

योजनेस संमती मिळवली. निझामाने नंतर कुरकूर केली, पण वऱ्हाड निझामाच्या हातून निसटला तो निसटलाच. एकीकडे वंगभंगाची योजना राबविणारा कर्झन व दुसरीकडे निझामाच्या विस्तारवादी धोरणाला शह देणारा कर्झन. जर वऱ्हाड निझामाच्या ताब्यात तेव्हा गेला असता तर उत्तरोत्तर निझाम बलवान झाला असताच व पुढे १९४७ ला तो भारत सरकारला मोठी डोकेदुखी ठरला असता. भारताच्या स्वातंत्र्याला फार मोठे ग्रहण लावण्याचे सामर्थ्य त्या सत्तेत आले असते. म्हणून लॉर्ड कर्झनची महत्त्वाची कामगिरी म्हणून ही घटना वेगळ्या संदर्भात, वेगळ्या अर्थाने ध्यानी घ्यावी लागते. सातवा निझाम गादीवर आल्यानंतर पहिल्याप्रथम त्याने सर अली इमामची पंतप्रधान म्हणून नियुक्ती केली (१९०१). हे इमाम म्हणजे इंग्रजांच्या एक्झिक्युटिव्ह कौन्सिलचे सदस्य. वजनदार असामी. त्यांच्या नेमणुकीमागचा हेतू वऱ्हाड मिळवणे हाच होता. त्यांनी इंग्लंडमध्ये जाऊन प्रचंड पैसा खर्च केला. त्यांच्या प्रयत्नांचा जो आरंभ झाला तो पुढे पुढे बराच वाढत गेला. त्यातूनच एका सॉलिसिटर कंपनीचे वकील व लॉर्ड माऊंटबॅटन यांचे स्नेही लॉर्ड मॉक्टन निझामाच्या मदतीसाठी आले. ही घटना १९४० पूर्वीची आहे. लंडनच्या कॉवर्डचान्स अँड कंपनीचे ते एक सॉलिसिटर होते व इंग्रज सरकारकडे वऱ्हाडची वकिली करण्यासाठी कंपनीने त्यांची नियुक्ती केली. केवळ या एका कंपनीसाठी निझामाने १९ लाख पौंड खर्च केल्याची नोंद आहे. ह्याच लॉर्ड मॉक्टननी नेहरू, पटेल यांच्या गळी "जैसे थे" करार उतरविला होता, ह्याच काळात निझामाच्या घटनाविषयक खात्यातील अधिकारी नबाब अलियावर जंग यांचा व त्यांचा संबंध आला. पुढे तो १९४० ला जगासमोर दृष्टोत्पत्तीस आला. आरंभी या सगळ्या प्रयत्नांचे सूत्र होते वऱ्हाड मिळवणे. त्या प्रयत्नांचा भाग म्हणजे निझामाने खुद्द बॅ.महंमद अली जिना व जाफरुल्लाखान यांना वार्षिक हजार पौंड मोबदल्यावर दीर्घकाळ नियुक्त केले होते, यच्चयावत ब्रिटिश वृत्तपत्रे, पार्लमेंटचे सभासद तर मदतीला होतेच. सगळा इतिहास येथे सांगण्यास सवड नाही, पण १९०१ ते १९४७ पर्यंत निझामाने वऱ्हाड मिळवण्यासाठी अक्षरशः प्रयत्नांची पराकाष्ठा केली. खुद्द ब्रिटिश सम्राटाच्या समोर गाऱ्हाणे पेश झाले. पण इंग्रज सरकार बधले नाही. एकीकडे इंग्रजांशी सहकार्य करायचे, युद्धात मदत करायची व दुसरीकडे आपण भारतातील अन्य संस्थानिकांपेक्षा निराळे आहोत व काही विशेष अधिकार आपणास मिळावे, नव्हे आहेत; अशी भूमिका घ्यायची ही प्रारंभीच्या निझामाची भूमिका १९११ नंतर अधिक स्पष्टपणे दृग्गोचर झालेली दिसते. एकदा तर व्हॉईसरॉय लॉर्ड रीडिंग यांना लिहिलेल्या एका पत्रात आपल्या या भूमिकेचा निझामाने निःसंदिग्ध पुनरुच्चार केला व लॉर्ड रीडिंग

यांनींही एकदाच काय ते बोलून सोक्षमोक्ष व्हावा अशा पद्धतीने निझामाला सुनावले. हा पत्रव्यवहार महत्त्वाचा आहे. निझामाने व्हाईसरॉयला २० सप्टेंबर १९२५ रोजी पत्र लिहिले. त्यात निझामाने म्हटले होते की -

"Save and except matters relating to foreign powers and policies, the Nizams of Hyderabad have been independent in the internal affairs of their State just as much as the British Government in British India. With the reservation mentioned by me, the two parties have on all occassions acted with complete freedom and independence in all inter-Governmental questions that naturally arise from time to time between neighbours. Now, the Berar question is not and cannot be covered by that reservation. No foreign, power of policy is concerned or involved in its examinations and thus, the subject comes to be a controversy between the two Governments that stand on the same plane without any limitations of subordination of one to the other."

निझामाच्या या पत्रातील भूमिकेतील वाक्य न् वाक्य नव्हे शब्द न् शब्द स्वतःच्या स्वातंत्र्याचा उद्घोष करणारा आहे. ती ब्रिटिशांना मान्य होणे शक्य नव्हते. पण ही भूमिका मांडण्याची हिंमत निझामाने १९११ ला दाखविली, १९२६ ला दाखविली व हीच भूमिका अधिक विस्तारून १९४६ ला स्वतंत्र भारत सरकारसमोर आली. इंग्रज सरकारच्या वतीने लॉर्ड रीडिंग यांनी त्या वेळी निझामाला उत्तर देताना लिहिले होते,

"The Sovereignty of the British Crown is supreme in India, and therefore no Ruler of an Indian State can justifiably claim to negotiate with the British Government on an equal footing. Its supremacy is not based only upon treaties and engagements, but exists independently of them and, quite apart from its prerogative in matters relating to foreign powers and policies, it is the right and duty of the British Government[ while scrupulosly respect all treaties and engagements with the Indian States, to preserve peace and good order throughout India. The consequences that follow are so well known, and so clearly apply no less to your Exalted Highness that to other Rulers, that it seems hardly necessary to point them out. But if illustrations are necessary, I would remind Your Exalted Highness that the Ruler of Hyderabad along with other Rulers received in 1862 a Sanad declaratory of the British Government subject to continued loyalty to the Crown; that no succession in the Masnad of Hyderabad is valid unless it is recognised

by his Majesty the King-Emperor; and the British Government is the only arbiter in cases of disputed succession."

या परिच्छेदात व्हाईसरॉयची प्रतिबिंबित झालेलीच भूमिका पुढे १९४८ ला भारत सरकारच्या वतीने घेण्यात आली व त्यानुसार पोलिस कारवाई झाली म्हणजे निझामाची आकांक्षा हा त्याच्या व्यक्तिगत आकांक्षेचा परीघ ओलांडून भारतीय स्वातंत्र्याच्या अस्तित्वाशी निगडित झाली होती.

निझामाने आपली ही वऱ्हाडची मागणी अगदी थेट 'जैसे थे' करारापर्यंत ताणून धरली होती. ह्याचा अर्थ असा की आपले बळ वाढविण्यासाठी इंग्रजांनी सगळ्या युक्त्या वापरावयाच्या व नंतर त्यातून मिळवलेल्या बळावर जनतेला ठेचायचे. इंग्रजांनी निजामांला मात्र त्याच्या जागी जखडून ठेवण्याचे धोरण स्वीकारले होते. पुढे १९३८ ला लॉर्ड लिनूलिथगो यांच्याशी संघयोजनेत सामील होण्याच्या संदर्भात हेच धोरण प्रकट झाले. दुसरे महायुद्ध सुरू झाले म्हणून दोघांनीही श्वास टाकला. सगळेच सुधारणेचे ठराव गुंडाळले गेले. पण हात दाखवून अवलक्षण होण्याचा प्रकार कसा घडत गेला व त्यासाठी वऱ्हाडचे कोलीत कसे वापरले गेले म्हणून हा ऊहापोह केला एवढेच.

निझामाला फक्त आपल्या स्वातंत्र्याचा घोष करून थांबावयाचे नव्हते तर इस्लामी राजवटीची स्थापना करण्याचे त्याचे स्वप्न होते. त्याचा उल्लेख कुरुंदकरांनी केला आहेच. ह्या संदर्भात एकच पुरावा नोंदविणे पुरेसे होईल. १९२८ ला निझामाच्या सेवेतील सय्यद अख्तर हुसेन हे इंजिनियर गृहस्थ हजच्या यात्रेचे सोंग म्हणून किंवा भारत सरकारला संशय येऊ नये म्हणून निझामाच्या सल्ल्याने मक्का-मदिनेस १९२९ ला गेले. त्यांना तेथल्या मशिदीतील असंख्य गैरसोयी व दुरवस्था आढळली. या धर्मस्थळांचे पुनरुज्जीवन करायचे तर काय करावे लागेल याचा त्यांनी प्लॅनच तयार केला, मापे घेतली व निझामाला ९ लाखांची दुरुस्ती योजना सादर केली. पुढे भारत सरकारने चौकशी केल्यानंतर निझामाने सारवासारव केली. पण याच निझामाने आपल्या हैदराबाद राज्यांतर्गत हिंदू धर्मस्थळांच्या बाबतीत एक फर्मान काढले. त्यात, "ज्या गावात मुसलमानांची वस्ती बरीच असेल त्या गावात हिंदू देवस्थानांचा विस्तार करू नये, दुरुस्ती करू नये." या हुकुमान्वये राज्यात हिंदू दानशूर मंडळींनाही धाक वाटावा अशी व्यवस्था झाली. या हुकुमाबाबत बरीच आरडाओरड झाली. म्हणजे निझामाच्या समोरचे स्वप्न कसे होते व तसे कसे आरंभापासूनच होते हे उघड होईलच.

निझामाच्या या कूटनीतीचे आणखी एक दृश्यफळ इत्तेहादुल मुसलमीन या संघटनेचे रूप. परिस्थितीच्या दडपणाखाली निझामाला ती वाढवावी लागली. मुळात ती

१९२६ पासून वावरणारी, आरंभीची सेवाभावी संघटना होती. पण १९३० नंतर सबंध भारतात राष्ट्रीय मागण्यांचे दडपण वाढत होते. तीन गोलमेज परिषदा झाल्या व त्यातून अंतिमतः १९३५ चा कायदा अस्तित्वात आला. या कायद्यातले महत्त्वाचे कलम म्हणजे संघराज्य व्यवस्थेचे होते, ते मुळात निझामाला मान्य नव्हते, होणे शक्यच नव्हते. पण उघडपणे नाही म्हणायची सोयच नव्हती. ह्या दृष्टीने तीनही गोलमेज परिषदांतील हैदराबादचे सर सय्यद अकबरी यांच्या नेतृत्वाखालच्या शिष्टमंडळाचे वर्तन व कार्य पटण्याजोगे आहे. ते सबंध राजकीय सुधारणेला शह देणारे होते. त्यात निझामाने जातीने लक्ष घातले होते. त्यातून कायदा तर झाला मग तो बुडवायचा कसा? त्या योजनेतून इत्तेहादुल मुसलमीन संस्थेला हिंदूंची प्रतिरोधी संस्था म्हणून उत्तेजन दिले. या संस्थेच्या नेतृत्वाने सतत भारत सरकारच्या रेसिडेंटचा व त्यांच्या कलाने चाललेल्या मंत्रिमंडळाचा कधी प्रच्छन्नपणे तर कधी उघडपणे धिक्कार केला. का तर जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीची लाट थोपवायची होती. त्यासाठी साम, दाम, दंड, भेद सगळे मार्ग वापरण्यात आले. स्टेट काँग्रेसवर बंदी येण्याचे कारण केवळ ती सत्याग्रह करते किंवा करेल म्हणून नव्हे तर राजकीय सुधारणाच थोपविण्याचा तो एक आवश्यक भाग होता. पण सगळे एकदम सांगून टाकायचे नसते व निझामाने ते केले नाही. त्यांनी व मंत्रिमंडळाने सतत हिंदू पुढाऱ्यांबरोबर वाटाघाटी केल्या व येथे कौतुकाने व अभिमानाने नोंदवावेसे वाटते की, आमची मंडळी त्या परीक्षेत कसास उतरली. या काळात श्री. काशिनाथराव वैद्य व एम.नरसिंहराव यांचे खरे कर्तृत्व प्रगट झाले. आपला मुद्दा, भूमिका यत्किंचितही न सोडता त्यांनी मुस्लिम समाज, नेते, कार्यकर्ते, राज्यकर्ते यांच्यासमोर सर्वसाधारण तमाम जनतेची जबाबदार राज्यपद्धतीची मागणी वेगवेगळ्या शब्दांत ठणकावून मांडली. सत्याग्रह बंद असूनही हे जनसंघटनेचे त्यांचे कार्य चालू होते. विशेषतः उमरी येथे झालेले १९४१ चे अधिवेशन त्या दृष्टीने विशेष ऐतिहासिक मानावे लागेल. त्या वेळी अध्यक्षीय भाषणात श्री. काशिनाथराव वैद्य यांनी आपली सबंध भूमिका संपूर्ण लोकशाही व संपूर्ण स्वातंत्र्य यांच्याजवळ नेऊन ठेवली. कुरुंदकरांनी काही ठिकाणी अशा मंडळींचा उल्लेख "मवाळ" म्हणून केला आहे. तो या सर्व कार्यकर्त्यांना अन्याय करणारा आहे, असे आम्हाला वाटते. सत्याग्रहाच्या वेळी सत्याग्रह, सभेच्या वेळी सभा, शस्त्रासाठी शस्त्र, शेवटी ही साधनेच. हेतू समाजाचे नीतिधैर्य सांभाळून त्याला पुढे रेटीत नेणे. हैदराबादच्या इतिहासाच्या संदर्भात म्हणून १९३९ ते ४६ या कालावधीतील एकूण कार्य मला

महत्त्वाचे वाटते. व्यक्तिगत आवडनिवड म्हणून कुणी कुणाचे जास्त कमी कौतुक केले तर आमचे त्याच्याशी भांडण नाही.

१९४६ ला स्टेट काँग्रेसची बंदी उठल्यानंतर राजकीय चळवळीला तुफान आले. या संदर्भात कुरुंदकरांच्या नजरेतून निसटलेली एक गोष्ट जाता जाता येथे नमूद करावीशी वाटते ती म्हणजे हैदराबाद राज्यातील, शहरातील, खेड्यातील, सर्व थरांतील, सर्व व्यवसायांतील मंडळींनी प्रगट केलेला निर्धार. या सर्वांची कुणीतरी कोठेतरी दखल घ्यायला हवी. सरकारी नोकरीत नसणारे प्रक्षोभाने पेटलेले असत, तर नोकरीत असलेलेही प्रक्षोभाने पेटलेले असत. वरून शांत वाटणारा ज्वालामुखीचा हा पर्वत आतून खदखदत होता. अत्याचाराला प्रतिकार करतानाही तो लाव्हा प्रकट होत होता. सीमा भागात सशस्त्र आंदोलनातही प्रगट होत होता. हा सबंध असंतोष व्यापक, खोल व दीर्घकालीन असल्यामुळेच भारत सरकारला हैदराबादेत शिरणे शक्य व सोपे झाले. १९४६ च्या सुमारास हैदराबाद राज्यातील वकिलांनी कोर्टावर बहिष्कार घालण्याची जी चळवळ केली तीही अजोड होती. कागदपत्रांच्या, पुराव्यांच्या, पंचनाम्यांच्या, छायाचित्रांच्या, वृत्तान्तांच्या आधारे त्यांनी हिंदू जनतेवरील अत्याचार दिल्लीला पोचविले व त्याचा नंतर सर्वत्र प्रसार झाला. पोलिस कारवाईसाठी ते एक सबळ कारण ठरले हेही नमूद करायला हवे. ह्याच वकील मंडळींनी भारत सरकारला वेळोवेळी दिलेल्या वृत्तान्ताच्या आधारेच श्वेतपत्रिकेचा मजकूर पुरविला. हे काम जिकिरीचे, चिकाटीचे व धैर्याचेही होते. इतिहासात त्याची नोंद व्हायला हवी व योग्य मूल्यमापनही व्हायला हवे म्हणून हा सबंध कालखंड केवळ प्रक्षोभपूर्व म्हणून भागणारे नाही, तर सबंध समाजच्या समाज काळाला आव्हान देत उभा राहिला म्हणून महाकाव्याचा अंश होय.

हैदराबादच्या इतिहासाच्या संदर्भातील काही मुद्द्यांचा ऊहापोह कुरुंदकरांच्या विवेचनाच्या संदर्भात केला. हा विषय त्यांच्या व आमच्याही जिव्हाळ्याचा. त्या विषयावर कितीही लिहिले, बोलले तरी कमीच वाटेल. पण या सर्व लेखनातून हैदराबादच्या एकूण इतिहासाकडे पाहण्याची अभ्यासकांची, वाचकांची दृष्टी विस्तारावी म्हणून हा प्रपंच केला. वाचक कुरुंदकरांच्या ह्या ग्रंथाचे प्रेमाने स्वागत करतील असा भरवसा वाटतो.

**द.पं जोशी,**
'माऊली', ३-४-१०१३/२६/
वरकतपुरा, हैदराबाद ५०० ०२७.

## १.

# माझा मराठवाडा

मराठवाडा या शब्दाला एका बाजूने पाहिले तर फार अर्थ आहे. दुसऱ्या बाजूने पाहिले तर या शब्दाला काहीच अर्थ नाही. आम्ही मंडळी हा शब्द सार्थ म्हणून शिल्लक उरावा या मताची नाही. हा शब्द निरर्थक व्हावा या मताची आहोत. जन्मभर आमच्या नेत्यांनी जी धडपड केली ती हा शब्द सार्थ असावा म्हणून नाही तर तो शब्द निरर्थक व्हावा म्हणून. पण अजून नियतीची इच्छा हा शब्द निरर्थक व्हावा अशी दिसत नाही. ठीक आहे. मराठवाडा शब्द अर्थपूर्ण असणेही आम्हाला मान्य आहे. कारण आम्ही त्या शब्दाला अस्मितेचा अर्थ दिला आहे.

मराठवाड्याला एक ऐतिहासिक संदर्भ आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले आणि पुढे पेशव्यांनी टिकविलेले, वाढविलेले मराठी राज्य नसते तर मग मराठी बोलणारा सगळा भाग हा मोगलांच्या दक्षिण सुभ्याचाच भाग झाला असता. त्याचा वेगळा मराठवाडा म्हणून उल्लेख करण्याची गरज नव्हती. पेशव्यांना जर वेळोवेळी मिळालेले विजय पचविण्याची क्षमता असती तरी मराठवाडा निर्माण झाला नसता. पेशवाईचा पाडाव झाल्यानंतर आणि फौजांच्या खर्चासाठी जो वऱ्हाड इंग्रजांनी तोडून घेतला तो देऊन झाल्यानंतर एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात हैदराबाद संस्थानला एक दिवाण सालारजंग म्हणून मिळाले. जेवढे राज्य निर्माण करण्याची पहिल्या निजामाची इच्छा होती, आणि मागोमाग जेवढे राज्य निर्माण करण्यात नंतरचे निजाम गुंग होते त्या साऱ्याचा नाद सोडून सालारजंगांनी हैदराबादचे जे संस्थान शिल्लक उरले होते त्याची व्यवस्था लावली. जाता जाता सर्वांचे लचके तोडून झाल्यावर जे संस्थान शिल्लक उरले होते तेही भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. सालारजंगांनी

या संस्थानात नवीन व्यवस्था लावली. पूर्वीचे वसूल करणारे गुत्तेदार बाद करून त्यांनी पगारी नोकर निर्माण केले. हैदराबाद संस्थानची एकूण सोळा जिल्ह्यांत विभागणी करून प्रत्येक जिल्ह्यावर एक एक पगारी कलेक्टर नेमला. या सोळा जिल्ह्यांचे त्यांनी मराठी बोलणारे, कानडी बोलणारे असे एक एक व तेलगू बोलणारे दोन असे एकूण चार सुभे केले. या प्रयत्नात हैदराबाद संस्थानातील मराठी बोलणारा प्रदेश एक सुभा म्हणून बनला. हा सुभा म्हणजे मराठवाडा. मूळ मुसलमानी पद्धतीने उच्चार करायचा तर मऱ्हेटवाडी. मराठी लोकांचा प्रदेश.

आम्ही निजाम राजा राहावा याला विरोधी होतो. राजेशाहीच्याच विरोधी होतो. मोगली साम्राज्याचा हा शेवटचा अवशेष शिल्लक राहावा हेही आम्हाला नको होते. आम्हाला भारताचा एक प्रांत म्हणून हैदराबाद संस्थान शिल्लक रहावे हे नकोच होते. हैदराबादने भारतीय संघराज्यात विलीन व्हावे हा आमच्या मागणीचा फक्त पहिला टप्पा होता. या संस्थानाचे तीन भाषावार तुकडे करून मराठवाडा महाराष्ट्राला जोडावा आणि संपूर्णपणे एकात्म महाराष्ट्र निर्माण व्हावा ही आमची आकांक्षा. ही आकांक्षा पूर्ण व्हायची म्हटल्यानंतर मराठवाडा या वेगळ्या अस्तित्वाची तरी गरज काय? आम्ही महाराष्ट्रात विनशर्त सामील होणाऱ्यापैकी आहोत. तेव्हा मराठवाडा हा शब्द निरर्थक व्हावा हीच आमची आकांक्षा आहे. महाराष्ट्र राज्य बनले. पण ते ज्या पद्धतीने चालले त्या पद्धतीमुळे मराठवाडा हा शब्द निरर्थक व्हावा ही जी आमची इच्छा ती मात्र पूर्ण झालेली नाही. लवकर पूर्ण होईल असे दिसतही नाही.

मराठवाडा हा शब्द निरर्थक झाला पाहिजे असे आम्ही म्हणतो त्यावेळी एकात्म महाराष्ट्र निर्माण व्हावा आणि महाराष्ट्राच्या सर्व विभागांत असा एकजीवपणा निर्माण व्हावा की वेगळेपणा सांगण्याची गरजच वाटू नये असे आम्हाला अभिप्रेत असते. मराठवाडा शब्द निरर्थक व्हावा ही आमची इच्छा महाराष्ट्र एकजीव व्हावा या ध्येयवादाशी निगडीत आहे. आपले पृथक अस्तित्व टिकवून धरण्यासाठी झटणारी वेगळिकीची भावना इथे प्रबल नाही. इच्छा नसताना आम्ही महाराष्ट्रात आलेलो नाही. इच्छा नसताना महाराष्ट्रात अडकून पडलेलो नाही. आम्ही स्वेच्छेने, आग्रहाने व हट्टाने महाराष्ट्रात आलो. कारण आम्ही महाराष्ट्रातच आहो ही आमची उत्कट जाणीव आहे. जनतेच्या स्मृती फार अल्पकालीन असतात नाही तर आमच्या हट्टामुळे महाराष्ट्र झाला. एरवी तो अस्तित्वात आला नसता याची आठवण लोक विसरले नसते.

मराठवाडा या शब्दाची आम्हाला लाज वाटत नाही. वाटतो तो अभिमान.

अभिमानाने आणि गर्वाने सांगावे असे आमच्या जवळ किती तरी आहे. मराठवाडा नावाचे काही लांच्छन आहे व ते आम्ही विसरू इच्छितो अशी मुळीच गोष्ट नाही. मराठवाडा हा अभिमान व गौरवाचा भाग आहे पण महाराष्ट्रात तो आम्ही विलीन करू इच्छितो असे आमचे म्हणणे आहे. मात्र ही क्रिया प्रेमानेच होणार. तुम्ही मराठवाड्याचा पराभव करून हे घडवून आणू शकणार नाही. पराभव करण्याचे प्रयत्न फक्त कटुता वाढवतात, वेगळेपणाची जाणीव बळकट करतात.

मराठवाड्याजवळ अभिमान बाळगण्याजोगे खूप आहे. आद्यकवी मुकुंदराज आणि ज्ञानेश्वर यांच्यावर अजून वाद चालू आहेत, ते जरूर चालू द्या. पण नामदेव, जनाबाई, गोराकुंभार, एकनाथ, मुक्तेश्वर, रामदास हे तर आमचे आहेत. महानुभाव पंडित नरेन्द्र भास्कर तर मराठवाड्याचे आहेत. सातवाहनाची राजधानी पैठण आणि यादवांची राजधानी देवगिरी ही ठिकाणे तर मराठवाड्यात आहेत. पुष्कळ वेळेला ठळक बाबींची नोंद मुद्दाम करावी लागते. छत्रपती शिवाजी महाराजांचे घराणे वेरूळच्या पाटलांचे. महाराजांच्या मागे आपले पुण्य उभा करणारा रामदास जांबेचा. महाराजांना क्षत्रिय ठरवून राज्याभिषेक करणारा गागाभट्ट पैठणचा. महाराजांचे उपपंतप्रधान अण्णाजी दत्तो मराठवाड्याचे, पंतप्रधान मोरोपंत पिंगळे हे बिलोली जवळ नांदेड जिल्ह्यातले म्हणजे मराठवाड्याचे. महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजापूरवासिनी आणि तीन ज्योतिर्लिंगे - वेरूळ, औंढा नागनाथ, परळी-मराठवाड्यात. वेरूळचे कैलास लेणे व अजिंठ्याची चित्रकला इथली. साहित्याचा, संस्कृतीचा केवढा तरी गौरवशाली अभिमानास्पद वारसा मराठवाड्याचा आहे. त्या वारसाचा रास्त अभिमानही आम्हाला आहे. पण आमचा शिवाजी सर्व महाराष्ट्र आपला मानणारा आहे. तो मराठवाड्याचे वेगळेपण सांगणारा नाही याचा अभिमान आम्हाला जास्त आहे.

फार जुन्या इतिहासातल्या गोष्टी सांगण्याने वर्तमानकाळात निभाव लागणार नाही हे मलाही कळते. शिवाजीने निर्माण केलेल्या मराठी राज्याचे लाभ तर महाराष्ट्राला झालेच. पण पेशवाई बुडाली आणि इंग्रजांचे राज्य आले याचेही लाभ महाराष्ट्राला मिळाले. हे लाभ आम्हाला मिळाले नाहीत. निजामाच्या राजवटीत आम्ही दडपलेले राहिलो. हे आमचे ऐतिहासिक कारणामुळे निर्माण झालेले मागासलेपण आहे. तेही आम्ही नाकारत नाही आणि या आमच्या ऐतिहासिक मागासलेपणाला इतर कुणी जबाबदार आहे असे आम्हां समजत नाही. वर्तमानाचे भान आमच्या मनात आहे पण ते आकसशून्य आहे. निजामाच्या राजवटीत आम्हाला अडकून पडावे लागले याबद्दल

पुण्यामुंबईला आम्ही गुन्हेगार ठरविलेले नाही. सगळे हैदराबाद संस्थान मागासलेलेच होते. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या हैदराबाद संस्थानात धर्मवेडी जातीय राजवट नांदत होती. कधी तरी हा अंधार संपणार होता. सर्व भारतभर पेटलेल्या स्वातंत्र्य आकांक्षेने हैदराबाद संस्थानसुद्धा पेटून उठणारच होते. हैदराबाद संस्थानात जागृतीचे अग्रदूत कोण होते? कुणी वामन नाईकांचे नाव घेतील, कुणी केशवराव कोरटकरांचे नाव घेतील. दोघेही मराठीभाषिक होते. मराठवाडाच हैदराबादच्या स्वातंत्र्य आंदोलनात अग्रभागी होता. हैदराबाद स्टेट काँग्रेसचे अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ. जन्माने कानडी पण मराठवाडा त्यांची कर्मभूमी. हे मराठवाड्याचे नेते. सगळ्या सशस्त्र आंदोलनाचे म्हणजे कृतिसमितीचे अध्यक्ष दिगंबरराव बिंदू मराठवाड्याचे. कृतिसमितीचे चिटणीस गोविंदभाई श्रॉफ हे तर आजही मराठवाड्याचे सर्वांत आदरणीय नेते मानले जातात. हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य लढ्यात मराठवाडा अग्रेसर होता. जागृतीतही आणि पुढे सशस्त्र आंदोलनातही.

हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्य-लढ्याचा अर्थ पुष्कळदा लोकांना कळत नाही. तो केवळ संस्थानाच्या विलीनीकरणाचा लढा नव्हता. भारताच्या प्रादेशिक अखंडतेचाच तो लढा होता. ज्या संख्येने इथे सत्याग्रह झाले, ज्या संख्येने सशस्त्र आंदोलनात लोक सहभागी झाले ते प्रमाण भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सर्वोच्च प्रमाण आहे आणि जनतेवर जे अत्याचार झाले त्याचे प्रमाणही फार मोठे आहे. उठसूठ कोणत्याही छोट्यामोठ्या घटनेच्या वेळी रझाकारांची आठवण काढणारे लोक आहेत. त्यांना रझाकारांचे अत्याचार म्हणजे काय हेही माहीत नसते. आणि सशस्त्र रझाकार व सर्व धर्मवेडे साह्याला घेऊन शासन नागवेपणाने नाचत होते तरीही जी जनता झुंजत राहिली, जिचा कणा व मान ताठ राहिली त्यांच्यावर सहजासहजी पराभव लादता येत नसतो, हेही पुष्कळ मंडळी विसरतात. प्रतिकूल परिस्थिती व अनन्वित अत्याचार म्हणजे काय हे आम्ही भोगलेले आहे. तरीही हे सारे पाशवी सामर्थ्य मराठवाड्याला नमवू शकले नाही. या आमच्या स्वातंत्र्यलढ्याचा आम्हाला रास्त अभिमान आहे. आमचा स्वातंत्र्यलढाच कुणी पुसून टाकतो म्हटले तर ते जमणारे नव्हे. भारतीय स्वातंत्र्याच्या लढाईत त्याग, बलिदानाच्या रोमहर्षक कहाण्यांत मराठवाडा नेहमी अग्रभागी राहिला. हुतात्मा गोविंदराव पानसरे, हुतात्मा बहिर्जी नाईक हे दोन हुतात्मे म्हणजे बलिदान करणाऱ्या अनेकांचे प्रतिनिधी. आमचा हा गौरवास्पद वारसा आहे. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात आम्ही पुढे होतो. राष्ट्रासाठी मरण्यात आम्ही पुढे होतो हे अभिमानाने सांगताना आम्हाला संकोच

वाटण्याचे कारण काय?

१७ सप्टेंबर १९४८ ला पोलिस ॲक्शन झाली व हैदराबाद भारताचा अविभाज्य भाग झाला. यानंतर क्रमाने भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरीत राहिली. हैदराबादचे विभाजन व्हावे व भाषावार प्रांत बनावे या भूमिकेचा आग्रही पुरस्कार करण्यात मराठवाडा पुढे होता. भारतीय नेत्यांच्यापैकी पं. नेहरू हैदराबादच्या विभाजनाला प्रतिकूल होते हे एक उघड गुपित आहे. मराठवाडा जवळजवळ एकमुखी महाराष्ट्रवादी राहिला नसता तर महाराष्ट्र अस्तित्वात आला नसता. मराठी भाषिकांचे दोन प्रांत अस्तित्वात आले असते हेही उघड गुपित आहे. आपण जर अटी घालीत बसलो तर महाराष्ट्र अस्तित्वात येणारच नाही म्हणून मराठवाड्याच्या एका पिढीचा सत्यानाश झाला तरी चालेल पण महाराष्ट्र हवा ही आग्रही भूमिका आम्ही घेतली. आपण नुसते महाराष्ट्राचे घटक नाही तर निर्माते आहो अशी आमची भूमिका आहे, या भूमिकेची कुणी बूज ठेवली नाही हा प्रश्न अलाहिदा. पण आम्हाला असे वाटतेच की आपली ही कष्ट भोगण्याची तयारी हा अभिमानास्पद ठेवा आहे. आम्ही बिनशर्त महाराष्ट्रवादी होतो. ज्येष्ठ राजकीय नेत्यांनी आपले राजकीय अस्तित्व संपवून ती तयारी ठेवून महाराष्ट्र जन्माला घातला.

बिनशर्त महाराष्ट्रात जाणे म्हणजे काय याची थोडीफार कल्पना आम्हाला होतीच. हैदराबाद 'ब' गटातील प्रांत होता. उर्वरित महाराष्ट्र 'अ' गटातील प्रांत होता. 'ब' प्रांतातील तीन वर्षांची सेवा म्हणजे 'अ' गटातील दोन वर्षांची सेवा. या नियमामुळे मराठवाड्यातील मंडळींची सेवाज्येष्ठता गेली. उच्च न्यायालयाचे खंडपीठ नसल्यामुळे अनेक वकिलांचे धंदे बसले. राजकारणात तर सर्व जुन्या नेत्यांना निवृत्तच व्हावे लागले. हे व असे अनेक परिणाम मराठवाड्यातील मंडळींना भोगावे लागले. आज याही गोष्टी जुन्या झालेल्या आहेत. त्या उगाळीत बसण्याची आमची इच्छा नाही.

मराठवाड्यात कर्तृत्व भरपूर. बौद्धिक क्षमताही भरपूर आहे. पूर्वी निजामाचे राज्य चालू असताना दिवाकर कृष्ण, नांदापूरकर, बी. रघुनाथ यांच्यासारखे साहित्यक्षेत्रातील नेते आमच्याकडे झाले. आज कान्त, महानोर तीच परंपरा चालवीत आहेत. सर्व महाराष्ट्रात ज्यांच्याविषयी आकर्षण आहे असे वाङ्मयाचे नेते मराठवाड्यात आहेत.

मग आमची तक्रार कोणती आहे? तक्रार इतिहासाविषयी नाही. ती वर्तमानकाळाविषयी आहे. मराठवाडा सर्व महाराष्ट्राचे धान्यकोठार होण्याची क्षमता

असणारा भाग आहे. औद्योगिक विकासाची प्रचंड क्षमता इथे आहे. मराठवाडा आणि उरलेला महाराष्ट्र यात विकासाची फार मोठी दरी आहे. मुंबई विद्यापीठ इ.स. १८५६ सालचे तर मराठवाडा विद्यापीठ इ.स. १९५८ चे. अंतर कुणालाही कळावे इतके उघड आहे. पश्चिम महाराष्ट्रात दरडोई उत्पन्न ३४५ असते तेव्हा मराठवाड्यात ते दरडोई फक्त १७४ रुपये असते. मराठवाडा मागासलेला आहे हे एक न नाकारता येणारे सत्य आहे. ही विकासाची दरी संपवून मराठवाडा सर्वांच्या बरोबरीने यावा हे लवकर, झटकन घडणारे कार्य नाही त्याला उशीर लागेल हे मान्यच आहे. पण उशीर लागेल म्हणजे किती उशीर लागेल? माझे एक मित्र म्हणाले, हे अंतर भरून काढण्यास ५० वर्षे लागतील. मी म्हटले माझी हरकत नाही. मी ५० वर्षे थांबण्यास तयार आहे. पण महाराष्ट्राशी जेव्हा आम्ही संलग्न झालो तेव्हा लोक म्हणत हे अंतर भरून काढण्यास ५० वर्षे लागतील. १९५६ ते आजतागायत या आश्वासनाचा जवळपास निम्मा भाग संपला आहे. २५ वर्षांत हे अंतर कमी किती झाले? ५० टक्के कमी झाले असेल तर फारच चांगले. हे अंतर ३०/४० टक्के कमी झाले असेल तरी मी निराश होणार नाही. सत्य असे आहे की मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यांच्यातील अंतर गेल्या २५ वर्षांत कमी झालेले नाही. उलट हे अंतर वाढलेले आहे. तक्रारीचा मुद्दा हा आहे. महाराष्ट्र एकात्म व्हायचा असेल तर महाराष्ट्राच्या विविध भागांतले अंतर कमी व्हायला हवे. ते जर वाढत असेल आणि याबाबत कोणतीही अपराधाची जाणीव महाराष्ट्रात नसेल तर मग आमची तक्रार आहे. हा बेदरकारपणा महाराष्ट्राच्या अस्तित्वालाच धक्का लावील. जे आम्ही निर्माण केले ते केवळ बेजबाबदारपणे वागल्यामुळे धोक्यात येईल याची खंत आम्हाला आहे. आणि आम्ही असा महाराष्ट्राच्या एकात्मतेचा विचार करतो याचा अभिमानाही आहे.

मराठवाडा ही गौरवाने सांगण्याजोगा वारसा असणारी संतांची तशीच लढवय्यांची जमीन. विकासाची क्षमता असणारी जिद्दी माणसांची भूमी. पण आकांक्षा आहे महाराष्ट्राच्या गौरवात एकजीव होण्याची. मराठवाड्याचे निराळेपण संपावे ही. आणि खंत आहे याची की हे घडून येण्याऐवजी मराठवाडा या नावाने लढत राहणे आम्हाला भाग पाडले जात आहे ह्याची.

❋ ❋ ❋

(व्याख्यानाचा हस्तलेख-बहुधा अमुद्रित.)

# २.

# माळरानावरील कवडसे

इ. स. १९५२ पर्यंतचा काळ हा स्वप्नाळूपणाचाच काळ म्हटला पाहिजे. या वेळेपर्यंत माझे वयही फारसे नव्हते. वास्तवाचा फारसा विचारही केलेला नव्हता. वास्तवात ज्याला आधार नाही अशा भोळ्या स्वप्नवादाचा काळ माझ्या जीवनात ५२ सालपर्यंत म्हणजे विशीपर्यंत होता. या नंतरच्या काळात मी पुरा पालटून गेलो. याही नंतरच्या काळात मी स्वप्ने पाहिलेलीच आहेत. स्वप्ने पाहण्याचा माझा नाद कधी संपला नाही. आता यापुढे तो कधी संपेल असे वाटतही नाही. पण आता स्वप्ने पाहताना ती स्वप्ने आहेत याचे भानही मला असते आणि वास्तवाचे भानही पुरेसे जागृत असते. खरा स्वप्नाळू माणूस तो की जो स्वप्नाळू असतो पण आपण स्वप्नाळू आहोत याची जाणीव मात्र त्याला नसते. आपल्या स्वप्नांच्यावरील उत्कट प्रेमापोटी स्वप्नांनाच वास्तवता समजण्याची भोळीभाबडी चूक जे करू शकत नाहीत त्यांना स्वप्ने पाहणारे असे आपण फार तर म्हणू. पण स्वप्नाळू म्हणता येणार नाही. माझ्या जीवनातील भाबड्या स्वप्नाळूपणाचा कालखंड विसावं वर्ष संपत असताना संपला.

१९५२ साल हे माझ्यासाठी प्रचंड यातनांचे आणि भ्रमनिरासाचे वर्ष होते. माझ्या जीवनात इतका दुःखमय काळ पुन्हा कधी आला नाही. इ.स. १९४७ साली मी हैदराबादच्या मुक्ती आंदोलनात सहभागी झालो. त्याचवेळी जून महिन्यात मी मॅट्रिक पास झालो. पोलिस ॲक्शन होईपावेतो ते चौदा महिने गेले त्या १४ महिन्यांत एका लोकविलक्षण धुंदीत मी वावरत होतो. मरणाची भीती ज्या काळात फारशी कधी वाटलीच नाही असा तो काळ होता. पोलिस ॲक्शन झाल्यानंतर हा धुंदीचा काळ

टिकणे शक्य नव्हते. तो ओसरून गेला यात काही नवलही नव्हते. शिक्षणावरून माझे लक्ष उडालेलेच होते. तसा मी नाममात्र विद्यार्थी होतो. अभ्यासाची कोणतीही चिंता न करता परीक्षेला बसत होतो. या परीक्षांच्या मध्ये नापास होण्याचीही फारशी क्षिती नव्हती. तसा मी प्रथमच इ.स. १९४९ साली इन्टरला नापास झालो. पण या नापास होण्याचे थोडेसुद्धा दुःख मला वाटलेले आठवत नाही. आपण नापास होणार याची मला खात्री होती. तसे मी सर्वांना सांगितलेलेही होते. निकाल पाहण्याची उत्सुकता नव्हती. उलट जे पास झाले त्यांनाच आपले काही चुकले की काय अशी लाज वाटावी इतका मी आनंदात होतो, हसत खेळत होतो. माझे सर्व नातेवाईक आणि मित्र मला बुद्धिमानच समजत. त्यामुळे मी नापास झाल्याने त्यांना वाईट वाटे. माझ्या आईवडिलांनाही या माझ्या अपयशाची जबर खंत होती. ज्याला नापास होण्याचा विषाद नव्हता असा मीच होतो.

इन्टरची परीक्षा पास होणे यात मला काही कठीण होते असे नाही. पण मला परीक्षा पॉस होण्यात रस उरलेला नव्हता. अभ्यासाचे क्रमिक पुस्तक वाचायचेच नाही असे ठरल्यानंतर परीक्षा नापास होणे कठीण नसते. अनेकजण भरपूर अभ्यास करून नापास होत. नापास होण्यासाठी इतके कष्ट करावे लागतात हे मला मान्य नव्हते. आणि पास व्हायचेच ठरवले तर परीक्षा पास होण्यात काही अवघड आहे असे मला वाटत नव्हते. गणितात शंभरापैकी शंभर गुण मिळवणारा कुशाग्र विद्यार्थी मी नव्हतो. पण ९२ ते ९५ गुण मला गणितात मिळत असत. अशा प्रकारची पूर्वपीठिका असणाऱ्या विद्यार्थ्याला परीक्षेची फारशी भीती वाटत नसते तसेच माझेही होते. या नापास होण्यात आपण आयुष्याचा अपव्यय करतो आहोत असेही मला कधी वाटले नाही. पास होण्यात काही अर्थ आहे असेही मी मानले नाही. माझ्या आवडीच्या विषयात-वक्तृत्व स्पर्धेत-बक्षिसे मिळवीत होतो. माझ्या भोवती मित्रांचा एक मोठा गट होता. हे पास होणारे मित्र मला आपला नेता समजत. राजकारणी थोडीफार लुडबूड करणारा मी तरुण होतकरू कार्यकर्ता होतो. अशा त्या अवस्थेत पास-नापास होणे याला माझ्यासाठी कोणतेही महत्त्व नव्हते. बावन्न सालपर्यंत मनाची हीच अवस्था होती.

या सगळ्या सार्वजनिक जीवनाला एक वैयक्तिक कडाही होती. वयाच्या सतराव्या, अठराव्या वर्षापासून आपली इच्छा असो वा नसो, आपण तरुण होतो

आहोत याची जाणीव निर्माण होणे अपरिहार्यच असते. तसा मी लहान वयापासून कथा-कादंबऱ्या वाचीतच होतो. त्यामुळे जिथपर्यन्त शब्दज्ञानाचा संबंध आहे. तिथपर्यंत मी १६–१७ वर्षांचा झालो. यामुळे काही विशेष नवे ज्ञान झाले असे समजण्याचे कारण नाही. स्वामी शिवानंदांची पुस्तके आणि ज्याला अश्लील वाङ्मय म्हणतात असे पुष्कळसे वाङ्मय वयाच्या बाराव्या वर्षीच मी वाचून टाकले होते. पण हे सारे शब्दज्ञान होते. त्या शब्दज्ञानाचे पाठांतर, शृंगार या शब्दाचा अर्थ किंवा वासना या शब्दाचा अर्थ थोडाफार कळू लागला ही अवस्था सतराव्या-अठराव्या वर्षी प्राप्त झाली. मराठवाड्यासारख्या प्रदेशातील संक्रमणावस्थेतील पिढीत मीही होतो. बालविवाह नसावेत, लग्नाच्या वेळी मुलगी किमान चौदा वर्षांची असावी हे मत विलक्षण क्रांतिकारक आणि सुधारकी वाटावे असे वातावरण माझ्या भोवताली होते. माझे वडील त्यामानाने सुधारलेले, त्यांचा कल नव्या विचाराकडे झुकलेला. यामुळे सोळा वर्षांचा झाल्याखेरीज मी माझ्या मुलाचे लग्न करणार नाही असे विचार माझे वडील गंभीरपणे मांडताना मी ऐकलेले होते. यामुळे जेव्हा मी १७-१८ वर्षांचा झालो त्यावेळी आपण आता पुरेसे प्रौढ व तरुण झालो आहोत असे मला वाटू लागले. आणि पाहता पाहता मी एका मुलीच्या प्रेमातही पडलो. आपण फक्त मॅट्रिक पास, त्यानंतरच्या काळात सतत नापास होतो आहोत. आपल्याला नोकरी नाही, आपण बेकार आहोत असे मला मुळी जाणवतच नव्हते. आपण तडफदार पुरोगामी कार्यकर्ते आहोत, तरुण आहोत, तेव्हा प्रेम करण्याचा आपला हक्क आहे, असे निश्चितपणे मला वाटत होते. जिच्यावर आपण प्रेम करतो आहोत तिची आकलनशक्ती किती याचाही पोच मला नव्हता आणि प्रेम करणे म्हणजे नेमके काय हेही मला कळत नव्हते. माझी पत्नी असणारी व्यक्ती त्यावेळी अजून वयात न आलेली केवळ लहान मुलगी होती. तिला काही कळत होते की नाही याचाही पत्ता नव्हता. ही आमची प्रेयसी आणि चोरून भेटण्याचा प्रयत्न करणे, चोरून बोलणे, अगर पत्र लिहिणे हे सगळेच थिल्लरपणाचे प्रकार आहेत, सबब ते वर्ज्य समजावेत असे आमचे या क्षेत्रातील अफाट व्यवहारज्ञान! न भेटता, न बोलता, पत्र न पाठवता आमचे प्रेम चालू होते. प्रेयसीला ते प्रेम कळाले की नाही आणि तिने ते स्वीकारले की नाही या दोन्ही बाबी गौण समजाव्यात असे मानणारे गडकऱ्यांच्या कवितेत रमणारे असे अव्यवहारी मन मजजवळ होते. न बोलता, न भेटता मी प्रेमात पडलो होतो. या प्रेमाचे रूपांतर लग्नात होईल काय? या

तुच्छ प्रश्नाचा विचार करणे मला आवश्यक वाटत नव्हते. येऊन जाऊन एक प्रश्न समोर होता, तो म्हणजे राजकीय क्रांती झाली पण अजून समाजवाद आलेला नाही तेव्हा आपल्या प्रेयसीला 'माझे तुझ्यावर प्रेम आहे' हे समाजवादी क्रांती होण्याच्या आधी सांगणे योग्य ठरेल की ती क्रांती होईपावेतो वाट पाहणे योग्य ठरेल!

व्यक्तिगत जीवनात माझे मन एका अल्लड मुलीला देऊन मी बसलो होतो. ती अजून वयात आलेली नव्हती, अजून लुगडे नेसत नव्हती, शाळेत जाताना परकर आणि घरी तर चक्क भावाचे कुडतेच घालून वावरत असे. (याच मुलीने पुढे सर्व सुखदु:खात अपार कष्ट उचलून अत्यंत खंबीरपणे माझा संसार सांभाळला.) या मुलीला आपण काय जिंकले आहे याचा पत्ता असण्याचे कारण नव्हते आणि सार्वजनिक जीवनात माझे मन समाजवाद या कल्पनेला वाहिलेले होते. समाजवादी क्रांतीच्या उंबरठ्यावर आपण उभे आहोत, चार-दोन वर्षांत तीही होऊन जाईल याची पुरेपूर खात्री मला पटलेली होती. व्यवहाराचा कोणताच पोच नसलेल्या स्वप्नात आम्ही वावरत होतो. त्या स्वप्नातून बावन्न साली बाहेर पडणे हा योग आमच्या वाट्याला येणे अपरिहार्य होते.

इ.स. १९५२ सालची निवडणूक ही प्रौढ मतदानावर आधारलेली स्वतंत्र भारतातील पहिलीच निवडणूक. आमच्यासारख्या तरुण मुलांना निवडणूक हे काय प्रकरण असते हे फारसे कळतच नसे. आम्ही ज्यांना आमचे ज्येष्ठ नेते मानत होतो त्यांना तरी निवडणूक म्हणजे काय हे किती प्रमाणात समजत होते याविषयी मला शंकाच आहे. काँग्रेसची लोकप्रियता झपाट्याने घसरत जात आहे आणि आता काँग्रेसपक्ष सावरण्याची शक्यताच नाही असे आम्ही समजत होतो. लोकप्रियता म्हणजे काय? याबाबतची आमची समजूत ही भोळीभाबडीच होती. माझा ओढा समाजवादी पक्षाकडे होता आणि आमच्या नेत्यांच्या व्याख्यानांना जी प्रचंड गर्दी होत असे तो आमच्यासाठी आमच्या पक्षाच्या लोकप्रियतेचा निर्विवाद पुरावा होता. सर्व वर्तमानपत्रे काँग्रेस पक्षाच्या घसरत्या लोकप्रियतेबाबत बोलत होती. पंडित जवाहरलाल नेहरू यांना संघटना निर्माणही करता येत नाही, त्यांना संघटना सांभाळताही येत नाही. महात्मा गांधी वारलेले आहेत. अशा अवस्थेत सरदार पटेल किती प्रमाणात संघटना सांभाळू शकतील याची वानवाच आहे, असे आमचे लोक बोलत असत. इ.स. १९५० साल अखेर सरदार पटेल वारले.

सरदारांच्या शोकसभेत मी काय बोललो याची आजही मला स्वच्छपणे आठवण आहे. हैदराबाद संस्थानातील रहिवासी असल्यामुळे सरदारांच्याविषयी माझ्या मनात कृतज्ञता आणि आदरभावना होतीच. सरदार पटेल यांच्याविषयी समाजवाद्यांच्या मनात फारसा राग कधीच नव्हता. सरदार समाजवादी नाहीत. आपण समाजवादी असल्याचा त्यांचा दावा नाही. शिवाय ते जनतेचे लोकप्रिय पुढारी नाहीत. सत्तरी ओलांडलेला हा आजारी वृद्ध कणखर व दृढनिश्चयी आहे. पण तो फार काळ जगणारा नाही. सरदार हे समाजवादाचे खरे शत्रूच नव्हते. पाच-चार वर्षांत ते मरूनही जातील. समाजवादाला खरा विरोध नेहरूंचा आहे असे आमची मंडळी खाजगीत बोलत. विशिष्ट दिवशी सरदारांचा मृत्यू होईल असे आम्हालाही माहीत नव्हते. पण ते फार दिवसांचे सोबती नाहीत याची सर्वांनाच जाणीव होती. सरदारांच्या शोकसभेत मी त्यांचे गुणगान केले, आणि समारोप करताना असे मी भाकित वर्तविले की, काँग्रेस संघटना सांभाळणारा आता कुणी जेष्ठ नेता उरलेला नाही. या अप्रिय होत जाणाऱ्या आणि ढासळत जाणाऱ्या संघटनेला फारसे भविष्य नाही. काँग्रेस या देशात स्थिर सरकारही देऊ शकणार नाही, जनतेचे दारिद्र्यही दूर करू शकणार नाही. गोरगरीब जनता आपले दारिद्र्य सहन करून काँग्रेसला मते देईल याची शक्यता फार कमी आहे, म्हणून भारतात लोकशाही टिकली तर काँग्रेसला भविष्य नाही.

खाजगीत आम्ही त्या काळी नेहरूंचा चेंग कै शेक होणार याबाबत निःशंक होतो. खाजगी बैठकीत आम्ही असे म्हणतच असू की ध्येयवादाच्या प्रेमापोटी जर नेहरूंनी लोकशाही टिकविण्याचा अट्टाहास धरला तर लोकच काँग्रेसचा पराभव करतील. आणि सत्तेत टिकून राहण्यासाठी जर नेहरूंनी लोकशाही गुंडाळली तर मग आम्ही सशस्त्र क्रांतीला मोकळे आहोत. त्यानंतर नेहरूंचे भवितव्य चेंग कै शेकपेक्षा निराळे असणार नाही. आम्हाला कोणत्याच बाबतीत वास्तववादाचे भान कसे नव्हते हा मुद्दा स्पष्ट होण्यासाठी ही माहिती पुरेशी ठरते. १९५१ साल मध्यावर आले आणि निवडणुकीचे नगारे वाजू लागले. त्यावेळी आम्ही अजून भ्रमातच होतो.

५२ सालच्या निवडणुकीत भारतात दोन प्रमुख पक्ष निवडून येतील. या दोन प्रमुख पक्षांपैकी एक समाजवादी पक्ष असेल असे अशोक मेहतांनी जाहीर रीतीने सांगितलेले होते. त्यावेळी मी हैदराबाद शहरातील सर्वात बुद्धिमान मानल्या गेलेल्या तरुण समाजवादी कार्यकर्त्याला मुद्दाम भेटण्यास गेलो. आपण कुठून उभे राहणार हे

या कार्यकर्त्याने आधीच जाहीर केलेले असल्यामुळे त्या मतदारसंघात उभे राहण्यास कॉंग्रेसचा कुणी कार्यकर्ता तयारच नाही असे आमच्या गोटात सार्वत्रिक मत. या कार्यकर्त्याला मी जाऊन भेटलो आणि हैदराबाद संस्थानमधील निवडणुकांची मी त्यांच्याशी चर्चा केली. आमचे नेते अतिशयोक्ती न करता अतिशय मोंजके अनुमान करण्याबद्दल प्रसिद्ध होते. त्यांनी मला सांगितले लोकसभेत या निवडणुकीत आपल्या पक्षाला बहुमत मिळण्याची शक्यता अजिबात नाही. कमीत कमी दीडशे आणि जास्तीत जास्त पावणेदोनशे जागा मिळतील. केंद्रीय शासन निवडणुकीच्या मार्गाने जर आपल्या हाती यायचे असेल तर ५-१० वर्षे वाट पाहणे आवश्यक आहे. कॉंग्रेसने इंग्रज राजवटीच्या विरूद्ध वर्षानुवर्षे वाट पाहिली. आपण स्वतंत्रपणे पक्ष म्हणून अस्तित्वात येऊन अजून पाच वर्षे झालेली नाहीत. तेव्हा आपण वाट पाहणे शिकले पाहिजे. अशोक मेहता जेव्हा दोन पक्षांपैकी आपला पक्ष एक राहील म्हणतात त्यावेळी आपण क्रमांक दोनचा पक्ष राहू असा त्याचा अर्थ असतो. या नेत्यांनी मला सांगितले हैदराबाद संस्थानात आपला पक्ष फार दुर्बळ आहे. तेव्हा ४० पेक्षा जास्त जागा या प्रांतात आपल्याला मिळणार नाहीत. भारताच्या तीन प्रांतात आपली सरकारे येतील. तीन प्रांतांत फार थोड्या फरकाने आपले बहुमत जाईल. उरलेल्या प्रांतात आपण प्रमुख विरोधी पक्ष असू.

ही सगळी मीमांसा आमच्या समोर असणाऱ्या अत्यंत मान्यवर तरुण नेत्यांची. कधीकाळी समाजवादी सरकार अस्तित्वात आले तर हा आमचा तरुण नेता त्या सरकारात अर्थ आणि नियोजन ही दोन्ही खाती सांभाळणारा मंत्री असणार. याबाबत आम्हा पोरासोरांना खात्री होती. आज हे लक्षात येते की ज्यांना मी जेष्ठ नेते समजत होतो तेही अधांतरी हवेतच तरंगत होते. पण त्यावेळी मात्र असे वाटे की हा आमचा नेता अतिशय अचूक भविष्यवेध घेणारा, अतिशय मार्मिक विवेचन करणारा आहे.

५२ सालच्या निवडणुकीत माझे मन चमत्कारिकपणे द्विधा झालेले होते. सर्व भारतभर समाजवादी पक्ष निवडून यावा असे मला जरूर वाटत होते. पण हैदराबाद संस्थानात मात्र हैदराबाद मुक्ती आंदोलनातील काही ज्येष्ठ नेते कॉंग्रेस पक्षाच्या वतीने उभे होते. या ज्येष्ठ नेत्यांच्याविषयी मला प्रेम आणि आदर असे. ते पडावेत असे मला वाटत नव्हते. आमच्या मुक्ती आंदोलनातील आघाडीच्या कार्यकर्त्यांचा मुख्य संच 'जनता लोकशाही आघाडी' या नावाने मराठवाड्यात निवडणुका लढवीत होता. त्याचे

ज्येष्ठ नेते मला बोलताना म्हणाले, ४२ पैकी आम्ही फक्त २७ जागांच्यापैकी क्वचितच एखादी जागा पडेल. पण निवडणूक म्हणजे जुगार. त्यामुळे आमची किमान वीस माणसे निवडून येतील असे आम्ही मानतो. हे जे २७ जण उभे होते त्यांच्याविषयी तर माझ्या मनात इतके गाढ प्रेम होते की ती सगळीच माणसे निवडून यावीत असे मला वाटत असे. सर्व भारतभर समाजवादी पक्ष निवडून यावा. हैदराबादेत मात्र स्वातंत्र्य लढ्यातील कार्यकर्ते - मग ते कोणत्याही पक्षातील असोत, निवडून यावेत हे वाटणे मुळातच चुकीचे आहे. हे काही त्यावेळेला मला जाणवले नाही.

हैदराबाद संस्थानात ही पहिली निवडणूक म्हणजे एक चमत्कारिकच बाब होती. पुष्कळ वेळेला निवडणुकीला उभे राहिलेल्या प्रतिस्पर्धी उमदेवाराचा प्रचार करण्यासाठी विरोधी पक्षातील आपला लाडका नेता येतो आहे म्हणून एक उमेदवार दुसऱ्या उमेदवाराची सभा सुद्धा जातीने हजर राहून निर्विघ्नपणे पार पडावी याची काळजी घेत असे. गोविंदभाई श्रॉफांच्याबाबत तर हे नेहमीच घडे. ते काँग्रेसविरोधी प्रचार करण्याच्या दौऱ्यावर असत आणि पुष्कळदा काँग्रेसचाच उमेदवार त्यांचे जेवणखाण आपल्या घरी आग्रहाने करी, त्यांच्या सभेची व्यवस्था करी. काही लोकप्रिय इतर उमेदवारांच्या बाबतीतसुद्धा असा प्रकार घडलेला मधून मधून दिसत असे. मी स्वतः अशा सभा पाहिलेल्या आहेत की, जिथे एकाच सभेत विधानसभेचे दोन परस्परविरोधी उमेदवार येऊन बोलले. ही निवडणूक जसजशी रंगात आली तसतसा माझा भ्रमनिरास होऊ लागला.

पहिली गोष्ट म्हणजे दोन आदरणीय नेते जाहीर सभेत परस्परांच्या उखाळ्या पाखाळ्या काढताना आणि खाजगी बैठकीत एकमेकांच्या विषयी अत्यंत तुच्छतेने बोलताना मी प्रथमच पाहात होतो. ही नेते मंडळी आपल्या वैयक्तिक जीवनात गरजेनुसार लबाड्या करणारी क्षुद्र माणसेच आहेत हे पाहिले म्हणजे प्रचंड दुःख वाटत असे. जाहीर सभेत बोलल्या जाणाऱ्या अनेक बाबी आणि खाजगी बैठकीत होणाऱ्या चर्चा यांचा परस्परांशी काही ताळमेळच नसे. एकाच पक्षाचे कार्यकर्तेसुद्धा एकमेकांशी ज्या दुष्टाव्याने वागत ती बाब पाहताना अतिशय वेदना होत असत. लढ्यांच्या काळात सर्व उदात्तपणा उसळून वर आलेला मी पाहिलेला आहे. ती भव्यता, दिव्यता हेच या व्यक्तीचे स्वाभाविक रूप आहे असे मी उगीचच गृहीत धरून चाललो. भव्य, दिव्य घटना घडत असतात. ज्या व्यक्ती सर्वार्थाने उजळलेल्या दिसल्या त्या

व्यक्ती खरोखरी फार सामान्य आणि क्षुद्र आहेत हे या निवडणुकीत अतिशय दुःखाने जाणून घेणे मला भाग पडले. याला अपवाद नव्हते असे नाही. काही माणसे खरोखर उदात्तच होती. उरलेली माणसे सर्वांच्या सारखी. स्वप्नात आम्ही होतो. माणसे माणसासारखी वागत होती हा दोष त्यांचा नव्हताच, आमचा होता.

काही मतदार संघात राजकीय पक्ष अतिशय बेजबाबदारपणे वागे. एका मतदार संघात आमच्या पक्षाचा उमेदवार उभा होता. मी त्याला विचारले, "या मतदार संघात आपल्या पक्षाचे सभासद किती?" तो म्हणाला, "माझ्या गावात शंभर आहेत उरलेल्या मतदार संघात सभासद नोंदणी नाही". मी विचारले, "ज्या मतदार संघात आपले कार्य नाही, कार्यकर्ते नाहीत तिथे निवडणूक लढवायची कशाला? ही हमखास पडणारी जागा नाही काय?" आमचा विधानसभेचा उमेदवार म्हणाला, "लोकांना लाज असेल तर ते मला मते देतील. शेवटी बहुसंख्यांक मतदार गरीब असतात. ते माझ्याशिवाय इतर कुणाला मत देणार?" अजून एका मतदारसंघात आमच्या पक्षाच्या वतीने जुना रझाकार नेताच उभा होता. मी ज्येष्ठ मंडळींना विचारले, "याला तुम्ही तिकीट कसे दिले?" ज्येष्ठांचे म्हणणे असे पडले की, "निवडणुका जिंकण्यासाठी असे डावपेच आवश्यकच असतात. मी उदाहरणं समाजवाद्यांचीच देतो आहे कारण तो मी माझा पक्ष मानतो. इतर पक्षांच्या वतीने सर्रास गणंग, गुंड आणि भ्रष्ट लोक उभे राहिलेले दिसत होते. पण त्याचे फारसे वाईट वाटत नव्हते कारण ते पक्षच भ्रष्ट मंडळींचे आहेत, असे आम्ही समजत होतो. प्रत्यक्षात निवडणुकीच्या निकालांचे चित्र आम्हाला अगदी अनपेक्षित होते".

मराठवाड्यातून हैदराबाद मुक्ती आंदोलनातील सर्व तरुण तडफदार आणि जिद्दीचे कार्यकर्ते व यशस्वी क्रांतिवीर ज्या जनता आघाडीच्या वतीने उभे होते तिची सर्व माणसे पडली. गोविंदभाईंच्या नेतृत्वाखाली असणारे २७ जण गोविंदभाईसह पडले. यांतील निम्म्याहून अधिक मंडळींची अनामत रक्कम जप्त झाली. समाजवादी पक्ष सर्व देशभर मोठ्या प्रमाणात पडला. त्यांचे लोकसभेत २५ खासदारसुद्धा निवडून आले नाहीत. वर हैदराबादेतील ज्या तरुण नेत्यांचा उल्लेख आलेला आहे, त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. हैदराबाद संस्थानात समाजवाद्यांचे कसेबसे दहा लोक निवडून आले. यात सर्व मोठे नेते पडले.

इ.स. १९५२ सालच्या मार्चमध्ये जेव्हा मी आलो त्यावेळी मला हे प्रथम लक्षात

आले की काँग्रेस प्रचंड प्रमाणात निवडून आली आहे. ती पाच वर्षे काँग्रेसचे राज्य राहणारच. पण पाच वर्षानंतरसुद्धा काँग्रेसचा पाडाव करणे कठीण आहे. समाजवादी पक्षाचा सर्व देशभर नुसता पाडाव झालेला नाही; त्यांची मानसिक शक्तीच इतकी खच्ची झालेली आहे की यापुढे नजिकच्या भविष्यकाळात काँग्रेसला प्रतिस्पर्धी संघटना म्हणून पक्ष उभा राहण्याची शक्यता नाही. लोकशाही मार्गाने आपल्या देशात समाजवादाचा विजय होईल हे तर फार दूर आहे. पण सशस्त्र क्रांतीचा उठाव करण्याची शक्तीसुद्धा कुठे शिल्लक नाही. गोरगरीब जनता प्रतिष्ठित आणि श्रीमंत यांच्याविरूद्ध गरिबांच्या पक्षाला मतदान करीत नसते. धर्म, जाती, अंधश्रद्धा, पैसा यांचा वापर करून समाजातील प्रस्थापितांचे वर्ग जितक्या सहजतेने निवडणुका जिंकतात तितके समाजवाद्यांना निवडणुकीत विजयी होणे सोपे नसते. भारताच्या ग्रामीण भागात जमीनदार आणि संस्थाने पुरेशी प्रभावी आहेत हे तर खरेच आहे. पण प्रमुख शहरांतही कामगारांच्या पक्षांना निवडणुका जिंकणे फारसे जमलेले नाही.

क्रांती लोकशाही मार्गाने की हुकूमशाही मार्गाने हा प्रश्नच गौण आहे. कोणत्याच मार्गाने क्रांती होण्यासाठी अजून पूर्वतयारीच झालेली नाही. हे मला जाणवू लागले, तिथून क्रमाने माझा स्वप्नाळूपणा संपत आला व राजकारणाच्या डोळस, वास्तववादी अभ्यासाला आरंभ झाला. एकाएकी मला जाणवले की शिक्षणाची गाडी पूर्णपणे हुकलेली आहे. अनेकदा नापास झालेला, पास होण्याची शक्यता नसलेला बेकार तरुण आपण. पदवी नाही, ती मिळवण्याची शक्यता नाही. नोकरीही नाही. राजकारणात तर आपण पराभूत आहोतच. पण व्यक्तिगत जीवनातसुद्धा आपण पराभूत. एखाद्या मुलीच्या आयुष्याचा नाश करण्याचा आपल्याला हक्क नाही. खरे म्हणजे कुणावर प्रेम करण्याच्या लायकीचेच नाही. आपले सगळेच आयुष्य वाया गेले. प्रचंड निराशा, वैफल्य आणि व्यर्थपणा याची उत्कट जाणीव यावेळी मला सर्वप्रथम झाली. ५२ सालचे सगळे वर्ष असे निराशेने, काळोखाने व्यापलेले गेले.

यानंतरच्या काळात मी निराशेतून बाहेरही पडलो. पदवीही मिळवली. उशिरा का होईना प्राध्यापक झालो. हे सगळे खरे असले तरी ५२ साली मी जे नैराश्य भोगले ते त्यामुळे खोटे ठरत नाही. या नंतरच्या काळात फारसे खोटे भ्रम माझ्या मनात कधीच निर्माण झाले नाहीत. आज बावन्न सालची निराशा मला पुन्हा पुन्हा एक आठवण म्हणून जाणवते आहे. ज्या पद्धतीने जनता पक्षाचा विजय झाला, आणि ज्या

पद्धतीने जनता पक्षाच्या ठिकऱ्या उडाल्या ते सगळे मी पाहतोच आहे. पण बावन्न सालचा भ्रम आणि भ्रमनिरास आज नाही. स्वप्नाळूपणाची धुंदी आणि स्वप्नभंगाच्या व्यथा या दोन्हीही पासून दूर असलेल्या माझ्या मनाला आज पुनः पुन्हा इ.स. १९५२ सालचा मार्च आठवतोय. आपण वेडे त्यावेळी होतो की आज आहो, अगर नेहमीच आपण असे वेडे राहत आलो; व्यवहार आपल्याला कधी कळलाच नाही असे समजावे की आता आपण पुरेसे शहाणे झालेले आहोत असे समजावे, हे मात्र मला आजही ठरवता येत नाही.

❋ ❋ ❋

(प्रसिद्धी : नागपूर पत्रिका, दिवाळी १९७९)

# 3.

# १९३८ चा हैदराबादचा लढा

इ. स. १९३८ हे वर्ष हैदराबादच्या राजकीय जागृतीत एक महत्त्वाचा टप्पा असणारे वर्ष आहे. हैदराबाद संस्थानातील सर्व राजकारण १९३८ नंतर एकदम वेगळ्या टप्प्यावर जाऊन पोहोचते. इ.स. १९४८ साली पोलिस ॲक्शनमुळे हैदराबात संस्थानचे अस्तित्व संपले आणि हैदराबाद हा भारतीय संघराज्याचा भाग बनला. ३८ ते ४८ हे दशक हैदराबादच्या संस्थानी जीवनात क्रमाने जागृती वाढत जाण्याचे आणि राजकीय आंदोलन उग्र; उग्रतर होण्याचे दशक आहे. या सगळ्या लढ्याला इ.स. १९३८ सालापासून आरंभ होतो यामुळे या टप्प्याचे महत्त्व आहे. वेगवेगळ्या मार्गांनी या आंदोलनाची पूर्वतयारी होत होती. हिंदू महासभेने आरंभिलेला भागानगर निःशस्त्र सत्याग्रह, आर्य समाजाने सुरू केलेले आंदोलन, हैदराबात स्टेट काँग्रेसने आरंभिलेला सत्याग्रह, विद्यार्थ्यांनी सुरू केलेली वंदे मातरमूची चळवळ आणि बहादूर यार जंग या मुसलमान नेत्याने गतिमान केलेली मुसलमानांची राजकीय चळवळ हे ठळकपणे समोर दिसणारे पाच घटक होते. या पाच घटकांच्या मागे अतिशय महत्त्वाचा असा दोन वृत्तींचा संघर्ष होता. त्यापैकी एका वृत्तीचे नेते हैदराबादचे अतिशय चतुर आणि चाणाक्ष असे नेते व राजे मीर उस्मान अलिखाँ बहादूर हे सातवे निजाम होते आणि दुसऱ्या वृत्तीचे नेते महात्मा गांधी होते. एखादी राजकीय घटना समजून घ्यायची असेल तर ती सुटी सुटी समजून न घेता तिच्या मागचे-पुढचे सर्व धागेदोरे सामग्र्याने समजावून घेतले पाहिजेत. १९३८ साली हैदराबाद संस्थानात जे राजकीय जागृतीचे पर्व सुरू होते त्यामागे असणारी जी पार्श्वभूमी - तिचा एक स्थूल आराखडा या

निमित्ताने सांगण्याचा विचार आहे.

हैदराबाद संस्थान आणि तेथील राजकारण समजून घ्यायचे असेल तर अतिशय चतुर आणि चाणाक्ष त्याचप्रमाणे अत्यंत सावध असणारे हैदराबादचे राजे शेवटचे निजाम यांचा थोडा परिचय आपल्याला असला पाहिजे. मुळात हैदराबाद संस्थान हे मोगल साम्राज्याचा एक भाग म्हणून अस्तित्वात आलेले संस्थान आहे. आलमगीर औरंगजेब याच्या तालमीत पूर्णपणे वाकबगार झालेला मीर कमरुद्दीन हा या संस्थानचा निर्माता होय. या कमरुद्दीनलाच चिन्‌किलीजखाँन म्हणजे छोटा तलवार बहाद्दर, निजाम उलमुल्क, आसफजहाँ इत्यादी पदव्या आहेत. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासकाळी दक्षिणेच्या सुभेचा सुभेदार म्हणून कमरुद्दीनने कारभार सांभाळला आणि हळूहळू दक्षिणेच्या सुभ्याचे एका स्वतंत्र राज्यात त्याने रूपांतर केले (इ.स. १७२४) कधीही फारसा मोठा विजय न मिळवता सतत पराभवाचे तडाखे खात एखादे राज्य अस्तित्वात कसे आणावे याबाबत हा पहिला निजाम अतिशय धूर्त होता. त्याच्यानंतर क्रमाने या संस्थानच्या गादीवर निरनिराळे लोक आले. हे हैदराबादचे राजे निजाम म्हणून ओळखले जात. या गादीवरचा सातवा आणि शेवटचा निजाम इ.स. १९११ साली गादीवर आला. हा हैदराबादच्या राजकारणाचा एक महत्त्वाचा भाग आहे. या शेवटच्या निजामाचे नाव उस्मानअली असे होते. सर्व जगभर या निजामाची प्रसिद्धी श्रीमंती व चिक्कूपणा यासाठी होती. निजाम हा अतिशय चिक्कू म्हणून प्रसिद्ध आहे. पण कायदा व सुव्यवस्थेचा एक तज्ज्ञ, महत्त्वाकांक्षी आणि पाताळयंत्री असा चाणाक्ष, मुत्सद्दी म्हणून त्याची फारशी कीर्ती नाही. खरे म्हणजे त्याने अतिशय कौशल्याने हैदराबाद संस्थानचे स्वातंत्र्य जवळ जवळ सिद्ध करीत आणलेले होते. हिंदुस्थानचा भाग नसणारे स्वतंत्र, सार्वभौम हैदराबाद नावाचे राष्ट्र अस्तित्वात आणण्याची महत्त्वाकांक्षा निजामाने जवळजवळ पूर्ण करीत आणलेली होती, योगायोगाने त्याची ही सर्व स्वप्ने त्याच्या मित्रांनी वेळेवर पुरेसा पाटिंबा न दिल्यामुळे धुळीला मिळाली. निजाम हा भारतीय राष्ट्रवादाचा शत्रू, हैदराबाद संस्थानातील जनतेचा आणि जनतेच्या स्वातंत्र्याकांक्षेचा शत्रू, पण म्हणूनच शत्रूची काळजीपूर्वक पारख आपण केली पाहिजे. आपल्या सगळ्या राजकारणात शत्रूची नीटशी ओळख नसणे हा नेहमीच कच्चा दुवा राहिलेला आहे.

इ.स. १९११ साली उस्मानअली हे हैदराबादचे निजाम झाले, ज्यावेळी उस्मान

अली निजाम झाले त्यावेळी हैदराबाद संस्थानात प्रशासनाच्या दृष्टीने पुरेशी अव्यवस्था आणि गोंधळ मोठ्या प्रमाणात होता. मागासलेपण हे तर होतेच पण त्या मागासलेपणाच्या जोडीला सर्वांगीण अव्यवस्था हाही महत्त्वाचा भाग होता. या अव्यवस्थेला पायबंद घातल्याशिवाय आणि सामाजिक जीवनाचे मागासलेपण संपू न देता प्रशासन व्यवस्थित करणे ही निजामाची पहिली इच्छा होती. म्हणून हैदराबादच्या इतिहासात काही काळ तर असा आहे की ज्यावेळी हैदराबादला मंत्रिमंडळच नव्हते. स्वतः निजामच सर्व कारभार सांभाळीत असत. निजामाचा विचार करताना आपल्या डोक्यात बडोद्याचे सयाजीराव महाराज किंवा कोल्हापूरचे शाहू महाराज यांचा विचार येणे बरोबर नाही. कारण गायकवाड व शाहू महाराज यांचे गुणदोष कोणतेही असले तरी त्यांच्यासमोर प्रजेचे कल्याण हा प्रमुख प्रश्न होता. निजामाच्या समोर प्रजा हा मुद्दा नव्हता. हिंदू प्रजेच्या कल्याणाचा विचार त्याने कधी केला नाही. पण मुस्लिम प्रजेच्याही कल्याणाचा विचार त्याने कधी केला नाही. निजामाचे ध्येय मुसलमानांचे कल्याण हे नव्हते. नाही तर भारतीय राष्ट्रवादाला निजाम हा अधिक मोठा धोका सिद्ध झाला असता. निजामासमोरचा प्रश्न स्वतः स्वतंत्र सार्वभौम राजा होण्याचा आणि त्यासाठी हैदराबाद हे राष्ट्र करण्याचा होता. या हेतुसिद्धीसाठी कोणतीही साधणे वापरण्याची त्याची तयारी होती. धर्मवेड त्याच्याजवळ नव्हते असे नाही. पण ते धर्मवेड मर्यादित होते. मुख्य वेड सम्राट होण्याचे होते. साधन म्हणून त्यासाठी धर्म वापरण्याची त्याची तयारी होती. आरंभापासूनच निजामाच्या डोक्यात सार्वभौम राजा होण्याचे स्वप्न पक्के मनात घर करून बसलेले होते. निज़ामाचे म्हणणे असे की इंग्रज भारताचे स्वामी होण्यापूर्वी हैदराबाद संस्थान एक स्वतंत्र राष्ट्र होते. नंतर वेळोवेळी इंग्रजांशी आमच्या पूर्वजांनी तह केले. हे तह दोन मित्रांच्यामधील तह आहेत. ते तह आम्ही पाळू, करारातील प्रत्येक अट प्रामाणिकपणे पाळू पण दोन मित्रांच्यामधील करारामुळे आपण मांडलिक असल्याचे सिद्ध होत नाही. उलट करार करणारे दोन पक्ष यांतील एक पक्ष जर स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र असेल तर दुसराही पक्ष स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र असणार हे उघड आहे. हैदराबाद संस्थान हे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र आहे ही गोष्ट परंपरासिद्ध आणि करारांनी मान्य झालेली आहे. आणि म्हणून स्वतंत्र राजाप्रमाणे आपल्यालाही हिज मॅजेस्टी अशी पदवी लावण्याचा हक्क आहे. इंग्रजांनी निजामाचा हा दावा फेटाळून लावला हे जरी खरे असले तरी त्यामुळे इ.स. १९२६ सालापासून आणि त्याही पूर्वीपासून निजाम

स्वतःला स्वातंत्र्य मागत होता ही गोष्ट उघडच आहे.

निजाम आयुष्यभर या स्वातंत्र्याची सिद्धता करीत वसला. हैदराबाद संस्थानला स्वतंत्र नाणेव्यवस्था होती. ही नाणी एक पैशापासून शंभर रुपयांपर्यंत होती आणि या नाण्यांच्या जगातल्या बाजारात विनिमयाचा दर ठरलेला होता. निजामाने हैदराबादच्या चलनाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळविलेली होती. हैदराबादची स्वतःची पोस्ट, टेलिग्राफ, रेल्वे इत्यादींची सोय होती. स्वतंत्र सिव्हिल सर्विस होती. स्वतःचे विद्यापीठ होते, इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, बेल्जियम, हॉलंड, ब्राझील, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, इजिप्त, तुर्कस्थान, सौदी अरब, अफगाणिस्थान इत्यादी राष्ट्रांच्यामध्ये निजामाने परिश्रमपूर्वक स्वतःची एक लॉबी तयार केलेली होती, जगातल्या बँकांत याच्या ठेवी होत्या. हे सगळे उद्योग व्यवस्थितपणे हाताळणारा एक चाणाक्ष पाताळयंत्री पुरुष म्हणून निजामाचा विचार करण्यास आपण शिकले पाहिजे. या निजामासमोर इ.स. १९३५ सालापासून एक नवीन परिस्थिती उभी राहिलेली होती. इ.स. १९१९ साली ब्रिटिश सरकारने हे कबूल केले होते की भारतात भारतीय जनतेला जबाबदार असणारी राजवट निर्माण करणे हा इंग्रजांचा हेतू आहे. या हेतूच्या दृष्टिने काही निश्चित पुढची पावले टाकावीत असा भारतातील राजकीय नेत्यांचा आग्रह होता व त्या दृष्टीने अखिल भारतीय काँग्रेसने इ.स. १९२९ सालापासून संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी सुरू केलेली होती. भारतीय जनता संपूर्ण स्वातंत्र्य मागत होती. ते देण्याची इंग्रजांची इच्छा कधीच नव्हती. पण सुधारणेचा एक नवा हप्ता देण्यास इंग्रज़ तयार झाले होते. त्या वाटाघाटींतून इ.स. १९३५ चा कायदा साकार होत होता. १९३५ च्या कायद्यात ब्रिटिश इंडिया बरोबर संस्थानांचाही विचार होता. या कायद्याच्या मागे संपूर्ण भारताचे एक फेडरेशन म्हणजे संघराज्य बनवावे असे एक सूत्र होते. संस्थानिकांनी आपआपल्या अटी घालून या संघराज्यात जायचे होते. प्रांतिक कारभार संपूर्णपणे भारतीय जनतेच्या आधीन, केंद्रीय कारभारात भारतीय जनतेचा सहभाग आणि सर्व भारताचे एक संघराज्य ही दिशाच निजामाला संपूर्णतः नापसंत होती. कारण सर्व भारतात लोकशाही आणि जनतेचे राज्य आले तर हैदराबाद संस्थानातही क्रमाने राजा नामधारी होणार म्हणजे स्वतंत्र राष्ट्राचे स्वप्न संपलेच. यामुळे निजामाचा संघराज्यात सहभागी व्हायला विरोध होता. एक स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र म्हणून उरलेल्या भारताशी मैत्रीने वागण्याची त्याची तयारी होती. यामुळे इ.स. १९३७ च्या सुमारास निजामाने मनाशी काही निर्णय

घेतलेले दिसतात. पहिला निर्णय हा की क्रमाने राज्यकारभार आणि प्रशासन भारतीय जनतेच्या हाती सोपवण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. या प्रक्रियेचा शेवट येत्या पाचपंचवीस वर्षांत इंग्रजांचे राज्य पूर्णपणे संपून भारत स्वतंत्र होणार आहे. दुसरा निर्णय हा की, भारत स्वतंत्र होताना कदाचित पाकिस्तान बनणार नाही अगर पाकिस्तान बनेल. या दोन्हीपैकी काही घडले तरी त्यात हैदराबादने सामील व्हायचे नाही. हैदराबादचे स्वतंत्र राष्ट्र अस्तित्वात आणायचे असेल तर उरलेल्या भारताशी आपले सर्व संबंध तोडले पाहिजेत.

सर्व भारतभर अखिल भारतीय काँग्रेस कार्यरत होती. संस्थानात काम करणारा या संघटनेचा विभाग स्टेट पीपल्स कॉन्फरन्स या नावाने ओळखला जाई[१]. या संघटनेला हैदराबाद संस्थानात शिरकाव करू द्यायचा नाही हे तर निजामाने ठरवलेच पण भारतातील मुसलमानांचे नेतृत्व मुस्लिम लीग करीत असे. मुस्लिम लीगलाही हैदराबादेत काम करू द्यायचे नाही असा निर्णय निजामाने घेतला. मुस्लिम लीग सर्व भारतातल्या मुसलमानांच्या हितसंबंधाचा विचार करीत होती. निजामाची भूमिका ही की भारतीय हिंदू असले काय अगर मुसलमान असले काय ते सगळेच परराष्ट्रातले लोक. आमचे राष्ट्र निराळे आहे, त्यामुळे त्यांच्याशी आमचा संबंधच काय? हैदराबाद संस्थानामध्ये असलेले सामाजिक जीवनाचे मागासलेपण जसेच्या तसे टिकवून निजामाने प्रशासन सुरळीत केलेले होते. या हैदराबाद संस्थानाला हिंदू असो अगर मुसलमान असो कोणत्याही अखिल भारतीय जाणिवेचा स्पर्श होऊ नये ही निजामाची उत्कट इच्छा होती. म्हणून कायदे आझम जीना यांचे आणि निजामाचे संबंध अतिशय दुराव्याचे होते.[२] पण हे घडत असतानाच निजामाला अजून एका गोष्टीची जाणीव होती. शेवटी हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र व्हायचे असेल तर आम्ही

---

१. १९२० पूर्वी हैदराबादेत अखिल भारतीय काँग्रेसच हैदराबाद शाखा म्हणून कार्यरत होती. कै. वामन नाईक तिचे सूत्रधार होते. १९१५ पासून अनधिकृतपणे एक गट हैदराबादेहून प्रतिवर्षी काँग्रेस अधिवेशनाला जात असे. – **संपादक**

२. नाही. कै. कुरुंदकरांना तसे वाटते. पण प्रत्यक्षात बॅ. जीना व झाफरुल्लाखान निझामाच्या सेवेत होते असे गुप्त कागदपत्रांवरून उघडकीस आले आहे. – **संपादक**

स्वतंत्र राष्ट्र आहोत ही भूमिका आग्रहाने पुरस्कारणारी एखादी संघटना हैदराबादेत अस्तित्वात असली पाहिजे. या दृष्टीने निजामाने इत्तहादुल मुसलमिन ही संघटना अस्तित्वात आणली होती. निजामाच्या कृपेने अस्तित्वात आलेली आणि त्याच्या कृपेनेच बलवान झालेली अशी ही संघटना. हिचे नेते निजामाच्या कृपेनेच संघटनेचे नेते बनलेले नबाब बहादुर यार जंग हे होते. सगळ्याच गोष्टी मनाजोग्या घडत नाहीत त्यामुळे इत्तहादुल मुसलमिन ही संघटना व तिचे नेते बहादुर यार जंग हेही संपूर्णपणे निजामाच्या मनाजोगे घडले नाहीत. जवळ जवळ निजामाच्या राजकीय हेतूचे साधन असणारी ही संघटना काही प्रमाणात निजामाच्या हेतूच्या कक्षेबाहेर जाऊ लागली. यातूनच इ.स. १९३८ सालच्या सर्व आंदोलनाचा उदय झालेला आहे.

या घटनेकडे अजून एका दुसऱ्या बाजूने म्हणजे भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या बाजूनेही पाहिले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन आपल्या आरंभावस्थेत इंग्रजीतून चर्चा करणाऱ्या शहरातील सुशिक्षित मंडळीपुरतेच मर्यादित होते. शहर भागात का होईना आणि सुशिक्षित मध्यम वर्गाकडून का होईना निर्भयपणे काही कृती घडावी ही अवस्था भारतीय राजकारणात वंगभंगाच्या चळवळीमुळे आली. वंगभंगाच्या चळवळीनंतर तरुणांचे लक्ष मोठ्या प्रमाणात कृतीकडे वळू लागले. इ.स. १९२० नंतर भारतीय राजकारणाची सूत्रे गांधीजींच्या हाती गेली. महात्मा गांधींनी एकतर भारतीय राजकारण शहरांच्या बाहेर ग्रामीण भागापर्यंत सुशिक्षितांच्याकडून बहुजनसमाजापर्यंत नेण्याचा फार मोठा प्रयत्न केला आणि दुसरे म्हणजे जागोजागी सत्याग्रहाच्या रूपाने हे आंदोलन कृतीत रूपांतरित करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. पण महात्मा गांधी जरी झाले तरी जन्मतःच ते काही सर्व विषयांचे ज्ञाते आणि जाणते असे नव्हते. तेही अनुभवाने आणि क्रमाक्रमाने शहाणे होत चाललेले होते. १९१८ पर्यंत तर महात्मा गांधींना असे वाटे की भारतावरील इंग्रजांचे राज्य आहे यात फारसे आक्षेपार्ह असे काहीच नाही. भारतावरील इंग्रजांचे राज्य सैतानी आहे आणि ते संपवलेच पाहिजे त्याशिवाय या देशाला तरणोपाय नाही या निर्णयावर एक मनोमन लाडका सिद्धांत असा होता की भारतातील सर्व संस्थानिक हे आपल्या गमावलेल्या स्वातंत्र्याचे अवशेष आहेत. हे सर्व भारतीय संस्थानिक मध्ययुगीन सरंजामशाही मनोवृत्तीत वाढलेले आहेत हे खरे आहे पण ही माणसे अस्सल राष्ट्रभक्त आहेत, त्यांचे भारतभूमीवर प्रेम आहे. त्यांनाही स्वातंत्र्याची इच्छा आहे. खरे भांडण इंग्रज राजवटीशी

सरहद्द गांधी आणि शेख अब्दुल्ला यांच्या उदयामुळे गांधीजी अधिक बलवान झाले आणि आता हैदराबाद संस्थानच्या प्रश्नाला हात घातला पाहिजे असे त्यांनी ठरवले. हैदराबादच्या कॉंग्रेस राजकारणाचे नेतृत्व आणि मार्गदर्शन इ.स. १९४५ पर्यंत व्यक्तिशः गांधीजींकडे होते. गांधीजींनी १९३७ अखेर हैदराबाद संस्थानात राजकीय आंदोलन संघटित करण्याला अनुमती दिली. यामळे हैदराबाद स्टेट कॉंग्रेस इ.स. १९३८ साली अस्तित्वात आली. हैदराबादच्या राजकारणाचा एक दुवा यामुळे स्पष्ट होतो.

हैदराबाद संस्थान हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. त्याकाळी एक कोटी चौसष्ट लक्षांच्या आसपास या संस्थानची लोकसंख्या होती. याहून कमी लोकसंख्येचा प्रदेश जगात सार्वभौम राष्ट्र म्हणून नांदत आहेत. या हैदराबादचे स्वतंत्र राष्ट्र करावे ही कल्पना निजामाच्या डोक्यात आली असती तर त्यात नवल वाटण्याजोगे काहीच नव्हते. हैदरावाद संस्थानाचे एकूण सोळा जिल्हे होते. स्थूलपणे आठ जिल्हे तेलगू भाषिक, पाच मराठी भाषिक आणि तीन कानडी भाषिक अशी या संस्थानची रचना होती. पण या स्थूल परिचयापेक्षा हैदराबादचा इतर सूक्ष्म परिचय जास्त महत्त्वाचा आहे. त्यातील एक महत्त्वाची गोष्ट अशी की सर्व संस्थानभर जहागिरीचे निरनिराळे प्रदेश होते. यातील सर्वांत मोठी जहागीर व्यक्तिशः निजामाची, जिचे उत्पन्न निजामाची वैयक्तिक मालकी होती तिला सरफे खास म्हणत. याखेरीज लहानमोठे हिंदू व मुसलमान जहागीरदार होते. मोठ्या हिंदू जहागीरदारांत किशनप्रसाद, राजे राय रायान, राजा वनपार्ती, इंद्रकरण इत्यादी प्रमुख होते. मुस्लिम जहागीरांत सालारजंग सर्वांत प्रमुख होते. संस्थानचा एक तृतीयांश प्रदेश जहागीरदारीने व्यापलेला होता. शिवाय तेलगू प्रदेशात मोठमोठे जमीनदार होते, परंपरेने चालत आलेले सरदेशमुख, देशमुख, देशपांडे, सरदेशपांडे, इजारदार, महाजन अशा वतनदारांचीही खूप मोठी संख्या होती. सर्व संस्थान एका सरंजामशाही युगात वावरत होते, परंपरागत चालत आलेले जीवन, सर्व चालीरीती, रूढी या संस्थानात पुरेपूर होत्या. वेठबिगार चालू होती. अस्पृश्यता बिनतक्रार सर्वत्र पाळली जाई. पुरुषच गुलाम होते मग स्त्रीदास्य तर होतेच. अठराव्या शतकातील भारताचे सर्व वातावरण जवळपास इ.स. १९४० पर्यंत हैदराबाद संस्थानात होते.

याबाबतीत अगदी साध्यासुध्या अशा दोन गोष्टी मी नमूद करू इच्छितो. माझी

स्वतःची मावशी लग्नाच्या वेळी चौदा वर्षांची होती. चौदाव्या वर्षी तिचे लग्न जुळवण्याला अतोनात अडचणी आल्या. कारण एवढ्या मोठ्या वयापर्यंत मुलगी अविवाहित ठेवणे समाज प्रशस्त मानीत नव्हता. ही इ.स. १९४२ ची गोष्ट आहे. पश्चिम महाराष्ट्रात यावेळी फडके, खांडेकर जुने झालेले होते आणि महर्षी कर्वे याच्या कार्याला काही दशके उरलेली होती. माझे चुलत आजोबा जवळपास पंचावन्न वर्षांचे होते. त्यांनी एका सोळा वर्षांच्या मुलीशी लग्न केले. हे लग्न १९४२ चेच आहे. मोठ्या प्रमाणात नातेवाईक मंडळी या लग्नाला गोळा झालेली होती. चार दिवस आनंद सोहळा चालू होता. जमलेल्या शेकडो लोकांना काही गैर घडते आहे याचे यत्किंचितही भान नव्हते. आमच्याकडे जणू शारदा नाटक पोचलेलेच नव्हते. निरनिराळे जहागीरदार आपल्या तरुण देखण्या मुली निजामाला भेट देत असत. ही जहागीरदारांची राजाला भेट म्हणून मुली देण्याची प्रथा इ. स. १९४८ सालपर्यंत होती. पोलीस ॲक्शन झाल्यानंतर निजामाच्या जनानखान्यात विपन्नावस्थेत सापडलेल्या या दुर्दैवी स्त्रियांची संख्या साडेतीनशेच्या आसपास होती. निजामाच्या कारकीर्दीत एकूण जनानखान्यात किती मुली आल्या, ज्या तिथेच राहिल्या आणि मेल्या याचा आकडा उपलब्ध नाही. पण तो सहजच एक हजाराच्या आसपास असावा असे जाणकारांचे म्हणणे आहे. यात दासी, बटकी आणि हिजडे यांचा समावेश नाही. तो अकुलीनांचा भाग झाला. ही गणती कुलीन कन्यांची चालू आहे. असे जनानखाने इतर सरदार, जहागीरदारांचेही होते. माणसाला माणूस म्हणून काही अस्तित्व असते याची जाणीवच नव्हती.

लोकसंख्येत शेकडा ८५ हिंदू होते. अकरा टक्के मुसलमान होते, पारशी, ख्रिश्चन आणि इतर मिळून चार टक्के होते. पण सर्व जीवनावर मुस्लिम वर्चस्व होते. एक म्हणजे सर्व राज्यकारभाराचीच वरपासून खालपर्यंत भाषा उर्दू होती. राज्यकारभाराचीच भाषा नव्हे तर सर्व शिक्षणाचे माध्यमच उर्दू होते. मातृभाषेतून शिक्षण इयत्ता चौथीपर्यंत असते. त्यात तिसरी आणि चौथीला उर्दू आवश्यक भाषा असे. पुढचे तर सर्व शिक्षण उर्दूतच असे. त्यामुळे मराठी, तेलगू, कानडी या भाषांच्यामध्ये शिक्षण नाही, त्यांना राज्यकारभारात वाव नाही. म्हणून त्यांच्या विकासाची सोयच नव्हती. सर्वांच्या भाषेवर उर्दूचे दाट संस्कार पसरलेले होते. बाकीच्यांचे सोडा पण निजामी राजसत्तेविरूद्ध संतापाने पेटून उठलेले व ज्वलज्जहाल देशभक्त असणारे आमचे स्वातंत्र्यवीर सुद्धा ज्या मराठी भाषेतून बोलत असत ती

मराठी उर्दूमय होती. माझ्या जिल्ह्याचे लोकप्रिय काँग्रेस नेते आपल्या व्याख्यानाचा आरंभ मराठीतून बोलताना "माझे अजिज परभणीच्या रहनेवालो आज मी तुमच्या सामने एक महत्त्वाची गुजारीश पेश करण्यासाठी खडा आहे." असा करीत असत. त्यामुळे सर्व जीवनावर संपूर्णपणे गाढ असे मुस्लिम संस्कृतीचे आक्रमण दिसून येत असे. त्याचा कुणाला संकोचसुद्धा वाटत नसे. हैदराबादेत जानेवारी, फेब्रुवारी हे महिने चालत नसत. अजूर, दये हे मुसलमानी महिने चालत. मोहरमची बारा दिवस सुटी असे. रमझान संपूर्ण महिना अर्धा दिवस सुटी असे. सर्व मुसलमानी सणांना सुटी असे. मोहरमच्या सणात हिंदू मंडळी ताबुतांच्या समोर मोठ्या आनंदाने आणि उत्साहाने 'धुला, धुला,' करीत नाचत असत.

मशिदींच्या समोर वाद्ये वाजवायची नाहीत हा तर नियम होताच पण मशिदीच्या शेजारी कोणतेही घर मशिदीहून उंच असू नये असाही नियम होता. हिंदूच्या घराची खिडकी अशी असू नये की ज्यामुळे मुसलमानांच्या घरात पाहता येईल. गोषा सर्वत्र कसोशीने पाळला जाई. जाहीर सभा आणि व्याख्याने शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय घेता येत नसत. वर्तमानपत्रे बाहेरची फारशी आत येऊ द्यायची नाहीत, आत काढू द्यायची नाहीत, असे एक सूत्र होते. असा एक अलिखित कायदा होता की सरकारी शाळा फारशा काढायच्या नाहीत, खाजगी काढू द्यायच्या नाहीत. सामान्यपणे एका जिल्ह्यात लहानमोठी तेराशे गावे असत. इतक्या गावांच्यासाठी मिळून मुलांची दोन हायस्कूले आणि मुलींचे एक हायस्कूल पुरेसे आहे असे शासनाला वाटे. याहून वरच्या शिक्षणाची सोय तर फक्त राजधानी हैदराबाद इथेच होती. नोकऱ्यांचे दोन भाग पाडले जात असत. पहिल्याला ओहोदे कुलिया-महत्त्वाच्या नोकऱ्या असे म्हणत. त्यात सामान्यपणे सत्त्याण्णव ते अठ्ठ्याण्णव टक्के मुसलमान असत. दुसरा गट ओहोदे-गैर कुलिया हा असे. म्हणजे बिनमहत्त्वाच्या नोकऱ्या. त्यात पंचाहत्तर टक्के मुसलमान असत. लोकसंख्येत ते अकरा टक्के होते. यामुळे सर्व शासकवर्ग खालपासून वरपर्यंत मुस्लिम समाजातील असे. सावकारीसुद्धा अरब, रोहिले व पठाण मोठ्या प्रमाणात करीत. त्या खालोखाल मारवाडी सावकार असे. कुणालाही मुसलमान धर्म स्वीकारता येत असे. पण मुस्लिम धर्म कुणाला सोडता येत नसे. कुणाला फसवून अगर सक्तीने जरी मुसलमान केले असले, किंबहुना एक माणूस मुसलमान झाला आहे अशी नुसती अफवा जरी असेल तरी तो मुसलमानच समजावा लागत असे. कारण वेळ पडली तर

तो मुसलमान नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी उरलेल्यांच्यावर येऊन पडे. या दृष्टीने एक घटना म्हणून नांदेडचीच जुनी गोष्ट सांगता येईल.

कविवर्य दे. ल. महाजन यांचा एक भाऊ उडाणटप्पू व भटक्या असा होता. हा त्यांचा भाऊ एक दिवस आजारी अवस्थेत घरी परतला. या भावाच्या विषयी लोक म्हणत की त्याने मुसलमान धर्म स्वीकारला आहे. पण या भावाने मरताना कविवर्य महाजन यांना असे सांगितले की, 'मी कधीही मुसलमान धर्म स्वीकारलेला नाही, मी हिंदूच आहे. माझी उत्तरक्रिया हिंदू पद्धतीने करा.' महाजनांनी ती केली म्हणून नांदेडच्या ब्राह्मणांनी त्यांच्यावर जातिबहिष्कार घातला. महाजन जहागिरदार असूनसुद्धा अन्यायाविरूद्ध दाद मागू शकले नाहीत कारण कायद्यानुसार ज्याच्याविषयी मुसलमान असल्याचा वहीम आहे तो कधीही मुसलमान नसल्याचा पुरावा महाजन कुठून देणार, स्त्रियांच्या अपहरणाचे प्रकार अधूनमधून सतत घडत. मुसलमानी आक्रमणाची जनतेला सवयच इतकी झाली होती की त्याविरूद्ध प्रतिकार करण्याची हिंमतच नव्हती.

हैदराबादेत हिंदूंची परिस्थिती अशी वाईट होती यावरून मुसलमानांची परिस्थिती फार चांगली होती असे अनुमान काढणे बरोबर होणार नाही. मुसलमानांच्यामध्ये धर्मवेड होते, अरेरावी होती, स्वतःला राज्यकर्ते समजण्याची त्यांची रीत होती, पण बहुसंख्यांक मुसलमान दरिद्री आणि हलाखीचे जीवन जगत होते. मुस्लिम समाजाचे जीवनमान उंचावे यासाठी निजामाने फारसे काही केलेले नव्हते. टांगेवाले, हमाल, शेतमजूर, पानवाले अगर घरगुती नोकर हेच बहुसंख्य मुसलमानांचे जीवन होते. या परिस्थितीला हिंदू आणि मुसलमान यांच्या संघर्षाचा रंग येणे अपरिहार्य होते. म्हणून गांधीजी हैदराबाद संस्थानात राजकीय कार्य सुरू करण्यास तयार नव्हते. बॅरिस्टर रामचंद्र नाईक, धर्मवीर वामन नाईक, केशवराव कोरटकर, काशिनाथराव वैद्य इत्यादी अनेक मंडळींची इच्छा राजकीय कार्य हैदराबादेत सुरू व्हावे अशी होती.पण वरून परवानगी मिळत नव्हती. हैदराबादेत शैक्षणिक व सामाजिक कार्यच तेवढे करावे, आताच राजकारणाकडे वळू नये असे वरिष्ठ नेते म्हणत. त्यामुळे राजकीय संघटन आणि राजकीय मागण्या संस्थानात सुरू झालेल्या नव्हत्या. नव्या पद्धतीने विचार करणारा, राजकारणाविषयी जागरूक असणारा तरुण वर्ग बराच अस्वस्थ झालेला होता पण त्याला अजून निश्चित कार्य सापडलेले नव्हते. केशवराव कोरटकर यांनी हैदराबाद संस्थानभर आर्यसमाजाचे कार्य बरेच वाढवीत नेलेले होते; समाजसुधारणा

आणि राजकीय जागृती याद्दष्टीने आर्यसमाजाने हैदराबादेत फार मोठे कार्य केलेले आहे. हळूहळू हिंदू समाजात स्वाभिमानाचे वारे वाहू लागले होते.

या सुमारास इत्तहादुल मुसलमीन या संघटनेचे नेते बहादूर यार जंग यांनी वातावरण तापविण्यास आरंभ केला. निजामाची इच्छा अशी होती की हैदराबाद संस्थानातील मुसलमानांची एक बलवान संघटना असावी. या संघटनेचा निजामाच्या राजवटीला आणि हैदराबाद एक स्वतंत्र राष्ट्र या कल्पनेला पाठिंबा असावा. बहादूर यार जंग निजामाची ही इच्छा पार पाडण्यासाठी कटिबद्ध होते. पण राजकारणाला काही स्वतःचे नीतिनियम असतात. मुसलमानांच्यामध्ये प्रचार आणि जागृती आणि त्याचे एका संघटनेत रूपांतर हा उद्योग सुरू झाला की त्याला एखाद्या वैचारिक भूमिकेची गरज लागते. हैदराबाद हे मुसलमानांनी जिंकलेले राष्ट्र आहे. या राष्ट्राचे मालक संस्थानातील सोळा लक्ष मुसलमान आहेत, त्यांच्या इच्छेने प्रतिनिधी निजाम आहेत ही बहादूर यार जंग यांची भूमिका होती. मुसलमानांनी संघटित होऊन निजामाच्या मागे उभे राहावे हा हेतू या आंदोलनाने साध्य होणार होताच पण त्याबरोबर मुसलमानांनी स्वतःला राज्याचे स्वामी मानावे आणि निजाम हा सर्वांच्या इच्छेचा प्रतिनिधी नाममात्र प्रमुख असावा हेही या चळवळीचे एक रूप ठरणार हे उघड होते. आणि राष्ट्र धोक्यात आहे, धर्म धोक्यात आहे अशा घोषणा करून निर्माण होणाऱ्या संघटना आक्रमक ठरणार हेही उघड आहे. इत्तहादुल मुसलमीनचे कार्य जोराने सुरू होताच जागोजाग हिंदूवरील आक्रमणे वाढली. निजामाला जागृत व संघटित मुसलमान आपल्या पाठीशी उभे आहेत हे चित्र हवे होते. पण मुसलमानांनी स्वतःला सार्वभौम समजावे आणि निजामाला घटनात्मक प्रमुख मानावे हे मात्र नको होते. त्याला हिंदूंच्यामधील नवजागृती नको होती पण मुसलमानी आक्रमणामुळे हिंदूंनी चिडून पेटून उठावे हेही नको होते. इत्तहादुल मुसलमीन ही संघटना बलवान असावी, झुंजार असावी असेही निजामाला वाटे. शिवाय ती आपल्या हातातील बाहुले असावी असेही वाटे.

हिंदू समाजावर आक्रमणे वाढू लागताच हिंदू समाजातील प्रतिकाराची भावना जागी होऊ लागली. अनेक ठिकाणी मुसलमानांनी आर्य समाजाच्या केंद्रावर हल्ले करून तेथील होमकुंडे फोडून टाकली. जत्रांना आणि देवळांना उपसर्ग देणे सुरू झाले. मुसलमानांच्या वागण्या-बोलण्यात अधिक कडवेपणा आणि अधिक आक्रमकता दिसू

लागली. या परिस्थितीत उस्मानिया विद्यापिठातील वंदे मातरम् हे प्रकरण उद्भवले. हैदराबाद संस्थानात धर्मशिक्षण याचा अर्थ मुसलमानांना मुस्लिम धर्माचे शिक्षण इतकाच होई. इतरांना धर्मशिक्षण दिले जात नसे. शुक्रवारी नमाजसाठी लांब सुटी असे. विद्यापीठाच्या वसतिगृहात नमाजची स्वतंत्र सोय होती. म्हणून उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी अशी मागणी केली की आम्हालाही आमच्या धार्मिक उपासनेची परवानगी असावी. वसतिगृहाच्या चालकांनी हिंदूंनाही धर्म उपासनेसाठी एक हॉल दिला. या हॉलमध्ये प्रार्थना, भजने इत्यादि कार्यक्रम होत. हिंदू विद्यार्थ्यांनी स्वतःला मुसलमानांच्या बरोबरीचे समजावे आणि नमाजसाठी हॉल मागताच भजनासाठी हॉल मागावा हे मुस्लिम विद्यार्थ्यांना आवडले नाही. तिथून कुरबुरीचा आरंभ झाला. हे हिंदू विद्यार्थी आपल्या प्रार्थनेत वंदे मातरम् हे गीत म्हणत. त्या गीतामुळे आपल्या धर्मभावना दुखावतात असे मुस्लिम विद्यार्थ्यांचे म्हणणे होते.

वंदे मातरम् या गीताविषयी काँग्रेस पक्षातच वाद होते. पण त्या वादाचे स्वरूप निराळे होते. या गीतात भारताचे वर्णन हिंदू देवीप्रमाणे केले आहे म्हणून हे गीत आम्ही राष्ट्रगीत म्हणून मान्य करणार नाही असे काँग्रेसमधील मुसलमानांचे म्हणणे होते. वंदे मातरम् हे गीत तुम्ही म्हणणार असाल तर म्हणा, तुम्हाला आवडत असेल तर असो. आम्हाला हे गीत आवडत नाही यामुळे आम्हाला न आवडणारे गीत राष्ट्रगीत नको. ही मागणी अगदी वेगळी आहे. आमच्यावर वंदेमातरम् लादू नका ही ती मागणी आहे. उस्मानिया विद्यापीठातील मुस्लिम विद्यार्थ्यांची मागणी यापेक्षा निराळी होती. तुम्ही वंदे मातरम् म्हणू नका असे त्यांचे म्हणणे होते. मुस्लिम विद्यार्थ्यांच्या या मागणीवर विचार होऊन हैदराबाद शासनाने असा एक आदेश काढला की विद्यापीठात अगर महाविद्यालयात वंदे मातरम् हे गीत म्हणू नये. सार्वजनिक ठिकाणीही हे गीत म्हणू नये. या आदेशाविरूद्ध उस्मानिया विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. हे विद्यार्थी महाविद्यालयावर बहिष्कार टाकून बाहेर तर पडलेच पण वंदे मातरम् गीत गाऊन त्यांच्यातील अनेकांनी सत्याग्रह केला. वंदे मातरम् हा १९३८ सालच्या सत्याग्रही लढ्याचा आरंभ होता. एकूण विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्यापैकी मोठ्या संख्येने हिंदू विद्यार्थ्यांनी यावेळी महाविद्यालये सोडली. हे विद्यार्थी शिक्षणासाठी संस्थानाबाहेर पडले. या विद्यार्थ्यांची एक फार मोठी अपेक्षा अशी होती की मालवीयांचे बनारस विद्यापीठ आपले स्वागत करील. पण बनारस विश्व हिंदू विद्यापीठाला निजामाने एक

लक्ष रुपयांची देणगी दिलेली होती. बनारसचे हे हिंदू विद्यापीठ अन्यायाच्याविरूद्ध लढणाऱ्या हिंदू विद्यार्थ्यांना सहानुभूती दाखवू इच्छीत नव्हते. कारण आपल्या मुस्लिम आश्रयदात्याला नाराज करण्याची विद्यापीठाची तयारी नव्हती. या बहिष्कार घालणाऱ्या विद्यार्थ्यांना नागपूर विद्यापीठाने आश्रय दिला.

या विद्यार्थ्यांच्या बहिष्कार व सत्याग्रह आंदोलनाला हैदराबादच्या चळवळीत फार मोठे महत्त्व आहे. जी मंडळी नागपूर विद्यापीठात गेली ती त्या विद्यापीठातून पदवीधर झाली पण इकडे हैदराबाद संस्थानात त्यांना सरकारी नोकरी मिळणे शक्य नव्हते. हैदराबाद संस्थानात पुष्कळसे तरुण राजकीय कार्यकर्ते या सत्याग्रहातून वर आलेले आहेत. हैदराबाद संस्थानातील अनेक प्रसिद्ध कम्युनिस्ट कार्यकर्ते या आंदोलनातून उदयाला आले. १९३९ साली वंदे मातरम् म्हणणे हा आपला पवित्र हक्क आहे. हिंदूंच्या धर्मांवर होणारे आक्रमण ताबडतोब थांबवा, आम्हाला धार्मिक न्याय व समानता पाहिजे अशा घोषणा देणारे हे तरुण कार्यकर्ते धार्मिक राजकारणात फार काळ राहू शकले नाहीत. वंदे मातरम् चळवळीतील बहुतेक सर्व कार्यकर्ते पुढच्या काळात काँग्रेसमध्ये अगर कम्युनिस्ट पक्षात गेले. धार्मिक आक्रमण असणाऱ्या समाजात धार्मिक प्रश्नावर सुरू झालेली आंदोलनेसुद्धा धर्मातील प्रवाहात मिसळत गेली. जिथे हिंदू मुसलमानांच्या विरूद्ध लढत होते तिथेही हिंदुत्ववादी राजकारण फारसे प्रभावी राहू शकले नाही.

वंदे मातरम् आंदोलन विद्यार्थ्यांनी जेव्हा सुरू केले त्याच्या किंचित आधी आर्यसमाजाचे आंदोलन सुरू झालेले होते. आर्यसमाज ही संघटना लढाऊ संघटना आहे. आर्यसमाजाच्या कार्यकर्त्यांना मारहाण, आर्यसमाज मंदिरातील होमकुंड फोडणे या बाबी फार काळ ती संघटना सहन करणे शक्य नव्हते. एकदोन गावी तर आर्यसमाजाने प्रतिकारही करून पाहिला. शासनाने आर्यसमाजाच्या काही काही कार्यकर्त्यांवर गुंडगिरी बद्दल खटले भरले. हे खटले चालू असतानाच शामलाल आर्य यांचा मृत्यू झाला. यामुळे आपल्या धार्मिक मागण्यांसाठी आर्यसमाजाने सत्याग्रह सुरू केला. आर्यसमाज ही संघटना थोडी समजून घेण्याजोगी आहे. स्त्रीशिक्षण, प्रौढ शिक्षण, पुनर्विवाह, जाती निर्मूलन, अस्पृश्यता निवारण असे समाजसुधारकांचे सर्व कार्यक्रम आर्यसमाज उत्साहाने हाताळतो. पण तो वेदाचा कडवा अनुयायी आहे. आर्यसमाज स्वतःचा धर्मच मानतो. आपला धर्म हाच एकमेव खरा धर्म आहे असे तो

मानतो. ही एक वेदप्रामाण्य मानणारी कडवी धार्मिक चळवळ आहे. व्यवहारात आर्यसमाज मुस्लिम आक्रमणाच्या विरूद्ध नेहमीच हिंदूंचा त्राता राहत आलेला आहे. आर्यसमाजाचा अहिंसेवर फारसा आग्रह नसतो. त्यांचा मुस्लिम विरोध, अहिंसा विरोध प्रसिद्ध आहे. पण नेहमीच आर्यसमाजाचे लोक प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे काँग्रेसच्या राजकारणात राहत गेले. लाला लजपतराय, स्वामी श्रद्धानंद यांच्यापासून आजच्या चरणसिंगापर्यंत प्रायः आर्यसमाजी नेते काँग्रेसमध्ये राहत आले आहेत. आर्यसमाजाचा सत्याग्रह १९३८ साली जोमाने सुरू झाला. काँग्रेसचा सत्याग्रह संपल्यानंतरही आर्यसमाजाने काही महिने सत्याग्रह चालविला. आर्य समाजातून बाहेर पडलेले हे सत्याग्रही कार्यकर्ते पुढच्या काळात प्रामुख्याने काँग्रेसमध्ये राहिले. गुलबर्गा आणि बिदर या जिल्ह्यातील बहुतेक सर्व काँग्रेस कार्यकर्ते आर्यसमाजी होते. आर्यसमाजाच्या या आंदोलनामुळेसुद्धा अनेक कार्यकर्ते राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले. आर्य समाजाचे वरिष्ठ नेते काँग्रेसच्या राजकारणाशी निगडीत असल्यामुळे काँग्रेसचे आंदोलन सुरू होण्याच्या आगेमागे आर्यसमाजाचे आंदोलन सुरू व्हावे आणि काँग्रेसचे आंदोलन संपल्यानंतर काही महिन्यांनी आर्यसमाजाचे आंदोलन संपावे हे साहजिकच होते. आर्यसमाजाने जाहीररीत्या आपला व काँग्रेसचा संबंध कधी कबूल केला नाही. उलट आपल्या आंदोलनाच्या वेळी स्वतःचे आंदोलन सुरू करून काँग्रेस गोंधळ माजवीत आहे असे सांगून आर्यसमाजाने काँग्रेसचा निषेधही केला. बाहेर एकमेकांच्या विरूद्ध आरोळ्या ठोकणारे हे दोन्ही गट गांधीजींचा सल्ला घेत असत, हे उघड गुपित आहे.

आर्यसमाजाने हैदराबादेतील हिंदूंना प्रतिकाराची सवय लावली. प्रसंगविशेषी हत्यार चालविण्याइतकी हिंमतही लोकांच्यामध्ये प्रथम आर्यसमाजानेच निर्माण केली. हातात काठी अगर तलवार घेऊन आक्रमणाच्या प्रतिकाराला या संस्थानात हिंदू माणूस तयार करण्याचे श्रेय आर्यसमाजालाच दिले पाहिजे. आर्यसमाजाच्या सहवासातच हैदराबाद येथील जनता सशस्त्र प्रतिकाराच्या दृष्टीने तयार होऊ लागली. पुढे हैदराबादच्या मुक्ती आंदोलनात उमरी बँकेच्या लुटीचे एक प्रसिद्ध प्रकरण आहे. या उमरी बँक प्रकरणाचे एक संयोजक धनजी पुरोहित निष्ठावंत आर्यसमाजी आणि निष्ठावंत काँग्रेसभक्त होते.

याच वेळेला हिंदू महासभा ही स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नेतृत्वाखाली लढाऊ रूप घेत होती. हिंदू महासभेने हिंदूंच्या धार्मिक अधिकारांच्या संरक्षणासाठी भागानगर

निःशस्त्र प्रतिकार आंदोलन सुरू केले. हिंदू महासभेच्या या आंदोलनात हिंदू महासभेचे सत्याग्रही म्हणून जे गेले त्यांच्यातील पुष्कळजण पुढे कॉंग्रेसच्या कार्यात सहभागी झाले. हैदराबाद संस्थानात हिंदू महासभेचे कार्य फारसे कधीच वाढू शकले नाही. पण वाय. डी. जोशी, रामचंद्रराव यांच्यासारखे काही ध्येयवादी हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्ते या आंदोलनातून उभे राहिले.

आर्यसमाजाची मागणी आपल्यावरील आक्रमणाची चौकशी आणि उपासना स्वातंत्र्य ही होती. हिंदू महासभेची मागणी हिंदूंच्यावरील आक्रमण थांबवण्यात यावे ही होती. विद्यार्थ्यांची मागणी वंदे मातरम् म्हणण्याचा हक्क प्रस्थापित करणे इतकीच होती. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसची मागणी प्रामुख्याने राजकीय होती. त्यांना निवडणुकीवर आधारलेली विधानसभा आणि जनतेला जबाबदार असणारे मंत्रिमंडळ हवे होते. हैदराबाद संस्थानात लोकशाहीची प्रक्रिया सुरू व्हावी अशी स्टेट कॉंग्रेसची मागणी होती. जनतेच्या राजकीय हक्कांचा पुरस्कार करण्यासाठी एक राजकीय संघटन सुरू करण्याचा मनोदय स्टेट कॉंग्रेसचा होता. ही संघटना स्थापन होण्यापूर्वीच निजामाने तिच्यावर बंदी घातली. पण त्याही अवस्थेत स्टेट कॉंग्रेस स्थापन केल्याचे जाहीर करण्यात आले. गोविंदराव नानल हे या स्टेट कॉंग्रेसचे पहिले अध्यक्ष होते. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसवरील बंदी उठवा यासाठी कॉंग्रेसने आंदोलन सुरू केले. सुमारे नऊशे सत्याग्रही तुरुंगात गेलेले असताना महात्मा गांधींनी आदेश देऊन हा सत्याग्रह स्थगित केला.

स्टेट कॉंग्रेसने आपला सत्याग्रह एकाएकी स्थगित करावा ही गोष्ट कुणालाच आवडली नाही. स्टेट कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांनासुद्धा गांधीजींच्या निर्णयाबद्दल अतिशय असमाधान होते. हिंदू महासभा आणि आर्यसमाजाच्या नेत्यांनी तर गांधीजींची ही स्थगिती म्हणजे जनतेचा विश्वासघात अशी भूमिका घेतली. आज आपण इतक्या दीर्घ काळानंतर गांधीजींच्या या निर्णयाचे अवलोकन करू लागलो म्हणजे असे वाटते की गांधीजींचा निर्णयच बरोबर होता. आंदोलनातून कार्यकर्ते तयार करायचे आणि कार्यकर्त्यांची हिंमत संपण्याच्या आत आंदोलन मागे घ्यायचे. मिळालेली शक्ती संघटित करून पुन्हा आंदोलनाचा आरंभ करायचा ही एक सतत चालणारी प्रक्रिया असते. या प्रक्रियेत गांधीजी वाकबगार होते. इ. स. १९३८ साली गांधीजी सत्याग्रह मागे घेतात आणि इ. स. १९४५ साली हैदराबाद संस्थानभर कॉंगेस संघटना एक बलवान

संघटना म्हणून अस्तित्वात येते, ४८ च्या मुक्ती आंदोलनात इतर कार्य बाजूला ठेवले तरी केवळ सत्याग्रह या कक्षेत बारा हजार लोक काँग्रेसने तुरुंगात दाखल केले ही गोष्ट आपण समजून घेतली पाहिजे. वेळेवर सत्याग्रह, वेळवर माघार आणि कोणत्याही माघारीतून संघटनेच्या सामर्थ्यात वाढ याबाबत गांधीजी फार मोठे तज्ज्ञ होते. १९३८ साली उदयाला आलेल्या कार्यकर्त्यांच्या फळीनेच हैदराबाद संस्थानातील पुढचे पंधरावीस वर्षांचे सर्व राजकारण व्यापून टाकलेले आहे.

हिंदू सभेला मात्र हा प्रश्न नीट हाताळता आलेला दिसत नाही. हिंदूंच्यावरील धार्मिक अत्याचार थांबवा या मागणीसाठी त्यांनी आंदोलन सुरू केलेले होते. गांधीजींच्या प्रमाणे त्यांनी आपले आंदोलन बिनशर्त थांबविले नाही. स्टेट काँग्रेसचे आंदोलन बंद झाल्यानंतर काही महिन्यांनी हैदराबादच्या पंतप्रधानांनी एक चौकशी समिती नेमून सर्व प्रकारच्या आक्रमणांची चौकशी करण्यात येईल असे आश्वासन दिले. हिंदूंना त्यांच्या धर्मउपासनेचे सर्व स्वातंत्र्य देण्याची ग्वाही दिली आणि हिंदू सभेला सत्याग्रह स्थगित करण्याची विनंती केली. म्हणजे हिंदू महासभा ज्या मागणीसाठी आंदोलन करीत होती त्याबाबतीत ती विजयी ठरली होती. स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह स्टेट काँग्रेसवरील बंदी उठवा या मागणीसाठी होता, बंदी तशीच राहिली. ती जवळ जवळ सात वर्षे चालू होती. आपली मागणी अपूर्ण ठेवून काँग्रेस बाहेर पडत होती. आर्यसमाज हिंदू महासभेला दिलेले आश्वासन आपल्यालाही पुरेसे आहे असे समजून थांबला होता. ज्या धार्मिक मागण्यांच्यासाठी आंदोलन सुरू झाले त्या धार्मिक मागण्या मान्य झाल्यावर आंदोलन संपले म्हणजे या आंदोलनात धार्मिक मागण्यांचा विजय झाला; राजकीय मागण्या तशाच पराभूत राहिल्या असे तात्कालिक चित्र दिसते. थोडे पुढे जाऊन आपण पाहू लागलो तर सारे धार्मिक प्रश्न मागे पडतात आणि राजकीय मागणी बलवान होते असे दिसते.

एकदा सत्याग्रह बंद झाल्यानंतर चौकशी समिती नेमण्यास टाळाटाळ, चौकशी समिती ही सुद्धा नुसता फार्सच म्हणजे त्यातून निष्पन्न काही होणारे नव्हते. चौकशी, संरक्षण वगैरे नुसत्या सांगण्याच्या गोष्टी. बाकी आक्रमण, अत्याचार चालूच राहणार होते. यामुळे आमच्या मागण्यांचा विजय झाला या घोषणेतही फारसा अर्थ नव्हता. मूळ प्रश्न राजकीय होता. तो राजकीय प्रश्न सुटताच धार्मिक आक्रमणाचा प्रश्न सुटून गेला. पण मूळ प्रश्न धार्मिक होता असे जरी मानले तरी धार्मिक राजकारणावर विश्वास

ठेवणाऱ्या नेतृत्वाला हा लढा सातत्याने व नेटाने चालवता आला नाही ही गोष्ट उघड होते. १९३८ हा हैदराबादच्या राजकारणाचा महत्त्वाचा टप्पा आहे. राजकीय संघटनांची निर्मिती, राजकीय कार्यकर्त्यांच्या पहिल्या फळीचा उदय व हिंदूंच्या प्रतिकाराचा आरंभ या सर्व बाबी १९३८ पासून सुरू होतात. इतिहासाच्या क्रमात पाहायचे तर हैदराबादचे आंदोलन धार्मिक प्रश्नावरून सुरू होते व राजकीय प्रश्नांच्या दिशेने विकसित होते. हैदराबादेतही समोर रझाकार लढत असताना आणि मुसलमानी अत्याचार डोळ्यांसमोर दिसत असताना धार्मिक राजकारण प्रभावी होत नाही याचा हिंदुत्ववादी मंडळींनी गंभीरपणे विचार केला पाहिजे, असे मला वाटते.

धार्मिक राजकारण सर्व आर्थिक, राजकीय प्रश्न आपल्या पोटात सामावून घेण्याइतके व्यापक झाले नाही तर ते प्रभावी होत नाही. हा जसा अडतीस सालचा एक बोध आहे त्याप्रमाणे धार्मिक प्रश्नांचाही शेवट आर्थिक व राजकीय प्रश्नातच होतो, धार्मिक प्रश्न हे मूलतः आर्थिक व राजकीय असतात असाही या घटनेचा बोध आहे. तुम्ही स्पष्टीकरण कसेही करा हैदराबादचा राजकारणाचा आरंभ १९३८ पासून होतो ही घटना मात्र निर्विवादपणे सर्वांनी मान्य केलेली आहे.

❊ ❊ ❊

(प्रकाशन : धर्मभास्कर १९७८)

ठेवणाऱ्या नेतृत्वाला हा लढा सातत्याने व नेटाने चालवता आला नाही ही गोष्ट उघड होते. १९३८ हा हैदराबादच्या राजकारणाचा महत्त्वाचा टप्पा आहे. राजकीय संघटनांची निर्मिती, राजकीय कार्यकर्त्यांच्या पहिल्या फळीचा उदय व हिंदूंच्या प्रतिकाराचा आरंभ या सर्व बाबी १९३८ पासून सुरू होतात. इतिहासाच्या क्रमात पाहायचे तर हैदराबादचे आंदोलन धार्मिक प्रश्नावरून सुरू होते व राजकीय प्रश्नांच्या दिशेने विकसित होते. हैदराबादेतही समोर रझाकार लढत असताना आणि मुसलमानी अत्याचार डोळ्यांसमोर दिसत असताना धार्मिक राजकारण प्रभावी होत नाही याचा हिंदुत्ववादी मंडळींनी गंभीरपणे विचार केला पाहिजे, असे मला वाटते.

धार्मिक राजकारण सर्व आर्थिक, राजकीय प्रश्न आपल्या पोटात सामावून घेण्याइतके व्यापक झाले नाही तर ते प्रभावी होत नाही. हा जसा अडतीस सालचा एक बोध आहे त्याप्रमाणे धार्मिक प्रश्नांचाही शेवट आर्थिक व राजकीय प्रश्नातच होतो, धार्मिक प्रश्न हे मूलतः आर्थिक व राजकीय असतात असाही या घटनेचा बोध आहे. तुम्ही स्पष्टीकरण कसेही करा हैदराबादचा राजकारणाचा आरंभ १९३८ पासून होतो ही घटना मात्र निर्विवादपणे सर्वांनी मान्य केलेली आहे.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : धर्मभास्कर १९७८)

## ४.

# कै. स्वामी रामानंद तीर्थ : एक पत्र व चर्चा

पू. स्वामीजींच्या चरणी शि. सा. न.

आपले आत्मवृत्त वाचले. आपण ह्या हैदराबाद संस्थानातील जनतेचे मुक्तिदाते म्हणून आम्हाला चिरवंदनीय आणि प्रातःस्मरणीय आहात ह्यात शंकाच नाही. त्याबरोबरच आपण स्वार्थरहित आणि अहंकाररहित संन्यासीही आहात. जीवनाचे काही दिवस आपल्या नेतृत्वाखाली एका भव्य लढ्यात अतिशय धुंदीत मी काढू शकलो, ह्याबद्दल मला नेहमीच धन्यता वाटली. ज्यांच्या पायावर डोके ठेवताना मला तृप्ती लाभली, त्यांपैकी आपण एक आहात.

हे आणि यासारखे मी पुष्कळच लिहू शकेन. एक तर अशा प्रकारच्या स्तुतिस्तोत्रांची तुम्हाला सवय नाही व तुम्हाला 'एम्ब्रॅस' करण्याची माझी इच्छा नाही. आणि दुसरे जिथे सध्या पोटपाणी सुरक्षितपणे चालू आहे, त्या संस्थेचे तुम्ही अध्यक्ष असल्यामुळे मला तुमची स्तुती जपून करण्याची इच्छा आहे. आपण नोकरीमुळे भाटगिरी करतो आहो, असे मला वाटायला नको आणि तुम्हालाही वाटायला नको. आदर हा मौनात असावा. श्रद्धा ही कृतीतून दिसावी हे बरे.

आत्मवृत्त लिहिण्यापूर्वी तुमचे-माझे दीर्घ बोलणे झाले होते. ह्या बोलण्यात आत्मवृत्तकाराकडून दुहेरी अपेक्षा कोणत्या असतात याची आपणास कल्पना दिली होती. एक तर व्यक्तिजीवनाचे चित्र त्यात तपशिलाने असावे आणि दुसरे म्हणजे ज्या सामाजिक परिवर्तनाचे आपण कर्णधार होतो, त्याचे महत्त्वपूर्ण तपशील आपण मोकळेपणाने सांगावे, अशी माझी आग्रहपूर्वक प्रार्थना होती.

मी शून्य झालो. जिथे मीच शून्य झालो तिथे इतरांच्याविषयी ओलावा आणू कुठून? तुमची सारवासारव आहे. तुम्हाला कुणाविषयी वाईट लिहावयाचे नव्हते, त्याशिवाय सहकाऱ्यांविषयी जिव्हाळ्याने लिहिणे शक्य नव्हते, हे सत्य एकदा तरी कबूल करा... (नो कॉमेंट)

आपण संन्यासी आहात पण धार्मिक आणि आध्यात्मिक प्रेरणा आपल्या जीवनात कधीच प्रबल दिसत नाहीत. स्वार्थरहित समाजसेवेचा मार्ग म्हणूनच आपण संन्यास स्वीकारलेला दिसतो. प्राचीन भारताविषयी फारशी गौरवबुद्धी आपल्या मनात नाही. स्वामी विवेकानंद आणि स्वामी रामतीर्थ ह्यांच्या मनात प्राचीन भारताविषयी महान गौरव होता. आपल्या मनाचे हे परिवर्तन मूळचेच की उत्तरकालीन अभ्यासाचा परिणाम हे आपण आत्मवृत्तात सांगितलेले नाही. खरे म्हणजे स्वतःच्या वैचारिक विकासाचाच त्यात आढावा घेतलेला नाही. ही एक उणीव म्हटली पाहिजे.

(स्वार्थरहित समाजसेवा आपल्याला आध्यात्मिक प्रेरणा वाटत नाही, ही विचारांची अपक्कता आहे.)

आपणाकडून अनेक बाबींच्यावर प्रकाश पडणे अपेक्षित होते. संस्थानविषयक प्रश्नांच्याकडे काँग्रेस १९२७ नंतर अधिक लक्ष देऊ लागली. संस्थानांच्यासाठी एक अखिल भारतीय-संघटना जन्माला घालण्याचा अतोनात प्रयत्न काँग्रेसने केला. ह्यामागची भूमिका नेमकी कोणती होती? 'डोमिनियन स्टेट्स' हे जोपर्यंत ध्येय होते, तोपर्यंत संस्थानांचा विचार फार गंभीरपणे करण्याची गरज नव्हती. पण संपूर्ण स्वातंत्र्य हे ध्येय ठरले की संस्थानांचा विचार करणे भाग पडले हे खरे आहे का? की....

संस्थाने हा गमावलेल्या स्वातंत्र्याचा अवशेष आहे, ही भूमिका अनुभवांनी बदलली व संस्थाने हा गुलामगिरीचा संरक्षक किल्ला आहे, ही नवी भूमिका स्वीकारावी लागली म्हणून स्टेट्स पीपल्स कॉन्फरन्सचा उदय झाला? संस्थाने संपली पाहिजेत ह्या निर्णयावर गांधीजी व सरदार केव्हा आणि का आले?

(शिपायाकडून इतिहासकाराची अपेक्षा नसावी.)

हैदराबाद स्टेट्स् काँग्रेसच्या स्थापनेला एकोणीसशे अडतीसपर्यंत गांधीजींनी आशीर्वाद दिलेला नव्हता. त्यांनी १९३८ साली आशीर्वाद का दिला? १९३५ च्या कायद्यात चेंबर ऑफ प्रिन्सेसची स्वतंत्र सोय होती. फेडरेशनमध्ये येण्यासाठी संस्थानिकांना स्वतःच्या अटी घालण्याचे स्वातंत्र्य होते. ही घटना भारताच्या अखंडत्वाला धोक्याची

आहे म्हणून भारताच्या प्रादेशिक सलगतेसाठी हैदराबादेत प्रबल व संघटित जनमत आवश्यक आहे हा निर्णय गांधींनी घेतला काय?

(ते महात्माजी जाणोत, बलिदानाची तयारी ठेवणारा भेटला. त्याला आशीर्वाद मिळाला इतके मी जाणतो.)

स्टेट काँग्रेसवर जन्मापासून बंदी होती. आंध्र महासभा, कर्नाटक महासभा, महाराष्ट्र परिषद ह्यांद्वारे काही काम चालू होते. अचानक १९४५ ला महाराष्ट्र परिषदेने असा ठराव केला की, जनतेला जबाबदार राज्यपद्धती संस्थानात निर्माण करणे हे महाराष्ट्र परिषदेचे ध्येय आहे. हा ठराव करणे म्हणजे महाराष्ट्र परिषदेवर बंदी बोलावून घेणे होते. मग असा ठराव का केला गेला? भारतीय स्वातंत्र्य जवळ आले आहे, ह्यावेळी गप्प बसणे योग्य नव्हे ह्या जाणिवेने की हा ठराव स्टेट काँग्रेसवरील बंदी उठण्यास उपकारक ठरेल, ह्या कुणाच्या तरी चतुर सूचनेमुळे? मला दुसरा संभव जास्त दिसतो. कारण ह्यानंतर लवकरच स्टेट काँग्रेसवरील बंदी इंग्रजांच्या दडपणाने उठविण्यात आली. पण हा माझा अंदाज झाला; सत्य काय आहे?

(गप्प बसणे योग्य नाही असे वाटले.)

१९४६ सालच्या हैदराबादच्या निवडणुकीविरूद्ध सत्याग्रह करण्याची घोषणा मागे घेऊन फक्त बहिष्कार घालावा, हा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय अतिशय योग्य होता, ह्यात शंकाच नाही. निर्णायक लढा जवळ येत असताना गौण प्रश्नांवर शक्ती खर्चण्यात अर्थ नव्हता हे खरेच आहे. स्वातंत्र्य जवळ येत आहे. निर्णायक लढा देण्याची वेळ येत आहे. अशा वेळी शक्ती खर्चू नका, हा सल्ला कुणी दिला? कार्यकर्तेच विचारांती ह्या निर्णयावर आले, की नेहरूंचा हा सल्ला होता? तुमचे मित्र शेख अब्दुल्ला यांनी जबाबदार राज्यपद्धतीसाठी लढा सुरू केला. त्यांना परवानगी मिळाली. शेख अब्दुल्लांनी सल्ला न ऐकता लढा दिला काय? भारतात विलीन व्हा, ह्या मुद्द्यावर लढा देणे अब्दुल्लांना अशक्य होते म्हणून त्यांना परवानगी देण्यात आली होती का? की तो फक्त सामर्थ्य (!) प्रदर्शनाचा कार्यक्रम होता? नेहरूंनी त्या लढ्यात भाग घेतला आहे.

(शेख साहेब माझे मित्र नव्हते. भारतीय स्वातंत्र्याच्या वाटाघाटीत त्यांना संस्थानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व हवे वाटे. मला त्याची गरज नसे. नेहरू त्यांचे सावधपणे मित्र होते. माझ्या तोंडचा 'मित्र' हा शब्द उद्धारवजा होता.)

१९४७ च्या सात ऑगस्टला आपला लढा सुरू झाला. यापूर्वी सरदारांनी तुम्हाला नेमके काय सांगितले होते? असे म्हणतात की, सरदारांनी अखंडपणे लढा चालू ठेवा, संघर्ष जिवंत राहू द्या, जेल भरलेले असू द्या, माऊंटबॅटन परतल्यानंतरच हा प्रश्न सोडविता येईल असे सांगितले होते हे खरे आहे का? माऊंटबॅटन गव्हर्नर जनरल असणे अनेक कारणांसाठी सोयीचे होते. पण हैदराबाद प्रश्नासाठी ती अडचण आहे, असे सरदारांचे मत होते का? हा संदर्भ मनात ठेवूनच तुम्ही लढ्याचा ठराव स्वीकारताना हा संघर्ष टर्मपुरता नसून पूर्ण वर्षाचा आहे, असे सूचक बोलला होता का? (स्थूलपणे हे बरोबर आहे. शब्दशः चूक.)

इत्तेहादुल मुसलमीन निजामाला सार्वभौम मानीत नव्हती. हैदराबाद संस्थानातील मुसलमान जनता सार्वभौम असून निजाम त्या सार्वभौमत्वाचे प्रतीक आहे, असे मानी. त्या भूमिकेचा प्रतिवाद काँग्रेसच्या राजकारणात नाही. हे सहजच घडले की जाणीवपूर्वक घडले?

(जबाबदार राज्यपद्धतीचा आग्रह ह्या सर्वच भूमिकांचा विधायक प्रतिवाद होता.)

हे आणि असे शेकडो प्रश्न आमच्यासमोर उभे आहेत आणि तुमचे आत्मवृत्त सर्व ठिकाणी गप्प आहे. आपण मोकळेपणाने सर्व प्रश्नांची उत्तरे का दिली नाहीत, हे तुम्हाला विचारण्यातही अर्थ नाही. मुन्शींनी जर विपर्यास केला नसता तर तुम्ही हे जे लिहिले तेही लिहिले नसते, हेच खरे. शेवटी आभार के. एम. मुन्शींचेच मानायला हवेत.

पत्राबद्दल सविस्तर उत्तराची अपेक्षा नाही. पण हे पत्र समोर ठेवून आपण काही बोलावे, काही सांगावे ही मात्र अपेक्षा आहे. आपला आशीर्वाद हे माझे भाग्य आहे. खरोखरी मला त्याहून निराळे काहीच नको आहे.

आपला नम्र,

नरहर कुरुंदकर

**टीप :** कै. स्वामी रामानंद तीर्थ यांना माझे हे पत्र होते. त्यांनी पत्र परत केले. तोंडी पुष्कळ चर्चा केली. कंसामध्ये असलेली वाक्ये मी लिहून घेतलेली आहेत. वाक्ये स्वामीजींची. चर्चा लगेच लिहून ठेवण्याचे अवधान राहिले नाही. ते इतक्यात लवकर जातील असे वाटले नव्हते.

(प्रकाशन : 'ललित' दिवाळी १९७२)

५.

# एक राजकारणी संन्यासी - स्वामीजी

२२ जानेवारी १९७२ ला तीन वाजता पू. स्वामी रामानंद तीर्थ ह्यांच्या निधनाने एक कृतार्थ जीवनाचा पूर्ण विराम झालेला आहे. सुदृढ प्रकृती हे स्वामीजींचे वैशिष्ट्य कधीच नव्हते. आणि गेले तीन महिने तर ते अंथरुणाला खिळूनच होते. पण मानवी शौर्याचा उगम बळकट शरीरापेक्षा बळकट मनावर जास्त अवलंबून असतो. स्वामीजी मनाने नेहमीच निर्भय आणि स्वभावतः निर्लेप होते. तीन-चार दिवसांपूर्वीच त्यांनी औषधांचा, तज्ज्ञ डॉक्टरांचा आणि सुसज्ज रुग्णालयाचा धैर्याने शेवटचा निरोप घेतला. जर शरीर साथ देणारच नसेल तर इतरांच्यावर 'निष्कारण ओझे' म्हणून जगण्याची त्यांची इच्छा नव्हती. वीर पुरुषाप्रमाणे जाणीवपूर्वक मृत्यूला सामोरे जाऊन त्यांनी स्वतःच्या निःस्पृहतेला साजेल अशा गतीची प्राप्ती करून घेतली. राजकारण कधी कृतज्ञ नसते. तसे महाराष्ट्राचेही राजकारण कृतज्ञ नाही. पण कृतज्ञता हा मानवी मनाचा विशेष आहे. राजकारणाच्या स्वार्थी रंगाने सर्वांचीच मने रंगलेली नसतात. त्या साऱ्यांना स्वामीजी आपल्या मुक्ततेची शुभ देवता होते ही गोष्ट कधी विसरता येणार नाही. स्वामीजींच्या प्रसन्न, कृतार्थ आणि निरिच्छ व्यक्तिमत्त्वाने ज्या हजारो, लाखोंच्या जीवनात कर्तृत्वाने अंगार फुलविले त्यांना ही कृश मूर्ती आज कायमची नजरेपुढून मालवली आहे याची हळहळ वाटल्याविना राहणार नाही. स्वामीजी मान्यतेच्या शिखरावर असताना कधी अहंकारी व उर्मट झाल्याची आठवण कुणी सांगू शकणार नाही. देव्हाऱ्यातून दूर फेकले गेल्यानंतर जो कुढेपणा, किरकिरेपणा देवमूर्तीत निर्माण होतो तोही त्यांच्या ठिकाणी कुणी पाहिली नाही. ती एक समर्पित ओंजळ होती

आणि समर्पणाच्या बेभान अवस्थेतच तृप्त होती. कुणाला काही मागण्याची ज्यांना क्षुद्र बुद्धी नसते त्यांना हक्काचे काही हिरावले गेल्याचा विषादही नसणे स्वाभाविकच होते.

एक दिवस कोणतीही अपेक्षा न करता जीवनसर्वस्व पणाला लावण्याचे ठरवून एक तरुण मुलगा उस्मानाबाद जिल्ह्यात हिप्परगा या शाळेत येऊन, शिक्षक म्हणून दाखल झाला. त्याचे नाव व्यंकटेश खेडगीकर. आपण हैदराबादच्या संस्थानी जनतेच्या भाग्याचे विधाते आहोत ह्याची जाणीव त्यावेळी त्यांना अगर इतर कुणाला असण्याची शक्यता नव्हती. एक ध्येयवादी तरुण शिक्षक, एक गांधी-टिळकांचा अनुयायी असणारा तरुण यापलीकडे त्यांना कुणी ओळखीत नव्हते. शिक्षण-संशोधन वैचारिक सेवेची साधने निर्माण करणे व वैचारिक कार्याबद्दल आस्था बाळगणे ही स्वामीजींची कायमची प्रवृत्ती होती. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा हा अखंड धागा जीवनाच्या आतापर्यंत अतूट होता. स्वामीजींचे सगळे विचार कुणाला पटतील असे नव्हते. चारित्र्यवान ध्येयवादी मनाने केलेला विचार नेहमीच 'सत्यदर्शक' असेल अशी हमी कोणी द्यावी? पण विचारांच्या विषयीची आस्था मात्र प्रामाणिक होती.

पण त्यांचा योग राजकीय नेते होण्याचा होता. ज्या हैदराबाद संस्थानात शैक्षणिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक सगळ्याच प्रकारचे मागासलेपण होते तेथील कार्य अनेक बाजूंनी व अनेक पटींनी अवघड आणि किचकट होते. हैदराबाद संस्थान हे एक मुस्लिम संस्थान असल्यामुळे त्यावेळच्या राजकारणात ते अवघड जागेचे दुखणे होते. कोणतीही राजकीय मागणी असली तरी तिच्यावर हिंदू जातीयवादाचा शिक्का मारणे सोपे होते व बाहेरून अशा वेळी समर्थन प्राप्त होणे कठीण असे. संस्थानी राजवटीत वीस लक्ष मुसलमानांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे आक्रमक जातीयवादाच्या चौरस वातावरणात अत्याचार सहन करीतच काम करणे भाग होते. आणि दीर्घकाळच्या मागासलेपणामुळे बहुसंख्य जनता इतकी प्रतिकारशून्य झाली होती, की त्यांना लढ्याची कल्पनाच सहन होत नसे. अशा त्या वातावरणात चारित्र्य, धैर्य आणि बलिदानाची सिद्धता हेच राजकारणाचे आधार होते. अशा राजकारणाचा नेता फक्त संन्यासीच होऊ शकतो तसा तो झाला! आपला संसार मोडण्याची गरज न भासलेल्या ह्या कृश, कषाय-वस्त्र-धाऱ्यावर कोटयवधींच्या संसाराची नवी मांडामांड करण्याचे ऐतिहासिक कर्तव्य येऊन पडले होते. या लढ्यात विजयी झाल्याशिवाय जातीयवादाचा गंड कोसळणार नव्हता. भारत सलग होणार नव्हता व लोकशाहीलाही भवितव्य नव्हते.

हा लढा देण्याचे भाग्य स्वामीजींना लाभले. हैदराबाद संस्थान भारतात विलीन झालेले व शेवटी समाप्त, नामशेष झाल्याचे पाहाण्याचा योगही त्यांना आला. शेवटी हैदराबाद संस्थान दफन झाल्याविना महाराष्ट्रही शक्य नव्हता. आंध्रही शक्य नव्हता. भाषावार प्रांतरचनाच शक्य नव्हती. ज्या दिवशी हैदराबाद संपले त्या दिवशी स्वामीजींचे जीवितकार्य संपले. जीवन कृतार्थ झाले. यानंतर त्यांना त्यांच्याच शब्दात सांगायचे तर "सद्भावना प्रसाराविना दुसरा छंद उरला नाही". सर्वोदयाकडे ते याच नजरेने पाहत असत.

हैदराबाद लढ्याचे नेते म्हणून ते मुसलमानांचे लाडके असू शकत नव्हते. नेहरूनिष्ठ समाजवादी म्हणून सरदार गट त्यांच्यावर रुष्ट होता. हैदराबाद विभाजनाच्या आग्रहामुळे त्यांच्यावर पुढे नेहरूही नाराजच होते. भोगवादी राजकारणात स्वामीजींचे पुण्य आपल्या स्वार्थावरील झूल होऊ शकत नाही हे कळल्यावर अनुयायी फारच जवळ टिकू शकले नाहीत. स्वामीजींनी तसा प्रयत्नही केला नाही. शेवट ती समर्पणांजली होती. तिला स्वतःच्या विसर्जनाची ओढ होती. स्वार्थाच्या सोयी पाहणे त्यांना कसे शक्य असणार? आपण काय आहो ही पक्की खात्री असल्यामुळेच बहुधा ते नित्य तृप्त होते.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : दैनिक प्रजावाणी, २५-१-१९७२)

## ६.

# अध्यात्मवादी स्वातंत्र्याचे उपासक - स्वामी रामानंद तीर्थ

कै. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ हे स्वामी म्हणजे संन्यासी होते व हैदराबाद संस्थानचे राजकीय नेते होते. संन्यासी हा त्याग, वैराग्य, अनासक्ती यांचा प्रतिनिधी असतो. राजकारणाचे स्वरूप याहून भिन्न असते. काहीजणांना यात विसंवाद वाटतो. संन्याशाने प्रपंचात मन कशाला घालावे? प्रपंचातील प्रश्नांचा मोह सुटत नसेल तर संन्यास तरी कशाला घ्यावा? संन्याशाचे जीवन तपस्वी, क्षमाशील व भोगातीत असले पाहिजे. या जीवनदीक्षेला राजकारण ही बाब विसंगतच मानणे भाग आहे. कारण परलोकातील मोक्षाचा पाठपुरावा करणारा संन्यासी आणि इहलोकातील प्रश्नांचा उलगडा करण्यासाठी झटणारा राजकारणी यांचे रस्तेच भिन्न असले पाहिजेत. एका व्यक्तीच्या जीवनात जर या दोन बाबी एकत्र दिसत असतील तर तो विसंवाद आहे, असे काहीजणांना वाटते. आणि या वाटण्यात अर्थ आहे. माणसांना एक विशिष्ट बाब विशिष्ट तऱ्हेने जाणवत असेल तर त्यामागे परंपरा असते. फार मोठी परंपरा अशी आहे की, साधुसंत प्रपंचाच्या प्रश्नांच्या बाबतीत उदासीन राहिले. आम्हाला व्यवहार हा परमार्थाहून निराळा आणि परमार्थ व्यवहाराहून निराळा समजण्याची सवय लावली आहे.

गृहस्थाश्रम हा व्यवहारधर्माचा आधार आहे. हा आश्रम वैराग्याचा नव्हे. कारण पत्नी आहे. तिच्याविषयीची कर्तव्ये आहेत. परंपरेत पत्नीच्या संख्येला बंधन नाही, परंपरेनुसार पत्नीखेरीज उपपत्नीही विहित आहेत. मुलेबाळे आहेत. त्यांच्या संगोपनाचा, जपणुकीचा प्रश्न आहे. म्हणून जायदाद व संपत्ती मिळविणे आले. मित्रांना

जोडणे, सांभाळणे आहे तसे शत्रूचा पराभव करणे आले. म्हणून गृहस्थाश्रमाचे पुरुषार्थ काम व अर्थ असतात. या अर्थकामाची सोय सर्वसामान्य प्रतिष्ठित असावी म्हणून योग्य काय व अयोग्य काय याचे नियम असतात. म्हणून अर्थ व काम धर्माशी सुसंगत हवे. धर्म, अर्थ, काम यांचा तोल व संगती हे गृहस्थाश्रम धर्माचे वैशिष्ट्य आहे. यालाच व्यवहार, त्रिवर्ग-प्रतिपत्ती असे म्हणतात. म्हणून गृहस्थाश्रमात भोग असतो, अहिंसेसह हिंसा असते. सत्यासह असत्य असते व न्यायनीतीसह सोय असते. राजकारण हा या आश्रमाचा भाग आहे. मग जर हे खरे असेल तर संन्याशाने राजकारण का करावे? संत, संन्याशी, योगी, फकीर, वली, ऋषी, मुनी, ब्रह्मचारी यांचा राजकारणाशी संबंधच काय?

हा प्रश्न फार मोठा आहे. त्याचे उत्तरही तेवढेच मोठे दिले पाहिजे. मी या प्रश्नांचे उत्तर संक्षेपाने देण्याचा प्रयत्न करणार आहे. म्हणजे त्या संदर्भात आपण स्वामीजींकडे पाहू शकू. त्यापूर्वी त्यांच्या चरित्राचे प्रमुख टप्पे लक्षात घेतले पाहिजेत. स्वामीजींचा जन्म १९०३ सालचा. त्यांनी संन्यास घेतला १४ जानेवारी १९३१ ला, म्हणजे २८ वे वर्षी. या संन्यासापूर्वीच्या काळात ते टिळक महाराष्ट्र विद्यापीठात (शासनमान्य शिक्षणावर बहिष्कार टाकून) शिकले व हिप्परग्याच्या राष्ट्रीय शाळेत त्यांनी अध्यापकाचे कार्य केले. स्वामी रामतीर्थ यांच्या परंपरेचा त्यांचा संन्यास, त्यामुळे फार मोठे विधिविधानांचे अवडंबर कधीच नव्हते. राजकारणात वेगाने खेचले जाऊन ज्येष्ठ राजकीय नेते होण्याचा काळ इ.स. १९३३ ते १९४८. लोकसभेत इ.स. १९४८ ते १९६२ - सुमारे १४ वर्षे. भूदान, खादी इत्यादी कार्यांत शेवटपर्यंत. २२ जानेवारी १९७२ मृत्यू. असा हा सत्तर वर्षांचा काळ होता. या कालखंडात त्यांना हैदराबादचे मुख्यमंत्री होण्याचा योग होता पण त्यांना सत्तापद नको होते. केंद्र शासनात मंत्री होण्यासही ते तयार नव्हते. सत्तेचा मोह न होणे हा त्यांचा कायम स्वभावविशेष होता. ज्यांना प्रयत्न करूनही काही मिळू शकले नाही, मिळवता आले नाही अशा कार्यकर्त्यांचे मन जसे कडवटपणे भरलेले असते तसे स्वामीजींचे नव्हते. हैदराबाद भारतात येणे व या संस्थानाचे तुकडे होऊन, महाराष्ट्र, आंध्र, कर्नाटक अस्तित्वात येणे या बाबी घडताच स्वामीजी कृतकृत्य व कृतार्थ झाले. त्यांच्याशी बोलणाऱ्याला जाणवत असे ते समाधान व वृत्तीची कृतार्थता.

आता आपण पुन्हा मूळच्या प्रश्नाकडे वळू. या संन्याशाचा राजकारणाशी संबंध

काय? आपल्या जगभरच्या इतिहासात साधुसंतांच्या व संन्याशांच्या दोन परंपरा दिसतात. एक परंपरा समाज आणि त्याची दुःखे यांच्याविषयी पूर्णपणे उदासीन असते. आपण आपले जीवन परमेश्वराला समर्पित करून आपली परमेश्वराची भक्ती जगात वाढवावी याविना आपले दुसरे काही काम आहे असे या संतांना वाटत नाही. जगातील नानाविध प्रकारची दुःखे त्यांना जगाचा मोह दूर करण्याचे शिक्षण देतात. दुःखी माणसांना दुःखमुक्त व्हावयाचे असेल तर त्यांनी ईश्वरावर प्रेम करून स्वार्थ, मोह, अहंकार सोडवावा असे या परंपरेला वाटते. या परंपरेचे खंडन अगर तिची अवहेलना करण्याचा माझा हेतू नाही. कारण याही परंपरेत फार मोठी माणसे होऊन गेलेली आहेत. स्वतः संपूर्णपणे निर्मोही, निरिच्छ आणि निर्भय होणे ही असामान्य शक्ती आहे.

पण याखेरीज साधुसंतांची दुसरी परंपरा आहे. या मंडळींचा ईश्वरावर दृढ विश्वास असतोच. स्वार्थातून मुक्त होण्याची त्यांची तपस्याही चालू असतेच. पण त्यांना असे वाटते की, आपण समाजाचे काही देणे लागतो. हे जगच परमेश्वरस्वरूप असल्यामुळे जगातील मानवाची सेवा करतानाच आपण ईश्वराची अधिक चांगली सेवा करू शकतो. या परंपरेचे संतही असेच मानतात की, स्वार्थातच अहंता, लोभ, मत्सर, द्वेष व दुःख यांचे मूळ साठविलेले आहे. म्हणून स्वार्थाचा होम पेटविला पाहिजे. आपल्या वैयक्तिक जीवनाची उभारणी वैराग्यावरच असली पाहिजे. पण याबाबतची आपली साधना माणसाच्या सेवेत सफल झाली पाहिजे. लोकयात्रेचे मार्गदर्शन करण्याची जबाबदारी भगवद्गीतेतच कृष्णाने अर्जुनावर टाकलेली आहे. जनी जनार्दन समजून लोकसेवा करण्याची संतपरंपरा आता नाही म्हटले तरी अडीच हजार वर्षे जुनी आहे. या परंपरेचे संत कोणती तरी लोकसेवेची कामगिरी आपल्या अंगावर घेऊन समाजाच्या प्रत्यक्ष उपयोगीपडण्याचा प्रयत्न करीत असतात. या दोन प्रेरणेतूनच बौद्धांनी शाळा, अनाथालये, दवाखाने चालविले. बौद्धांच्या या कार्याचा प्रभावच ख्रिश्चनांवर पडलेला आहे. जगभर मिशनरी सेवा म्हणून शाळा, अनाथालये, दवाखाने चालवितात. यामागचे ध्येय हे आहे.

ज्यांच्या धडपडीमागे अनेक स्वार्थी हेतू असतात अशी सामान्य माणसे आपण सोडून देऊ, पण आजही भारतात मदर टेरेसांचे प्रचंड कार्य चालू आहे. मदर टेरेसा कुणाला ख्रिश्चन करीत नाहीत. धर्मप्रसार करणे, ख्रिस्ताच्या कळपात नवनवी कोकरे

सत्पुरुषांची नावे आपणास सहज घेता येतील. विद्यारण्य, गुरू गोविंदसिंह आणि रामदास. ही तीन नावे इतिहासात प्रसिद्ध आहेत. विद्यारण्य माधवाचार्य हे आपल्या काळातले महापंडित होऊन गेले. अनेक शास्त्रांच्यावर त्यांची ग्रंथरचना आहे. सर्व-दर्शन-संग्रह त्यांच्या चौरस व्यासंगाचा पुरावा आहे. विद्यारण्य संन्यासी होते. पुढे ते शृंगेरी पीठाचे शंकराचार्य झाले. त्यांच्या डोळ्यांसमोर अल्लाउद्दिन खिलजीने सारा दक्षिण भारत जिंकला. हे प्रसिद्धच आहे की हरिहर आणि बुक्कराच यांना प्रेरणा स्वामींची होती. ज्याला आपण विजयानगर म्हणून ओळखतो तो मूळचे विद्यारण्यनगर होते. हिंदूंना सन्मानाने आणि प्रतिष्ठेने जगता आले पाहिजे यासाठी राजकारणात रस घेऊन राज्यनिर्मिती घडवून आणणारा हा एक प्रसिद्ध संन्यासी. समर्थ रामदासस्वामींचे चरित्रसुद्धा असेच आहे. खरे म्हणजे वैराग्यशाली रामदासांना काही नको होते. घरदार, संसार सोडून टाकळीला जाऊन स्वामी तप करीत बसले. त्यांना ईश्वरदर्शनही घडले. पण या निरिच्छ संतांना राजकारणात रस होता. हिंदूंचे एक स्वतंत्र सार्वभौम राज्य असले पाहिजे अशी जबर इच्छा होती. हिंदुराज्य निर्माण झाले असते तर रामदासाला काय मिळणार होते? त्याला काहीच नको होते. स्नानसंध्या करण्यासाठी गंगेत उदंड पाणी होतेच. पण ती संध्याही निर्वेध चालावयाची असेल तर गंगेच्या दोन्ही काठांवर आपले राज्य हवे म्हणून रामदासाने शिवाजी महाराजांच्या मागे आपले पुण्य उभे केले व छत्रपती ईश्वरी अवतार आहेत अशी घोषणा केली. दशमेश गुरू गोविंदसिंह हे तर धर्मगुरूच होते, पण त्यांना हातात शस्त्र घेऊन लढावे लागले. ज्या ज्या वेळी राष्ट्र गुलाम व परतंत्र होतात त्या त्या वेळी संत-संन्याशांना राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा विचार करणे भाग पडते असे दिसून येईल.

आधुनिक भारतात समाजांचे दायित्व पत्करणाऱ्या व स्वातंत्र्याचा विचार करणाऱ्या संन्याशांची एक परंपराच आहे. या स्वातंत्र्यवादी असणाऱ्या आधुनिक भारतातील संन्यासी नेत्यांना फार मोठे महत्त्व आहे. हजारो कार्यकर्त्यांना राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी जीवित समर्पण करण्याची प्रेरणा या तीन संन्याशांनी दिली. कालक्रमानुसार ही नावे म्हणजे स्वामी दयानंद, स्वामी विवेकानंद व स्वामी रामतीर्थ. स्वामी दयानंद हे राजकीय नेते नव्हते. वेदावर कटोर निष्ठा असणारे संन्याशी होते, पण जातिभेद निवारण, अस्पृश्यता निवारण, आधुनिक शिक्षण यात तर त्यांनी रस घेतलाच पण त्याबरोबर राष्ट्रीय स्वातंत्र्याची प्रेरणाही त्यांनी दिली. स्वामी श्रद्धानंद व लाला

लजपतराय याच प्रेरणेतून पुढे आले. स्वामी विवेकानंद असेच संन्यासी होते. पण भारताच्या स्वातंत्र्यावर त्यांची गाढ श्रद्धा होती. स्वामी रामतीर्थ तर स्वतःला भारतरुपच समजत असत. मीच भारतवर्ष आहे. पंजाब व बंगाल माझे बाहु, काश्मीर माझे डोके, कन्याकुमारी माझे पाय आहेत. एक हृदय, एकात्मा असणारा भारतच मी आहे. असे ते म्हणत. स्वामी रामानंद तीर्थांच्या रूपाने रामतीर्थांची प्रेरणा कार्यरत होती.

खरे म्हणजे या यादीतच आपण महात्मा गांधी आणि संत विनोबा भावे यांचाही समावेश केला पाहिजे. गांधीजी हे रूढ अर्थाने संन्यासी नव्हते. त्यांनी दीक्षापूर्वक भगवी वस्त्रे धारण केलेली नव्हती, हे खरेच आहे, पण ते धर्मपुरुषच होते. ईश्वरावर त्यांची गाढ श्रद्धा होती. परमेश्वराच्या इच्छेशिवाय गवताचे एक पातेही हलत नाही असे ते म्हणत. नानाविध प्रकारची व्रते आणि भजने, सकाळ-संध्याकाळच्या प्रार्थना, मौन आणि ध्यानचिंतन हा सगळा गांधीजींचाही प्रकार होता. ते आत्म्याचा शोध घेणारे प्रवासी होते. शंकराचार्य म्हणत ब्रह्म तेवढे सत्य आहे. या सत्यस्वरूपी ब्रह्माचा शोध घेण्यासाठी गांधीजी जन्मभर अहिंसेची साधना करीत होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी तू सर्वस्व पणाला लाव असे त्यांना त्यांच्या आतल्या आवाजाने सांगितले होते. हा आत्म्याचा म्हणजे ईश्वराचाच आदेश होता. गांधींचे शिष्य विनोबा म्हणजे तर चालते बोलते तपच. विनोबांचे मन गीता, उपनिषदे यातच गुंतलेले होते. एकदा एकजणाने विनोबांना विचारले, 'हा समोरचा कंदील खरा आहे. यावर जितकी दृढ श्रद्धा आहे तशी ईश्वराच्या अस्तित्वाविषयी तुम्हाला खात्री व श्रद्धा आहे का?' विनोबा म्हणाले, 'मी ईश्वराविषयी निःशंक आहे. समोरच्या कंदिलाची मात्र खात्री देता येत नाही'. या देशातले कोटी कोटी लोक गांधी-विनोबांना संतच मानतात आणि दोघांनाही राष्ट्राच्या स्वातंत्र्याचा, राजकारणाचा विचार करणे भाग पडत गेले. ज्याला तुम्ही आम्ही राजकारण म्हणतो तो गांधी-विनोबांसाठी परमेश्वराच्याा उपासनेचा मार्ग होता, त्यांची ती अध्यात्मसेवा होती.

कै. स्वामी रामानंद तीर्थांच्या जीवनावर आत्यंतिक प्रभाव टाकणाऱ्या या तीन विभूती होत. स्वामी रामानंद हे पहिले. त्यांच्या परंपरेचे ते संन्यासी होते. महात्मा गांधी हे दुसरे आणि विनोबा तिसरे. यांचे स्वामी अनुयायी होते. स्वामीजी हे अहिंसेचे थोर उपासक होते व निर्भयपणे सशस्त्र आंदोलनाचे दायित्व स्वीकारणारे आणि त्या लढ्याचे मार्गदर्शन करणारेही होते. ज्यांची उपासना इहलोकासाठी चालू आहे असेही

लोक धर्माची, देवळाची नावे घेऊन उभे असतात आणि काहीजणांसाठी राजकारण हाही उपासनेचा भाग असतो असे हे चित्र आहे. मी स्वतः या प्रश्नावर अनेकदा स्वामीर्जींशी बोललो आहे. एका मर्यादेपर्यंत ते चर्चा करीत व मी मर्यादा संपल्यावर मोकळेपणाने हसून सांगत 'हे मला माहीत नाही, पण हे घडले मात्र खरे.' बुद्धिवाद करून एखादा मुद्दा समर्पकपणे पटवून द्यावा यात त्यांना रस नव्हता. ते म्हणत माझ्यापुरता या मुद्द्यावरील विचार संपलेला आहे. श्रद्धापूर्वक मी निर्णय घेतलेला आहे.

स्वामीजींनी मला एकदा एक गोष्ट सांगितली होती. त्यांच्या मनोवृत्तीवर प्रकाश टाकणारी अशी ती गोष्ट आहे. एका तुरुंगात एक कैदी होता. आपण या तुरुंगात कधी व कुठून आलो हे त्या कैद्याला आठवत नव्हते. इथून बाहेर सुटावयाचे म्हणजे कुठे जायचे हे कैद्याला माहीत नव्हते. तो कैदी अशक्तही होता. त्याच्या शेजारी एक हातोडा होता. कैदी मधून मधून उठे व भिंतीवर घाव घालू लागे. पहिले दिवशी अज्ञात आवाजाने विचारले, 'भिंत फुटेपर्यंत तुझी शक्ती टिकेल असे तुला वाटते का?' कैदी म्हणाला, 'ते मला माहीत नाही. ठोकीत राहा हा माझा मंत्र आहे.' तिसरे दिवशी अज्ञात आवाजाने विचारले, 'अरे या भिंतीनंतर दुसरी भिंत असेल. तुरुंगाबाहेर पडण्याची ही दिशा बरोबर आहे इतकी तरी तुला खात्री आहे काय?' कैदी म्हणाला, 'तेही मला माहीत नाही. ठोकीत राहा हा माझा मंत्र आहे.' इथे स्वामीजी थांबले. मी विचारले, 'चौथे दिवशी काय झाले?' स्वामीजी म्हणाले, 'तुम्ही नास्तिक आहात. चौथे दिवशी काय झाले हा गौण मुद्दा आहे. गोष्टीचा शेवट तुम्ही कसाही करा. मला दोन शेवट दिसतात. पहिला शेवट असा, चौथे दिवशी भिंत पडली व कैदी स्वतंत्र झाला. दुसरा शेवट असा, कैदी वर्षानुवर्षे ठोकीत राहिला. एक दिवस मरून गेला. भिंत काही पडली नाही. मला दोन्ही शेवट पवित्र वाटतात कारण महत्त्व ठोकीत राहायला आहे. कर्म महत्त्वाचे, निष्कामता महत्त्वाची, फळ गौण.'

राजकारणात अध्यात्मप्रवासी म्हणून कोण येतात हे ओळखणे कठीण नसते. तसे ते सोपे असते. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात तुम्ही असा. तुमच्या प्रयास-प्रयत्नामुळे स्वार्थ कमी होत जात संपतो आहे काय? जगाविषयी निष्काम प्रेमभावना वाढत जात आहे काय? तुमच्या खटपटीमुळे, धडपडीमुळे मन कर्तव्यच्युत न होतांही आसक्त व तृप्त होते आहे काय? जर हे घडत असेल तर सेवेचे क्षेत्र कोणतेही असो, माणूस परमार्थमार्गाचा प्रवासी असतो. तुम्ही त्रिकाळ पूजा, जप व भजन करीत असा

पण परिणाम जर स्वार्थ, लोभ अहंता कमी होण्यात होत नसेल तर ती देवपूजा नव्हे. देवाचे निमित्त करून आरंभ झालेली देहपूजाच आहे. मी स्वामीजींची कृतार्थता पाहिली आहे. त्यांच्यासाठी राजकारण हा अध्यात्माचा प्रांत होता हेच खरे.

मानवी मनातच परस्परविरोधी अशा दोन प्रेरणा आहेत. स्वतःचा स्वार्थ जपायचा, बलवान करायचा आणि त्या स्वार्थाचे समर्थन करण्यासाठी युक्तिवाद शोधायचे अशी एक प्रेरणा आहे. देवळातील पुजारी जेव्हा रिकाम्या हाताने देवदर्शन घेऊ नये म्हणून सांगतो त्यावेळी देवाचा महिमा ही पुजाऱ्याच्या स्वार्थाची सोयच असते. पण याच मानवी मनात स्वार्थाच्या परिघाबाहेर स्वतःला खेचून नेण्याचीही प्रेरणा आहे. ही जी स्वार्थाचा निरास करणारी प्रेरणा जीवनाला आकार देत असते तिला अध्यात्माची प्रेरणा असे म्हणतात. अध्यात्माची सार्वकालिक अमर गाथाच ही आहे. माणूस स्वतःचे प्रश्न सोडविण्यासाठी झटतच असतो. स्वतःचा स्वार्थ आणि समाजाचा स्वार्थ एकमेकांशी सुसंगत करून टाकणे हाही माणसाचा प्रयत्न असतो, पण माणूस स्वार्थाबाहेर जाण्यासाठी तपही करतो. स्वामीजींसारख्या संन्याशाचे राजकारण हा अशा तपाचा भाग असतो. तुमच्या माझ्या मोजपट्ट्या त्याला लावणे योग्य नव्हे. गेल्या उन्हाळ्यात पुण्याला आम्ही अच्युतराव पटवर्धनांची भेट घेतली. सहज गप्पांतून गप्पा निघाल्या आणि आम्ही स्वातंत्र्य म्हणजे काय या विषयावर बोलू लागलो. क्रांतिवीर अच्युतराव पटवर्धन म्हणाले, "बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य. ही व्याख्या भांडवलशाहीच्या समाजात प्रमाण व आधार राहिली. सर्वांना स्वातंत्र्य देण्यात ही व्याख्या निरुपयोगी ठरली. सर्वांना समान संधी, सर्वांना संरक्षणाची समान हमी ही समाजवाद्यांची, स्वातंत्र्याची व्याख्या व्यवहारात सर्वांना समानपणे गुलाम करणारी ठरते. आपण स्वातंत्र्याची निर्दोष कल्पना केली पाहिजे."

मी म्हटले, "स्वातंत्र्याची निर्दोष व्याख्या करण्यासाठी आपण अध्यात्मात जायचे काय?" सर्वांविषयी असणाऱ्या उत्कट प्रेमाखातर स्वेच्छेने स्वतःच्या स्वार्थाला घातलेला आवर ही कल्पना स्वातंत्र्यात कुठेतरी आली पाहिजे असे अच्युतराव पटवर्धनांचे मत पडले. मी म्हटले, 'तुमची स्वातंत्र्याची कल्पना मान्य केली तर फक्त खरे अध्यात्मवादीच स्वातंत्र्याचे उपासक होऊ शकतील.' मला वाटते स्वर्गीय स्वामी रामानंद तीर्थ या व्याख्येत बसतात.

* * *

(प्रकाशन : दैनिक पुढारी २८-३-१९७६)

# ७.

# कुरुंद्यात स्वातंत्र्य आले

कुरुंदा माझे परंपरागत राहते गाव. निजाम हैदराबादमधील परभणी जिल्ह्यात ते आहे. यंदा आपण स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा करीत आहो. त्यावेळी सगळ्या जुन्या आठवणी उजळून निघणे स्वाभाविक आहे. संस्थानाच्या बाहेर राहणाऱ्या जनतेला स्वातंत्र्य १५ ऑगस्टला मिळाले. आमच्यासाठी मुक्ततेचा हा क्षण तेरा महिन्यानंतर सप्टेंबर १७ ला पोलिस ॲक्शनमुळे आला. माझ्या गावाला जेव्हा ही आनंदाची बातमी कळली तेव्हा मी हैदराबादला होतो. पण नंतर जेव्हा मी कुरुंद्याला आलो तेव्हा माहिती विचारून घेतली त्या आधारेच पुढचे वर्णन लिहिले आहे. दोन स्वातंत्र्यातील भावनेचा आणि जाणिवेचा फरक मात्र विचारात घेतला पाहिजे. भारतीय जनतेसाठी स्वातंत्र्याचा क्षण अतीव दुःखाचा आणि निराशेचा होता. देशाची फाळणी झालेली होती, निर्वासितांचे लोंढे येत होते. जातीय दंगली चालू होत्या. हे दृश्य मोठे सुखद नव्हते. अंतःकरणात शोक, मनावर ताण आणि चेहऱ्यावर ओढून ताणून आणलेले हसू असे स्वातंत्र्याचे स्वागत करणे भाग होते. आमच्यासाठी सारे भोगून, पाहून, सहन झालेले होते. अत्याचार हेच आमच्यासमोर नित्य जीवन होते. स्वातंत्र्य ही सर्व दुःखांची समाप्ती होती. आनंद मनात मावणेच शक्य नव्हते. स्वातंत्र्य ही आमच्यासाठी याची देही याची डोळा सुखाची पर्वणी होती. आनंदाने नाचा हे कुणाला सांगण्याची गरजच नव्हती. आम्ही शतकांच्या अंधारातून लख्ख प्रकाशात येत होतो.

भारतीय स्वातंत्र्याची घोषणा जूनमध्ये झाली. त्यापूर्वी काही दिवस इंग्रजी राज्य

समाप्त झाल्यानंतर आपण स्वतंत्र होणार आहो ही घोषणा हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खाँ ह्यांनी केलेली होती. त्यांच्या दृष्टीने हे कृत्य नुसते न्याय्य नव्हते तर स्वाभाविकही होते. मोगलांचे सेनापती व सुभेदार म्हणून पहिले निजाम दक्षिणेत आले व त्यांनी स्वतंत्र राज्य निर्माण केले. इंग्रजांचे मांडलिकत्व स्वीकारण्यापूर्वी निजाम स्वतंत्रच होता. इंग्रज गेल्यानंतर जसा भारत स्वतंत्र होईल तसा निजाम स्वतंत्र होईल. जनतेच्या संमतीने मध्य युगात हे राज्य निर्माण झाले नव्हते. तो मुसलमानांचा विजित प्रदेश होता. तेव्हा, आताही स्वतंत्र राहण्यासाठी जनतेच्या संमतीची गरज नव्हती. हैदराबाद संस्थानचा हा पृथक राष्ट्रवाद मोठ्या प्रयत्नाने निजामाने जोपासलेला होता. सुमारे एक कोटी साठ लक्ष लोकसंख्या असणारे हे भारतातील सर्वांत मोठे संस्थान होते. त्याचे स्वतःचे स्वतंत्र पोस्ट होते, तार व्यवस्था होती. स्वतंत्र रेल्वे, स्वतंत्र नाणीव्यवस्था होती. परदेशात जाता-येताना जसे नाक्यावर सामान तपासले जाते तशी व्यवस्था होती. I.C.S. प्रमाणे H.C.S.ही स्वतंत्र नोकरशाही होती. स्वतंत्र छोटीशी फौज होती (१२ हजारांची). सर्व भारतभर मुसलमानांची संघटना मुस्लीम लीग होती. पण हैदराबादसाठी स्वतंत्र इत्तेहादुल मुसलमीन ही संघटना होती. रहीमत अली यांनी १९३४ साली जेव्हा प्रथम पाकिस्तानची भूमिका मांडली त्यात उस्मानीस्थानची स्वतंत्र व्यवस्था होती. तेव्हा स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र म्हणून अस्तित्वात येणे ही निजामासाठी स्वाभाविक गोष्ट होती.

जे संस्थान सर्व बाजूंनी वेढलेले-भारताने-आहे ते स्वतंत्र राहणार कसे, असे फालतू प्रश्न विचारण्यात अर्थ नव्हता. ते मुसलमानांचे राष्ट्र होते. ८७ टक्के प्रजा हिंदू असली आणि मुस्लिम साडेदहा टक्के असली म्हणून काय झाले? हिंदूप्रजा सगळी घावरलेली व निःशस्त्र होती. सुमारे सोळा लक्ष मुसलमान सर्व जीवनावर प्रभुत्व ठेवून होते. फौजेत आणि पोलिसांत त्यांचे प्रमाण ९५ टक्के होते. कनिष्ठ नोकऱ्यांत ते ७५ टक्के होते. वरिष्ठ नोकऱ्यांत प्रमाण ९८ टक्के असे. राज्यभाषा उर्दू होती. इस्लाम हा राज्याचा अधिकृत धर्म होता. त्यामुळे मोहरमची बारा दिवस सुटी असे, रमजानचा महिना अर्धा दिवस शाळा असे. सुटी रविवारी नसून शुक्रवारी होती. आणि महिने इराणी अजूर-दय-वहमन असे चालत. शिवाय मुसलमानांत अरब व रोहिले सशस्त्र होते. ते सावकारीसह गुंडगिरी करीत. सामान्य मुसलमान सशस्त्रच होता. त्यामुळे एक कोटी चाळीस लक्ष हिंदूंना दावून ठेवणे निजामाला कठीण वाटत नसे. हैदराबादमधील

सर्व हिंदू जमीनदार, जहागीरदार, वतनदार निजामी राजवट टिकावी या मताचे होते. मुसलमानांचे तर ते राष्ट्रच होते. पारशी, ख्रिश्चन ह्यांची संख्या नगण्य असली तरी ते निजामाचे पाठीराखे होते. दलित समाजाची स्वतंत्र संघटना होती. तिचे नेते बी. एस. व्यंकटराव व शामसुंदर होते. त्यांना अत्याचारापासून बचाव होण्याचा एकच मार्ग दिसत होता. तो म्हणजे हैदराबादच्या स्वातंत्र्याला मान्यता देणे.

त्यावेळी कम्युनिस्टांनी अजून भारतीय स्वातंत्र्याला मान्यता दिलेली नव्हती. त्यांचीही हैदराबादच्या स्वातंत्र्याला सुप्त मान्यता होती. कम्युनिस्टांनी अधिकृतरीत्या हैदरावादच्या स्वातंत्र्याला मान्यता फेब्रुवारी १९४८ मध्ये दिली. अशी सगळी तयारी झालेली होती. फक्त पहिल्या निजामाने आपल्या मुलाला केलेल्या उपदेशाचे मनन शेवटच्या निजामाने केलेले दिसत नाही. पहिले निजाम उलमुल्क आसफजहा आपल्या मुलाला सांगतात की, दक्षिणेतील जानवेधारी (ब्राह्मण) हे अतिशय घातक आहेत. त्यांना मारावे. हा प्रदेश मराठ्यांचा आहे. त्यांच्याशी वैर करू नये. ह्या मराठ्यांना नष्ट करणे औरंगजेबाला जमले नाही तर ते तुला जमेल असे समजू नकोस. मुस्लिम अत्याचारांनी सर्व हिंदू प्रजेला एकत्र येऊन लढणेच भाग पडले. म्हणजे ब्राह्मण-मराठे एक झाले, पहिल्या निजामाने सांगितले होते त्याप्रमाणे हे घडले की निजामाचा शेवट आला.

हैदराबाद राज्यात अतिजहाल, जहाल, मध्यममार्गी, मवाळ असे गट राजकारणात पडूच शकत नसत. तो दोन जहालांचाच झगडा होता. निजाम, कासीम रझवी आणि मुसलमान यांना पूर्ण स्वातंत्र्य हवे होते. त्यासाठी वाटेल त्या अत्याचारांची त्यांची तयारी होती. गरज पडली तर एक कोटी चाळीस लक्ष हिंदूंची आपण संपूर्ण कत्तल करू अशी कासीम रझवीची जाहीर घोषणा होती; व त्याने शंभरदा तिचा उच्चार केला होता. ह्या जागेपासून खाली येण्यास ते तयार नव्हते. हे संस्थान संपूर्णपणे नष्ट झाल्याशिवाय भारतीय स्वातंत्र्याला पूर्णता नाही. जनतेची मुक्तता नाही. अत्याचारी, प्रतिगामी, पिसाट जातीयवादाचा शेवट नाही, म्हणून हे संस्थान नष्टच झाले पाहिजे! त्यासाठी शस्त्राचा जमेल तो वापर करू. अंतर्गत सशस्त्र यादवीची तयारी ठेवू अशी हिंदूंची भूमिका होती. नाव जरी स्टेट कॉंग्रेस असले, ध्येय जरी धर्मातीत लोकशाही असले तरी शेवटी ती होती हिंदूंची संघटना (भारतीय कॉंग्रेसप्रमाणे). ह्या चळवळीचे नेते पू. स्वामी रामानंद तीर्थ होते. निजामाविरोधी सरदार पटेल, कासीम रझवी विरोधी

स्वामीजी असा हा प्राणांतिक संघर्ष होता. त्यात मवाळांना जागा नव्हती, तडजोडीची शक्यता नव्हती.

हैदराबादचा हा स्वातंत्र्यलढा ७ ऑगस्ट १९४७ ला सुरू झाला. हा दिवस कुरुंद्यात अगदी शांतपणे गेला. कुरुंदा हे एक मोठ्यापैकी खेडे होते. पाच-सहा मारवाडी व्यापारी, २५-३० ब्राह्मणांची घरे, सर्व मिळून पाच हजार लोकसंख्या हे या मौज्याचे स्वरूप होते. मुसलमानांची लोकसंख्या खूपच मोठी म्हणजे हजारभर होती. सर्व अस्पृश्यांची मिळून लोकसंख्या सातशेच्या आसपास होती. उरलेली तीन-साडेतीन हजार लोकसंख्या मराठे, धनगर आणि लिंगायत, तेली, सुतार, लोहार अशी होती. सारे मराठे ह्या गावात 'महानुभाव' ह्या आत्यंतिक अहिंसावादी पंथाचे होते. पण ते मनाने लढण्यास तयार होते. कुरुंदा हे काँग्रेसचेही बळकट केंद्र होते. रजाकारांचेही बलवान केंद्र होते. तरीही सात ऑगस्ट मोठ्या शांततेत गेला. कारण खेडेगावी कुणी सत्याग्रह करायचा नाही असा निर्णय घेण्यात आला होता. सत्याग्रही अहिंसक असतो. त्याने जाहीररीत्या कायदा तोडावा, शांतपणे अटक करून घ्यावी हे सारे तत्त्वज्ञान खेड्यात पाळले जाणे कठीण होते. रजाकारांना कायदेशीर वागणे मान्यच नव्हते. त्यांच्या गुंडगिरीकडे पोलिस दुर्लक्ष करीत.

म्हणून असे ठरले की, सत्याग्रहींची नावे गुप्तपणे ठरवावी. दर आठवड्यास एक तुकडी याप्रमाणे त्यांनी गुप्तपणे जिल्ह्याचे ठिकाणी परभणी येथे जावे, तेथे सत्याग्रह करावा. परभणीलाच तुरुंग होता. सत्याग्रहींना अटक केली की कोर्टापुढे नेत. त्यांना शिक्षा होई. तिथून तुरुंगात नेत. अशा प्रकारे सुमारे शंभर सत्याग्रही गावातून परभणीस गेले. त्यांनी शांतपणे सत्याग्रह केला. शहराच्या ठिकाणी कायदेशीरपणाचा निदान देखावा असे. एक निर्णय असा होता की, जे भूमिगत सशस्त्र चळवळीत भाग घेऊ इच्छितात त्या साऱ्यांनी एके दिवशी गाव सोडावे. गावापासून डोंगर जवळ होता. रात्री आठ वाजता निघावे. डोंगरावर दहा साडेदहापर्यंत पोचावे व तिथेच मुक्काम करावा. डोंगरा-डोंगराने थेट निजामी हद्दीच्या बाहेर चार दोन दिवसांत जाता येई. मार्गावर असलेल्या जवळच्या खेड्यांना बातमी असली म्हणजे ते स्वयंपाक करून ठेवीत. दिवस पावसाचे होते, म्हणून कार्यकर्त्यांना अन्नपाण्याची फार अडचण नव्हती.

सामान्यत्वे शंभर माणसे असली की चार-दोन घरभेदे त्यात असतातच. पण

मुसलमानांच्या उर्मटपणाने व अत्याचाराने लोकमत क्षुब्धच इतके झाले होते की हिंमतवान माणसे प्रतिकाराला उभी होती. इतर मध्यम लोक चोरून मदत करीत. भित्री मंडळी सतत अधिकाऱ्यांच्या खुशामती करीत, लाचारपणे त्यांची मर्जी संपादन करण्याचा प्रयत्न करीत. पण कुणी बातम्या शासनाला पुरवीत नसे. ग्रामीण भागात हा एकोपा फार मोठा होता. सतत खुशामत करीत जगणाऱ्यांनाही भूमिगत कार्यकर्ते भेटत. ही भित्री माणसे कार्यकर्त्यांना कळवळून उपदेश करीत, पण शासनाला कळवीत नसत की अमका अमुक ठिकाणी लपलेला आहे. स्वतंत्र हैदराबादला जाहीर रीतीने पाठिंबा देणारा अस्पृश्य वर्गही या वागणुकीला अपवाद नव्हता. ते मदत करीत नसत, पण हेरगिरी अगर चुगली करीत नसत. त्याचा परिणाम असा होई की, गावातील तीन हजार माणसांना जे पूर्णपणे माहीत असे त्याची कोणतीही वार्ता मुसलमानांना नसे. जे त्यांच्याकडे चाले ते आम्हाला कळत नसे. जणू एका गावात दोन गावे वसत होती.

एक निर्णय असाही ठरला होता की, ज्याला जेवढे झेपेल तेवढे त्याने करावे. झेपणार नाही तिथे चक्क पाय धरून माफी मागून मोकळे व्हावे. जो हे करील त्याला कुणी निंदायचे नाही, त्याचा तिरस्कार करायचा नाही. मात्र त्याने कार्यकर्त्यांना दगा द्यायचा नाही. दगाबाजांना क्षमा नाही. सर्वत्र वातावरण असेच होते. कुरुंद्यात तर अगदी पक्के वातावरण असे होते. माझे एक चुलते पूर्णपणे ह्या मताचे होते की निजामाचे राज्य बुडणे शक्य नाही, कारण एका मुसलमान साधूचा त्याला तसा आशीर्वाद आहे. म्हणून ही सगळी चळवळ मूर्खपणाची असून तिचे अपयश नक्की आहे. ह्या गाढवपणाशी कोणताही संबंध ठेवण्याची त्यांची इच्छा नव्हती. बहुतेक भूमिगत कार्यकर्ते निर्धास्तपणे त्यांच्या शेतावर जात, रात्री मुक्काम करीत. गावातून जेवण येई. जेवून मग विश्रांती घेऊन इतरत्र जात. ह्या माणसाविषयी कुणालाही कधी दुरावा वाटला नाही. गावचे एक प्रमुख कार्यकर्ते पाटील होते. त्यांनी कायदेभंग केला. पण पोलिसांनी त्यांना कोर्टासमोर उभे करण्याऐवजी त्यांना चौकशीनिमित्त ठेवून घेतले व छळाला आरंभ झाला. पाटील छळापुढे टिकले नाहीत. त्यांनी सरळ माफी मागितली. कोर्टाकडे दयेचा अर्ज केला. न्यायालयाने त्यांची माफी मान्य केली. दीड हजार रुपये दंड केला. पोलिसांनी त्यांच्याकडून हजार दोन हजार रुपये उकळले. पाटील सुटून गावी आले. त्यानंतर दहा महिने त्यांचे रोजचे उठणे, बसणे, जेवणे मुस्लिम अधिकाऱ्यांत असे. ह्या अधिकाऱ्याना प्रसन्न ठेवण्यासाठी महिना दोन-तीनशे रुपये पाटील खर्चीत.

पण भूमिगत कार्यकर्ते त्यांच्या मळ्यात जमत, जेवत, विश्रांती घेत. त्यांच्या मळ्यातील घरात हत्यारे लपवीत. पुष्कळदा तिथे आक्षेपार्ह पत्रके सायक्लोस्टाइल होत. पाटलांना हे सर्व माहीत होते, पण त्यांनी कधी दगा दिला नाही. त्यांनी माफी मागितल्याबद्दल कुणी त्यांना दोष दिला नाही.

ही भूमिका त्या चळवळीला भागच होती. सारेच जण हौतात्म्य पत्करू शकत नाहीत. मात्र सचोटीचे पथ्य पाळले जावे. कुरुंद्यात कुणी दगाबाज निघाला नाही. पण शेजारच्या एका खेड्यात निघाला. हा माणूस पोलिसांना बातम्या देतो ही माहिती कार्यकर्त्यांना वरील माफीमागू पाटलांनीच दिली. कार्यकर्त्यांनी त्यांचे घर जाळले. नाक कापून टाकले. गावाने त्याला वाळीत टाकले. हैदराबाद लढ्यातील हा समजूतदारपणा आता मला विलक्षण वाटतो. त्याकाळी मीही कार्यकर्ता होतो. तेव्हा मला हे सारे स्वाभाविक वाटे. आम्ही म्हणतच असू, की जमेल त्याने गोळी खावी, न जमणाऱ्याने पाणी पाजावे. तेही न जमले तर शांतपणे घरच्या घरी डोळे पुसावे. पण शत्रूचा खबऱ्या होऊ नये.

निजामाच्या राज्यात दारूचे उत्पन्न फार मोठे होते. म्हणून शिंदीची झाडे सुरक्षित होती. ती तोडणे गुन्हा होता. ह्या झाडांच्यापासून शिंदी काढणारे काहीजण असत. काहींचे व्यापारी गुत्ते होते. शिंदीच्या झाडात हिंदूंच्यापैकी अनेकांचे हितसंबंध होते. ही झाडे तोडणारे कोण हे सर्वांनाच माहीत असते. बहुतेक वेळी ज्याच्या शेतात झाड असे तो कंदील घेऊन उभाही असे. तोच दुसरे दिवशी ठाण्यावर जाऊन गुन्हा नोंदवी. पंचनामा होई. त्यावर शेजारचे शेतकरी साक्षीदार म्हणून सह्यांचे अंगठे करीत. पण आम्ही तोडताना कुणाला पाहिले नाही ह्यावर एकमत असे. शिंदीचे मडके अडकवणे, शिंदी काढणे ही कामे बहुतेक गावातील अस्पृश्य करीत. असे मडके अडकवलेले झाड भल्या पहाटे मडके काढून घेतल्यावर तोडीत; पण तो अस्पृश्य कधी कुणाचे नाव सांगीत नसे. उलट, ठाण्यावर जाऊन आपण सरकारचे एकनिष्ठ असल्यामुळे आपले काँग्रेसवाल्यांनी मुद्दाम नुकसान केले असे तो रडत, ओरडत सांगी. कुरुंद्याच्या आसपास मोठे शिंदीवन होते. अशी हजारो झाडे सप्टेंबर, ऑक्टोबर १९४७ ला तोडली गेली.

ऑक्टोबरपर्यंत सत्याग्रह संपलेला होता. भूमिगत कार्यकर्ते गाव सोडून गेले होते. सरहद्दीच्यावर कार्यकर्ते ठाण मांडून होते. मधून मधून ते येत. एखाद्या पोलिस

ठाण्यावर हल्ला करून ते ठाणे जाळीत. मधून मधून विजेच्या तारा तोडणे, पाटील-पांड्यांची दप्तरे जाळणे असेही प्रयत्न होत. जनतेचा छळ करणारे अत्याचारी मुसलमान प्रमुख ह्यांच्या घरावर मधून मधून हल्ले होत. तालुकाभर अशा कार्यकर्त्यांचेही एक वर्तुळ होते. जे कार्यकर्ते असतील असे शासनाला वाटत नसे अशी ही मंडळी तालुकाभर हिंडत, गुप्त सभा घेत, काय घडत आहे याची माहिती देत, पत्रके वाटीत. सशस्त्र कार्यकर्त्यांना हवी असणारी माहिती गोळा करीत. त्यांच्या कार्यक्रमाची निश्चिती करीत. हे काम करणाऱ्या मंडळींत मी एक होतो.

पंधरा वर्षांचे वय व किरकोळ शरीर असल्यामुळे मी पोरगासोरगाच वाटत होतो. मळके धोतर अगर हाफ पॅन्ट, एक मळके कुडते, डोक्यावरील सर्व केस तासून केलेला गुळगुळीत गोटा व थोडी शेंडी. जवळ एखादे गाठोडे असे. मी तालुकाभर हिंडत होतो. पत्रके तर वाटीत होतोच, पण दारूगोळाही गरजेनुसार इकडून तिकडे पोचवीत होतो. तालुक्यात काही अगदी छोटी गावे असत. दहा-पंधरा घरे. सगळी मिळून लोकसंख्या साठ सत्तर, अशा गावात मुसलमानांचे घरच नसे. ह्या अशा गावांच्यापैकी काही गावे म्हणजे आमचे किल्लेच होते. ह्या गावांवर जवळपास आमचे राज्यच असे. रजाकारांनाही ह्याची जाणीव असे कारण ह्या गावांच्या जवळपास एकटा दुकटा रजाकार गेला तर तो जिवंतही परत येत नसे. पुष्कळदा त्याचे प्रेतही मिळत नसे. ह्या गावांना दारू, गोळ्या पुरवाव्या लागत. माहिती द्यावी-घ्यावी लागे. मी नेहमी राजरस्त्याने चाले. मधून मधून एखादा मुसलमान त्रास देई. अपमान करी. एखाद्या वेळी मुद्दाम कुणी धक्का देई. हे सोडले तर माझे हिंडणे कुणी मनावर घेत नसे. दर पंधरा-वीस दिवसाला होणारी माझी चक्कर हा गावकऱ्यांना दिलासा होता. मी चार-सहा जणांशीच बोले, पण ते गावभर पसरे.

गावात पोलिस ठाणे होते. ह्या ठाण्यावर एक सबइन्स्पेक्टर व कधी सहा, कधी आठ पोलिस असत. भोवतालच्या लहानमोठ्या तीसचाळीस गावांत त्यांचा दरारा असे. ह्या पोलिसांना खरा आधार गावात असणाऱ्या मुसलमानांचा होता. हजाराच्या मुस्लिम लोकसंख्येत सशस्त्र रझाकारच दोनशेच्या आसपास होते. गावचा पोलिस सब-इन्स्पेक्टर हुशार, शूर व कडवा जात्यंध होता. त्याचे नाव अब्दुल अजीज. त्याच्या चाणाक्षपणाचा धाक असे. तो इंग्रजी वृत्तपत्र मागवी. उर्दू वर्तमानपत्र येत. त्यांच्याजवळ एक रेडिओ होता. वर उल्लेखिलेल्या पाटलांच्याजवळ एक रेडिओ होता. गावात

बाहेरची वर्तमानपत्रे येतच नसत. कारण त्यांच्यावर बंदी होती. उर्दू वर्तमानपत्रे वाचण्याची लोकांची इच्छा नव्हती. गावात एक शाळा चौथीपर्यंत होती. तिथे बहुतेक शिक्षक मुसलमानच होते. गाव रेल्वेपासून दूर होते, मोटार तर नव्हतीच. जवळचे रेल्वे स्टेशन पाच मैलांवर होते. तिथे एक गाडी येई, एक जाई. ह्या गावकऱ्यांना सगळ्या वातम्या कळण्यासाठी माझा मोठा आधार वाटे. आम्ही खरे खोटे अशा बेताने सांगत असू की लोकांचा उत्साह भंग होऊ नये.

एकाएकी जून १९४८ ला ही व्यवस्था कोसळून पडली. जवळ असणारे वापटी हे गाव आमचे ठाणे होते. ह्या छोट्या गावाने रजाकारांचे अनेक हल्ले परतविले होते. पोलिसांनाही परतण्यास त्यांनी भाग पाडले होते. हे गाव ताब्यात घेण्याच्या प्रयत्नात अनेकजण जखमी, काहीजण ठार झाले होते. पण जून महिन्यात असा निर्णय वरिष्ठ नेत्यांनी घेतला की हे गाव रिकामे करून सर्वांनी बायकामुलांसह सरहद्दीबाहेर यावे. असेच एक दुसरे छोटे गाव वाडी होते. तेही रिकामे करण्यात आले. कुरुंद्यापासून फक्त तीन मैलांवर असणाऱ्या ह्या गावावर तीन वेळा हल्ले झाले. रझाकारांपैकी सहा जण ठार, अनेक जण जखमी झाले. पण हे लोकसंख्या ४७ असणारे गाव लढत होते. ही गावे रिकामी करण्याचा निर्णय विशिष्ट कारणामुळे घेण्यात आला होता. हैदराबादच्या सरहद्दीवर क्रमाने भारतीय फौजा जमा होत होत्या. हा वेढा क्रमाने आवळला गेल्यानंतर संस्थानात अत्याचारांना ऊत येणार हे नक्की होते. ह्या छोट्या गावांना ह्यापुढे मदत पोचविणे कठीण होते. त्यांना वाऱ्यावर सोडण्यापेक्षा गावे रिकामी करणे योग्य होते.

पावसाळ्याच्या तोंडावर शेते, घरे सोडून, जनावरे जंगलात सोडून बायकामुलांसह अनिश्चित काळापर्यंत निर्वासित होणे ही दुःखाची बाव ह्या गावांनी मोठ्या धैर्याने पार पाडली. दिवसेंदिवस सरहद्दीवरील रझाकारांचा धुमाकूळ वाढत होता. सरहद्दीच्या आत दोन तीन मैल शिरून रझाकार लुटालूट करीत. आम्ही कितीही प्रयत्न केला तरी निजामी राजवट उलथून टाकणे आमच्या आटोक्यात नव्हतेच ते काम भारतीय फौजांनाच करणे भाग होते. भारत सरकारने सैनिकी हस्तक्षेप करीपर्यंत जनतेचे मनोधैर्य व लढा टिकविण्याचे काम स्टेट काँग्रेस करीत होती. सरहद्दीवर सेना जमू लागताच आमच्या कार्याचा एक भाग पूर्ण झालेला होता. सरहद्दीवरील निजामी ठाण्यावर हल्ले करणे आणि हल्लेखोर रझाकारांना पिटाळून लावणे हे नवे काम

स्वीकारल्यावरोबर आतील ठाणी सोडून देणे भाग होते. त्याप्रमाणे गावे सोडून दिली.

त्याचवेळी आमचा एक कार्यकर्ता सुदाम पकडला गेला. त्याला पकडून कुरुंदाला आणण्यात आले व कुरुंदा ठाण्यात त्याचा छळ सुरू झाला. ह्या छळाच्या वेळी गावचे पाटील पुष्कळदा उपस्थित असत. आणि निष्कारण छळ सहन करण्यापेक्षा नावे सांग व जीव वाचव म्हणून उपदेश करीत. त्या छळाच्या काळात सुदाम कधी हे म्हणाला नाही, की पाटील तुमच्या मळ्यात आमचे केंद्र आहे व तुम्हीच आम्हाला जेवण पुरवता. त्याने त्याच पाटलाकरवी आम्हाला पळण्याचे निरोप केले व सर्व व्यवस्था लागल्यानंतर, आम्ही फरार झाल्यानंतर आमची नावे सांगितली. त्यामुळे माहिती मिळणारी सगळी यंत्रणाच कोसळली. मी हैदराबादला फरार झालो. तिथेच पोलिस ॲक्शनपर्यंत किरकोळ कामे करीत होतो. निघण्यापूर्वी गावकरी मंडळीना मी हे तपशिलाने समजावून सांगितले की, आता निजाम व रजाकारांचा घडा भरला आहे. सरहद्दीवर भारतीय फौजा जमू लागल्या आहेत. ह्यानंतर क्रमाने वेढा पक्का होत जाईल आणि नंतर भारतीय फौजा हैदराबादेत शिरतील आणि ह्या अत्याचारांचा शेवट होईल. आता तुम्ही फक्त वाट पाहा. काही करू नका. शासनाच्या आज्ञा निमूटपणे पाळा, धीर सोडू नका.

जुलैपासून मौजे कुरुंदा जगापासून जवळपास तुटल्यातच जमा होते. पावसाळा असल्यामुळे गावकऱ्यांचे बाहेर जाणे येणे मंदावलेलेच होते. गावातून बाहेर पडण्याचे तीन मार्ग होते. त्यावर एक पोलिस व दहा पंधरा रझाकार ह्यांचे ठाणे असे. गावात येणारा व गावातून जाणारा ह्यांची ते कसून तपासणी करीत. त्यामुळे होता होईतो लोक बाहेर गावी जाण्याचे टाळीत. चिखलाचे प्रमाण जास्त असल्यामुळे पावसाळा संपेपर्यंत गाड्या चालणे शक्यच नव्हते. गावात संस्थानाबाहेरचे मराठी वर्तमानपत्र येतच नसे. आमची यंत्रणा संपल्यामुळे स्टेट कॉंग्रेसची बातमीपत्रे येईनात. कार्यकर्ते सरहद्दीवर अडकले होते तेही इतक्या आत येत नव्हते. अमीनसाहेबांनी (सब इन्स्पेक्टर पोलिस) सर्व टपाल तपासून मगच देण्यास आरंभ केला. ह्या बेकायदेशीर सेन्सॉरमुळे राजकीय बातमी कळणेच कठीण झाले. कुणालाही कशाची जाणीव नाही. त्यामुळे साऱ्या हालचाली थंड झाल्या असे वातावरण निर्माण होई. हे वातावरण निराश करणारे होते.

जुलैनंतर क्रमाने जनतेत निराशा वाढत गेली. बाहेर काय घडत आहे ह्याबाबत अमीनसाहेब प्रमुख गावकऱ्यांना सायंकाळी बोलावून घेऊन माहिती सांगत. गावात रेडिओ दोनच होते. सर्वांना बातम्या कळणे सोयीचे व्हावे म्हणून पाटलांचा रेडिओ

पोलिस ठाण्यात आणून ठेवला होता. त्यामुळे हैदराबाद रेडिओ सांगेल तेच ऐकायचे. एरवी तरी दुसरे काय ऐकता येणार होते! कारण रेडिओवरील स्टेशने माहीत कुणाला होती? अमीन मात्र शहाणा माणूस होता. परिस्थितीची थोडीफार कल्पना त्याला होती. पण तो सत्य न सांगता हैदराबादचा प्रचारच समजावून सांगे. त्याने भारताचा नकाशा गावकऱ्यांसमोर टांगून ठेवला आणि दोन बाजूने पाकिस्तान व खालून हैदराबाद ह्यामुळे हिंदुस्थानच कसा घेरला गेला आहे हा मुद्दा गावकऱ्यांच्या मनावर ठसविण्याचा त्याने प्रयत्न केला. गावकऱ्यांना हे म्हणणे मुळीच आवडत नव्हते, पटत नव्हते. पण शेवटी त्याला उत्तर काय ? हिंदुस्थानच घेरला गेलेला आहे हे सत्य टाळणार कसे ? त्यातल्या त्यात शहाणा असा एक हिंदू शिक्षक गावात होता. त्याने एक-दोन नकाशे काळजीपूर्वक तपासले. काँग्रेसच्या एका पत्रकात भारताचा नकाशा व त्यात हैदराबाद होते. मोठ्या दुःखाने गुरुजींनी लोकांना सांगितले, "बाबांनो, गोष्ट खरी आहे. आपणाला मुसलमानांनी घेरलेले आहे. गावाच्या वाटांवर चौक्या बसवून गाव घेरले तसे भारत घेरलेले आहे." लोक जास्त हताश होऊ लागले.

अमीन अब्दुल अजीज निरनिराळ्या बाबी सांगत असे. तो म्हणे मुंबई आणि मद्रासला जाणाऱ्या सर्व रेल्वे हैदराबादमधून जातात. त्या बंद केल्या की मद्रास दिल्ली पासून तुटले. मनमाडपर्यंत निजामी रेल्वे होतीच. मनमाड जिंकले की दिल्ली आणि मुंबईची ताटातूट. नकाशात ठिकाणे अधिकच जवळजवळ दिसत. मग तर फारच वाईट वाटे. एक आंतरराष्ट्रीय चोर सिडने कॉटन सतत चोरून शस्त्रे आणून हैदराबादला पुरवितो हे गावकऱ्यांना माहीत होते. ही चोरटी शस्त्रे विमानातून येत. हे विमान अडवणे अगर पाडणे भारताला शक्य नसल्यामुळे हैदराबादजवळ हत्यारे कशी गोळा होत आहेत ह्याबाबत भडक वर्णने गावकऱ्यांना अमीनने सांगितली होती. हैदराबाद संस्थानात एकूण वीस लक्ष मुसलमान (खरा आकडा सोळा लक्ष) त्यात दहा लक्ष स्त्रिया. अगदी म्हातारे व मुले सोडली तर पाच लक्षाची मुसलमान फौज हैदराबादेत तयार होऊ शकते. शस्त्रे सिडने कॉटनची. शिवाय आदिवासी, अस्पृश्य ह्यांच्या फौजा आणि ज्या हिंदूना जगण्याची इच्छा आहे त्यांच्या फौजा, अशा संभाव्य फौजांची संख्या सहजच दहा लक्ष होणार. शिवाय निजामाची सून निलोफर बेगम इराणची म्हणून मदतीला येणाऱ्या इराणी, अफगाणी फौजा, पाकिस्तानच्या फौजा आणि भारतातील कोट्यवधी मुसलमान. मग भारताचे काय होणार? गावकऱ्यांना चिंतेचा हाही एक

विषय होता.

एक कार्यकर्ता गावात ठाण्यात अडकलेला होता. त्याचा छळ, अपमान रोज डोळ्यांसमोर होई. मधेच बहिर्जी हा जवळच्या गावचा कार्यकर्ता हुतात्मा झाल्याची बतमी आली, कोण जिवंत आहेत, कोण ठार झाले हे नक्की कळतत् नव्हते. त्याचीही चिंता होतीच.

पण हिंदूंच्यासह मुसलमानही घाबरलेले होतेच. कारण त्यांनाही काही गोष्टी समजत नव्हत्या. पैकी एक न समजणारी गोष्ट काश्मीर होती. तिथली प्रजा मुसलमान. पाकिस्तान तिथे लढत आहे. त्याचा पराभव का व्हावा? पाहता पाहता जुनागढ भारतीय फौजांनी जिंकले, पचविले. त्याबाबत पाकिस्तान काही का करू शकले नाही? हैदराबादला जैसे थे करारावर सह्या का कराव्या लागल्या? हिंदूंच्यामध्ये ज्याप्रमाणे मुसलमानांनी केलेल्या हिंदूंच्या कत्तलीच्या कहाण्या लोकप्रिय होत्या व घबराट निर्माण करीत होत्या, तशाच मुसलमानांच्यामध्ये हिंदूंनी केलेल्या कत्तलींच्या कहाण्या प्रचलित होत्या. मुस्लिम निर्वासितांचे लोंढे हैदराबादेत येत होते. हिंदू बहुसंख्य आहेत. त्यांनी आपल्या कत्तली केल्या तर कसे? या साऱ्या प्रश्नांनी मनातून मुसलमानही हादरलेला, भेदरलेला असे. पण भीती झाकण्यासाठी तो शौर्याचा अभिनय करी. मुसलमानही एकटा दुकटा रात्री हिंडत नसे. ह्या वातावरणात जुलै-ऑगस्ट संपला.

सप्टेंबर उजाडला आणि अमीन साहेबांनी शांतपणे पाटलांच्या चौकीवरील रेडिओ आपल्या घरी नेऊन ठेवला. अमीनने योजना चाणाक्षपणे केलेली होती. पण गावकऱ्यांना ह्याचे फारसे महत्त्व नव्हते. नाहीतरी रेडिओ हैदराबाद ऐकण्याची लोकांना इच्छा नव्हती. भारतीय नेत्यांना ही नभोवाणी शिव्या देई. त्या ऐकवत नव्हत्या, आवडत नव्हत्या. ह्या बातम्यांच्यावर त्यांचा विश्वास नव्हता. परिणामी तेरा सप्टेंबरला पोलिस ॲक्शन सुरू झाले याची माहिती कुणालाच नव्हती. सकाळी पूर्णेहून निघणारी गाडी नेहमीप्रमाणे निघाली ती अंबा स्टेशनवर सकाळी ७.३० ला आली. हे स्टेशन कुरुंद्याहून पाच मैल दूर होते. ही गाडी पुढे निघून गेली आणि नंतर गाड्या सोडू नका अशी आज्ञा पूर्णेला येऊन पोचली ही गाडी सकाळी अकराला हिंगोलीला पोचली. व तिथेच थांबली. दुपारी भारतीय फौजा हिंगोलीला आल्या. त्यांनी ही रेल्वे अडकवून ठेवली. युद्ध सुरू झाल्याची बातमी फक्त अमीनाला होती. त्याचा विश्वास रेडिओ हैदराबादवर होता. हैदराबाद नभोवाणीने युद्धाच्या बातम्या देताना दुपारी

घोषित केले की सर्वत्र हैदराबादच्या फौजा निकराने लढत असून कुठे भारतीय फौजा मैल दोन मैल आत आहेत, कुठे हैदराबादच्या फौजा मैल दोन मैल भारतीय हद्दीत आहेत. ही बातमी खरी असावी अशी अमीनची मनोमन इच्छा असली तरी खात्री नव्हती. त्याने दुपारच्या गाडीची बातमी आणण्यासाठी एक माणूस अंबा स्टेशनवर पाठविला होता. तो संध्याकाळी परत आला, त्याने गाडी अजून आली नाही ही वार्ता आणली. गावकऱ्यांना वाटले की गाडी कुठे तरी कार्यकर्त्यांनी उडविली, पाडली असावी. ह्या घटनेचा अर्थ अब्दुल अजीज, फक्त एकच माणूस त्या खेड्यात समजू शकत होता.

तेरा सप्टेंबरचा सगळा दिवस असा गेला. चौदा सप्टेंबरला संध्याकाळी अमीनने औरंगाबाद स्टेशन लावले. औरंगाबादवरून भारतीय अधिकारी औरंगाबाद भारतीय सेनेच्या ताब्यात असल्याचे सांगत होते. अंबा स्टेशनवर आजही गाडी नव्हती. चौदाला सायंकाळी अमीनसाहेबांना नक्की खात्री पटली की, भारतीय फौजांचा विजय होत असून सर्वत्र हैदराबादची पिछेहाट होत आहे. हैदराबाद रेडिओ मात्र अजूनही सर्वत्र आपला विजय होत आहे, वाशीम, मनमाड, सोलापूरच्या दिशेने फौजा पुढे सरकत आहेत हे ओरडून सांगत होता. पंधरा सप्टेंबरला सर्व गावांतून पीठ गोळा करण्यात आले. गिरणी सतत चालली. ज्वारी व हरभरा दळणे चालूच होते. हिंदू व मुसलमान यांच्या घरीही सतत जाती चालू होती. काही तरी बिघडले आहे हे सर्वांना कळले, पण काय बिघडले आहे ह्याची कल्पना कुणाला येत नव्हती. सतरा सप्टेंबरला हैदराबादच्या जवळ निजामी फौजा शरणागती देत होत्या. कुरुंद्यात सर्व मुसलमान सैपाक करीत होते. त्यांनी रात्री भाकऱ्या व चटण्या बांधल्या व रात्रीच गाव सोडले. ही मंडळी डोंगराकडे गेली. त्यांनी अठराचा सर्व दिवस व रात्र चिंतेत डोंगरावर काढली.

१८ सप्टेंबरला गावात सर्वत्र सामसूम. गावात एकही मुसलमान स्त्रीपुरुष नव्हता. अमीनसाहेबही नव्हते. आणि साऱ्या गावाला अचानक मरणभय निर्माण झाले. मुसलमान निघून गेले. आता गाव घेरले जाणार, सर्व हिंदूंची कत्तल होणार ही सर्वांची खात्री पटली. पाटलांनी सर्वांना लढण्यास तयार राहण्यास सांगितले. सापडतील ती हत्यारे घेऊन लोक जीव मुठीत धरून मारण्यास, मरण्यास सिद्ध झाले. सारे हैदराबाद तुफान आनंदाने नाचत होते तेव्हा कुरुंदा मरणाच्या भयाने थरथरत होते. १९ ला सकाळी मुसलमान गावात आले. मिळेल त्याला मिठ्या मारून हिंदु-मुस्लिम भाई-भाई

म्हणून सांगू लागले. पाय धरून जीव वाचविण्यासाठी विनवू लागले. क्षणभर काय झाले हे कुणाला समजेचना. दुपारी भारतीय फौजा तिरंगी ध्वजासह त्या खेड्यात आल्या आणि लोकांच्या आनंदाला अनावर उधाण आले. आजवर भोगलेल्या अत्याचारांची प्रतिक्रिया सुरू झाली. गावातील लोक मोठेपण, प्रतिष्ठा आणि वय विसरून रस्त्यावर निजामाच्या नावे बोंब मारू लागले व होळीप्रमाणे रस्त्यावर नाचू लागले.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : 'सुगंध' दिवाळी अंक १९७२)

## ८.

# नांदेडचे झेंडा प्रकरण - रझाकार नेत्याचा तिरंग्याला प्रणाम

नांदेड जिल्ह्यातील स्टेट काँग्रेसची चळवळ आधीच जास्त बळकट अशी होती. गोविंदराव पानसरे ह्यांच्या बलिदानानंतर तर वातावरण तापलेले असेच होते. जीवन-मरणाचा निर्णायक लढा जवळ येत आहे आणि हा लढा केवळ निःशस्त्र राहणार नाही ह्याची तीव्र जाणीव नांदेडच्या कार्यकर्त्यांना फार आधीपासून होती. जणू उपजतच होती असे म्हणायला हरकत नाही. लढ्याला आरंभ झाला तेव्हा नांदेडचा गट अगदीच निःशस्त्र नव्हता. पण शस्त्रांच्यापेक्षा हिंमत हाच खरा आधार सर्वांना होता. ज्येष्ठ पिढीत शामराव बोधनकर, भगवानराव गांजवे, गोपाळशास्त्री देव आणि तरुण मंडळीत अनंत भालेराव, नागनाथ परांजपे, रघुनाथ रांजणीकर, जीवनराव बोधनकर असा कडव्या कार्यकर्त्यांचा व अमर्याद मनोधैर्याचा गट नांदेडला होता. ह्या सर्वांच्या जिद्दीतूनच नांदेडचे प्रसिद्ध झेंडा प्रकरण निर्माण झाले.

७ ऑगस्ट १९४७ ला स्टेट काँग्रेसचा लढा सुरू झाला; 'भारतात बिनशर्त सामील व्हा' ही लढ्याची प्रमुख घोषणा होती. ह्यानंतर बरोबर एक आठवड्याने म्हणजे भारताच्या पहिल्या स्वातंत्र्यदिनी झेंडा प्रकरणाला आरंभ झाला. सराफ्यातील शामराव बोधनकरांच्या तीन मजली इमारतीत वरच्या मजल्यावर काँग्रेसचे ऑफिस होते. भर सडकेवर असणाऱ्या ह्या ऑफिसवर स्वातंत्र्यदिनी भारताचा राष्ट्रध्वज लावावा आणि तो प्रयत्नपूर्वक जतन करावा असा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. हा निर्णय घेणे सोपे मुळीच नव्हते. राष्ट्रध्वज लावताच वातावरण तप्त होणार याची

जाणीव होती. प्रचंड दंगल होण्याचा संभव दिसत होता. जाळपोळ, लुटालूट, अत्याचार असे अनन्वित प्रकार सुरू होतील हेही दिसत होते. विरोधी शक्ती म्हणजे पोलिस, रझाकार, गावातील अरब, रोहिले व पठाण ह्यांची शक्ती एवढी मोठी होती की, लढ्याला नामशेष व्हावे लागेल ह्याची सर्वांनाच जाणीव होती. तरीही ध्वज उभारायचाच असे ठरले.

जिल्ह्याचे सेक्रेटरी गांजवे होते. त्यांनी १५ ऑगस्टला सकाळीच काँग्रेस ऑफिसवर राष्ट्रध्वज फडकावला. भगवानराव गांजवे हे सौजन्य व कणखरपणा यांचे एक नमुनेदार उदाहरण. त्यांनी काँग्रेस ऑफिसवर ध्वज लावला. ऑफिसला कुलूप लावले व स्वतःजवळ किल्ल्या ठेवल्या. निःशस्त्रपणे अत्याचारी नेतृत्वाला सामोरे जाणे व सर्वांसमोर उभे राहणे हा त्यांचा योग होता. उरलेले कार्यकर्ते वेळ आलीच तर सर्व होळी विभाग आक्रमणाविरुद्ध कसा लढवायचा या योजनेची सिद्धता ठेवण्यात गुंतले होते. शामराव बोधनकरांचे राहते घर हे कार्यकर्त्यांचे ठाणे होते.

सकाळपासूनच हा ध्वज डौलाने फडकत होता. पुढे काय होणार याची चर्चा हिंदू मंडळी गटागटाने करीत होती. मुसलमानांच्या सशस्त्र टोळ्या धमक्या देत दहशत निर्माण करीत गावातून हिंडत होत्या. ध्वज काढून टाका, याचे परिणाम फार गंभीर होतील असे परस्पर निरोप येणे चालूच होते. हिंदूमधील ज्येष्ठ मंडळींना हे आततायी वर्तन नापसंत होते. त्यांच्याकडूनही सूचना येत होत्या. गांजवे यांचे दैनंदिन काम शांतपणे चालू होते. सर्वांना ते हसून शांतपणे सांगत, पोलिस काय म्हणतात ते पाहू नंतर सर्वानुमते निर्णय घेऊ. माझा हट्ट नाही. आमचे सगळे लोक म्हणाले ध्वज काढा तर काढू. ज्या सगळ्या लोकांचा गांजवे हवाला देत ती माणसे रस्त्यावरून हिंडत नव्हती. एखादा लोकांना भेटला तर गांजवे सेक्रेटरी आहेत, त्यांना विचारा, असे सांगत असे. आमचे काही म्हणणे नाही. म्हणणे व हट्ट तर कुणाचाच नाही, झेंडा तर निघत नाही हे पाहून शेवटी मुस्लिम नेत्यांनी पोलिसांना हस्तक्षेप करण्याची सूचना दिली.

दुपारी चार वाजता सुमारे पन्नास पोलिस एक इन्स्पेक्टर यांच्यासह डी.वाय.एस.पी. नरसिंग प्रसाद घटनास्थळी हजर झाले. गांजवे यांचा शोध घेतला. ते स्वतःच्या घरी होते. तेथून त्यांना बोलाविण्यात आले. त्यांना पोलिसांनी विचारले, हा झेंडा कुणी लावला? गांजवे एखादी सामान्य गोष्ट सांगावी तसे म्हणाले - मी लावला. संतप्त होऊन इन्स्पेक्टरने विचारले, हा परदेशी झेंडा लावण्याचे परिणाम काय होतील याची

कल्पना आहे काय? जेलमध्ये जावे लागेल.

गांजवे यांनी अतिशय शांतपणे सांगितले की, ध्वज परदेशी नाही. आपल्या राष्ट्राचा ध्वज आहे. पोलिस म्हणाले, तुम्ही देशद्रोही आहात. हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र आहे. हा हिंदुस्थानचा भाग नव्हे. गांजवे म्हणाले, आम्ही तर हैदराबाद भारताचा अविभाज्य भाग मानतो. ह्यानंतर शिवीगाळ, धमक्यांना आरंभ झाला. काही जण समजूत घालू लागले. समजूत घालण्यासाठी डी.वाय.एस.पी. नरसिंग प्रसाद यांनी बाजूला नेऊन गांजवे यांना सांगितले, भारतीय ध्वज लावणे हा गुन्हा असल्याच्या आज्ञा आमच्याकडे नाहीत. यामुळे आम्ही कायद्याप्रमाणे तुम्हाला ध्वज काढण्याची आज्ञा देऊ शकणार नाही, पण एकूण विचार करता तुम्ही ध्वज काढावा हे बरे.

गांजवे यांचे म्हणणे असे की, ध्वज काँग्रेस ऑफिसवर आहे. काँग्रेसच्या आज्ञेनुसार लावलेला आहे. त्यामुळे आमच्या अध्यक्षांच्या आज्ञेशिवाय आम्ही ध्वज काढू शकत नाही. तुम्ही वाटल्यास मला अटक करा. मी जेलमध्ये बसण्यास तयार आहे. बरे, ध्वज काढायचा असेल तर उपाय सोपा आहे. ह्या किल्ल्या घ्या. वर जाऊन ऑफिस उघडा, ध्वज काढा, जप्त करा. रीतसर पंचनामा करा. किल्ल्या मला परत करा. माझी काहीच तक्रार नाही. मी मात्र ध्वज काढणार नाही. गांजवे जो उपाय सांगत होते तो सर्वांत कठीण होता, समोरून त्या इमारतीत जाण्याची एक चिंचोळी वाट होती. तिच्या पायरीवर पाय ठेवताच आतून गोळीबार झाला असता. घराकडे मागून जाण्याचे सर्व रस्ते रोखण्यात आले होते. ते प्रतिकाराविना मोकळे होणार नव्हते. शे-दीडशे माणसे मरू द्यावी एवढ्याची तयारी, त्याच्या परिणामाची तयारी ठेवल्याशिवाय पोलिसांना त्या इमारतीत जाणे शक्य नव्हते. शासनाच्या आज्ञा आटोकाट प्रयत्न करून शांतता टिकवा अशा होत्या. नांदेडला त्या क्षणी भीषण दंगल शासनाला नको होती. रात्री आठपर्यंत विविध प्रकारचे इलाज वापरून संपले. शेवटी उद्या वाईट परिणाम भोगावे लागतील असे सांगून पोलिस परतले. ध्वज मात्र तसाच होता.

दुसऱ्या दिवशी सकाळपासून ध्वज काढण्याविषयी नानाप्रकारचे प्रयत्न पुन्हा सुरू झाले. हिंदूंना गांजवे सांगत, सर्वांचा विचार घेऊन ठरवतो. माझा काही हट्ट नाही. मुसलमानांना सांगून पोलिसांनी ध्वज जप्त करावा, माझी हरकत नाही. ध्वज मात्र डौलाने फडकत होता. सतरा तारखेला मुसलमानांची ईद आली. अठरा तारखेला त्यांची मिरवणूक होती. अठरा तारखेला मुसलमानांनी आणि रजाकारांनी शासनाला अल्टिमेटम दिले, ध्वजाखालून मिरवणूक जाणार नाही, ध्वज निघाला पाहिजे. नाही तर गावात

जाळपोळ होईल, रक्तपात होईल. त्या इमारतीसमोर मिरवणूक चार वाजता येईल. तोपर्यंत ध्वज निघाला नाही तर सराफा लुटण्यापासून दंगलींना आरंभ होईल. आणि तावडतोव सारे नांदेड भयग्रस्त झाले. आज मरण आहे याची जाणीव एकदम सर्वांना झाली. नित्याप्रमाणे सडकेवरून निःशस्त्र गांजवे नम्रपणे चर्चा करीत हिंडत होते. त्यांच्या बोलण्यातला संथपणा व चेहऱ्यावरचे हसू कायम होते. दंगलींना आरंभ झाला तर समोर पहिला बळी गांजवेच होते. त्यानंतर उभयपक्षी युद्ध सुरू झाले असते. या दिवशी हिंदूंना दुकाने उघडण्याची हिंमत नव्हती. सडकेवरून हिंडण्याची भीती वाटे.

सकाळपासून गांजवे यांच्याकडे शिष्टमंडळे येण्यास आरंभ झाला. प्रथम रावसाहेब मुळावेकरांच्या नेतृत्वाखाली वकिलांचे शिष्टमंडळ आले. होळीवरील शंभर-सव्वाशे घरे प्रतिकाराचा प्रयत्न करतील पण उरलेल्या नांदेड शहराचा बचाव कोण करील? आपल्या हट्टापायी गावाची राखरांगोळी करू नका, अशी त्यांनी मागणी केली. गांजवे यांनी नम्रपणे सांगितले की, आम्ही तर तळहातावर शिरच घेतलेले आहे. आता जगाचे काय होईल या चिंतेचे ओझे आमच्यावर नको. आम्हाला शूरासारखे मरू द्या, पाय मागे ओढू नका. नंतर काही तासांनी श्री.संधी यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ आले. आमचे सर्वस्व लुटले जाईल, आमचे रक्षण करा, अशी विनंती त्यांनी केली. व्यापाऱ्यांना गांजवे यांनी स्पष्टपणे सांगितले की, हा ध्वज स्वातंत्र्य मिळेपर्यंत हजारोंच्या रक्ताने रंगला आहे. अजून थोडेसे रक्त खर्ची पडले तर मी पर्वा करणार नाही. नंतर नांदेडचे कलेक्टर शहाबुद्दीन आले. ते म्हणाले. गुंडांच्या हाती गाव देऊ नका, तुमच्यासमोर पदर पसरतो. मला शांततेची भीक वाढा. कलेक्टर खरोखरच पदर पसरून उभे राहिले. क्षणभर गांजवे यांचे मनही विचलित झाले.

दुसऱ्या क्षणी गांजवे भानावर आले. हा प्रश्न एकट्याचा नव्हता. सर्वांचे नेते म्हणून गांजवे चर्चेला समोर होते, पण मागे शेकडो कार्यकर्ते तळहातात प्राण घेऊन उभे होते. बायका, मुले, जायदाद, अब्रु पणाला लावलेल्या ह्या शूर कार्यकर्त्यांनी जागूनच दोन दिवस काढले होते. राष्ट्रध्वजाच्या प्रतिष्ठेसाठी सर्वस्व पणाला लावलेल्या आप्तांचा घात करणे गांजवे ह्यांना शक्य नव्हते. कारण आता माघार म्हणजे पुढच्या सर्व कार्याचा नाश होता. गांजवे शांतपणे म्हणाले, कलेक्टरसाहेब मी काय करू? माझ्या हाती काही नाही. आपण पोलिसांकरवी ध्वज उतरवा, मी किल्ल्या तुमच्याजवळ देतो. शांततेचा भंग होऊ नये. गाव गुंडांच्या हाती जाऊ नये या व्यवस्थेची जबाबदारी माझी नाही. आपण योग्य ती व्यवस्था करा. शेवटी कलेक्टर परत गेले.

शामराव बोधनकरांच्या घरी गांजवे आले. त्यांनी सर्व कार्यकर्त्यांशी चर्चा केली व विचारले, काय करावे? कार्यकर्ते म्हणाले, आपण प्रतिकार करीत मरू पण आता माघार नाही. चर्चा चालू असताना इत्तेहादुल मुसलमीनचे जिल्हाध्यक्ष, रझाकारप्रमुख, आमदार अखलाक हुसेन धैर्याने एकटेच बोधनकरांच्या घरी आले. ते गांजवे यांना म्हणाले, मी तुमच्या भेटीसाठी रझाकारांचा नेता म्हणून आलेलो नाही, मित्र म्हणून आलेलो आहे. आमचे लोक गुंड आहेत. ते जाळपोळीसाठी संधी पाहात आहेत. मला शांतता हवी आहे. मला साह्य करा. आपण ह्यातून मार्ग काढू. अखलाक हुसेन म्हणाले राष्ट्रध्वज तुमचा एकट्याचा नाही, आमचाही आहे. त्यातील हिरवा रंग आमच्यासाठीच आहे. गांजवे म्हणाले, आपल्या मनात राष्ट्रध्वजाविषयी आदर आहे ह्याचे मला समाधान आहे. ह्या किल्ल्या घ्या, आपण ध्वज काढा. माझी हरकत नाही. अखलाक हुसेन म्हणाले, मी ध्वज काढणार नाही. तुम्ही मला रस्ता सांगा. तुम्ही एक तास ध्वज काढता काय? तासाच्या आत मी माणसे पुढे घेऊन जातो. गांजवे म्हणाले, आम्ही ध्वज एक मिनिटही काढणार नाही.

चर्चा करताना अखलाक हुसेन म्हणाले, तुम्ही ध्वज एक फूट खाली घेऊ शकता काय? गांजवे म्हणाले, फूटभर ध्वज खाली आणून काय होणार? ध्वज तिथेच राहील. मिरवणुकीला ध्वजाखालूनच जावे लागेल. शिवाय ध्वज असा फूटभर खाली घेणे म्हणजे शोक व्यक्त करणे. या उद्योगात काय अर्थ? पण अखलाक हुसेन म्हणाले, ध्वज काढणार नाही हा तुमचा आग्रह कायम राहील. मला माझ्या लोकांना सांगण्यासाठी काही तरी शिल्लक राहील. आपण दोघे ध्वजाशेजारी उभे राहू. माझ्या लोकांनी शांतपणे जावे असे मी सांगेन. तुमच्या मंडळींना शांत राहण्यासाठी तुम्ही सांगा. गांजवे यांनी आपल्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय केला व मूळ मुद्दा म्हणजे ध्वज काढणार नाही हा शिल्लक राहून तडजोड होणार असेल तर ती मान्य करावी असे आपले मत दिले. सर्वानुमते ही तडजोड स्वीकारली गेली.

आक्रमक मनोवृत्तीच्या जात्यंध मंडळींना ही तडजोड कुठवर पचेल याबाबत रांजणीकर, अनंत भालेराव, नागनाथ परांजपे यांना शंका होती. म्हणून तडजोड झाली तरी युद्धाची सिद्धता असू द्या, असा निर्णय त्यांनी घेतला. शामराव बोधनकरांचे राहते घर, काँग्रेस ऑफिस असणारे घर, यावर जिथून हल्ला होण्याचा संभव आहे त्या सर्व जागा रोखण्याची व्यवस्था करण्यात आली. अखलाक हुसेन व गांजवे दोघेच वर असणार म्हणून गांजवे यांच्या नकळत त्यांच्या संरक्षणाची सोय करण्यात आली.

शेवटी येणार येणार म्हणून गाजत असलेला रझाकार व मुसलमानांचा सशस्त्र जुलूस सायंकाळी चार वाजता सराफ्यातील पहिल्या चौकापर्यंत आला. सुमारे चार-पाच हजार लोक घोषणा करीत, नाचत, हवेत फैरी झाडत त्या मिरवणुकीत होते. रझाकारांचे उपनेते नजीर अली मिरवणुकीसोबत होते. गांजवे व अखलाक हुसेन तिसऱ्या मजल्यावर ध्वजाच्या दोन बाजूस होते. सर्व रझाकारांचे प्रमुख नेते आता तडजोड झाली आहे, शांतपणे जा हे समजावून सांगत होते. आणि झेंडा खाली घेऊन चालणार नाही, तो काढलाच पाहिजे, नसता सारा गाव जाळू, असे अनुयायी ओरडत होते.

शांततेची ही तहान अखलाक हुसेन आणि नजीरअली यांना का लागावी? याचे कारण असे की, मिरवणूक रस्त्यावर दुतर्फा हिंदूंची उंच घरे व चांगली मजबूत. गावात तंग वातावरण असल्यामुळे रस्त्यावर हिंदू असणारच नाहीत. म्हणून मुसलमानांचे समूह सरळ गोळ्या व बॉम्बच्या टप्प्यात येतील. एखादा हॅन्डग्रेनेड शे-दीडशे मुसलमानांचा घात करील व मुसलमान कायमचे घाबरतील. शासनाला शांतता पाळण्याचे वरून कडक आदेश असताना स्वतःच्या सामर्थ्याच्या जोरावर पुढे जाण्यास रझाकार नेते घाबरत होते. अनुयायांना इतका विचार करण्याची क्षमता कधी नव्हतीच. सडकेवरून निःशस्त्र हिंडणाऱ्या हिंदू प्रजेला अगर व्यापाऱ्यांना त्रास देणे जसे सोपे असते तसे सिद्धता असलेल्या गटावर हल्ला करणे सोपे नसते. नेत्यांना हे कळत असल्यामुळे शांततेची तहान अखलाक हुसेन ह्यांना लागलेली होती.

वरून अखलाक हुसेन व खाली नजीरअली शांतपणे जा म्हणून अनुयायांना विनवीत आहेत. खाली हजार लोक पिसाटपणे झेंडा खाली ओढा म्हणून ओरडत आहेत, हवेत फैरी झाडत आहेत. शेजारी गांजवे शांतपणे उभे आहेत, असा प्रकार जवळजवळ तासभर चालू होता. कुणी तरी खालून गोळी झाडली. ती गांजव्यांच्या समोरून सूं ऽऽऽ आवाज करीत गेली. हिंदूंना वाटले गोळी गांजव्यांवर झाडली गेली. त्यांचा प्राण संकटात आहे. लगेच होळी भागातील अनेक घाटांवर एक एक माणूस बंदूक घेऊन उभा असल्याचे दृश्य दिसले. रझाकारांना प्रथमच आपल्यासमोर काय वाढून ठेवले आहे ह्याचा काही अंदाज आला आणि त्यांच्यात चलबिचल वाढली.

सुमारे वीस तरुण हातात पिस्तुले घेऊन तिसऱ्या मजल्यावर गांजवे यांच्या रक्षणासाठी आले. त्यात बळवंतराव बोधनकर, विनायकराव डोईफोडे, गणपतराव सरसर ही माणसे प्रमुख होती. अखलाक हुसेन ह्यांचा समज असा झाला की, झेंडा झाकला तर लोक शांतपणे जातील, म्हणून त्यांनी ध्वजावर आपली शेरवानी काढून

टाकली व ध्वज झाकण्याचा प्रयत्न केला. तरी खालून ध्वज दिसत होताच. ध्वजावर शेरवानी पाहताच ह्या वीस मंडळींनी अखलाक हुसेनचा गळा धरला आणि त्याच्याशी झटण्यास आरंभ केला. पण गांजवे म्हणाले, आज ते माझे पाहुणे आहेत. मला तिसऱ्या मजल्यावरून खाली ढकला आणि नंतर काय करायचे ते करा. त्यामुळे अखलाक हुसेनची सुटका झाली पण वीस सशस्त्र लोकांचे कडे त्यांच्याभोवती राहिले. आपण शांततेसाठी झटलो हेच योग्य केले याचा नवा प्रत्यय रझाकार नेत्याला आला होता. आता येथून जिवंत कसे परतावे याचीच तो चिंता करीत होता.

तिकडे मुसलमान लोक अखलाक हुसेनचे काय झाले या चिंतेत होते. एक शूर पोलिस इन्स्पेक्टर शहानवाज खान एकटाच हातात रिव्हॉल्व्हर घेऊन शेजारच्या घराच्या गच्चीवर गेला. तिथे जाऊन पाहतो तो अनेक पिस्तुले त्याच्यावर रोखलेली त्याला दिसली. त्याने रिव्हॉल्व्हर आपल्या पट्ट्यात बंद करून खाली यावे असे या वीस मंडळींनी फर्मावले. परिस्थितीचे गांभीर्य जाणून शहानवाज खानने आपले रिव्हॉल्व्हर पट्ट्यात बंद केले व उडी मारून तो जवळ आला. अखलाक हुसेनने त्याला सांगितले, मी सुरक्षित आहे. मला धोका नाही. पण लोकांना शांतपणे जाण्यास सांगा. नाही तर फुकट शेकडो लोक मरतील. तुम्ही मला निष्कारण गुंडांचा सरदार केले आहे. मला आता रक्तपात नको आहे. गांजवे माझे भाऊ आहेत. शहानवाज खान म्हणाला, तुम्ही तशी चिठ्ठी द्या. मी लोकांची समजूत घालतो. पण मला सुरक्षितपणे परत जाता येईल याची हमी हवी. वीस बेभान तरुण आता शहानवाजला सोडण्यास तयार नव्हते. पण गांजवे यांनी त्याला सुरक्षित परत देण्याचे आश्वासन दिले. गांजवे म्हणाले ही वेळ आम्ही आणली नाही. रझाकारांनी आणली. आम्ही झेंडा काढणार नाही. बाकी दंगल, रक्तपात मलाही नकोच आहे. शहानवाज खान शेवटी अखलाक हुसेनची चिठ्ठी घेऊन परतला.

अजून रझाकार उपप्रमुख नजीरअली आपल्या मंडळींची समजूत काढीत होता, मनधरणी करीत होता. इतक्यात एक उत्साही टोळके - सुमारे दीडशें मुसलमानांचे - अचानक कामधेनू जवळच्या चौकातून होळीकडे, शामराव बोधनकरांच्या घराकडे जाण्यास वळले. तेही सशस्त्र होते. नजीरअली लाऊडस्पीकरवरून ओरडून सांगत होता कुत्र्याच्या मरणाने मराल, तिकडे जाऊ नका. पण ऐकण्याच्या मन:स्थितीत रझाकार नव्हते. गल्लीच्या तोंडाजवळ हे टोळके येताच इशारा म्हणून रांजणीकरांच्या नेतृत्वाखालील गटाने कोरडे बार काढले. हा इशारा रझाकारांना पटला नसता तर गोळ्या झाडल्या

गेल्याच असत्या. तिथे रक्षणार्थ १५-२० तरुण सज्ज होते. पण बंदुकांचे आवाज ऐकताच एकदम कळप उधळावा तसे रझाकार उधळले आणि जीव मुठीत धरून पळत सुटले व मुख्य मिरवणुकीत दाखल झाले. आता सर्वांनाच सत्य साक्षात प्रत्ययाला आले होते. आता लढण्याची कुणाची इच्छा नव्हती. आमचे नेते नजीरअली व अखलाक हुसेन सांगतील तसे वागणे आमचे कसे कर्तव्य आहे, हे गर्दीत अनेक जण समजावून सांगू लागले. तोच शहानवाझखान अखलाक हुसेनची चिट्ठी घेऊन आला.

ह्यानंतर शांतपणे सारा जुलूस झेंड्याखालून घोषणा देत गेला. प्रथमच रझाकारांना हिंदूंच्या सामर्थ्यापुढे निमूटपणे झुकावे लागत होते. पण ह्यामुळे भीषण रक्तपात मात्र टळला. अशक्यतेची जाण आली, की रझाकार व त्यांचे नेते एकदम सुजाण झाले. मुख्य नाटक संपले होते. पण अजून समारोप व्हावयाचा होता. राष्ट्रध्वजावर अखलाक हुसेनची शेरवानी होती. ती काढताना ध्वज खाली आला. आता काय करावे? गांजव्यांनी किरकोळ गोष्ट सांगितल्याप्रमाणे सांगितले. तुम्ही तुमच्या हाताने ध्वज पुन्हा लावा व आपण दोघे मिळून ध्वजाला अभिवादन करू. शेजारी वीस पिस्तुले अजून होती. तेव्हा अखलाक हुसेन म्हणाले, हा तर फारच योग्य उपाय आहे. त्यांनी ध्वज उभारला. गांजवे व अखलाक हुसेन ह्यांनी ध्वजाला वंदन केले. शेजारच्या गच्चीवरून कलेक्टरांनी ह्या घटनेचा फोटो घेतला. पोलिस ॲक्शनपूर्वी इत्तेहादुल मुसलमीनच्या अध्यक्षांनी उभा करून वंदिलेला हा पहिला राष्ट्रध्वज!

ह्यानंतर गांजवे यांनी सुरक्षितपणे अखलाक हुसेनला खालच्या सडकेवर आणले. जिवंतपणे आपण सडकेवर पोचलो, आता भीती नाही याची खात्री पटताच रझाकार नेत्याचे धैर्याचे उसने अवसान गळून पडले. त्याने गांजवे यांना मिठी मारली व त्याच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याचे रडे थांबावयास दोन-तीन मिनिटे लागली. अशा प्रकारे बलिदानाची जिद्द विजयी झाली. ह्यानंतर दोन-चार दिवसांत कार्यकर्ते भूमिगत झाले.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : दैनिक 'मराठवाडा' १५-८-१९७२)

# ९.

# वेड्या राजकारणाचे आभार

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला हे स्थूलमानाने खरेच आहे. पण देशाच्या कानाकोपऱ्यात स्वातंत्र्याचा उदय वेगवेगळ्या वेळी झाला. ऐन मध्यभागी म्हणजे पोटात ही स्वातंत्र्य तिथी निराळी आहे. जुनागढच्या जनतेसाठी ही तिथी दि. ९ नोव्हेंबर आहे. गोव्यासाठी १९६१ सालातील तिथीचा विचार करावा लागेल. आम्ही जुन्या हैदराबाद संस्थानचे रहिवासी, आमच्यासाठी स्वातंत्र्याचा जन्म दि. १७ सप्टेंबर १९४८ ला होतो. या सुट्या, अलक्षित विभागाची इच्छा एकच होती ती म्हणजे भारतमातेशी एकरूप होऊन जाणे, म्हणून जेव्हा भारत स्वतंत्र झाला तेव्हा आम्ही गुलामीत होतो. पण स्वातंत्र्याच्या उत्सवात मनाने सहभागी होतो. आणि जेव्हा आम्ही गुलामीतून मोकळे झालो तेव्हा तर आनंदाला उधाण आले होते. पण त्या दिवसाची स्मृती जतन करण्याची इच्छा नव्हती. सर्वांच्या बरोबर आमचाही स्वातंत्र्य दिवस दि. १५ ऑगस्टच राहिला. हैदराबाद शहरातील केशव-मेमोरियल हायस्कूल सोडले तर १७ सप्टेंबरची आठवण आता कुणी काढीत नाही.

आज इतक्या दिवसांनी जेव्हा मी जुन्या स्मृती चाळवून पाहतो तेव्हा काहीसे चमत्कारिक वाटू लागते. त्यावेळच्या ब्रिटिश भारताला स्वातंत्र्यदिन अतिशय दुःखाचा आणि वेदनेचा होता. जड, भारावलेल्या मनाने, मनातले अतीव दुःख दडपून ठेवीत, ओढलेल्या चेहऱ्याने प्रत्येकजण कर्तव्य म्हणून आनंद व्यक्त करीत होता. त्या दिवशी जनतेचे मन उल्हासाने भरलेले नव्हते. देशभर दंगली चालू होत्या. आपली भयाण व्यथा घेऊन लक्षावधी निर्वासितांचे तांडे येत होते. देशाचे तुकडे पडले होते. गांधीजींनी

त्या दिवशी नोआखालीत उपवासच केला. सरदार आणि नेहरूंचे मन मोठे प्रसन्न नसणार. आम्ही अतिशय बेभान आणि आनंदित होतो. त्यावेळी मी वयाने लहानच म्हणजे फक्त पंधरा वर्षांचा होतो. मला फाळणीचे दुःख झाल्याचे आठवत नाही. ठिकठिकाणी हैदराबाद संस्थानभर हा दिवस सत्याग्रहाच्या कार्यक्रमाने गजबजलेला होता. ठिकठिकाणी खाजगी बैठकांतून स्वातंत्र्योत्सव साजरा झाला. त्या दिवशी ज्या खाजगी सभेत मी होतो, तेथे कोण बोलले ते आता आठवत नाही. आमचा स्वातंत्र्य लढा दि. ७ ऑगस्टलाच सुरू झालेला होता. म्हणून कुणीही मोठा नेता नव्हता. सारे अनोळखीच होते. पण तो वक्ता जे बोलला त्याचे सूत्र मात्र आठवते.

तो म्हणाला, "देशाची फाळणी झाली हे फार वाईट झाले. पण फाळणीमुळे हैदराबादचे संरक्षण संपले, मित्रहो! दोन-चार वर्षे चिकाटीने लढा व दम धरा. हैदराबाद संस्थानचा मृत्यू जवळ आलेला आहे."

हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेते कै. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांना मी पुढे विचारले होते की, नेमके फाळणीच्या वेळी तुम्हाला काय वाटले होते? स्वामीजी थंडपणे म्हणाले, त्यावेळी पुष्कळच दुःख झाले होते. पण पिकलेले गळू फुटले म्हणजे थोडे हायसे वाटते, तसेही वाटत होते. फाळणी झाली नसती तर आमच्या गुलामीलाच स्वातंत्र्य समजणे नशिबी आले असते; त्याची मला जास्त चिंता होती.

आम्ही कुणी पाकिस्तानवादी वा फाळणीवादी नव्हतो. उच्चस्वराने अखंड भारताचाच जयजयकार आम्ही करीत होतो. आमच्यापैकी मुलांना पाकिस्तान ही कल्पना नुसती अव्यवहार्य वाटत नसे तर मूर्खपणाची वाटे. आमच्यापैकी कुणी पाकिस्तानची शक्यता किंवा इष्टता सांगितली असती तर, त्याला आम्ही देशद्रोहीच म्हटले असते त्यात शंका नाही. आमचे मुसलमान वर्गमित्र आणि शिक्षक कट्टर पाकिस्तानवादी होते. पण मोठ्यांच्या मनात कुठेतरी भुंगा कुरतडीत होता. भारत अखंड राहीला तर मग आपले काय? फक्त एक शिक्षक याला अपवाद होते. त्यांचे नाव अब्दुल वाहब. ते खादीधारी होते. सारी मुसलमान मुले त्यांचा द्वेष करीत. आमच्या मनात त्यांच्याविषयी भक्तियुक्त आदर होता. ते म्हणाले, भारत अखंडच राहिला पाहिजे. त्यातच मुसलमानांचे हित आहे. आणि अखंड भारतात हैदराबादने सामील झाले पाहिजे. त्यात हैदराबादचे हित आहे. वाहबसाहेब मोठे विद्वान नव्हते. किंवा राजकारणाचे तत्त्वचिंतक नव्हते. ते त्यावेळच्या राष्ट्रीय मुसलमानांप्रमाणे

जमीयत उल उलेमाची भूमिका सांगत होते.

जून १९४७ उजाडला आणि आम्ही स्टेट कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी स्वयंसेवक म्हणून मैदानावर दाखल झालो. देशाची फाळणी होणार हे भवितव्य सर्वांच्या समोर होते. अधिवेशनाच्या आधी काही दिवस निजामाने आपण स्वतंत्र राहणार असे जाहीर केले होते. सारेच वातावरण समोर लढा दिसत असल्यामुळे उत्तेजित झाले होते. तरुणांच्यासमोर बोलताना बाबासाहेब परांजपे म्हणाले, "देह साडेतीन हाताचा असतो हे काही दिवस विसरा. त्यातले तीनच हात गृहीत धरा. कारण मरणाला सामोरे जावयाचे आहे." प्रत्यक्ष अधिवेशन दि. ११ जूनला सुरू झाले. तेव्हा फाळणीची योजना जाहीर झाली होती. पण अधिवेशनातील लढाऊ भाषणात मला कुठे फाळणीचे दुःख ऐकल्याचे स्मरत नाही. फाळणीच्या आम्ही सारेच विरोधी होतो. पण प्रत्यक्षात फाळणी झाली तेव्हा आम्हाला स्वातंत्र्याची आशा निर्माण झाली. अशक्य गोष्ट शक्य गृहीत धरून बोलायचे तर, मी असे म्हणेन की, भारत स्वतंत्र होताना जर अखंड राहिला तरीही आम्ही स्वातंत्र्योत्सव साजरा केला असता, पण जड मनाने. फाळणीच्या दुःखाने आजही शोक करणाऱ्यांना हे कळत नाही की, अखंड भारतात आम्ही गुलाम राहिलो असतो. महाराष्ट्र कधी अस्तित्वात आला नसता. भारत कधी बलवान झाला नसता.

पूज्य स्वामीजी म्हणत, हा लढा दुहेरी होता, निजाम, हैदराबादमधील मुस्लिम प्रजा, इत्तेहादुल मुसलमीन, रझाकार आणि सारे शासन हे लढा दडपीत नव्हते. ते आपल्या जुनाट अस्तित्वाच्या रक्षणासाठी लढत होते व नैराश्याने पिसाटपणे वागत होते. रझाकारांचे अत्याचार हा नैराश्याचा उद्रेक होता. त्यांचा लढा हा एक वेडा लढा होता. (द वेअर मॅड इनसेन यू नो) आणि स्वतःविषयी ते म्हणत, जनता शौर्याने लढत होती आणि माझा लढा 'भित्रा' म्हणत असे. त्याला स्वतःच्या मरणाची भीती नव्हती. रोज माणसे मरत होती. मधून मधून कार्यकर्तेही हौतात्म्य पत्करीत, त्याची क्षिती नव्हती. स्वामीजींना लढ्याच्या अपमृत्यूची भीती वाटे. दूरदर्शीपणाने निजामाने तडजोड केली तर प्रजेची गुलामी अमर झाली असती. भीती निजाम शुद्धीवर येण्याची होती. तडजोडीची तयारी हे आमचे मरण होते. त्याला मी भीत होतो, असे स्वामीजी म्हणत. स्वामीजी म्हणाले सतत तडजोडीचे प्रयत्न चालू होते. निजामाने भारतात विलीन होण्यास मान्यता द्यावी ह्या मोबदल्यात अनेक सवलतींची आश्वासने दिली जात

होती. मॉक्टनपासून नवाब अलीयावर जंग ह्यांच्यापर्यंत अनेजकण समजावणी करीत होते. पुरेसे संरक्षण मागून जर निजामाने भारतात विलीन व्हायचे ठरविले असते तर काय झाले असते? थँक गॉड, ही वॉज मॅड इनफ!

गेली कैक वर्षे मी हैदराबादच्या वागणुकीची संगती लावण्याचा प्रयत्न करीत आहे. पण मला ती सापडत नाही. राजकीय नेते एका धोरणाने वागतात. त्यांना कधी यश येते, कधी अपयश येते. पण त्यांच्या वर्तनामागे संगती असते. जीना असे का वागले येथपासून याह्याखानांनी आततायीपणा का केला याची संगती आपण सांगू शकतो. 'सरप्राईज' कराचीवर न होता जर विशाखापट्टनम्‌वर झाले असते, अगर तीन डिसेंबरच्या 'प्रिएम्टीव्ह स्ट्राईक'ला यश आले असते तर आंतरराष्ट्रीय शीतयुद्धाच्या विळख्यात बंगाल सापडला असता हे उघड आहे. याह्याखानाची व्यूहरचना चुकली, अंदाज चुकले म्हणू पण त्या वागण्यामागे संगती होती. निजाम व त्यांचे सहकारी यांच्या वागण्यामागची संगतीच सापडू शकत नाही. स्वामीजी त्याला वेडेपणा म्हणत मलाही दुसरे नाव सुचत नाही.

इ. स. १९४५ नंतर सर्वांनाच हे कळून चुकले होते की, ब्रिटिश साम्राज्य मोठ्या वेगाने संपत आहे. आणि स्वातंत्र्य जवळ येत आहे. सर्व तणावांचा विषय भारत अखंड राहणार की, फाळणी होऊन पाकिस्तान अस्तित्वात येणार हा होता. दि. १ मार्च १९४७ च्या कॉंग्रेसच्या शिफारशींचा अर्थ जनसामान्यांच्या कदाचित ध्यानात आला नसेल, पण मुत्सद्द्यांना तो कळलेला होता. या वातावरणात जर निजामाला हैदराबाद संस्थान हे स्वतंत्र, सार्वभौम राष्ट्र करावेसे वाटले तर त्यात नवल नाही. त्रावणकोर, भोपाळ, इंदूर इतकेच काय, पण औंधसारख्या अति लहान संस्थानिकांच्याही मनात स्वातंत्र्याचा विचार जेथे क्षणभर चमकून गेला तिथे निजामाची भूमिका समर्थनीय नसली तरी स्वाभाविक होती. दीड कोटीपेक्षा अधिक लोकसंख्या असणारा प्रदेश एका अनियंत्रित सलतनीत ठेवणे व त्यांचे राष्ट्र बनविणे अशक्य वाटण्याचे निजामाला कारण नव्हते. किंबहुना 'उस्मानीस्तान' कल्पनेचा पुकारा १९३४ सालापासून त्या भूमिकेतूनच होत होता. म्हणून दि. ३ जूनच्या घोषणेचे मला आश्चर्य वाटत नाही. या घोषणेद्वारे निजामाने अधिकृतरीत्या आपण स्वतंत्र राहणार आहो हे घोषित केले.

हैदराबादचा प्रश्न दि. १५ ऑगस्टपूर्वी मिटावा अशी कुणाची कितीही इच्छा असली तरी तो मिटणार नव्हता. हेही सर्वांनी गृहीतच धरलेले होते. दि. १५ ऑगस्ट

हा असा दिवस उजाडला की त्या दिवशी इंग्रजी साम्राज्य संपले. भारत व पाकिस्तान ही स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली. संस्थानिकांचे इंग्लंडच्या सम्राटाशी असणारे जुने करार संपले. यावेळी जुनागढने आपण पाकिस्तानात जाणार असे घोषित केले. काश्मीरचाही जैसे थे करार पाकिस्तानशी झाला होता. एकटे हैदराबाद मात्र स्वतंत्र होते. तत्त्वतः त्या दिवशी निजाम स्वतंत्र व सार्वभौम होते. हीच परिस्थिती वाटाघाटीचा घोळ घालून नुसती लांबवीत नेली तर हैदराबादचे स्वातंत्र्य केवळ वहिवाटीने स्थापन झाले असते, हे घडविण्याचा सगळा खटाटोप होता. दि. २६ ऑगस्ट १९४७ ला सरदार पटेल म्हणाले हैदराबादेत जनतेचे सार्वमत घ्यावे. जनतेचा निर्णय आम्ही मान्य करू. निजामांनी ही कल्पना फेटाळून लावली. पण स्वामीजीसारख्यांना क्षणभर साशंकता वाटणेही रास्त होते. रझाकारांच्या अत्याचारांनी लोक भयभीत असताना आणि ९० टक्के प्रशासन मुस्लिम असताना सार्वमताचा जुव्वा निजाम खेळले असते तर? बेजबाबदार, विलासी, अत्याचारी राजांना भक्तिभावाने लाखो मते देणारी जनता ज्या देशात आजही आहे, तिथे भारतीय सैन्याच्या ताब्याविना सार्वमत याला अर्थ नसतो. पुढच्या काळात पोर्तुगिजांनी पडद्याआडच्या हालचालीत गोव्याबाबत सार्वमताचा तोडगा सुचविला होता. पण अल्जेरियाच्या अनुभवाने नेहरू सावध झाले होते. त्यांनी ही सूचना फेटाळून लावली असे म्हणतात. सरदारांनीही आपली सूचना फेटाळली जाणार ही खात्री असल्यामुळेच केलेली असावी.

ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात भारत सरकार व हैदराबादच्या वाटाघाटी सुरू झाल्या. दीर्घकाळ चाललेल्या या वाटाघाटींचा मसुदा ऑक्टोबरअखेर मान्य झाला. सर्व संस्थानिकांशी झालेल्या करारात भारतात सामील होण्याची तयारी दर्शवून मग करार झाले होते. हैदराबादच्या बाबतीत अपवाद करण्यात आला होता. भारतात सामील होण्याचे मान्य न करता, आपल्या स्वातंत्र्याच्या भूमिकेशी तडजोड न करता केवळ जैसे थे परिस्थिती ठेवावी असा हा करार होता. परिस्थितीतील तणाव कमी करावा व स्थायी योजनेचा मधल्या काळात विचार व्हावा हीही करारात तरतूद होती. म्हणजे मसुद्यावर स्वाक्षरी करण्यातसुद्धा निजामाने टाळाटाळ केली. करारावर दि. २५ ऑक्टोबरला सह्या व्हाव्यात असे ठरले असतानासुद्धा निजामाने दिनांक पुढे ढकलला. या कृत्याचीही संगती लागू शकते. कारण पाकिस्तानने तसा सल्ला दिला होता. निजामाने असे वागणे म्हणजे शुद्ध फसवणूक होती. पण त्याला संगती होती. भारताने

काश्मिरात फौजा पाठविताच निजामाने हा करार मंत्रिमंडळाला मान्य नसल्याचे कळविले. यानंतर वाटाघाटींचे दुसरे पर्व सुरू झाले. वाटाघाटी अंतिमतः फसल्या तर आपण पाकिस्तानशी वाटाघाटी करू अशी धमकीही याच काळात दिली गेली. वाटाघाटीस. पुन्हा आरंभ झाला व जैसे थे करारावर दि. २९ नोव्हेंबर १९४७ ला स्वाक्षऱ्या झाल्या.

पाकिस्तान काश्मिरात विजयी होऊ शकत नाही. मंदगतीने का होईना पण पाक सैन्याची पिछेहाटच चालू आहे. पाकिस्तानची सेना भारतीय सेनेला तडाखा हाणू शकत नाही ही खात्री एव्हाना निजामाला पटली होती. कोणत्याही संस्थानाबाबत आपण जनतेची इच्छा प्रमाण मानू. त्या इच्छेला डावलून केलेली कृती आपण मान्य करणार नाही हे वेळोवेळी भारताने सांगितले होते. हे सांगणे म्हणजे केवळ भाषण नव्हते. जुनागढने हा इशारा डावलून पाकिस्तानात जायचे ठरविले. दि. १३ सप्टेंबर १९४७ ला जुनागढचे पाकिस्तानात सामीलीकरण पाकिस्तानने मान्य केले. जुनागढ प्रकरण युनोकडे न्यावे, असा माऊंटबॅटन यांचा सल्ला होता. तो नेहरू-सरदारांनी फेटाळला आणि फौजा पाठवून दि. ९ नोव्हेंबरला जुनागढचा ताबा घेतला. या घटनेमुळे हैदराबादला एक गोष्ट स्पष्ट झाली होती, जर हैदराबादने स्वतंत्र राहण्याचे ठरविलेच अगर पाकिस्तानात जायचे ठरविले तर भारताच्या सेना संस्थानात घुसतील, आणि त्यावेळी पाकिस्तान अगर ब्रिटन साह्य करू शकणार नाही. निजामाची तिसरी आशा भारतीय मुसलमान ही होती. जर वेळ आली तर ते बंड करतील ही शक्यता वरील दोन घटनांच्यामुळे मावळली होती. हा सारा सारासार विचार करूनच निजामाने जैसे थे करारावर स्वाक्षरी केली होती.

जी धडपड त्रावणकोर, भोपाळने करून पाहिली ती हैदराबादने अधिक नेटाने केली. दीर्घकाळ केली इतकेच ह्या वेळपर्यंतच्या घटनांच्यावरून सांगता येईल. नसलेले स्वातंत्र्य निर्माण करण्याचा हा एक फोल प्रयत्न होता असे आपण म्हणू. पण या जगण्याला संगती होती. जैसे थे कराराने दोघांनाही उसंत मिळाली होती. मिळालेली उसंत स्वतःला बलवान करण्यासाठी वापरावी ही दोघांचीही इच्छा होती. डिसेंबर अखेर काश्मीर प्रश्नावर नेहरू युनोत गेले. आणि त्या जागतिक संघटनेच्या व्यासपीठावर चर्चासत्राचा आरंभ झाला. हिवाळा संपताच मार्च १९४८ मध्ये पुन्हा लढाईला तोंड लागले. यावेळी पाकिस्तानचा प्रतिकार अधिक तीव्र जोरदार होता. पण पाकिस्तानची शक्ती कितीही वापरली तरी त्याचा परिणाम भारताची आगेकूच मंद करण्यात होतो.

भारताचा पराभव करता येत नाही हे पुन्हा सिद्ध झाले. जैसे थे करारानंतरच्या काळात पाकिस्तानने हैदराबादला स्पष्टपणे हे कळविले होते की, जर भारताने सेनाबलाचा वापर केला तर, पाकिस्तान भारताचा तीव्र निषेध करील पण सैनिकी साह्यता करू शकणार नाही. पाकिस्तानचे म्हणणे असे होते की, आम्ही जास्तीत जास्त काय करू शकतो? फार तर पाकिस्तान भारताशी युद्ध सुरू करील. ते काश्मीर प्रश्नावर चालूच आहे. पण त्यामुळे हैदराबादचा बचाव होणे शक्य नाही. म्हणून हैदराबादने स्वतःचा विचार स्वतः करणे बरे. हा प्रश्न युनोत न्यावयाचा असेल तर आम्ही संपूर्ण साह्य करू.

ब्रिटनने मॉक्टन व माऊंट बॅटन यांच्या द्वारा तीन बाबी स्पष्ट केल्या होत्या. प्रथम म्हणजे ब्रिटन हैदराबादसाठी हस्तक्षेप करणार नाही, सैनिकी साह्यता सोडाच, पण शस्त्रसाह्यही देणार नाही, जगातील बडी राष्ट्रे याबाबत मध्ये पडणार नाहीत. कारण ब्रिटन भारताला राष्ट्रकुलाबाहेर जाण्यास भाग पाडणार नाही. ब्रिटनकडे असलेले हैदराबादचे पैसेसुद्धा भारत सरकारच्या संमतीविना हैदराबादला वापरता येणार नाहीत. दुसरी बाब म्हणजे ब्रिटन हैदराबादच्या प्रश्नावर तटस्थ राहील. युनोत पाठिंबा देणार नाही. तिसरी सर्वांत महत्त्वाची बाब म्हणजे भारतासमोर चार-दोन आठवडेही टिकणे हैदराबादला शक्य नाही. आणि भारत सरकार शेवटी सैनिकी कारवाई करील हे नक्की समजावे. याच बाबी मेहदी नवाब जंग, मंजूर यारजंग, अलि यावर जंग निजामाला आतून समजावीत होते. असेही म्हणतात की भोपाळच्या नवाबांनी आपला दूत पाठवून निजामाला हा सल्ला दिलेला होता की, भारताकडून मिळणाऱ्या सवलती तात्काळ स्वीकारा, नाहीतर भविष्य वाईट आहे. तरीही हैदराबाद भारतात सामील होण्यास तयार नव्हते. कासीम रजवी तर रोज मुंबई-मद्रास जिंकून, दिल्लीवर आसफजाही ध्वज फडकविण्याची भाषा बोलत होता. मधून मधून एक कोटी वीस लक्ष हिंदूंची कत्तल करून टाकण्याची भाषाही बोलत होता. कशाच्या जोरावर ही सारी मगरुरी चालली होती; कुणाचा आधार होता, हेच कळत नाही.

एप्रिल १९४८ मध्ये माऊंट बॅटन यांना परतण्याचे वेध लागलेले होते, हैदराबाद प्रश्न अर्धवट ठेवून जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. त्यांनी एक शेवटची योजना तयार केली. त्या योजनेप्रमाणे निजामाने भारतात सामील व्हावे. त्यांना अंतर्गत कारभारात पूर्ण स्वायत्तता असावी. क्रमाक्रमाने व टप्प्या-टप्प्याने हैदराबाद राज्यात लोकशाही राजवट यावी असे ठरत आहे. नेहरू-पटेलांनी मोठ्या कष्टाने या योजनेला संमती दिली होती. तुरुंगात स्वामीजींच्या कानावर तपशिलाने ही योजना घालण्यात

आली होती. पुढे स्वामीजी मला म्हणाले, या योजनेला कष्टाने संमती देताना आपण स्वातंत्र्याचे प्रेतही थडग्यात पुरून टाकत आहो असे मला वाटत होते. पण माझा निरुपाय होता. आपण जूनमध्ये परतत आहो त्यापूर्वी हैदराबाद प्रश्न जर संपला नाही तर आपल्या मागे भारतीय फौजाच तो प्रश्न सोडवतील. १९४८ सालचा काश्मीरातील ऑक्टोवर सहलीचा काळ येण्यापूर्वी भारतीय सैन्य हैदराबादचा प्रश्न संपवील. त्यानंतर काहीच शिल्लक राहणार नाही. म्हणून मी जाण्यापूर्वी संधी करा असे परोपरीने माऊंटबॅटन सांगत होते. पण निजामाला ते पटले नाही. दि. २१ जून १९४८ ला माऊंटबॅटन परतले आणि वाटाघाटीही बंद झाल्या. हैदराबादभोवती भारतीय फौजा क्रमाने जमत होत्या, ही गंभीर परिस्थिती पाहून निजामाने पुन्हा वाटाघाटीची इच्छा दर्शविली. माऊंटबॅटन योजनेचा विचार करण्यास आपण तयार आहो हेही सुचविले. पण भारतीय प्रतिसाद त्याला मिळाला नाही. माऊंटबॅटन योजनेतील काही तत्त्वे आपण बदलण्यास तयार आहो असेही निजामाने सांगितले. पण त्याला प्रतिसाद मिळाला नाही. चोरटी शस्त्रे आणण्याचे सिडने कॉटनचे प्रयत्न, हैदराबाद प्रश्न युनोकडे नेण्याचा मोईन नवाज जंगाचा प्रयत्न हे खरे म्हणजे मुस्लिम जनतेचे धैर्य टिकविण्याचे प्रयत्न होते.

दि. १३ सप्टेंबरला पोलिस ॲक्शन सुरू झाली. दि. १७ सप्टेंबरला हैदराबादचा पाडाव झाला. मनोधैर्य इतके खचलेले होते की, भारतीय सैन्याला प्रतिकार असा फारसा झालाच नाही. लष्कराने लढणे टाळले. रझाकारही कुठे लढले नाहीत. सेनेला अडविण्यासाठी पूल उडविले नाहीत. शिस्तीत माघारसुद्धा घेतली नाही. वाट फुटेल तिथे लोक पळाले. फौजा समोर येताच शरण आले. आततायी हेकटपणा म्हणावा तर चिवट प्रतिकार नाही. निदान काही काळ तर लपून घातपात करावे, तेही नाही. इतके जर मन कच्चे होते, सामर्थ्य दुबळे होते, तर वेळीच तडतोड करावी हेही नाही. अशी निजामाची व हैदराबादी नेत्यांची वागणूक राहिली. ह्या वागणुकीची संगतीच लागत नाही.

तरीही या वेड्या आणि भेकड नेत्यांचे आम्ही ऋणी आहो. ते थोडे जरी समंजसपणे वागते तर आम्ही गुलामच राहिलो असतो. कायम गुलाम कुणीच राहात नाही हे खरे! पण तीन दशकांची गुलामी तरी तोंड दाबून सहन करणे भाग पडले असते. दुबळ्यांची उर्मट भाषा व अहंता आम्हाला आधार झाली हेच खरे.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : 'महाराष्ट्र टाइम्स' दि. १५-८-१९७२)

## १०.
# शेवटचा निझाम

हैदराबाद संस्थानचे शेवटचे राजे व अधिपती मीर उस्मान अलीखाँ हे त्या संस्थानचे सातवे राजे होते. निझाम उस्मान अली श्रीमंती आणि चिक्कूपणा ह्यासाठी सर्वत्र अतिशय प्रसिद्ध आहेत. संस्थानाचे वार्षिक उत्पन्न २५ कोटी रुपये होते. पण त्याखेरीज उस्मान अलीचे खाजगी उत्पन्न निराळे असे दीड कोटी रुपयांचे असे. निझामची खाजगी इस्टेटही दोन अब्ज रुपयांच्या आसपास असे. जगातील अत्यंत श्रीमंत माणूस असा त्यांचा उल्लेख होई. उस्मानअली नानाविध मार्गांनी पैसा सावडीत, एकत्र करीत. पण स्वतः अतिशय साधे राहात. कमालीचा कद्रूपणा ह्यासाठी ते प्रसिद्ध होते. आख्यायिकांनी एखाद्याचे व्यक्तिमत्त्व असे काही झाकोळून जाते की त्यामुळे सत्याकडे डोळेझाक होऊ लागते.

उस्मानअलीकडे कद्रू व श्रीमंत, लहरी व अफूबाज संस्थानिक म्हणून पाहणे धोक्याचे आहे. अत्यंत महत्त्वाकांक्षी, दूरदृष्टीचा, चतुर व पाताळयंत्री मुत्सद्दी म्हणूनच त्यांच्याकडे पाहिले पाहिजे. निझाम हा जनतेचा शत्रू हे जरी मान्य केले आणि त्याचा विजय हा दीड कोटी प्रजेच्या कायम गुलामीचा ताम्रपट झाला असता हे जरी मान्य केले तरी प्रतिस्पर्ध्यांची कुवत व त्यांचा दर्जा आपण विसरू नये. चिवटपणा, सावधपणा, धूर्तता ह्याबावत उस्मान अली सर्वांना पुरून उरणारे गृहस्थ होते. शस्त्रसामर्थ्यात त्यांचा निभाव लागला नाही म्हणूनच ते पराभूत झाले.

निझाम उस्मान अली हा मूलतः महत्त्वाकांक्षी माणूस. पहिला निझाम मीर कमरुद्दीन (हा आसफजहा अव्वल म्हणून ओळखला जातो) ज्याप्रमाणे महत्त्वाकांक्षी

व सावध तोच प्रकार ह्या सातव्या वारसाचा आहे. मुळात निझाम हे मोगल सम्राटांच्या वतीने दक्षिणेचे सुभेदार, पण मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाचा फायदा घेऊन त्यांनी स्वतंत्र राज्य निर्माण केले. मराठ्यांच्या सामर्थ्यासमोर टिकाव लागेना म्हणून इंग्रजांशी सख्य जोडून हे राज्य त्यांनी टिकविले, उस्मान अली ह्याच मार्गाने जात होते. भारत स्वतंत्र होत आहे ह्या प्रसंगी केन्द्रसत्तेत जे शैथिल्य व विस्कळीतपणा येईल त्याचा लाभ घ्यावा आणि पुन्हा एकदा स्वतंत्र राज्य (राष्ट्र) निर्माण करावे हा उस्मान अलीचा प्रयत्न होता. हैदराबादचे स्वतंत्र राष्ट्रात रूपांतर ही उस्मान अलीची प्रबळ व चिवट महत्त्वाकांक्षा होती.

इ. स. १९११ मध्ये उस्मान अली गादीवर आले. (जन्म १८८५ इ. स.) त्यावेळी अजून भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्नही नव्हता. पण उस्मान अलीच्या डोक्यात मात्र हैदराबादच्या स्वातंत्र्याचा प्रश्न घोळत होता. गादीवर येऊन आपले आसन स्थिर झाले आहे ह्याची खात्री पटताच निझामाने स्वातंत्र्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. हे त्याचे प्रयत्न तीन भिन्न दिशांनी सुरू झाले. ह्या दिशांचा विचार आपण करू लागलो म्हणजे निजाम हे किती दूरचा विचार करीत होते यावर प्रकाश पडतो. शंभर वर्षांपूर्वी वऱ्हाड इंग्रजांना कर्जफेडीसाठी दिलेला होता. वऱ्हाडवर ताबा इंग्रजांचा असला तरी तत्त्वतः तो निझामचा भाग आहे, हे इंग्रजांनी मान्य केलेले होते. निझामाचे म्हणणे असे की कर्ज परत घ्यावे व वऱ्हाड परत करावा. एका बाजूने हा प्रदेश वाढविण्याचा प्रयत्न होता, दुसऱ्या बाजूने आपण इंग्रजांचे मांडलिक नसून त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने करार करणारे आहोत हे दाखविण्याचाही प्रयत्न होता. निजामाने पद्धतशीरपणे प्रयत्न करून आपल्याला हैदराबाद संस्थानात घालण्यात यावे अशी मागणी करणारा व त्यासाठी चळवळ करणारा एक प्रभावी हिंदू नेत्याचा गट वऱ्हाडात अस्तित्वात आणला होता. ह्या धर्मपिसाट जातीय राजेशाही पंखाखाली आम्हाला जाऊ द्या. अशी मागणी करणारा, हिंदूंचा गट अस्तित्वात आणणारा निजाम चतुर व दूरदृष्टीचा नाही असे कोण म्हणेल?

निजामाचा दुसरा दावा असा की, निजाम आणि इंग्रज यांच्यात जे करार-मदार झाले ते सर्व दोन सार्वभौम शक्तींतील करार आहेत. निझामाचे इंग्रजांशी नाते बरोबरीच्या मित्राचे असायला हवे म्हणून त्याला हिज मॅजेस्टी ही उपाधी वापरता आली पाहिजे व अंतर्गत कारभारात पूर्णपणे स्वातंत्र्य असले पाहिजे त्या दृष्टीने व्हाइसरॉयशी

निजामाचा पत्रव्यवहार झालेला आहे. (इ.स. १९२६) ह्या स्वातंत्र्याच्या आकांक्षेमुळेच निझाम चेंबर ऑफ प्रिन्सेसचे सभासद कधी झाले नाहीत. (इ.स. १९३८).

निजामाला ह्या गोष्टींची जाणीव होती की स्वतंत्र राष्ट्र सिद्ध करणे ही सोपी गोष्ट नसून अवघड बाब आहे. त्यासाठी नानाविध प्रकारची पूर्वतयारी करावी लागेल. निझामाने ह्या दृष्टीने नाणेव्यवस्थेपासून आरंभ केला. हैदराबाद संस्थानने स्वतःची नाणी पाडली. नोटा छापल्या. त्यांना भारतीय नाण्यांशी विनिमय दर ठरविला. स्वतःच्या बँका निर्माण केल्या. हैदराबाद बँकेचा पौंडाशी विनिमय दर ठराविक असे. बँक ऑफ लंडनमध्ये ह्या बँकेच्या व्यवहारात पत होती. एका स्वतंत्र राष्ट्राप्रमाणे निझामाने अर्थव्यवस्था आखलेली होती. त्याने स्वतःचे विद्यापीठ निर्माण केले. (इ. स. १९१८) भारतात देशी भाषेतून मेडिकल, इंजिनियरिंग सायन्सचे उच्च शिक्षण देणारे हे एकमेव विद्यापीठ होते. हैदराबादच्या स्वतःच्या पदव्या, नोकऱ्या होत्या. भारतातील I.C.S. प्रमाणे हैदराबाद सिव्हिल सर्व्हिस होती. छोटेसे स्वतःचे लष्कर होते. पगाराचे मानही बरे होते. संस्थानची स्वतःची स्वतंत्र रेल्वे, पोस्ट व तारयंत्रणा होती आणि स्वतंत्र विमान व्यवस्थेचा विचार चालू होता.

स्वतंत्र राष्ट्र होण्यासाठी निझामाने अजून तीन प्रकारची तयारी केली होती. एकतर त्याने औद्योगिक विकासाच्या दृष्टीने कारखानदारीला आरंभ केला. अनेक धरणे बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला. त्यात निजामसागर धरण हे मोठे धरण होते. साखर कारखाने काढण्याचा उपक्रम केला. कापड गिरण्या काढल्या. कोळशाच्या खाणी सिद्ध केल्या. इतरही औद्योगीकरणाचा अव्याहत प्रयत्न चालू होता. स्वतंत्र राष्ट्राला औद्योगिक समृद्धी आवश्यक आहे ह्याची उस्मान अलींना जाणीव होती. त्यांनी सीनियर केंब्रिज माध्यमाची एक शाळा चालवून केंब्रिज इंग्रजी बोलणाऱ्या मुत्सद्द्यांची एक पिढी जन्माला घातली. जागतिक व्यासपीठावर मुत्सद्देगिरी कौशल्याने पार पाडू शकणाऱ्या ह्या पिढीतूनच नबाब अलीयावर जंग यांचा उदय झाला. ह्यासह जगभर सहानुभूती असणारे वर्तुळ निर्माण केले. हैदराबाद एक स्वतंत्र राष्ट्र व्हावे या कल्पनेला अरब राष्ट्रे, इराण व पाकिस्तानमध्ये पाठिंबा असला तर नवल नाही, पण इंग्लंड, अमेरिका, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, इटली, पोर्तुगाल येथेही निजामाला फार मोठा पाठिंबा होता. हैदराबाद संस्थानात लहानमोठ्या हिंदू वतनदार जागीरदारांचा असा एक मोठा वर्ग तर निझामाच्या पाठीशी होताच, पण दलित समाजही त्याने आपल्या

बाजूने घेतला होता.

आधुनिक जगात खऱ्या अर्थाने एका माणसाचे राज्य नसते. त्या राज्याला मनापासून पाठिंबा देणारा एक गट हवा असतो. असा गट कायम करण्यासाठी निझामाने इत्तेहादुल मुसलमीन ह्या संघटनेची स्थापना करून घेतली. (इ.स.१९२६) निजामाला हैदराबाद संस्थानात मुस्लिम लीग नको होती. ब्रिटिश इंडिया हे वेगळे राष्ट्र, हैदराबाद हे वेगळे राष्ट्र. तेव्हा या पृथक राष्ट्राला पृथक संघटना हवी ही तर निझामाची दृष्टी होतीच, पण त्याला स्वतःला जीनाचे नेतृत्व स्वीकारणारा अनुयायी व्हायचे नव्हते. त्याला स्वतःच्या इशाऱ्यावर नाचणारी संघटना हवी होती. सोळा लक्ष मुसलमानांना हे आपले राज्य आहे, त्याचे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्रात रूपांतर करणे व हे राष्ट्र जतन करणे आपले कर्तव्य आहे असे स्वप्न निझामाने दिले व ह्या संघटनेमार्फत त्याने सुमारे दीड लक्षाची अनधिकृत फौजही रझाकार या नावाने तयार केली.

वर जागोजागी इसवी सन दिलेले आहेत. त्यांचा काळजीपूर्वक विचार केला तर हे दिसून येईल की निजामाने स्वतंत्र होण्याची तयारी इ.स. १९४७ च्या आगेमागे केलेली नाही. तो सतत तीस वर्षे स्वातंत्र्याची टप्प्याटप्प्याने तयारी करीत होता. आणि ह्या तयारीसाठी त्याने अक्षरशः कोट्यावधी रुपयांचा खर्च केलेला होता. केवळ कद्रू व कंजूष म्हणून मीर उस्मान अलीखाँचा विचार करणे बरोबर नाही. निजामाच्या डोक्यात मध्ययुगीन स्वप्ने होती. इराणची राजकुमारी दुर्रेशहरवर त्याने आपल्या मुलाला सून म्हणून आणली होती. तुर्कस्तान आणि सौदी अरेबियाच्या राजकुमारिका आपल्या स्नुषा होतील का ह्याचाही प्रयत्न तो करीत होता.

आपण विस्तवाशी खेळत आहो याची त्याला जाणीव होती. त्या दृष्टीने गरजच पडली व परांगदा व्हावे लागले तर उपयोगी पडावे म्हणून जगभर त्याने पैसा पेरलेला होता. इराणमधील तेलाच्या खाणी, दक्षिण अमेरिकेतील खाणी, स्वित्झर्लंड आणि बँक ऑफ लंडनमध्ये ठेवी असा त्याचा भारताबाहेर सुमारे ५० कोटी रुपयांचा व्यवहार होता.

शेवटची गोष्ट ही की निझामाला दम होता. त्याच्या पूर्वजांचाही गुण शौर्य नव्हता. चिवटपणे टिकून राहणे व प्रतिकूल परिस्थितीत तग धरणे हेच निझामाचे घराणे करीत आले. तेच निझाम करीत होता. त्याच्या धूर्तपणाला अर्थ होता. १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत निझाम भारतात सामील झालाच नाही. वाटाघाटी नंतर सुरू

झाल्या. व्यवहारतः सोळा ऑगस्ट हा दिवस असा होता की इंग्रज राज्य संपलेले होते. भारत स्वतंत्र होता. त्यात हैदराबाद नव्हते, म्हणजे हैदराबाद स्वतंत्र राष्ट्रच झाले होते. हैदराबाद भारताशी मैत्री व शांततेने राहू इच्छिते, फक्त भारताने हैदराबादचे स्वातंत्र्य मान्य करावे ही निझामाची मागणी होती.

निझामाने वाटाघाटी लांबवीत पुढे जैसे थे करार केला. पुन्हा वाटाघाटीचे गुऱ्हाळ सुरू झाले. निझामाला वाटाघाटी लांबतील तितक्या हव्या होत्या. हैदराबाद प्रश्न युनोकडे नेण्याची त्याची तयारी होती. हा घोळ जर असाच काही वर्षे लांबत राहिला असता तर वहिवाटीनेच हैदराबादचे स्वातंत्र्य सिद्ध झाले असते. ह्याचा आरंभ म्हणून युनोत हा प्रश्न नेण्यात निझामाने यशही मिळविले होते.

हैदराबादचा प्रश्न हा भारताच्या प्रादेशिक अखंडत्वाचाच प्रश्न होता. हैदराबाद जर भारतात विलीन झाले नसते. तर एकात्म भारतही शक्य नव्हता. भाषावार प्रांतरचनाही शक्य नव्हती, भारतीय संविधानच आहे तसे दिसले नसते. हैदराबाद प्रश्न संपल्यावरच संविधानाची चर्चा खरोखरी सुरू झाली. तोवर आराखडाच चालू होता. निझाम हा जनतेच्या स्वातंत्र्याचाही शत्रू होता. भारतीय राष्ट्रवादाचाही शत्रू होता. हिंदू तर त्यांच्या राज्यात गुलाम होतेच, पण मुसलमानही दरिद्री व अशिक्षितच होते. लोककल्याण हा निझामाचा हेतू नव्हता. म्हणून निझाम संपला, निझामी राज्य संपले, भारताच्या नकाशावरसुद्धा हैदराबाद उरले नाही. याचे दुःख मानण्याचे कारण नाही. उलट हैदराबाद संपल्याचा आम्हाला अतोनात आनंद आहे, पण जो शत्रू संपला त्याचे सत्यरूपही आपण समजून घेतले पाहिजे. श्रीमंत पण कद्रू असे हास्यास्पद विदूषकाचे रूप नव्हे, ते पाताळयंत्री धूर्त असुराचे रूप आहे.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : 'रुद्रवाणी' जानेवारी १९७७)

## ११.
# एजंट जनरल

कन्हैय्यालाल माणिकलाल मुनशी ही भारतीय राजकारणातील एक चतुरस्त्र, कर्तबगार आणि बुद्धिमान व्यक्ती होती. त्यांना प्राचीन भारताविषयी, भारतीय परंपरांच्याविषयी अतिशय प्रेम व अभिमान होता. संस्कृत आणि संस्कृतीचे ते नुसते चाहतेच नव्हते तर त्या क्षेत्रात जिद्दीने काम करणारे कार्यकर्तेही होते. गुजराथचे श्रेष्ठ साहित्यिक म्हणून जशी त्यांची कीर्ती होती तशीच इतिहासाचे अभ्यासक म्हणूनही त्यांची प्रसिद्धी होती. भारतीय विद्याभुवन आणि ह्या संस्थेने प्रकाशित केलेला भारताचा विस्तृत चौरस इतिहास ही मुनशी ह्यांनी केलेली भारताची फार मोठी सेवा आहे असे मी मानतो. कुशल कायदेपंडित म्हणून ते देशभर ओळखले जात होते. काँग्रेसच्या उच्च वर्तुळात त्यांच्या गुणाची चाह असणारे नेते होते. काँग्रेसच्या आत आणि बाहेर त्यांचा मित्रपरिवार मोठा होता. काँग्रेसकडे असून कडवे हिंदुत्ववादी, हिंदुत्ववादी असून राजकारणात मवाळ व उजवे असे त्यांचे संमिश्र व्यक्तिमत्त्व होते.

त्यांच्या योग्यतेनुसार स्वतंत्र भारताची सेवा करण्याची संधी त्यांना मिळाली नाही. तशी मिळणेही शक्य नव्हते. एक तर मुनशींच्या मनाचा एक कप्पा अतिशय क्षुद्र होता. त्यांच्या दर्जाच्या माणसाला शोभणार नाही अशा प्रकारची तुच्छता त्यांना गुजराथखेरीज इतर प्रांतांच्याविषयी वाटे. आणि ही तुच्छता मनात ठेवून ते भारतीय हिंदूंचे नेते बनू पाहात. दुसरे म्हणजे त्यांचा स्वभाव प्रबल महत्त्वाकांक्षी आणि आत्मकेंद्री होता. त्याला मर्यादेचे भान नसे. स्वतःच्या शक्तीबाबतच्या गैरसमजामुळे त्यांना व्यक्तीवर अगर कार्यावर निष्ठा ठेवणे जड जाई. परिणामी इतरांनाही त्यांच्यावर

विश्वास टाकणे कठीणच असे. ओळख सर्वांची. त्यांच्या कर्तृत्वाविषयी सर्वांना आदर पण त्यांना कुणी जीवलग नाही व त्यांचे कुणी जीवलग नाही असा प्रकार घडे. ज्या व्यक्तीचा व माझा साक्षात परिचय कधीच नव्हता, फक्त दुरून पाहण्यापलीकडे ज्यांची माझी ओळख नव्हती, त्यांच्या व्यक्तित्वाविषयी यापेक्षा खोलात जाऊन चर्चा करणे बरे नव्हे.

मुनशी हे मूळचे टिळकानुयायी. मुंबईतील लोकमान्यांच्या चाहत्यांनी काँग्रेसबाहेर पडून जीनांच्या नेतृत्वाखाली होमरूल लीग स्थापन केली होती तिचे हे कार्यकर्ते, त्याही वेळी एक तरुण कायदेपंडित म्हणून त्यांचा लौकिक होताच. गांधीयुगात ते काँग्रेसमध्ये आले आणि लवकरच काँग्रेसच्या वरिष्ठ वर्तुळात त्यांच्याविषयी आदर निर्माण झाला. स. का. पाटलांच्याप्रमाणे ते मुंबई काँग्रेसशी कधी एकजीव झाले नाहीत. मोरारजी देसाईंप्रमाणे गुजराथशी एकजीव झाले नाहीत. तरी १९३० सालच्या काँग्रेस मंत्रिमंडळात ते मुंबईचे गृहमंत्री होते. उत्तम प्रशासक, चाणाक्ष मुत्सद्दी आणि जातीय दंगलींना तोंड देण्यास कठोर निश्चयी अशी त्यांची ख्याती झाल्यामुळे त्यांचा सर्वत्र दबदबा होता. हे सारे यश त्यांनी एका निर्णयाने गमावले. १९४२ च्या चळवळीत त्यांनी काँग्रेसचा त्याग केला, काँग्रेस वनवासातून बाहेर पडल्यानंतर १९४५ साली मुंबईत जे मंत्रिमंडळ बनले त्यात त्यांना जागा मिळू शकली नाही. त्यांचे कायदेपांडित्य लक्षात घेऊन त्यांना घटनासमितीवर (व संसदेवर) घेण्यात आले. संविधानाच्या चर्चा करीत बसणे हे क्षेत्र मुनशींना फार अपुरे होते. ते नव्या कर्तृत्वाला कुठे संधी मिळते ह्याची वाट पाहात होते.

हंगामी मंत्रिमंडळात आणि पुढे स्वतंत्र भारताच्या मंत्रिमंडळात मुनशींना जागा मिळालीच नाही. काका गाडगीळ मंत्री झाले. स. का. पाटलांचे वजन वाढले. मोरारजी गृहमंत्री झाले आणि आपण तसेच राहिलो ही खंत त्यांना थोडी नव्हती, अनेक संस्थानिकांचे ते सल्लागार असल्यामुळे गुजराथेतील एखाद्या संस्थान मंडळात त्यांना जागा मिळायला हवी होती, पण तिथे ढेवरभाईंची वर्णी लागली. ज्युनियर मंडळी सत्तेवर आली तरी मुनशी मोकळेच होते. या वाट पाहण्याला शेवटी जैसे थे करारामुळे यश आले. ह्या कारणाने त्यांचा हैदराबादशी संबंध आला. ५ जानेवारी १९४८ ला मुनशी एजंट जनरल म्हणून हैदराबादला दाखल झाले.

हैदराबाद संस्थान ही भारत सरकारची कायमची डोकेदुखी होती. भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी सर्व संस्थानिकांनी भारतात सामील होण्याचा शेवटचा दिवस १५

ऑगस्ट ठरलेला होता. ह्या दिवशी जुनागढ पाकिस्तानला सामील होणार हे घोषित झाले होते. काश्मीरचा जैसे थे करार पाकिस्तानशी झाला होता. उरलेली संस्थाने भौगोलिक स्थानाप्रमाणे भारतात अगर पाकिस्तानात सामील झाली होती. फक्त भारतातील सर्वांत मोठे संस्थान हैदराबाद हे मात्र कुठेच संलग्न झाले नव्हते. संस्थानाधिपती निजाम स्वतःला स्वतंत्र सार्वभौम समजत होते. ह्याबाबत त्यांचा आग्रह होता. १५ ऑगस्ट आला आणि गेला, निजामाला त्याची पर्वा नव्हती. ७ ऑगस्ट १९४७ पासून स्टेट काँग्रेसचे भारत सामिलीकरणासाठी प्रचंड आंदोलन सुरू झाले होते पण निजामाला या लढ्याचा विचार करण्याची गरज नव्हती. कारण या प्रश्नावर बोलण्याचा हिंदूंना काही हक्क आहे असे निजामाला वाटत नसे.

पुन्हा ऑगस्टअखेर वाटाघाटीचा घोळ सुरू झाला. या वाटाघाटींचा शेवट २९ नोव्हेंबर १९४७ ला भारत आणि हैदराबाद ह्यांच्यात जैसे थे करार होण्यात झाला. माऊंटबॅटन ह्यांचा असा प्रयत्न होता की, तात्पुरता असा करार व्हावा. ज्याचे स्वरूप इतके संदिग्ध व मोघम असावे की भारताच्या दृष्टीने ते व्यवहारतः सामिलीकरण वाटावे. हैदराबादला व्यवहारतः आपले स्वातंत्र्य मान्य झाले असे वाटावे व तात्पुरता समेट व्हावा. म्हणजे प्रश्नाचा अंतिम निर्णय भारताला अनुकूल लागण्याचा मार्ग मोकळा होईल. भारताने संयमाने वागावे असा जरी माऊंटबॅटनचा प्रयत्न असला तरी हैदराबाद भारतात सामील झाले पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. या भूमिकेला त्यावेळचे इंग्लंडचे पंतप्रधान ॲटली यांचा पाठिंबा होता. यासाठी सर्व प्रकारच्या सवलती देण्याची परिसीमा गाठण्याचा त्यांचा प्रयत्न होता. नाखुशीने सरदार व नेहरू एक एक सवलत मान्य करीत होते.

हैदराबादचा लढा सुरू होण्यापूर्वी म्हणजे जुलै १९४७ मध्ये स्वामी रामानंद तीर्थ गांधीजी, सरदार आणि नेहरूंना भेटून आले होते. हैदराबाद भारतात सामील झालेच पाहिजे, कोणत्याही परिस्थितीत हैदराबादला स्वतंत्र राहू दिले जाणार नाही, यावर सर्वांचे म्हणजे गांधी-नेहरू-सरदारांचे एकमत होते. फक्त गांधीजी आणि नेहरूंना असे वाटे की, प्रबल आंदोलनाचा दाब, परिस्थितीचे दडपण, सुरक्षिततेची खात्रीपूर्वक हमी याचा संयुक्त परिणाम होऊन शेवटी हा प्रश्न संपेल. निजाम भारतात येईल. सरदारांना असे वाटे की हा प्रश्न शक्तीच्या प्रदर्शनाविना सुटणार नाही. ज्यावेळी शक्य होईल तेव्हा हा प्रश्न सोडविला जाईल, तोवर आंदोलन चालू राहिले पाहिजे.

स्वामीजींनी सर्वांना निर्णायक लढ्याचे आश्वासन जनतेच्या वतीने देऊन टाकले होते. हा लढा जैसे थे कराराच्या वेळीही चालूच होता. सुमारे वीस हजार सत्याग्रही तुरुगांत होते. जैसे थे करार होताच स्वामीजी व काही कार्यकर्ते यांची सुटका झाली इतकेच.

ह्या पार्श्वभूमीवर कन्हैय्यालाल मुनशी यांना एजंट जनरल म्हणून हैदराबादला जाण्याची सूचना सरदारांनी केली. मुनशींनी आपल्या 'The End of An Era' या पुस्तकात हा दिवस २० डिसेंबर १९४७ असल्याचे नोंदविले आहे. स्वामीजी तुरुंगातून सुटताच मद्रासला व तेथून दिल्लीला गेले. जुलै ४७ च्या मानाने डिसेंबर ४७ चे वातावरण पूर्णपणे बदललेले होते. फाळणीमुळे ज्या प्रचंड दंगली आगेमागे उसळलेल्या होत्या त्या संपत आल्या होत्या. मध्यवर्ती सरकार स्थिरावलेले होते. केंद्रीय नेत्यांचा आत्मविश्वास वाढलेला होता. जे टाळण्याचा नेहरूंनी सतत प्रयत्न केला ते टळणे शक्य नव्हते हे नेहरूंना आता पटलेले होते. फाळणी झाल्यानंतर पाकिस्तान हे शेजारी राष्ट्र म्हणून क्रमाने शांततेने नांदण्यास आरंभ करील. स्वतःच्या जनतेच्या जीवनाचे प्रश्न त्यांच्या समोरही आहेत. हे प्रश्न पाकिस्तानच्या द्वेषाधिष्ठित राजकारणाला विधायक वळण लावतील अशी अंधूक आशा नेहरूंना होती, ती संपली होती. ऑक्टोबर अखेर काश्मिरात फौजा पाठवाव्या लागल्या होत्या. काश्मीरचा अनुभव आनंदाने हुरळण्याजोगा नसला तरी मनोधैर्य वाढविणारा आणि आश्वासक होता. जुनागढ फौजा पाठवून ताब्यात घेतलेच होते. म्हणून गरजच पडली तर हैदराबादचेही भवितव्य तेच होईल असा विचार करण्याच्या मनःस्थितीत केंद्रीय नेते होते.

गांधीजी, नेहरू व सरदार या तिघांनाही स्वामीजी भेटले, तिघांशीही तपशिलाने बोलले. जैसे थे कराराकडे लक्ष न देता हैदराबाद पूर्णपणे विलीन होईपावेतो लढा नेटाने चालवावा यावर तिघांचेही एकमत होते. स्वामीजींच्यासाठी तर हा निर्णायक लढा होता, ज्यात तडजोड शक्य नव्हती. हैदराबादचा लढा पूर्णपणे अहिंसक कधी नव्हताच. कोणताही कायदा न पाळणारे शासन आणि अत्याचाराचा क्रम सतत अभिमानाने चालविणारा पिसाट मुस्लिम आक्रमक जातीयवाद ह्याविरुद्ध लढणे भागच होते, जिथे सत्याग्रह करण्यासाठी जाणाऱ्या लोकांच्यावर सत्याग्रह करण्यापूर्वीच, केवळ चिखलातून दोन मैल कुणी जावे असा विचार करून पोलिस एकाएकी गोळीबार करीत तिथे केवळ कायदयाच्या कक्षेत कसे राहता येणार? (ही घटना डोरले, तालुका हदगाव, जिल्हा नांदेडची आहे.) बरे सत्याग्रही जेलमध्ये सुरक्षित राहतील ह्याचीही हमी नव्हती.

निजामाबाद जेलच्या सत्याग्रहींच्यावर जेलमध्ये घुसून हल्ला करण्यात आला होता. त्यामुळे आरंभापासूनच दुहेरी तयारी करणे भाग होते.

काँग्रेसचे कार्यकर्ते हिंसेचा वापर करीत ह्याबाबत सरदार काही विचारण्याचा संभव नव्हता. तुम्ही हिंसेचा वापर करता आहा काय हे विचारले की स्वामीजी होकार देणार. मग सरदारांनी काय करावे? तुम्ही योग्य करीत आहा हे तोंडाने बोलण्याची इच्छा नाही. हे वागणे चूक आहे, ताबडतोब हिंसाचार थांबवा असे सांगण्याची तर मुळीच इच्छा नाही. त्यामुळे सरदारांच्या बरोबर चर्चेत हा प्रश्न निघालाच नाही. मुनशींनी आपल्या पुस्तकात असे लिहिले आहे की, स्वामीजींनी सरदारांना अहिंसेचे आश्वासन दिले होते (पृष्ठ १८८). ही उघड चुकीची माहिती आहे. स्वामीजींच्या आत्मवृत्तात त्याचा स्पष्ट शब्दात इन्कार आहे. बेचाळीसच्या चळवळीतील हिंसेबाबत भारतीय काँग्रेस जशी नामानिराळी राहू इच्छीत होती, तसा हैदराबादचा प्रकार नव्हता. हैदराबाद स्टेट काँग्रेसने सशस्त्र प्रतिकाराचा कार्यक्रम जाहीर पुरस्कारिलेला होता. त्यावेळचे मध्यप्रांताचे गृहमंत्री द्वारकाप्रसाद मिश्र, कर्नाटक काँग्रेसचे नेते निजलिंगप्पा, आंध्रमधील टी. प्रकाशम् यांनी गरजेनुसार शस्त्रसाहाय्य दिले होते.

सरदारांनी डिसेंबर १९४७ च्या बोलण्यात सरळच तीन बाबी स्वामीजींना स्पष्टपणे सांगितलेल्या होत्या. पहिली म्हणजे चळवळ नेटाने चालू राहिली पाहिजे. दुसरी म्हणजे स्वामीजींनी शांतपणे जेलमध्ये थांबावे. हैदराबाद शासनाशी कोणतीही चर्चा, तडजोड करू नये. आम्ही काय चर्चा करतो आहो याचा विचार करू नये. शक्य तितक्या लवकर हैदराबादमध्ये परत जाणे व अटक करून घेणे हे त्यांचे कर्तव्य आहे. तिसरी बाब म्हणजे हैदराबादचा प्रश्न माऊंट बॅटन इंग्लंडला परतल्यानंतर पहिली संधी साधून सोडविला जाईल. प्रश्न सोडविण्याची जबाबदारी माझी. म्हणजे सरदारांची. सरदार नुकतेच जुनागढला भेट देऊन आले होते व जुनागढला जाहीर सभेत स्पष्टपणे ते म्हणाले होते की, योग्य प्रकारे न वागल्यास हैदराबादचे भवितव्य जुनागढप्रमाणे होईल.

नेहरूंनीही हिंसेचा प्रश्न उपस्थित केला नाही. त्यांच्या बोलण्यात सरदारांचेच मुद्दे निराळ्या भाषेत होते. एक मुद्दा थोडा गंमतीदार होता. नेहरू म्हणाले, भारतीय मुसलमानांनी काश्मीर व जुनागढ संघर्षाच्या वेळी आपल्या देशभक्तीचा बराच उचित (फेअरली डिझायरेबल) पुरावा दिला. ज्या दिवशी मुस्लिम समाज उदासीनपणे देशभक्त

होण्याचा प्रयत्न करतो (पॅसीव्हली पॅट्रिऑटिक) त्यावेळी नव्या आशा दिसू लागतात. शतकांच्या विषाचा प्रभाव कमी होण्यासाठी योग्य वेळ येईतो वाट पाहणे आपले कर्तव्य आहे. स्वामीजी सांगत, पंडितजींच्या जरतारी भाषेचा आम्ही साधासुधा अर्थ केला. तो अर्थ असा की, हैदराबाद प्रश्न भारताने कसाही सोडविला तरी भारतीय मुसलमान फक्त उदासीन राहतील, अंतर्गत उठाव होणार नाही असे त्यांचे मत आहे. संपूर्ण विलिनीकरण आणि क्रमाक्रमाने लोकशाही किंवा संपूर्ण जबाबदार राज्य पद्धती व सामिलीकरणाच्या प्रश्नावर सार्वमत यापेक्षा निराळा पर्याय मी मान्य करणार नाही.

गांधीजींनी मात्र हिंसेचा वापर आंदोलनात होत आहे ह्याबाबत स्वामीजींना खुलासा विचारला होता. स्वामीजी म्हणाले, अत्याचारांचा जमेल त्या मार्गाने प्रतिकार करण्याच्या आज्ञा मी दिलेल्या आहेत. स्पष्टपणे शस्त्राचा वापर जमेल तिथे आम्ही करीत आहो. गांधीजी दीर्घकाळ गप्प राहिले आणि म्हणाले, पळून भारतात येण्याच्या भेकडपणापेक्षा हे शौर्य फार चांगले. मी तुमच्या अडचणी जाणतो. ह्या लढ्याचे स्वरूपच असे आहे. एक मुनशी सोडले तर हैदराबादचा लढा पूर्णपणे अहिंसक असला पाहिजे असा आग्रह कुणाचा नव्हता. मुनशींना कुणी सल्ला विचारणार नव्हते. त्यांनी अनाहूत सल्ला दिला तर कुणी ऐकणार नव्हते.

ज्या वातावरणात मुनशींची एजंट जनरल म्हणून नेमणूक झाली ते इतक्या तपशिलाने सांगण्याचे कारण हे की हैदराबादचा प्रश्न वाटाघाटींनी सुटेल असे गांधी, नेहरू, सरदार कुणालाच वाटत नव्हते. मुनशी हा प्रश्न सोडवतील, सोडवू शकतील, निदान त्यांनी तो प्रयत्न करावा अशी कुणाची अपेक्षाही नव्हती. मुनशींची नेमणूक एक शोभेचा भाग होता. त्यांना कोणतेही अधिकार देण्यात आलेले नव्हते, जनतेच्या मनावर चांगला परिणाम व्हावा. दिसायला बरे दिसावे ह्यापेक्षा या नेमणुकीला फारसा अर्थ नव्हता. स्वतःच्या नेमणुकीचे महत्त्व मुनशी सुचवितात त्याप्रमाणे नव्हते. असण्याचा संभव नव्हता. मुनशी हे मुसलमानांचे नावडते होते हे त्यांचे एक महत्त्व होते. मुनशींनाही काही तरी द्यावे असे सरदारांच्या मनात आले इतकेच.

मुनशींना आपल्या नेमणुकीचे व्यावहारिक महत्त्व नीट माहीत होते म्हणून मुनशींनी सरदारांना हे सांगितले की, आपण संसदेतील जागा न सोडता हे काम पत्करू. सरदारांनी ही अट मान्य केली. राजकारणातील ध्वनी व सूचनांच्या संदर्भात याचा अर्थ हा होतो की हे एक प्रकारचं मंत्रिपातळीवरील काम आहे. हे संपल्यानंतर

मला मध्यवर्ती मंत्रिमंडळात जागा मिळावी. सरदारांनी ही भूमिका मान्य केली. मुनशींना १९४८ अखेर मंत्रिमंडळात स्थान मिळायला हवे होते. प्रत्यक्षात हे स्थान १९५० अखेर मिळाले. यावरून मुनशींचे कार्य सरदारांना किती पसंत पडले, ह्यावर पुरेसा प्रकाश पडतो. पोलिस ॲक्शन झाल्यानंतर काहीं दिवसांनी मुनशी दिल्लीला गेले व त्यांनी सरदारांना विचारले, माझ्यावर मंडळीचा इतका राग का म्हणून? सरदार म्हणाले, काही जण तुम्ही निजाम टिकवला म्हणून रुष्ट आहेत. काही जणांना माझ्यावर टीका करायची असते पण हिंमत होत नाही म्हणून तुमच्यावर टीका करून ते समाधान मानतात.

स्पष्टच सांगायचे तर हा भाग नुसता बनावटच वाटत नाही तर हेतुतः बनावट वाटतो. कारण हैदराबाद संस्थान संपविण्याचे श्रेय स्वतः सरदारांचे आहे. उदारपणे बोलायचे तर नेहरू आणि स्वामीजी व सेना श्रेयात सहभागी आहोत: निजाम टिकविण्याचे श्रेय मेनन-नेहरू-सरदार यांच्या सार्वत्रिक भूमिकेचे आहे. सारेच संस्थानिक टिकविले होते तसा निजाम टिकला, ह्याबाबतची प्रथम चर्चा मेनन व सरदार ह्यांच्यात झाली. त्यांच्या निर्णयाला नेहरूंनी संमती दिली, आणि सरदारांचे प्रतिनिधी समजून टीका झालीच असती तर टंडन, राजेन्द्रबाबू, स.का.पाटील, काका गाडगीळ, द्वारकाप्रसाद मिश्रा, मेनन ह्यांच्यावर झाली असती. मुनशींना सरदारांचे प्रतिनिधी कुणीच मानले नसते. मुनशी हैदराबादचा प्रश्न वाटाघाटींनी सोडविण्यात अपेशी टरले ह्याबाबत कुणीच त्यांना दोष दिला नाही, दोष देणारही नाही. कारण हैदराबादचा प्रश्न चर्चेने सुटणारा नव्हता, हे सारेच जण मानतात. मुनशींना का दोष दिला जातो ते मुनशींना माहीत होते. ते अर्धवट झाकण्याचा विफल प्रयत्न त्यांनी केला आहे इतकेच,

प्रबल महत्त्वाकांक्षा हा मुनशींचा स्वभावच होता. त्या महत्त्वाकांक्षेपोटी कुणाचे किती नुकसान होईल याची मुनशींना भीती नव्हती. हे नुकसान जर व्यक्तीचे झाले तर हरकत नसते. कारण राजकारणाची गती वक्रच असते. पण जर व्यक्तीच्या अस्वाभाविक महत्त्वाकांक्षा जनतेचे दीर्घ नुकसान करू लागल्या तर मग त्या व्यक्तीला क्षमा करणे फार कठीण होते. मुनशींना गांधीजींनी सांगितले होते की मार्च ४८ पर्यंत हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करा. गांधीजींसमोर मार्च का होता हे कुणी सांगितले नाही तरी आपण अनुमान करू शकतो. ऑक्टोबर-नोव्हेंबरात काश्मिरात युद्ध चालू होते ते बर्फाच्या वर्षावामुळे नोव्हेंबरअखेर मंदावले होते. मार्च ४८ ला काश्मिरात नव्या

घनघोर लढाईला तोंड लागणार त्यापूर्वी गांधीजींना हा प्रश्न सुटायला हवा होता. मुनशी मनात एक धोरण ठरवूनच आले होते, ते धोरण म्हणजे थोडी देवाणघेवाण करून वाटाघाटींनी हा प्रश्न मिटवायचा.

जिथे मेननपासून माऊंट बॅटनपर्यंत सारे थकले त्या ठिकाणी जर आपण सफल झालो तर ते यश आपली प्रतिष्ठा किती वाढवील ह्याचा विचार मुनशी करीत होते. मुनर्शींना महत्त्व देण्यास निजाम स्वतः तयार नव्हतेच, त्यांनी ९ जानेवारी १९४८ ला मुनशींना एक औपचारिक भेट दिली आणि ह्याच चर्चेत भारत-हैदराबाद संवंध हा एक प्रश्न टाळून निजामांनी अवांतर चर्चा केल्या आणि निरोप दिला. ह्यानंतर निजाम आणि मुनशींची दुसरी भेट हैदराबाद ज्या दिवशी शरण आले त्या दिवशी म्हणजे १७ सप्टेंबर १९४८ ला दुपारी चार वाजता झाली. मुनशी हे व्यापारी एजंट आहेत यापेक्षा त्यांना जास्त महत्त्व नाही ही हैदराबाद संस्थानची अधिकृत भूमिका होती. तिला अनुसरून शेवटपर्यंत निजामाची वागणूक राहिली. मुनशींचे राजकीय महत्त्व निजामाला कळण्यासाठी भारतीय फौजा हैदराबाद शहराच्या द्वारावर याव्या लागल्या.

भारत आणि हैदराबादमध्ये ज्या वाटाघाटी होत त्या नेहमी दिल्लीलाच होत. भारताच्या वतीने माऊंटबॅटन, मेनन, नेहरू आणि सरदार यांच्यापैकी तीन अगर कधी चौघेही वाटाघाटी करीत. हैदराबादच्या वतीने पंतप्रधान मीर लायक अली, मोईन नवाज जंग आणि सर वॉल्टर मॉक्टन हे सभासद कायम असत. चौथे सभासद पिंगल व्यंकटराम रेड्डी हे एकमेव हिंदू सभासद शोभेसाठी असत.* ते चर्चेत फारसा भाग घेत नसत. ह्या शिष्टंडळाने कधी मुनशींशी वाटाघाटी केल्या नाहीत. त्यांना एखादी योजना दिली नाही, त्यांना योजना मागितली नाही. मुनशी आणि लायक अली अनेकदा भेटत, अनेकदा गप्पागोष्टी होत. भारतात हैदराबादने विलीन व्हावे असा मुनशी आग्रह करीत. लायक अली नकार देत. मुनशींचा गंभीरपणे विचार करण्याची हैदराबाद मंत्रिमंडळाला गरजच नव्हती. कारण माऊंट बॅटनशी त्यांनी वॉल्टर मॉक्टनद्वारा नित्य

---

* त्याशिवाय निझामाच्या घटनाविषयक खात्यातील प्रमुख अधिकारी श्री. अलियावर जंग असत. ते पुढे महाराष्ट्राचे राज्यपाल झाले.

**संपादक**

संपर्क ठेवला होता. सर्व चर्चा प्रामुख्याने मेनन आणि मॉक्टन यांच्यातच होई. राजा आणि मंत्रिमंडळ मुनशींना मोजण्यास तयारच नव्हते. पण मुनशींना तर हा प्रश्न वाटाघाटींनी मिटवून श्रेय मिळवायचे होते. हे घडावे कसे?

पोलिस ॲक्शन झाल्यानंतर वार्ताहारांशी बोलताना स्वामीजी म्हणाले की, हैदराबादेतील जनतेला मुनशींचे वास्तव्य हा फार मोठा आधार होता. उद्याच्या पिढ्या आपला रक्षणकर्ता म्हणून त्यांचे स्मरण करतील. स्वामीजींच्या ह्या मुलाखतीला औपचारिकपणापलीकडे अर्थ नव्हता. मुनशींनी असे सुचविले आहे की, दिल्लीच्या मर्जीतून मी उतरल्यानंतर त्यांचे माझ्याविषयी मत बदलले. मुनशींनी केलेला हा अजून एक विपर्यास. मुनशी आणि स्वामीजी ह्यांचे संबंध आरंभापासूनच बिघडलेले होते. आधीच वैयक्तिक संबंध फारसा नव्हता. स्वामीजींना सरळ आगीत उडी घेणारी माणसे आवडत. त्यांना कायद्याचा कीस काढणे रुचत नसे आणि स्वामी मुत्सद्दी नव्हतेच. प्रामाणिकपणा हा एक छोटासा गुण त्यांच्याजवळ होता. तितक्यावर त्यांचे निभावून गेले.

मुनशींची नेमणूक जाहीर झाल्यानंतर स्वामीजी आणि मुनशी यांची प्रदीर्घ चर्चा मुंबईत झाली. या पहिल्या चर्चेतच दोघांना हे कळून चुकले की, आपले एकमेकांशी जमणार नाही. खरा विवाद्य मुद्दा वाटाघाटींचा होता. भारत सरकारचे म्हणणे हे की, हैदराबादने भारतात पूर्णपणे सामील झाले पाहिजे. हैदराबादचे म्हणणे हे की, आपण स्वतंत्र व सार्वभौम आहो. असे दोन टोकावर दोघे उभे असूनसुद्धा त्यांच्या वाटाघाटी सतत चालू आहेत. आणि सन्माननीय तडजोडीचे प्रयत्नही नेटाने चालले आहेत. असे जर आहे तर स्टेट काँग्रेस आणि हैदराबाद शासन यांनी वाटाघाटी करून तडजोडीचा प्रयत्न का न करावा? असे मुनशींचे म्हणणे होते. वाटाघाटींनी सुटण्याजोगा हा प्रश्न नव्हे. तडजोड करण्यासाठी आम्ही लढत नाही आहो. हा निर्णायक लढा आहे. त्यात तसूचीही तडजोड शक्य नाही. उलट वाटाघाटींमुळे लढा मंदावतो व संपतो. त्यानंतर भारत सरकारला हा प्रश्न सोडविताच येणार नाही. म्हणून वाटाघाटीचा प्रारंभ तर सोडा पण तशा शक्यतेची सूचना देणे सुद्धा भारताचा व हैद्राबाद जनतेचा द्रोह आहे असे स्वामीजींचे म्हणणे होते.

पण मुनशींना वाटाघाटी हव्या होत्या. स्टेट काँग्रेस आणि हैदराबादचे शासन यातील वाटाघाटीचे सूत्रचालक मुनशीच राहणार होते. ही संधी सोडण्याची त्यांची

तयारी नव्हती. स्वामीजींनी हैदराबादेत पुन्हा प्रवेश केला, जानेवारी ४८ अखेर त्यांना अटक झाली. इथपासून पोलिस ॲक्शनपर्यंत ते पुन्हा अटकेतच होते. यापूर्वी स्पष्टपणे त्यांनी मुनशींना आपण वाटाघाटीत रस घेणार नाही हे सांगून टाकले. आत्मवृत्ताच्या पृष्ठ १९६ वर त्याची मुद्दाम नोंद आहे. स्वामीजींच्याविषयी मुनशींच्या मनात आकस निर्माण होण्याचे हे कारण आहे. हा आकस वाढतच गेला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत हा आकस शिगेला पोचला कारण स्वामीजी कडवे महाराष्ट्रवादी व मुंबई महाराष्ट्राची आहे या भूमिकेचे पुरस्कर्ते होते. मुनशींनी आपल्या पुस्तकात जितके खुनशीपणाने लिहिता येईल तितके लिहिले आहे. मुनशींनाही फारसे विरोधी काही लिहिता आलेच नाही, इतके उज्ज्वल चरित्र व चारित्र्य स्वामीजींचे होते हा प्रश्न निराळा.

मुनशींना वाटाघाटीसाठी हस्तक हवे होते. ह्यामुळे लढ्याचा विश्वासघात झाला तर मुनशींना पर्वा नव्हती. भारतीय स्वातंत्र्य मुळातच दुबळे झाले तरी मुनशींना चिंता नव्हती. हे हस्तक मुनशींना मवाळ पक्षात मिळाले. हैदराबाद स्टेट काँग्रेसमध्ये आरंभापासूनच एक मवाळ गट होता. पुढे हैदरावादचे मुख्यमंत्री झालेले बी. रामकृष्णराव, विधानसभेचे सभापती झालेले काशीनाथराव वैद्य, आंध्र पितामह माडपाठी हनुमंतराव इत्यादी मंडळी या मवाळ पक्षाची होती. मवाळ पक्षाच्या पुढाऱ्यांना त्यांच्या मनोवृत्तीप्रमाणे वाटाघाटी हव्या होत्या. तडजोड हवी होती. काँग्रेससारख्या पक्षात असा गट असणारच. पण ह्या गटालाही शिस्त असते. बी. रामकृष्णराव हे अशा शिस्तीचे गृहस्थ होते. हेच वैद्य, माडपाठी इत्यादींच्याविषयी म्हणता येईल. त्यांनी स्वामीजींना विरोध केला. त्यांच्या विरुद्ध निवडणूक लढविली. विषय नियामक समितीत लढ्याच्या ठरावाला कसून विरोध केला. पण संघटनेने बहुमताने लढ्याचा ठराव स्वीकारल्यानंतर खुल्या अधिवेशनास पाठिंबा दिला. ते शांतपणे लढा सुरू झाल्यानंतर तुरुंगात गेले. त्यांनी कधी जाहीर रीतीने काँग्रेसशी संबंध तोडला नाही. कधी लढ्याचा निषेध केला नाही. संघटनेच्या आज्ञेविना ते जाहीर रीतीने वाटाघाटीला आले नाहीत. ह्याला शिस्त असे म्हणतात.

ही माणसे खाजगीत कुरकुरत होती. वाटाघाटी व्हाव्या असे त्यांचे म्हणणे होते. कुणी वाटाघाटीला आरंभ केला तर ह्यांची अनुमती होती. पण जोवर स्वामीजी वाटाघाटीला तयार नाहीत तोवर चर्चेला अर्थ नाही हे ते जाणत होते. ते स्वतः वाटाघाटीला तयार नव्हते. पण एक गृहस्थ जी.रामाचारी म्हणून होते त्यांनी लढ्याशी

द्रोह केला. अजून स्वामीजी तुरुंगात होते. वीस हजार सत्याग्रही तुरुंगात होते. अजून हैदराबादने भारताशी जैसे थे करार केलेला नव्हता. या काळी लायक अली मंत्रिमंडळात हे गृहस्थ मंत्री म्हणून गेले. मंत्री असताही स्वतःला काँग्रेसजन म्हणून घोषित करीत बसले. रामाचारींच्या रूपाने मुनशींना फार मोठा आधार मिळाला. त्यांच्या गौरवार्थ मुनशींनी खूप वाक्ये खर्चिली आहेत.

मुनशींच्या मते जी.रामाचारी हे स्टेट काँग्रेसच्या संस्थापकांच्यापैकी एक होते. ही एक चुकीची माहिती आहे. स्टेट काँग्रेस ज्यांच्या प्रयत्नाने अस्तित्वात आली त्यात अनेक लोक असले तरी हा जमीनदार नव्हता. स्टेट काँग्रेसचे पहिले अध्यक्ष गोविंदराव नानल व चिटणीस स्वामीजी होते. वैद्य, बिंदू, माडपाठी हनुमंतराव, वामन नाईक, केशवराव कोरटकर यांचा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष काँग्रेसच्या स्थापनेशी संबंध होता. तरुण म्हणून त्यात बी.रामकृष्णरावही होते. कारण कोरटकरांनी पुरस्कृत केलेल्या चळवळीत ते असतच. पण रामाचारीप्रमाणे निष्ठाशून्य माणूस राष्ट्रीय चळवळीचे संस्थापक असणे शक्य नव्हते. स्टेट काँग्रेसवर बंदी, हजारो लोक तुरुंगात असताना तू मंत्रिमंडळात कसा, असे रामाचारींना मुनशी विचारणे शक्य नव्हते. वाटाघाटींसाठी पक्षद्रोहाला उत्सुक असणारा हा माणूस मुनशींना फार जवळचा वाटला. मुनशींचे रामाचारीशी जितके सख्य जुळले तितके कोणत्याच मवाळाशी जुळणे शक्य नव्हते. रामाचारीचे म्हणणे असे की, त्यांना लायक अलीने नव्या सुधारणांचे आश्वासन दिले होते. प्रश्न हा आहे की, नव्या सुधारणाचे स्वरूप न पाहता, त्यांचा अधिकृत आरंभ होण्यापूर्वीच लढ्याशी द्रोह करून तुम्ही मंत्रिमंडळात का गेला? आणि लायक अली मंत्रिमंडळालाही पूर्वेतिहास होता. ह्यापूर्वी हैदराबादचा मुख्यमंत्री कधी इत्तेहादुल मुसलमीनचा नेता नव्हता. लायक अलींना पंतप्रधान करून इत्तेहादुल मुसलमीन हा पक्ष अधिकृत राजकर्ता पक्ष म्हणून निजामाने स्वीकारला होता. रामाचारी पक्षातीत मुसलमानाच्या मंत्रिमंडळात जात नव्हते. कासीम रझवीच्या मंत्रिमंडळात जात होते. तरीही भारत सरकारच्या एजन्ट जनरलला जीवलग माणूस हाच होता.

मुनशींनी महिनोगणती रामाचारींना हाताशी धरून कधी गनेरीवाल यांच्याद्वारे तर कधी पन्नालाल पित्तींच्याद्वारे तडजोड घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केला. भारतात संपूर्णपणे बिनशर्त सामील होण्यास जर निजाम तयार झाला तर ते सर्वांनाच हवे होते. पण हे घडण्याची शक्यता नव्हती. इत्तेहादुल मुसलमीन ही संघटना

हैदराबादेतील मुस्लिम समाज ह्या राज्याचा सार्वभौम अधिपती आहे असे मानीत असे. निजाम हे या समाजाचे प्रतिनिधी व प्रतीक म्हणून सार्वभौम समजावयाचे, ह्या संघटनेची निर्मिती, वाढ, तिची वैचारिक भूमिका साऱ्यांच्या मागे निजामाचा हात होता. ही भूमिका प्रमाण मानणारी प्रभावी संघटना, तिचे नेते कासीम रझवी, ह्या संघटनेच्या अधिपत्याखालील मंत्रिमंडळ, महत्त्वाकांक्षी निजाम हे पाहता विलीनीकरण मान्य होणे शक्यच नव्हते. मुनशींच्या वाटाघाटीचा विषय हा नव्हताच.

सरदार आणि नेहरू हे म्हणत की, रझाकार संघटनेवर बंदी घाला. जनतेला जबाबदार मंत्रिमंडळ आणा. या मंत्रिमंडळाशी आम्ही चर्चा करू. जनतेची इच्छा असेल तर आम्ही हैदराबादचे स्वातंत्र्य मान्य करू. एकूण नव्वद टक्के हिंदू प्रजा असणाऱ्या राज्याच्या बाबतीत हे सांगणे म्हणजे हैदराबाद स्वतंत्र उरू दिले जाणार नाही असे वेगळ्या भाषेत सांगणेच होते. हे सूत्र धरून काही तडजोड निघाली तर पाहावे असा विचार करणारा एक प्रभावी मुस्लिम गट हैदराबादमध्ये होता. या गटाचे म्हणणे असे की संरक्षण, परराष्ट्र संबंध, दळणवळणे हैदराबादने भारताच्या आधीन करावे. पण जगभर व्यापारी एजंट ठेवण्याची परवानगी हैदराबादला असावी. भारताने ब्रिटिश कॉमनवेल्थमध्ये राहावे, कॉमनवेल्थमधून भारत बाहेर पडल्यास हैदराबादला भारताबाहेर पडण्याची संधी असावी. भारत-पाक युद्ध झाल्यास हैदराबाद तटस्थ राहील. हैदराबादची प्रादेशिक अखंडता व आर्थिक स्वातंत्र्य जतन करावे. रझाकार संघटना क्रमाक्रमाने संपविण्यात यावी. हैदराबादला स्वतःची २८ हजार फौज ठेवू द्यावी. प्रथम तीन वर्षे पंचवीस टक्के मुसलमान, पंचाहत्तर टक्के हिंदू अशी विधानसभा असावी. पुढचा विचार नंतर करू. या मंत्रिमंडळाने भारताशी वेळोवेळी आपले संबंध ठरवावे, इत्यादी इत्यादी. ही योजना स्वामीजींसमोर ठेवण्यात आली होतीच.

स्वामीजींनी ही योजना पूर्णपणे फेटाळली. हैदराबादचे स्वातंत्र्य वहिवाटीने प्रस्थापित करण्याचा हा एक चतुर डाव होता. कारण पहिली तीन वर्षे संपल्यानंतर पुढची तीन वर्षे कधी अंमलात येण्याचा संभव नव्हता, ह्या क्षणापर्यंत स्वामीजी भारताशी हैदराबादने एकजीव व्हावे असे म्हणत. या क्षणी त्यांनी मनाने भाषावर प्रांतरचना होऊन हैदराबादचे नामधारी अस्तित्वही नष्ट करायचे हा निर्णय घेतला. तो निर्णय यशस्वीपणे काठाला लागताच ते समाधानाने राजकारणनिवृत्त झाले.

मुनशी हा धागा पकडून विचार करीत होते. संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती

आणि पंचवीस टक्के हिंदू यांतील अंतर कमी करून ते तडजोड घडवू इच्छीत होते. भारतात बिनशर्त विलीनीकरण, जगभर व्यापारी किंवा कोणतेही संबंध नाही. रझाकार संघटनेवर ताबडतोब बंदी आणि आरंभालाच हिंदूंना सर्वत्र ५० टक्के प्रतिनिधित्व व पुढे क्रमाक्रमाने संपूर्ण जबाबदार राज्यपद्धती, ह्या सूत्रावर तडजोड करण्यास हैदराबादेतील मवाळगट तयार होता (म्हणजे बी. रामकृष्णराव व काशीनाथराव वैद्य ह्यांचा गट.). हे त्यावेळी हैदराबादभर चर्चिले जाणारे उघड गुपित होते. मवाळ गटाच्या ह्या भूमिकेशी आपण सहमत होऊ शकणार नाही, पण त्यांच्या भूमिकेला अर्थ होता. भारताशी बिनशर्त संपूर्ण सामिलीकरण झाल्यावर आपले हित पाहण्यास भारत सरकार आहे. रझाकार संघटना पूर्णपणे बंद झाली की हिंदू सुरक्षित होतील आणि आरंभालाच पन्नास टक्के मंत्री मिळाले तर हिंदूंना आत्मविश्वासही येईल. उरलेले क्रमाने पाहू हा मवाळ गटाचा हिशोब होता, तो आपण समजू शकतो.

पण हा मवाळगटसुद्धा मुनशींना फार उपयोगी पडणारा नव्हता. रझाकार संघटनेवर पूर्ण बंदी. भारताशी संबंध नव्या विधिसभेने ठरवावे आणि हिंदूंनी चाळीस टक्के जागांवर तूर्त समाधान मानावे अशी जर काही योजना ठरू शकली तर सामिलीकरणाविना तडजोड व तूर्त तरी मुस्लिम वर्चस्व कायम ह्या कारणामुळे मुसलमान नेत्यांना मान्य होईल. हिंदूपैकी कुणी तरी हे मान्य करणारे हवे होते. आरवामदुदु अय्यंगार, पन्नालाल पित्ती, जी. रामाचारी ही मुनशींची आशा होती.

मुनशींनी उद्योग काय केले हे कुणालाच माहीत नाही. मुनशी स्वतः या बाबी सांगत नाहीत. पण शेवटची जी माऊंट बॅटन योजना होती तीत भारत सरकारने जगभरच्या व्यापारी संबंधांना मान्यता दिली होती. चाळीस-साठ हे हिंदु-मुस्लिम प्रमाण स्वीकारण्यास संमती दिली होती. हैदराबाद भारत सामिलीकरणाचा प्रश्न जनमतावर सोपविला होता. हे जनमत कधी घ्यायचे ते नक्की नव्हते. सरदारांनी व नेहरूंनी अतिशय नाखुशीने या योजनेला संमती दिली. मेननना ही योजना मान्य नव्हती. माऊंट बॅटन, वॉल्टर मॉक्टन, कॅम्बेल जॉन्सन, लायक अली, मोईन नवाज जंग ह्यांचा या योजनेत उघड सहभाग होता. पण ही योजना हिंदू स्वीकारतील याची खात्री कुणी कुणाला दिली होती हे गूढ रहस्य आहे. मुनशी एवढेच सांगतात की, त्यांना लायक अलींनी आडवे न येण्याची विनंती केली होती व त्यांनी अडथळा न करण्याचे आश्वासन दिले होते. सर्वांच्या सुदैवाने निजाम व कासीम रझवी यांना हेही मान्य

नव्हते. रझाकार संघटना नष्ट करण्यास ते तयार नव्हते. विलिनीकरणाचा प्रश्न जनतेच्या हाती सोपविण्यास तयार नव्हते. हिंदूंना सत्तेत सहभागी करण्यास तयार नव्हते. निजामाचे माऊंट बॅटन योजनेवरील जे चार आक्षेप, त्यांचा व्यावहारिक अर्थ हा आहे.

येथवर नेहरूंच्या संयमाची मर्यादा संपलेली होती. २६ एप्रिल १९४८ रोजी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, जर जनतेला शांततेची खात्री मिळाली नाही तर केन्द्र सरकार हस्तक्षेप करील. जर हैदराबाद सरकारला शांतता निर्माण करता आली नाही तर इतर उपायांचा विचार करावा लागेल. हे पोलिस ॲक्शनचे सूतोवाच होते. माऊंट बॅटन योजना फेटाळली गेली. जूनअखेर भारत सरकारने वाटाघाटी पूर्णपणे फिसकटल्या, ह्यापुढे वाटाघाटी नाहीत अशी घोषणा केली. हैदराबादच्या सीमेवर फौजा जमू लागल्या. सरदारांनी मुनशींना स्पष्टपणे सांगितले होते की, माऊंट बॅटन योजना संपूर्णपणे संपली असे समजून चालावे. यापुढे कोणतीही चर्चा, प्रश्न सोडविण्यासाठी वाटाघाटी, समजावणी ह्या प्रयत्नात पडू नये. हा प्रश्न भारतीय फौजा सोडविणार हे आता स्पष्ट झाले होते.

मुनशींच्या लिखाणातून ही सूचना मिळते. भारतीय फौजांना संस्थानात येण्याचे आमंत्रण द्यावे व माऊंट बॅटन योजना मान्य करावी ह्यासाठी ते प्रयत्न करीत होते. भारतीय फौजा घुसण्याचे टरल्यानंतर अल्टिमेटम दिल्यानंतरसुद्धा मुनशींचा प्रयत्न हाच होता. मुनशी एक गोष्ट सांगत नाहीत. पोलिस ॲक्शनची खात्री पटल्यानंतर माऊंट बॅटन योजना स्वीकारण्यास तयार होते. त्यांनी नव्या गव्हर्नर जनरलशी संपर्क साधण्याचा सतत प्रयत्न केला. पण भारताकडून याला प्रतिसाद मिळाला नाही. अल्टिमेटमनंतरसुद्धा मुनशी तडजोडीचा प्रयत्न करीत होते. स्थूलपणे माऊंट बॅटन योजनेच्या संदर्भात हा प्रयत्न होता हे विचारात घेतले तर त्या योजनेला हिंदू स्वीकारतील ही हमी कुठून आली ह्यावर काही प्रकाश पडू शकेल.

नव्याने मुनशींना निजामाविषयी प्रेम वाटू लागले होते. निजाम ऑक्टोबरमध्येच जसे थे कराराला अनुकूल झाले होते. पण कासीम रझवींनी हस्तक्षेप केला. निजामाची इच्छा माऊंटबॅटन योजनेप्रमाणे व्यवस्था व्हावी ही होती. तो त्या योजनेवर सही करणार होता. पण रझवीने हस्तक्षेप केला. मिर्झा इस्माईलच्या सल्ल्यानुसार ऑगस्ट १९४८ ला निजाम पुन्हा माऊंट बॅटन योजनेचा विचार करीत होते, पण रझवीने

हस्तक्षेप केला अशा प्रकारचे वर्णन मुनशी सतत करीत असतात, पोलिस ॲक्शन होऊन गेल्यानंतर मुनशींनी निजामाला जो सल्ला दिला त्यात हा एक महत्त्वाचा मुद्दा होता. माझा नाइलाज होता. मी जवळपास रझवीचा कैदी होतो. सारे उद्योग रझवीचे आहेत, असा जप करीत राहावे. निजामाने स्वतःला सोयीस्कर असल्यामुळे पुढे हा जप चालू ठेवला. मुनशींनी निजामाचे हे म्हणणे खरे असल्याचा भास निर्माण केला आहे. सत्य ह्यापेक्षा निराळे आहे. २१ जुलै १९४८ ला मॉक्टन कायमचा निरोप घेऊन परतले. या दिवसापर्यंत निजामाला केव्हाही मॉक्टनद्वारा माऊंट बॅटनला हे कळविता आले असते की, आपणावर गैरवाजवी दडपण आणण्यात येत आहे. आपणाला भारत सरकारचे साहाय्य हवे आहे. आणि भारतीय फौजा खरोखरी निजामाच्या निमंत्रणानुसार, पण दाखविण्यासाठी निजामाच्या इच्छेविरुद्ध आल्या असत्या. त्यांनी रझाकारांचा पाडाव केला असता. नंतर सत्य सर्वांना कळले असते. लायक अली पंतप्रधान झाले त्यावेळी तर भारतीय फौजा अजून राजधानीजवळच होत्या. आणि हैदराबादचे सरसेनापती एल. इद्रुस रझवींचे विरोधक असल्यामुळे केव्हाही हैदराबादच्याच फौजा रझाकारांच्या विरोधी वापरल्या असत्या.

कासीम रझवी हे नेहमीच निजामाच्या हातातील एक प्यादे होते. लायक अली अगर मोईन नवाझ जंग ही माणसे रझवीची अनुयायी नव्हती, ती सूत्रधार होती. हैदराबादच्या राजकारणावरील त्यांची पकड कायम होती. हैदराबादची माणसे सोडा पण कॅम्पबेल जॉन्सनचेही प्रत्यक्ष पाहणीनंतर हेच मत झाले होते.

मुनशींच्या मनात निजामाविषयीच्या प्रेमाचा उदय १६ सप्टेंबरला झालेला दिसतो. १३ सप्टेंबरला भारतीय फौजा अगदी सकाळी हैदराबादमध्ये घुसल्या. तो वेळेपर्यंत मुनशींना निजामाविषयी फक्त तिरस्कार होता. निजामाची अहंता एवढी मोठी की ते मुनशींना राजकीय चर्चेसाठी लायकच समजत नसत. एजंट जनरल म्हणून मुनशी रुजू झाल्यानंतर निजामाने एक औपचारिक भेट त्यांना दिली होती. पण त्याही वेळी राजकीय चर्चा टाळण्यात आली. पुन्हा कधी निजामाने औपचारिक भेट सोडा, पण सार्वजनिक समारंभालाही बोलावले नव्हते. तेव्हा मुनशींना राग असणे स्वाभाविक होते. १३-१४ आणि १५ सप्टेंबरला हैदराबाद नभोवाणी विजयामागून विजयाच्या वार्ता देत होती. हैदराबाद नभोवाणीने प्रथमच १६ सप्टेंबरला दुपारी जनतेला अधिकृतरीत्या सत्य सांगितले. सायंकाळी राजा महबूब करण भेटले. रात्री दीनयार

जंग निजामाच्या वतीने भेटले व त्यांनी सल्ला मागितला.

खरे म्हणजे लष्करी कारवाईला प्रारंभ होताच मुनशींचे काम संपले होते. यापुढे त्यांनी सल्ला देणे हा राजकीय शिष्टाचाराचा भंग होता. पण मुनशी हे पथ्य पाळण्यास तयार नव्हते. पोलीस ॲक्शन सुरू होताच व्ही.पी.मेननची त्यांचा निरोप घेतला व चिंता करू नये हे सांगितले. मुनशींच्या मताप्रमाणे या शेवटच्या निरोपाच्या वेळी मेनन म्हणाले, आपण जे काही कराल त्याला भारत सरकारच्या पाठिंबा राहील. मुनशींचे हे विधान बरोबर दिसत नाही. कारण शत्रूच्या प्रदेशात असणाऱ्या राजदूताला असे सांगण्याची प्रथा नाही. मेनन अशा प्रकारे शब्दात गुंतणारे चिटणीस नव्हते. पण मेननच्या माथ्यावर हा निरोप लादणे मुनशींना सोयिस्कर होते, उलट मेननची व इतरांची पुढची वागणूक मुनशीना दोष देणारी ठरविणारी होती.

मुनशींना आपले चुकले कुठे हे कळत नाही. त्यांचे चुकले कुठे हे आपणाला स्पष्ट कळते. एक तर मुनशींनी निजामाला सल्ला द्यायला नको होता. सल्ला दिलाच तर शरणागतीचा द्यायला हवा होता. मुनशींनी सल्ला दिला युद्धबंदीचा.(Cease Fire) परिणामी निजामाने गव्हर्नर जनरल राजगोपालाचारींना कळविले की, मी माझ्या मंत्रिमंडळाचा राजीनामा स्वीकारला आहे. रझाकार संघटनेवर बंदी घातली आहे. भारतीय सेनेला सिकंदराबाद येथे जाण्यास परवानगी दिली आहे. जर भारत सरकारने हे पत्र स्वीकारले असते तर परिणाम काय झाला असता? निजामाच्या सेनेला शरण येण्याची गरज नाही. निजाम नवे मंत्रिमंडळ बनविणार. ते मंत्रिमंडळ कारभार पाहणार आणि भारत सरकार व निजाम पुन्हा विलिनीकरणाच्या वाटाघाटी करणार. ह्या वाटाघाटीत निजामाचे सल्लागार मुनशी राहणार!! एजंट जनरल स्वतःच्या सरकारशी किती निष्ठावंत होते याचे हे फार नमुनेदार उदाहरण आहे.

मुनशी इतके करूनच थांबले नाहीत. त्यांनी निजामाचे व्याख्यान तयार करून दिले. ह्याही व्याख्यानात निजामाने युद्धबंदी हाच शब्द वापरला. मुनशींच्या सल्ल्याने नवे मंत्रिमंडळ जाहीर केले. मुख्यमंत्री युवराज प्रिन्स ऑफ फरार, एल.इद्रुस, दीनयार जंग आणि इत्तेहादुल मुसलमीनचे माजी अध्यक्ष अबुल हसन सय्यद अली हे चार मुसलमान. जी. रामाचारी व पन्नालाल पित्ती हे दोन हिंदू. असे हे सहा जणांचे मंत्रिमंडळ. त्यात मिर्झा इस्माईल, जैनयारजंग हे दोन मुसलमान आणि अरवामद्दू अय्यंगार हे एक हिंदू असे तीन नंतर येणार. म्हणजे पोलिस ॲक्शन झाले तरी सहा

मुसलमान, तीन हिंदू असे मंत्रिमंडळ. याच इत्तेहादुल मुसलमीनचे तीन मंत्री आणि हिंदूत काँग्रेसचा एक मंत्री जी.रामाचारी. हा सल्ला देणारा मुनशी. यावरून मुनशींचे सख्य कुणाशी होते यावर प्रकाश पडतो.

निजामांनी या व्याख्यानात पुन्हा सांगितले की, शांतता प्रस्थापित झाल्यानंतर भारत सरकारशी समझोता कठीण जाणार नाही. मी भारताशी मैत्रीचा नवा अध्याय आरंभ करीत आहे. मी असफजाही घराण्याच्या उत्कृष्ट परंपरा जतन करीन. स्वतः तयार केलेले हे खोडसाळ व्याख्यान मुनशींनी निजामाकडून वाचवून घेतले. हे सारे काम भारताच्या एजंट जनरलच्या सल्ल्याने होत आहे असा खुलासा केला. नंतर स्वतः व्याख्यान दिले. त्यांच्या स्वतःच्या व्याख्यानातही CEASE FIRE हाच शब्द आहे. मुनशींनी भारतीय फौजांचे वर्णन 'मित्रांच्या फौजा' असे केले. हे वर्णन नेहमी विदेशी फौजांचे करण्याची प्रथा आहे. मुनशी म्हणालेही, निजामाच्या म्हणण्याप्रमाणे हैदराबादच्या जनतेने भारताशी 'संलग्न सुसंगती'ने राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. येथील मूळ शब्द Integrated Harmony पुन्हा हैदराबादचे पृथक अस्तित्व सुचविते.

पंडितजींनी मुनशींना तातडीने निरोप पाठविला, आपण लुडबूड करू नका. हैदराबाद आमच्या सेनेला शरण येईल. आमचा लष्करी प्रशासक कारभार पाहील. आपण सेनेच्या राजधानी प्रवेशाच्या वेळी उपस्थित राहू नये. आमच्या सल्ल्याशिवाय आपण कोणतेही आश्वासन देऊ नये. सरदार व नेहरूंच्या कणखरपणामुळे मुनशींनी केलेला सारा घोळ एका क्षणात संपला. हैदराबादचा पराभव झाल्यानंतर भारतीय सेनेला संस्थान प्रवेशाची परवानगी देणारा निजाम कोण? आणि पराभवानंतर निजामाला कारभार तरी कोण पाहू देणार?

लोक आनंदाने वेडे झाले होते. मुसलमान एकाएकी खचून गेले होते. या वातावरणात सीझ फायरचे सरेंडर कसे झाले इकडे लक्ष देण्यास कुणाला फुरसद नव्हती. मुनशींचे कार्य संपले होते. त्यांनी केलेला विचका कुणाला कळण्यापूर्वी सावरला गेलेला होता. भारताच्या युनोतील वकिलाने निजामाच्या व्याख्यानाचा आधार दिला आणि भारतीय फौजा निजामाच्या परवानगीने राजधानीत गेल्या ह्यावर भर दिला. भारताच्या लष्करी सेनानीने सरळ शरणागती स्वीकारली व कारभार हाती घेतला. विजयी बंदुका हातात असल्या म्हणजे शब्दांचे गुंते चटकन सोडविता येतात.

पण मुनशींचा मोह अजून सुटला नव्हता. पोलिस ॲक्शननंतरच्या काळातही

हैदराबाद स्टेट काँग्रेसमधील जहाल विरुद्ध मवाळ या संघर्षात त्यांनी रस घेऊन पाहिला. पण बी.रामकृष्णराव महत्त्वाकांक्षी लोकांना दूर कसे ठेवावे हे जाणत होते. स्वामीजींच्याविषयी आत्मीयता व आदर आणि राजकारणात त्यांना विरोध हे रामकृष्णरावांचे सूत्र होते. शेवटपर्यंत त्यांनी हा जिव्हाळा टिकवला. सत्तेच्या राजकीय डावपेचात स्वामीजींना फार रस नसल्यामुळे हे सौहार्द कायम टिकणे कठीण नव्हते.

स्वामीजींविषयी मात्र मुनशींच्या मनातला राग केव्हाही गेला नाही. त्यांनी काँग्रेसमधील स्वामीजींचा गट हा छुपा कम्युनिस्टांचा गट आहे असा प्रचार सतत केला. ह्याबाबतची वस्तुस्थिती नोंदवून ह्या प्रकरणाचा निरोप घेतला पाहिजे. कम्युनिस्ट पक्ष हा दीर्घकाळपर्यंत काँग्रेस अंतर्गत पक्ष म्हणूनच होता. अखिल भारतीय काँग्रेसमधून कम्युनिस्ट पक्षाला १९४२ च्या लढ्याशी विश्वासघात केल्यामुळे काढावे लागले. भारतीय काँग्रेसमधून १९४५ साली कम्युनिस्ट बाहेर पडले. कम्युनिस्ट धार्जिणे म्हणून ज्यांची नेहमी नालस्ती केली जाते त्या नेहरूंनी ह्या निष्कासनात पुढाकार घेतला होता.

हैदराबाद स्टेट काँग्रेसही ह्याला समांतरच वागत होती. इ.स.१९३८ साली स्टेट काँग्रेस स्थापन झाली तेव्हा कम्युनिस्ट स्टेट काँग्रेसमध्येच होते. पुढे महाराष्ट्र परिषद, कर्नाटक परिषद, आंध्र महासभा या नावाने काँग्रेस कार्यकर्ते काम करू लागले. तिथेही कम्युनिस्टांचे पहिले भांडण तेलगू प्रदेशात झाले आणि कम्युनिस्टांची आंध्र महासभा व कम्युनिस्टेतरांची आंध्र महासभा इ.स. १९४३ ला निराळी झाली. ह्यानंतर तेलगू प्रदेशात काँग्रेस व कम्युनिस्ट पुन्हा कधी एकत्र आले नाहीत. इ.स. १९४५ मध्ये संस्थानी प्रजा परिषदेचे जे उदेपूर अधिवेशन झाले त्यात काँग्रेसच्या संस्थानी विभागातून कम्युनिस्टांना बाहेर काढावे असा निर्णय झाला. या निर्णयाला अनुसरून महाराष्ट्र परिषद व कर्नाटक महासभेतील कम्युनिस्ट वेगळे झाले. ३ जुलैला इ.स. १९४६ ला स्टेट काँग्रेसवरील बंदी उठली व तिन्ही सभा पुन्हा एकत्र आल्या. काँग्रेसमध्ये विलीन झाल्या त्या सुमाराला काँग्रेसमध्ये एकही कम्युनिस्ट नव्हता.

ऑगस्ट १९४७ ला काँग्रेसचा निजामविरोधी लढा सुरू झाला. त्यावेळी कम्युनिस्ट व काँग्रेस यांत तीव्र मतभेद होते. हे मतभेद इतके तीव्र होते की पुष्कळदा आंध्र प्रदेशात काँग्रेस कार्यकर्त्यांवर रझाकारांच्यासह कम्युनिस्टही हल्ले करीत. कम्युनिस्टांच्या या सर्व उद्योगाचा निषेध काँग्रेसने डिसेंबर १९४७ साली एका स्वतंत्र ठरावाने व

स्पष्ट शब्दांत केलेला आहे. फेब्रुवारी १९४८ नंतर तर कम्युनिस्टांनी हैदराबादच्या स्वातंत्र्याला पाठिंबा दिल्यामुळे ते व काँग्रेस शत्रूच झाले होते. पोलिस ॲक्शननंतर कम्युनिस्ट उठाव दडपून टाकण्यासाठी स्वामीजी व काँग्रेसने सर्वतोपरी साहाय्य केले. तरीही सोयीस्कररीत्या स्वामीजींवर छुपे कम्युनिस्ट असल्याचा शिक्का अनेक जणांनी मारून पाहिला. त्यांत मुनशी हे एक.

स्वामीजींना छुपे कम्युनिस्ट म्हणण्याचे कारण भाई गोविंददास श्रॉफ हे होते. गोविंदभाई नेहमीच मार्क्सवादी म्हणून ओळखले गेले. ते मार्क्सवादी होते व आहेत. त्यांनी नेहमीच मार्क्सवादाचा पुरस्कार केला. पण ते कडवे राष्ट्रवादी असल्यामुळे त्यांचे व कम्युनिस्टांचे कधी जुळले नाही. १९४२ नंतर कधीही ते कम्युनिस्ट पक्षाचे सभासद नव्हते. ह्यापूर्वी तरी रीतसर पक्षाचे सभासद ते होते की नाही कोण जाणे. लोकशाही प्रेम, राष्ट्रवाद, गांधी नेहरूंचे गाढ आकर्षण असणारे गोविंदभाई कधी कम्युनिस्ट होऊही शकणार नाहीत. गोविंदभाई स्टेट काँग्रेसचे सरचिटणीस व हैदराबाद मुक्ती आंदोलनाची जी कृतिसमिती होती तिचेही सरचिटणीस होते.

आता सारेच संपले आहे. हैदराबादच्या आंदोलनातील बहुतेक प्रमुख पात्रे आता काळाच्या पडद्याआड गेली आहेत. तरीही हे सारे एकदा लिहिणे आवश्यक होते. कारण हैदराबादचा जवळून परिचय नसणारा माणूस मुनशींच्या पुस्तकाचा आधार घेतो. त्यामुळे एकदा एजंट जनरल होते तरी कसे हे सांगणे भाग पडते.

❀ ❀ ❀

(प्रथम प्रकाशन : सोबत दिवाळी अंक १९७२)

## १२.

# हैदराबादचे विलिनीकरण - पडद्यामागील काही सत्ये

'राजस' मासिकाचा हैदराबाद अंक काढायचा ज्यावेळी ठरले त्यावेळी मला पाठविलेल्या पत्रात प्रा. परांजपे यांनी एक प्रश्न असा विचारला आहे की, हैदराबादमध्ये जे प्रचंड आंदोलन झाले त्यावर विश्वसनीय अशी फारशी तपशिलवार माहिती एकत्र लिहिलेली, गोळा केलेली आढळत का नाही? या एवढ्या प्रचंड संघर्षावर कितीतरी नाटके, कादंबऱ्या लिहिल्या जायला हव्या होत्या. तशा लिहिल्या का गेलेल्या नाहीत? या प्रश्नाचे नेमके उत्तर देता येणे कठीण आहे. प्रो. ना.सी.फडके यांची 'सितारा मंजील', भाऊसाहेब माडखोलकरांची 'स्वप्नांतरिता', बोकिलांची 'सैन्य चालले पुढे' ए.बी. जोशींची 'रानभूल' अशा काही कादंबऱ्या हैदराबादच्या संघर्षावर लिहिलेल्या आहेत. यांतली एकही कादंबरी संस्थानी राजकारणाच्या अगर संस्थानी जनजीवनाच्या माहितगारांनी लिहिलेली नाही. जे जाणकार आणि माहितगार होते त्यांच्यात कुणी ललित वाङ्मयाचे चांगले लेखक नव्हते. आपल्याकडे एकूणच राजकीय कादंबरी दुबळी आहे. राजकीय घटना काहीशा जुन्या झाल्याच्या नंतर त्या घटनांच्यावर लिहिलेली ऐतिहासिक कादंबरी ही सुद्धा आपल्याकडे फार दुबळी आहे. ललित वाङ्मयाचे नेतृत्व महाराष्ट्राचा जो पुढारलेला भाग करतो तिथे हा प्रश्न विचारण्याजोगा आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनावर चांगल्या कादंबऱ्या अगर नाटके नाहीत. बेचाळीसचे आंदोलन, सातारा जिल्ह्यातील पत्री सरकार यांवरही फारसे वाङ्मय उपलब्ध नाही.

हैदराबादच्या सर्व आंदोलनावर अधिकृत इतिहास म्हणून कुणीतरी लिहायला हवे होते. व्ही.पी.मेनन यांनी संस्थानांच्या विलिनीकरणाचा इतिहास विस्ताराने लिहिलेला

आहे. पण एकतर त्यांच्यासमोर सर्व संस्थाने होती, एकटे हैदराबाद नव्हते आणि दुसरे म्हणजे केंद्र सरकारचे संस्थान खाते आणि हैदराबाद इतक्यापुरतेच ते लिहीत होते. हैदराबादच्या जनतेने चालविलेल्या आंदोलनाविषयी मेनन यांना काही सोयरसुतक नव्हते. हैदराबाद प्रकरणाविषयी कन्हैयालाल मुन्शी यांनीही एक पुस्तक 'End of an Era' म्हणून लिहिलेले आहे. पण त्यात प्रामाणिक वृत्तांत कथनाखेरीज इतरच बाबी जास्त आहेत. कै. नबाब अलियावर ज़ंग बहादूर यांनीही हैदराबादविषयी एक पुस्तक लिहिलेले आहे. पण त्या पुस्तकात पोलिस ॲक्शन होईपावेतो आपली भूमिका काय राहिली या गोष्टीबाबत त्यासंनी मौन पाळलेले आहे. हैदराबादच्या जनतेचे आंदोलन, हैदराबादेतील मुसलमानांची इत्तेहादुल मुसलमीन व तिचे मित्र यांचे राजकारण, हैदराबादेतील शासन आणि भारताचे केंद्रीय शासन या सर्व घटकांचा एकत्रित विचार करणारे साधार व तपशीलवार पुस्तक उपलब्ध नाही, ही गोष्ट खरी आहे. कै.स्वामी रामानंद तीर्थ यांनी आपले आत्मवृत्त लिहिले आहे पण प्रत्येक ठिकाणी संन्याशाने स्वत:विषयी बोलावे काय? आत्मस्तुती करावी काय? याविषयीचा संकोच त्यांना नडत गेला. हैदराबादेत पोलिस ॲक्शन सप्टेंबर १९४८ साली झाले. या घटनेला अजून पुरते वर्षही झाले नव्हते, तर आंदोलनात अग्रभागी असणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक मोठा गट कॉंग्रेसमधून बाहेर पडला. हैदराबादचे आंदोलन हे मोठ्या प्रमाणात सशस्त्र आंदोलन होते. या सशस्त्र आंदोलनाची अधिकृत जबाबदारीही कॉंग्रेस संघटनेने घेतलेली होती. कॉंग्रेसने अधिकृतरीत्या सशस्त्र आंदोलनाची जबाबदारी स्वीकारण्याचा योग फक्त हैदराबादेत आला. जे या मुद्द्यावर बोलू इच्छित होते त्यांना बोलण्यासाठी वातावरण अनुकूल नव्हते. उरलेल्यांना जुन्या आठवणी सांगायच्या नव्हत्या. या लेखात ज्या साठ-चाळिशीच्या तहाचा उल्लेख येणार आहे त्याला मान्यता देणारे रामकृष्णराव पुढे हैदराबादचे मुख्यमंत्री झाले. हैदराबादच्या आंदोलनाला स्वातंत्र्यलढा म्हणून मान्यता अगदी परवा परवा म्हणजे १९७२ साली मिळाली. तोवेळपर्यंत सर्व घटना जुन्या झालेल्या होत्या. आमच्या देशातील अभ्यासकांना हैदराबादच्या आंदोलनाचे महत्त्व कधी मनापासून पटले नाही. म्हणून हैदराबादचा तपशीलवार इतिहास कुठे लिहिलेला आढळत नाही. याबद्दल इतर कुणाला दोषी धरण्यापेक्षा आम्ही आम्हालाच दोषी गृहीत धरणे अधिक चांगले होईल. कारण शेवटी ही जबाबदारी आमची होती, आम्हाला ती नीटपणे पार पाडता आली नाही.

या लेखात इतर प्रश्नांच्याविषयी काही बोलण्याऐवजी हैदराबादच्या राजकारणातील

काही विस्मृत दुव्यांच्याकडे मी लक्ष वेधायचे ठरविले आहे. इत्तेहादुल मुसलमीन ही धर्मपिसाट संघटना, तिचे सशस्त्र स्वयंसेवकाचे रझाकार नावाचे दल आणि या संघटनेचा स्वतःला मुजाहिदे आजम म्हणजे हुतात्म्यांचा सम्राट समजणारा माथेफिरू नेता कासीम रझवी याच्याविषयी आजवर पुष्कळ बोलले गेलेले आहे. त्यामानाने हैदराबादचे राजे उस्मान अलिखाँ बहादूर यांच्याविषयी फारसे बोलले गेलेले नाही. उस्मान अलिखाँ अफूच्या तारेत मस्त असणारे एक लहरी राजे, अतिशय कंजूष आणि अत्यंत श्रीमंत असे गृहस्थ म्हणून प्रसिद्ध आहेत. ते तितकेच धूर्त आणि पाताळयंत्री राजकीय मुत्सद्दी होते व गरजेनुसार वाटेल तेवढा पैसा खर्चण्याची त्यांची तयारी होती, ही गोष्ट कुणी फारशी लक्षात घेत नाही. हैदराबादच्या राजकारणाच्या नाड्या जवळ जवळ अखेरपर्यंत स्वतः निझामाच्याच हातात होत्या. जानेवारी १९४८ च्या नंतर कासीम रझवी याची शक्ती खूप मोठ्या प्रमाणात वाढलेली होती. एखादे पाऊल उचलण्यापूर्वी रझवींशी सल्लामसलत करणे निजामाला आवश्यक झालेले होते. इशाऱ्यावर नाचणाऱ्या बाहुलीपेक्षा कासीम रझवीने कितीतरी महत्त्व मिळविलेले होते. हे सगळे खरे असले तरी मुन्शी सांगतात त्याप्रमाणे शेवटच्या काही महिन्यांत निजाम हा फक्त नामधारी सत्ताप्रमुख आणि कासीम रझवी हे प्रमुख सत्ताकेंद्र अशी वेळ कधी आलेली नव्हती. इत्तेहादुल मुसलमीन ही संघटना जन्माला घालून वाढविणे, रझाकारांचे स्वयंसेवक दल शासनाच्या पाठिंब्यावर उभे करणे हे सर्व उद्योग स्वतः निजामांनी केलेले होते. एखादा नेता जर आपल्याला डोईजड होऊ लागला तर गरज पडेल तर विषप्रयोग करून त्याचा काटा बाजूला कसा करावा हे निजामाला अगदीच अज्ञात नव्हते, मुस्लिम लीगचे पहिले नेते बहादूर यार जंग यांना बाजूला सारणे हे तर निजामाचे कर्तृत्व होतेच पण कासीम रझवीला इत्तेहादुल मुसलमीनचे अध्यक्षही निजामानेच केले होते. हैदराबादेत राजकीय सूत्रचालन करणाऱ्या नेत्यांची दुहेरी फळी निजामानेच उभारली होती.

धर्मांधता वाढविणे, भावनावेगपूर्ण विद्वेषी वक्तृत्व गाजविणे आणि मुसलमानांची संघटना बलवान करणे या उद्योगांसाठी कनिष्ठ बुद्धीचा बेताल आणि बेछूट असा एक माणूस निजामाला हवा होता. सैय्यद कासीम रझवी यांचे स्थान इतकेच होते. लष्कराचे सरसेनापती जनरल एल.इद्रुस हे सैन्याचे अतिशय माहितगार व निष्णात नेते होते. ते पुरेसे फटकळ आणि स्पष्टवक्तेही होते. एल.इद्रुस हे कासीम रझवीला नेहमीच मूर्ख समजत आले. वाटाघाटीत नेहमीच मोईन नवाज जंग आणि अलियावर जंग यांना

प्राधान्य असे. निर्णायक जागी वसलेल्या, सत्तेची सर्व सूत्रे हाती असलेल्या चाणाक्ष मुत्सद्द्यांची एक फळी हैदराबादमध्ये होती. जी कासीम रझवींकडे नेहमीच तुच्छतेने पाहात असे. रझवींच्या खास विश्वासातले म्हणून मानले गेलेले तीन मंत्री यामीन जुबेरी, शैफ महमद आणि लायक अली हे रझवीला बडबड्या आणि मध्यम बुद्धीचा माणूसच समजत. पैकी लायक अली हे पंतप्रधान होते. हिंदू मंडळींत निजाम आ र वा मुद्दू आयंगार व पिंगल व्यंकट रामारेड्डी यांचा सल्ला घेत. तेही रझवीला तुच्छतेने पाहणारे होते. युरोपियनांच्यापैकी निजामाचे खास सल्लागार सर वाल्टर माक्टन यांचेही रझवीविषयी चांगले मत नव्हते. हैदराबादच्या राजकारणात कासीम रझवींचा उदय निजामाच्या हातातले बाहुले म्हणून झाला. हळूहळू रझवीने आपली शक्ती व वजन निर्माण केले आणि पुरेसा वजनदार नेता झाला हे खरे असले तरी निर्णायक सूत्रे नेहमीच निजामाच्या हाती होती. राजा म्हणून नव्हे तर सर्व घटनांचा खरा सूत्रचालक म्हणून हैदराबादेत जे काही घडले त्याची जबाबदारी निजाम मीर उस्मान अली यांच्यावर प्रामुख्याने टाकली पाहिजे. कासीम रझवी हे त्यामानाने गौण पात्र होते.

निजामाच्या कंजूषपणाविषयी आणि त्याच्या धर्मवेडाविषयी अनेक आख्यायिका प्रचलित आहेत. द्रव्यलोभीपणा निजामाजवळ भरपूर होता; पण आवश्यक कामासाठी प्रचंड प्रमाणावर पैसा कसा खर्चावा हेही निजामाला कळत होते. तेव्हा पैसे देऊन माणसे विकत घेण्याच्या कलेत निजाम नुसते निष्णात नव्हते तर काही प्रमाणात उधळपट्टीला मान्यत देणारे होते. हैदराबादचे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र निर्माण करण्याची निजामाची महत्त्वाकाक्षां होती. हे स्वप्न त्यांनी जिना अगर मुस्लिम लीगच्या पाठिंब्यावर पाहिलेले नव्हते. निजामाने अमेरिका, ब्राझील, पोर्तुगाल, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, फ्रान्स या देशांत स्वत:साठी लॉबी तयार केलेली होती. इंग्लंडमध्ये तर या लॉबीत काही काळपर्यंत स्वतः चर्चिलच होते. इंग्लंडच्या पार्लमेन्टमध्ये हैदरावादच्या स्वातंत्र्यावर चर्चिलने समर्थनाची जोरदार भूमिका घेतलेली होती. युनोतसुद्धा हैदराबादचा प्रश्न चर्चेला आला तेव्हा अगदीच नगण्य पाठिंबा हैदराबादला मिळाला नाही. दहाबारा राष्ट्रांनी हैदराबादची बाजू काळजीपूर्वक समजून घेतली पाहिजे असे मत दिले होते. हा सगळा आंतरराष्ट्रीय पाठिंबा प्रचंड पैसा खर्चल्याशिवाय मिळत नसतो. निजामाच्या कंजूषपणाच्या आख्यायिका आपण तारतम्याने समजून घेतल्या पाहिजेत.

भारत स्वतंत्र होण्याची घोषणा मार्च १९४७ साली करण्यात आली. या घोषणेनुसार हिंदुस्थानचे भारत व पाकिस्तान असे दोन भाग पाडले होते व संस्थानिकांना

आपले भवितव्य ठरविण्याची मोकळीक देण्यात आलेली होती. संस्थानिकांनी आपले भौगोलिक स्थान पाहून भारतात विलीन व्हायचे की पाकिस्तानात विलीन व्हायचे याचा निर्णय घ्यावा अशी सूचना करण्यात आली होती. पण कायद्यानुसार भौगोलिक स्थान पाहून निर्णय घेण्याची संस्थानिकांच्यावर जबाबदारी नव्हती. भारतात अगर पाकिस्तानात जायला अगर कुठेही न जाता स्वतंत्र व्हायला संस्थानिक मोकळे होते. ही घोषणा जरी झाली तरी आपल्या बाजूने कोणतीही घोषणा करण्याची घाई निझामाने केली नाही. एप्रिल आणि मे महिन्यात संस्थानिकांच्या बरोबर माऊंट बॅटननी पुष्कळ चर्चा केली. पण चर्चेच्यामध्ये हैदराबादच्या प्रतिनिधींनी भारतात अगर पाकिस्तानात सामील होण्याचा मुद्दा गौण मानला. त्यांचा आग्रहाचा मुद्दा असा होता की, अकोला, बुलढाणा, यवतमाळ आणि अमरावती हे चार जिल्हे निजामाच्या राज्याचा भाग आहेत. ते इंग्रजांच्या ताब्यात असले तरी तिथे अधिसत्ता निजामाची आहे. इंग्रजांनी जाण्यापूर्वी करारानुसार हे चार जिल्हे हैदराबादला परत केले पाहिजेत. प्रत्यक्ष वऱ्हाडामध्ये निजामाने आम्हाला हैदराबाद संस्थानात जाऊ द्या असे म्हणणाऱ्या कार्यकर्त्यांचा एक गट तयार केलेला होता. या गटाला पंजाबराव देशमुख आणि ब्रिजलाल बियाणी यांची प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष अनुमती होती. वऱ्हाडचे सरदार खापर्डे यांनाही वऱ्हाडचे चार जिल्हे निजामाला परत मिळण्याची मागणी न्याय्य वाटत होती. पैसा पेरून गरजेनुसार लॉबी तयार करण्याची निजामाची शक्ती यावरून लक्षात येईल. निजामाने वऱ्हाडचे जिल्हे का मागू नयेत? काश्मीरचा गिलीगीट हा भाग दीर्घकाळ इंग्रजांच्या ताब्यात होता. अधिसत्ता काश्मीर नरेशाची, तावा इंग्रजांचा. ही गिलीगीटची परिस्थिती होती. हा गिलीगीट जर काश्मीरला परत करायला इंग्रज तयार असतील तर मग वऱ्हाड निजामाला परत का करू नये? असा हैदराबादच्या मंडळींचा मुद्दा होता. वऱ्हाड परत करण्याच्या प्रश्नावर वीर वामनराव जोशी, द्वारकाप्रसाद मिश्र आणि रविशंकर शुक्ला यांचा कडवा विरोध होता. केंद्रीय नेते तर हा प्रश्न विचारात घेण्याच्या लायकीचासुद्धा समजत नव्हते. शेवटी माउंट बॅटनने वऱ्हाड निजामाला देता येणार नाही आणि घनघोर युद्धाशिवाय तो मिळणार नाही हे स्पष्टपणे सांगितले.

३ जून १९४७ ला निजामाने अतिशय शांतपणे आपला कुठेच विलीन होण्याचा मनोदय नसून स्वतंत्र राहण्याचा संकल्प आहे याची घोषणा केली. त्याबरोबरच शेजारी मित्रराष्ट्र म्हणून भारताशी अतिशय घनिष्ट आणि मैत्रीचे संबंध जोडण्याची इच्छा प्रदर्शित केली. मला तर कधी कधी असेही वाटते की निजामाने याही वेळी

स्वातंत्र्याची घोषणा केली नसती पण जून १५-१६ ला स्टेट काँग्रेसचे अधिवेशन हैदराबादेत भरत होते. या अधिवेशनात भारतीय संघराज्यात विलीन व्हा अशी मागणी करणारा ठराव येणार हे उघड होते. जनतेने मागणी करावी व नंतर ती आपण फेटाळावी यापेक्षा आपण आधी स्वतंत्र राहण्याची घोषणा करावी म्हणजे स्टेट काँग्रेसचा ठराव राजद्रोहाचा ठरविणे सोपे जाईल असे हैदराबाद शासनाने ठरविले असावे. नाही तर स्वतंत्र राहण्याची घोषणा करण्याची हैदराबादला गरजच नव्हती. कुठेही विलीन न होण्याची घोषणा न करता १५ ऑगस्टपर्यंत केवळ गप्प बसणे हैदराबादला स्वाभाविक होते. जून, जुलै आणि ऑगस्टचे पहिले पंधरा दिवस हैदराबादने कोणत्याही वाटाघाटीत भाग घेतला नाही. मावळणारे इंग्रजी राज्य आणि नव्याने अस्तित्वात येणारे भारत यांच्याकडे दुर्लक्ष करूनच अधिकृतरीत्या हैदराबादचे शासन चालत होते. पडद्याआड निजामाने विलिनीकरणावर सही करावी यासाठी खूप प्रयत्न चालू असतील पण अशा कोणत्याही प्रयत्नांना निजाम अगर त्यावेळचे पंतप्रधान नबाब छगतारी यांच्याकडून प्रतिसाद नव्हता.

शेवटी १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उजाडला. हा असा दिवस आहे ज्या दिवशी भारतावरील इंग्रजांची अधिसत्ता संपलेली होती आणि हैदराबाद कुठेही विलीन झालेले नव्हते. नव्या भारत सरकारशी त्यांचा कोणताही करारमदार नव्हता. तत्त्वतः यादिवशी हैदराबाद स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र होते. फक्त हे स्वातंत्र्य नव्या भारत सरकारने मान्य करणे एवढीच एक बाब बाकी होती. हैदराबाद संस्थानातून भारत सरकारच्या गाड्या जात येत होत्या. या बाबींकडे हैदराबादने तात्पुरते दुर्लक्ष केले आणि ऑगस्ट महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात हैदराबादने असे सूचित केले की, भारताशी मित्रराष्ट्र म्हणून सर्व प्रकारची बोलणी करण्यास हैदराबाद उत्सुक आहे. भारत सरकारने वाटाघाटीस अनुकूल प्रतिसाद दिला. यामुळे नवे भारत सरकार व हैदराबाद यांच्या वाटाघाटी सुरू झाल्या. हैदराबादच्या शिष्टमंडळाचे चिटणीस अलियावर जंग बहादूर हे होते. हिंदुस्थान सरकारला कोणत्या तरी प्रकारे हैदराबदशी संबंध जोडण्याची उत्सुकता होती म्हणून त्यांनी वाटाघाटीला अनुकूल प्रतिसाद दिला पण हैदराबादने वाटाघाटी सुरू का कराव्यात? वाटाघाटीची गरज हैदराबादला का वाटावी? हाही प्रश्न एकदा विचारात घेतला पाहिजे. हैदराबादने वाटाघाटी सुरू करण्याचे कारण भारत सरकारच्या एका विशिष्ट धोरणात आढळते. या भूमिकेबद्दल जवाहरलाल नेहरू अतिशय आग्रही होते. व ब्रिटिश शासनाकडून आपली भूमिका त्यांनी मान्य

नये, नसता आपण पाकिस्तानशी वाटाघाटी करू, हा सगळा सरळ दडपण आणण्याचा प्रकार होता. ऑगस्टमध्ये दडपण आणण्याच्या मनोवृत्तीत नसणारे निजाम ऑक्टोबर अखेर मात्र दडपणाचे डावपेच खेळू लागले. या बदलाचे कारण आपण समजून घेतले पाहिजे. या बदलाची प्रमुख कारणे दोन आहेत. पहिले कारण असे की जुनागडने पाकिस्तानात विलीन होण्याचा निर्णय घेतलेला होता. १२ सप्टेंबर १९४७ ला नेहरूंनी जुनागडचा प्रश्न सार्वमताने सोडविण्याची भूमिका जाहीर केली होती, पण १३ सप्टेंबर रोजी पाकिस्तानने जुनागडचे पाकिस्तानमधील विलिनीकरण मान्य केले. याशिवाय माऊंट बॅटन यांनी जुनागड प्रश्न युनोत न्यावा असा सल्ला दिला. निजामाने यावरून स्वाभाविक गणित मांडले की जर हैदराबादने पाकिस्तानशी वाटाघाटी सुरू केल्या तर हैदराबाद प्रश्न युनोत जाईल आणि हैदराबादच्या स्वातंत्र्याचा प्रश्न जर भारत युनोत नेणार असेल तर त्याला हैदराबादची तयारी होती. भारताने हैदराबाद प्रकरणी युनोत जाणे म्हणजे तो प्रश्न आंतरराष्ट्रीय आहे याला कबुली देणे, हे हैदराबादला हवेच होते. म्हणून हैदराबादची मनोवृत्ती दडपणाच्या राजकारणाकडे वळू लागलेली होती.

दुसरी गोष्ट अशी की पाकिस्तान काश्मिरात हस्तक्षेप करणार याची माहिती हैदराबाद सरकारला २० ऑक्टोबरच्या सुमारास मिळाली, २२ ऑक्टोबरला पाकिस्तानच्या काश्मीर आक्रमणाला आरंभ होतो. या काश्मीर प्रकरणाचा शेवट जर पाकिस्तानच्या ताब्यात काश्मीर जाण्यात झाला तर हैदराबादला अधिक ताठर भूमिका घेता येईल. निदान युद्ध घनघोर चालू राहिले तरी हैदराबादला भारताच्या पासून तातडीचा धोका नाही तेव्हा हा क्षण दडपणाच्या राजकारणास सोयीचा आहे असे हैदराबाद शासनाला वाटलेले दिसते. निजामाच्या दुर्दैवाने त्याचे अंदाज फसले. भारताने काश्मिरात आपले सैन्य रवाना केले, श्रीनगर तर पडले नाहीच पण पाकिस्तानी फौजांची पिछेहाट सुरू झाली. ९ नोव्हेंबर रोजी भारताने फौजा पाठवून जुनागडचा ताबा घेतला. त्यावेळी नेहरूंनी हेही जाहीर केले की, संस्थानिकांचे एकतर्फी निर्णय भारत सरकार मान्य करणार नाही. जुनागडचा प्रश्न ज्या पद्धतीने भारताने सोडविला ते पाहिल्यानंतर हैदराबादला पाकिस्तानशी वाटाघाटी सुरू करण्याची हिंमत झाली नाही. काश्मिरात पाकिस्तानी फौजांची माघार पाहिल्यानंतर हैदराबादला पाकिस्तानचा फारसा उपयोग होणार नाही हेही लक्षात आले म्हणून हैदराबादने भारत सरकारशी पुन्हा वाटाघाटीस सुरुवात केली व करारावर आपण सही करणार नाही असे निजाम म्हणत होते त्या करारावर २९ नोव्हेंबर १९४७ ला निजामाने सही केली.

जैसे थे करार हा जैसे थे नव्हता. त्यात इंग्रजी राजवटीपेक्षा निजामाचे अधिकार वाढलेले होते. हिंदुस्थान सरकारने आपल्या फौजा काढून घेतल्यामुळे निजामाचे राज्य अधिक अनिर्बंध झालेले होते. हा करार झाल्यानंतर हिंदुस्थान सरकार हैदराबाद विरुद्ध लष्करी बळ वापरील हे उघड झालेले होते. किंबहुना जरूर तर भारत लष्कर वापरील हे कळाल्यामुळेच जैसे थे करार झालेला होता. विलिनीकरण सोडा जैसे थे करार होण्यासाठीसुद्धा निजामाला लष्करी बळाची धास्ती वाटायला लागली ही गोष्ट उघड आहे. ही लष्करी बळाची व त्या बळाच्या वापराची भीती निर्माण झाल्यामुळे हैदराबादेत युद्धोन्माद वाढविण्याचे प्रयत्न सुरू झाले. जगातून हैदराबादला लष्करी साहित्य मिळविण्याचे प्रयत्न सुरू झाले. या वातावरणातच कासीम रझवी याचे सामर्थ्य क्रमाने वाढत गेले. केवळ सभेत व्याख्याने देण्यासाठी उभा केलेला नेता क्रमाने खरोखरीची शक्ती होऊ लागला. भारताला न विचारता हैदराबादला शस्त्रास्त्रे देण्यात हॉलंड, फ्रान्स व पोर्तुगाल पुढे आले. पोर्तुगालने लष्करी साहित्य पुरवठ्यासाठी गोवा विमानतळही वापरण्यास संमती दिली. ही शस्त्रास्त्रे एक आंतरराष्ट्रीय चोर सिडने कॉटन हैदराबादेत आणत असे. जैसे थे कराराच्या मागे काश्मीर आणि जुनागढ यांची पार्श्वभूमी आणि जैसे थे करारात हैदराबादच्या स्वातंत्र्याचा विकास या बाबी फारशा प्रसिद्ध नाहीत म्हणून येथे त्याकडे लक्ष वेधण्यात आले आहे.

हैदराबादच्या राजकारणात पोलिटिकल एजंट कन्हैयालाल मुन्शी यांनी जो गोंधळ घातला त्याविषयी मी इतरत्र लिहिलेले आहे म्हणून या ठिकाणी अजून एका न झालेल्या कराराकडे लक्ष वेधायचे ठरविले आहे. यापूर्वी मी याचा उल्लेख केलेला आहेच की हैदराबादच्या शिष्टमंडळाचे नेते जरी इतर कुणी असले तरी या शिष्टमंडळाचे चिटणीस नबाब अलियावर जंग बहादूर हे असत. नबाबसाहेब हे पुढेही भारताच्या राजकीय पेचावर महत्त्वाचे पुरुष राहिले. आणि महाराष्ट्राचे राज्यपाल म्हणून वारले. नबाब अलियावर जंग बहादूर हे शियापंथीय मुसलमान आणि निजामाच्या अत्यंत विश्वासाला पात्र असलेले अतिशय चतुर मुत्सद्दी गृहस्थ होते. ते शिया नसते तर बहुतेक भारताचे राष्ट्रपती होऊन गेले असते. जुन्या हैदराबाद राज्यात ते गृहखात्याचे चिटणीस होते. निजामाचे घटनात्मक सल्लागार आणि हैदराबाद संस्थानाचेही घटनात्मक सल्लागार तेच असत. अनेकदा हैदराबाद आणि निजामाच्या वतीने रेसिडेंट अगर व्हॉईसरॉय यांच्याशी बोलणी करण्यास निजामाचे व्यक्तिगत दूतही तेच असत. अलियावर जंग यांना तात्पुरत्या वर्ष दीडवर्षाच्या करारावर समाधान नव्हते. त्यांना

भारत व हैदराबाद यांच्यात कायमचे संबंध निर्माण करणाऱ्या करारात रस होता. जैसे थे करार याच्या वाटाघाटी चालू असतानाच अनधिकृतरीत्या कायमच्या संबंधाबाबतसुद्धा अलियावर जंग यांनी वाटाघाटी केलेल्या होत्या. या वाटाघाटींना पुढच्या काळात एका नव्या कराराचे स्वरूप आले. जेव्हा प्रत्यक्ष करार अधिकृतरीत्या चर्चेसाठी आला तेव्हा अलियावर जंग हैदराबादच्या राजकारणातून निर्वासित झाले होते. पण अधिकृत करार कुणाच्याही काळात आलेला असो त्या करारामागे डोके अलियावर जंगचे होते.

हैदराबाद कधी स्वतंत्र राष्ट्र होईल यावर नबाब अलियावर जंग यांचा विश्वास नव्हता. स्वतंत्र राष्ट्र होण्याची कल्पना अव्यवहार्य आणि मूर्खपणाची आहे, सबब ती सोडून द्यावी असे त्यांचे मत होते. स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र हा मूर्खपणा सोडून दिल्यास भारतात विलीन होण्यास आपण हैदराबादला जास्तीत जास्त सवलती मिळवून देऊ. यातच निजामाचे व हैदराबादच्या मुसलमानांचे कल्याण आहे असे त्यांचे म्हणणे आहे. या त्यांच्या भूमिकेमुळेच उस्मानिया विद्यापीठात त्यांना जोड्यांनी मारण्यात आले. सर्व पदांचा राजीनामा त्यांनी दिला. तो स्वीकारण्यात आला. अपमानित होऊन त्यांना राजकीय अज्ञातवासात जावे लागले. कारण अलियावर जंग स्वतंत्र राष्ट्राची कल्पना मानण्यास तयार नव्हते. पण अलियावर जंगांची जी योजना होती ती भारतीय लोकशाहीस किती घातक ठरली असती याचाही एकदा विचार केला पाहिजे. नोव्हेंबर ४७ अखेर जैसे थे करार झाला. केवळ बोलण्यात असलेली अलियावर जंग योजना क्रमाने साकार करण्याचे उद्योग फेब्रुवारी ४८ पासून सुरू झाले. मे १९४८ ला या योजनेला माऊंट बॅटनच्या आग्रहाखातर पटेल आणि नेहरू यांनी मान्यता दिली. जूनच्या मध्यावर ही योजना अधिकृतरीत्या निजामाने फेटाळली. हे सर्व भारतीय लोकशाहीचे सुदैव म्हटले पाहिजे. कासीम रझवीचा आक्रस्ताळेपणा परवडला पण सुस्वभावी आणि शांत असलेल्यास अलियावर जंग यांची योजना नको असे म्हणण्याची पाळी यावी, अशी ती योजना आहे.

स्थूल मानाने अलियावर जंग यांच्या योजनेचे स्वरूप असे आहे - हैदराबादने भारतात सामील व्हावे. भारताचे सार्वभौमत्व व अधिसत्ता मान्य करावी. या मोबदल्यात भारत सरकारने हैदराबाद संस्थान व निजामाचे राजघराणे टिकवून ठेवण्याची जबाबदारी घ्यावी. म्हणजे निजामाचे राजघराणे टिकले. राजा टिकला. हैदराबाद संस्थान शिल्लक असल्यामुळे महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र हे प्रांत अस्तित्वात येणे संपले. भारताची भाषावर राज्यरचनाच संपली. या योजनेचे दुसरे कलम असे की, हैदराबादला

भारतापेक्षा निराळे असे जगाशी राजकीय संबंध असणार नाहीत. पण हैदराबाद सर्व जगाशी व्यापारी संबंध ठेवू शकेल. हे जगातील इतर राष्ट्रांशी असणारे हैदराबादचे व्यापारी संबंध भारताच्या हितसंबंधांना बाधक असणार नाहीत. मात्र या व्यापारी संबंधावर भारत सरकारचे नियंत्रणही असणार नाही. आपल्या अंतर्गत कारभारात हैदराबादला पूर्ण स्वायत्तता राहील. एक नवीन राज्यघटना अस्तित्वात आणली जाईल. त्यानुसार विधानसभेत साठ टक्के हिंदू, चाळीस टक्के मुसलमान सभासद असतील. दर हा वर्षाला यात बदल करून क्रमाक्रमाने लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व येथवर हैदराबाद जाईल. हा प्रवास करण्याचा वेग हैदराबादची असेंब्ली ठरवील. लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व या टप्प्यापर्यंत हैदराबादचे राजकारण जाईपावेतो भारतीय संविधान हैदराबादेत लागू होणार नाही, (म्हणजे दीर्घकाळ उर्दू, तिचे वर्चस्व, नोकऱ्यांत मुसलमानांचे वर्चस्व आणि सर्व जहागिरदाऱ्या चालू राहतील) अशी थोडक्यात नबाबसाहेबांची योजना होती आणि ही कायमची योजना होती. ही योजना जरी निजामाने मान्य केली असती तर अलियावर जंगांच्या कृपेने एक कोटी हिंदूंचे कायमचे नुकसान झाले असते. नाइलाज म्हणून नेहरू, पटेलांनी वैतागून हेहीं कबूल केले. आमचे त्राते शेवटी निजाम व कासीम रझवीच ठरले, याची नोंद कुठेतरी होणे आवश्यक आहे.

पोलिस ॲक्शन होण्यास इतका उशीर का लागला? सप्टेंबर १९४८ म्हणजे जवळ जवळ स्वातंत्र्योत्तर तेरा महिने हैदराबादच्या जनतेला वनवास सहन का करावा लागला? या प्रश्नांची काही प्रमुख उत्तरें या ठिकाणी नोंदविली पाहिजेत. त्यावेळचे हैदराबादच्या कृतिसमितीचे अध्यक्ष श्री. दिगंबररावजी बिंदू यांना लढा सुरू करण्यापूर्वी सरदार पटेलांनी स्पष्टच सांगितले होते की, वर्षभर तरी हा प्रश्न आम्ही स्वातंत्र्यानंतर सोडवू शकणार नाही. त्यानंतर फारसा वेळ लागणार नाही. हा प्रश्न आम्ही शक्यतो त्वरेने सोडवू. हे बोलणे बहुधा जूनच्या पहिल्या आठवड्यातील आहे. (१९४७). या जून महिन्यात स्टेट काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात लढ्याच्या ठरावावर बोलताना आमचे नेते स्वामी रामानंद तीर्थ म्हणाले, हा लढा एखाद्या टर्मपुरता चालेल असे विद्यार्थ्यांनी समजू नये. तो किमान वर्षभर चालेल हे तुम्हाला माहीत असावे. ज्यांची लढा देण्याइतकी शक्ती नाही त्यांनी कृपया या लढ्यात उतरू नये. याही ठिकाणी पुन्हा एक वर्षाचा उल्लेख येतो. १९६५-६६ नंतर मी स्वामीजींना विचारले, तुमच्या त्या व्याख्यानात एक वर्षाचा उल्लेख काय म्हणून होता? स्वामीजींनी उत्तर दिले नाही,

पण जेव्हा त्या प्रश्नाचे उत्तर मी दिले तेव्हा ते म्हणाले, मुद्दा बरोबर आहे. माझे उत्तर असे आहे. जून महिन्यात बिंदूशी बोलताना अगर स्वामीजींशी बोलताना भारतीय नेत्यांच्या डोळ्यांसमोरचा विचार स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहे. ऑगस्टला भारत स्वतंत्र झाला तरी सुद्धा माऊंट बॅटन गव्हर्नर जनरल राहणार आणि इंग्रज सरसेनापती राहणारच. गव्हर्नर जनरल परत जाणे, भारतीय सरसेनापती पदाधिकार ग्रहण करणे या घटना घडण्यास स्थूलमानाने एक वर्ष लागणार. लष्करी कारवाईशिवाय हैदराबादचा प्रश्न सुटणार नाही. आणि ही कारवाई ब्रिटिश सरसेनापती व गव्हर्नर जनरल म्हणून निघून जाईपावेतो करता येणार नाही. म्हणून ही मंडळी वर्षभराचा वायदा करीत होती. २१ जून १९४८ ला चक्रवर्ती राजगोपालाचारी गव्हर्नर जनरल झाले आणि त्यानंतर तीन महिने संपण्याच्या आत हैदराबादचा प्रश्न संपला.

माऊंट बॅटन जाण्याच्या पूर्वी सर्व योजना संपलेल्या होत्या. वाटाघाटीही संपलेल्या होत्या. माऊंट बॅटन गेल्यानंतर एका आठवड्याच्या आतच हैदराबाद संस्थानची आर्थिक नाकेबंदी करण्याल आली. वाटाघाटी संपलेल्या आहेत आणि आर्थिक नाकेबंदी केली जात आहे या घटनेचा गंभीर अर्थ हैदराबाद शासनाच्या चटकन लक्षात आला. भारत सरकार अतिशय सावधपणे दोन बाबींचा विचार करीत होते. अजून काश्मीरमध्ये युद्धबंदी झालेली नव्हती. काश्मीरमध्ये युद्ध एप्रिल ते जुलै जोरात असे. आणि पुन्हा ऑक्टोबर,नोव्हेंबरमध्ये युद्धाला जोर असे. त्या दृष्टीने हैदराबादवर लष्करी कारवाई ऑगस्ट अगर सप्टेंबर या महिन्यात घेणे सोयीस्कर होते. म्हणून जुलैपासून सप्टेंबरपर्यंत वेळ काढला गेला. दुसरे म्हणजे हैदराबाद भोवताली कडक नाकेबंदी जर केली तर हैदराबादसाठी जगातून दडपण किती येते याचाही शोध भारत सरकारला घ्यायचा होता. नवोदित स्वातंत्र्य मिळविलेले नेते अंगलट येईल असे साहस करण्यास तयार नव्हते. सरदार पटेल खंबीर मनाचे आणि दृढनिश्चयी नेते होते. पण ते सुद्धा बेसावधपणे अगर उतावळेपणाने वागत नसत. जुनागढवर पोलिस ॲक्शन झाली त्यावेळी पाकिस्तानने पुष्कळ कुरकूर केली पण जगातील राष्ट्रांनी त्याकडे लक्ष दिले नाही. हैदराबादबाबतसुद्धा जगातून फार मोठे दडपण येणार नाही याची खात्री करून घेणे आवश्यक होते. जुलै-ऑगस्टमधील नाकेबंदीबाबत ऑस्ट्रेलियाने नापसंती नोंदविलेली दिसते. पण इतर कोणी याबाबत फारसा आक्रोश केलेला नव्हता. भारत सरकारला ही गोष्ट सुद्धा पुरेशी आश्वासक वाटली.

इंग्रज गेल्याच्या नंतर सुरू झालेली नाकेबंदी आणि सीमेवर जमणाऱ्या फौजा

विचारात घेऊन जुलैच्या पहिल्या आठवड्यातच हैदराबादने वाटाघाटी सुरू करण्याची इच्छा दर्शविली. खरे म्हणजे अलियावर जंग यांची पण अधिकृतरीत्या माऊंट बॅटनच्या नावे ओळखली जाणारी योजना पुन्हा विचारात घेण्याची तयारी आता हैदराबादने दाखविली होती. जो जैसे थे करार ऑक्टोबर अखेर फेटाळला तो हैदराबादने नोव्हेंबर अखेर स्वीकारला. जी माऊंट बॅटन योजना हैदराबादने मेअखेर फेटाळली ती जुलैमध्ये हैदराबाद विचारत घेण्यात तयार होते, पण भारत सरकारने आता नकार दिला. भारत सरकारने हेही कळविले की, 'हैदराबादेतील शांतता व कायद्याचे राज्य झपाट्याने कोसळत आहे. ही परिस्थिती तातडीने सुधारली गेली नाही तर भारताला गंभीरपणे दखल घ्यावी लागेल. सप्टेंबरमध्ये हैदराबादच्या शिष्टमंडळाने पाकिस्तानच्या साहाय्याने आपली बाजू युनोत मांडण्याचे ठरविले. युनोने हैदराबाद प्रश्न दाखल करून घेतला आणि चर्चेसाठी दिवस निश्चित केला. हैदराबाद प्रश्नावर युनोत चर्चा चालू असतानाच पोलिस ॲक्शन होऊन हैदराबादचा प्रश्न संपला. हैदराबादने प्रश्न उपस्थित केला होता म्हणून भारत सरकार हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे, राष्ट्रसंघाला त्यावर चर्चा करण्याचा अधिकार नाही ही भूमिका घेऊ शकले. हैदराबादचा प्रश्न सुटण्यास एक वर्ष उशीर का लागला याचे उत्तर वर आलेले आहे.

वर्षभराच्या उशिरामुळे खून, कत्तली, बलात्कार, अत्याचार याची जी काही किंमत हैदराबादच्या प्रजेला तेरा महिने द्यावी लागली तिचे प्रमाण बरेच मोठे आहे. आणि हैदराबादच्या स्वातंत्र्य-सैनिकांनी जो रोमहर्षक लढा दिला त्याची नाट्यमय गाथा तर खूपच रोमांचकारक आहे. पण सगळ्यांत महत्त्वाची आणि समाधानाची गोष्ट ही आहे की शेवटी हैदराबादचा पाडाव झाला. आणि त्यामुळे भारताची प्रादेशिक सलगता निर्माण झाली. नाही तर सलग राष्ट्रच बनले नसते.

❋ ❋ ❋

(प्रकाशन : 'राजस' मे १९७८)

## १३.

# 'हैदराबाद मुक्तिसंग्रामातील काही कथा' या पुस्तकाची प्रस्तावना

आमचे तरुण मित्र अशोक परळीकर ह्यांनी हैदराबाद मुक्तिसंग्रामातील काही कथा परिश्रमपूर्वक गोळा करून त्यांचा एक संग्रह सिद्ध केला आहे. हैदराबादचा मुक्तिसंग्राम भारतीय सैन्याच्या पोलिस ॲक्शनसह १७ सप्टें. १९४८ ला संपतो. आता ह्या घटनेला सुमारे २७ वर्षे उलटून गेलेली आहेत. ज्या आठवणी ताज्या होत्या त्या पुष्कळशा आता काळाच्या ओघात झावळ-झावळ झालेल्या आहेत. इतक्या वर्षानंतर ह्या सर्व हकिकती परिश्रमपूर्वक गोळा करायच्या असे जरी म्हटले आणि कितीही काळजी घेतली तरी तपशिलाच्या किरकोळ चुका राहण्याचा संभव असतो. खरे म्हणजे हा रोमहर्षक इतिहास त्याचकाळी समग्रपणे लिहिला जाणे आवश्यक होते. हैदराबादचा मुक्तिसंग्राम हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक उज्ज्वल आणि लोकविलक्षण असे पर्व होते. ह्या आंदोलनाचा समग्र इतिहास अजून कुणी लिहिलेला नाही. कै. स्वामी रामानंदतीर्थ स्मारक योजनेत असा बृहद् इतिहास लिहिला जाणार आहे. ते कार्य पूर्णतेला कधी जाईल हे सांगता येत नाही. एक तर मराठवाड्यात लेखकांची उणीव, दुसरे म्हणजे ह्या आंदोलनातील काही घटनांचा उच्चार करणे कायदेशीररीत्या अडचणीचे म्हणून दीर्घकाळ मौन पाळणें सर्वांनाच भाग होते.

एक उदाहरण घेऊन हा मुद्दा थोडा स्पष्ट केला पाहिजे. त्याशिवाय त्याचे मर्म पटणे कठीणच आहे. ह्या संग्रहात उमरी बँकेच्या लुटीचे प्रकरण आहे. ह्या प्रकरणात

मोजता मोजता असे लक्षात आले की, परळीकरांनी नाव घेऊन ज्यांचा उल्लेख केलेला आहे त्यांच्यातील सुमारे पंचवीस माणसे माझ्या चांगल्याच ओळखीची आहेत. म्हणून ह्या कथांमध्ये भाषाशैली वगळता काल्पनिक असे काही नाही. पण मला मात्र ज्या चौकटीत ह्या कथा घडल्या त्या चौकटीचा अतिशय थोडक्यात का होईना पण परिचय करून देणे भाग आहे. भारतीय राष्ट्राची प्रादेशिक अखंडताच हैदराबाद आंदोलनाच्या यशाविना शक्य नव्हती, हेही आता आवर्जून सांगावे लागते हीच दुःखाची बाब आहे. पण मराठवाड्याच्या बिनशर्त सहभागाविना संयुक्त महाराष्ट्रच निर्माण होणे अशक्य होते ह्याचीही विस्मृती झालेल्या काळात त्याहूनही अधिक जुन्या गोष्टीचे स्मरण राहिले नाही तर आश्चर्य कशाचे मानावयाचे?

हैदराबाद संस्थान हे एक लोकविलक्षण प्रकरण होते. एका बाजूला जुना मुंबई प्रांत, एका बाजूला जुना मद्रास, उत्तरेला जुना मध्यप्रदेश असे हे भारताच्या ऐन पोटात असलेले देशी संस्थानांतील सर्वांत मोठे संस्थान होते. सुमारे ८२ हजार चौरस मैलांचा ह्या संस्थानाचा क्षेत्रविस्तार होता. एक कोटी साठ लक्षांच्यावर लोकसंख्या होती. सव्वीस कोटीचे ह्या संस्थानाचे उत्पन्न होते. मोठ्या आत्मीयतेने संस्थानिक म्हणून ज्यांचे महाराष्ट्रात उल्लेख होतात त्यापैकी बहुतेक संस्थानिक हैदराबाद येथील सध्या जहागीरदारांपेक्षा लहान होते. हे संस्थान सोळा जिल्ह्यांत विभागले होते. स्थूलमानाने त्यातील आठ जिल्हे तेलगू भाषिक, पाच जिल्हे मराठी भाषिक, (ह्यांनाच 'मराठवाडा' म्हणतात) आणि तीन जिल्हे कानडी भाषिक होते. भारतावर होऊन गेलेल्या मोगली राजवटीचा हा ऐन नाभिस्थानी शिल्लक असलेला अत्यंत घातुक आणि बलवान असा अवशेष होता.

मोगल साम्राज्याच्या उतरत्या काळात चिन कुलीनखान म्हणजेच निजाम-उलमुल्क, आसफजहा पहिला हा दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला आणि मोगल राजवटीच्या ऱ्हासाचा फायदा घेऊन इ.स. १७२४ पर्यंत त्याने आपल्या सुभेदारीला स्वतंत्र राज्याचे स्वरूप आणले. स्थूलमानाने हे निजाम घराणे सगळे दोनशे चोवीस वर्षे टिकले. हैदराबाद स्वातंत्र्य आंदोलनाच्यावेळी मीर उस्मानअली खानबहाद्दूर हे हैदराबादचे अधिपती होते. ते स्वतःला 'निजामे सावे' म्हणजे सहावे निजाम म्हणत. इतिहासात हा गादीवर आलेला सातवा माणूस; पण त्यांतला एक मोजायचा नाही अशी प्रथा आहे. वारंवार हे आसफजाही राज्य मराठ्यांच्याकडून पराभूत झाले. मराठ्यांच्या शौर्याचे

गोडवे जरूर गावेत; पण सतत पराभव होत असतानासुद्धा आपले अस्तित्व टिकवून धरणारे जे चिवट निजाम, त्यांचेही कौतुक करायला विसरू नये. एका बलवंताच्या समोर आपला पराभव होतो म्हणून दुसऱ्या बलवंताच्या आश्रयाने टिकून राहण्याची ह्या राजवटीची क्षमता खूप मोठी होती. कधी मराठ्यांशी तह करून, कधी फ्रेंचांशी, तर कधी इंग्रजांशी तह करून हे घराणे आपले अस्तित्व टिकवीत आले. कुणाच्या तरी आश्रयानेच आपण जिवंत राहतो, हे जाणण्याइतका मनाचा तोल ह्या राजवटीजवळ नेहमीच होता. हा तोल संपला आणि हे राज्य निष्कारण हटवादाच्या आहारी जाऊन शेवटच्या निझामाने गमावले. मुत्सद्देगिरीत मुस्लिम राजे आणि मुस्लिम राजकारण नेहमीच हिंदूंच्यापेक्षा सरस असते असा एक समज आहे. जरी हा समज खरा गृहीत धरला तरी मीर उस्मान अलीखान हे ह्या समजाला अपवाद म्हटले पाहिजेत.

जुने हैदराबाद संस्थान आणि मीर उस्मान अलीखानने सज्ज केलेले नवे हैदराबाद संस्थान ह्यात अंतर होते. हैदराबाद संस्थानात नेहमीच मुस्लिम समाजाचा वरचष्मा असे. दीर्घकाळापर्यंत कोणत्या ना कोणत्या तरी मुस्लिम राजवटीखालीच हा प्रदेश राहात आला. संस्थानाची लोकसंख्या पंच्याऐंशी टक्क्याहून अधिक हिंदू होती. उरलेली पंधरा टक्के लोकसंख्या सगळीच मुसलमान नव्हती; पण लोकसंख्येत दहा अकरा टक्के मुसलमान होते. आपल्याशी एकनिष्ठ असणाऱ्या हिंदू जहागीरदारांना आणि बुद्धिमान हिंदू पुरुषांना हाताशी धरून पण मुस्लिम वर्चस्व कायम ठेवून कारभार चालवायचा ही ह्या भागात जुनी परंपरा होती. प्रथम बहामनी घराण्याने, नंतर अहमदनगरच्या निजामशाहीने, विजापूरच्या आदिलशाहीने आणि गोवळकोंड्याच्या कुतुबशाहीने ही पद्धत अबाधित चालविलेली होती. हैदराबादच्या निझामानेसुद्धा महबूब अलीच्या अंतापर्यंत हीच प्रथा चालविली. ह्या प्रथेत मुस्लिम राजवटीचे नुकसान काहीच नव्हते. राज्याला बळकटी, इस्लामचा वरचढपणा आणि हिंदूंचे बिनशर्त सहकार्य ह्यांचा समन्वय हा नेहमी सोयीचाच राहिला. इतका तोल जर शेवटच्या निझामाला शिल्लक राहिला असता तर भारतीय राष्ट्राचे कधीही भरून न येणारे नुकसान झाले असते. शेवटचा निझाम अतिरेकी होता हाच दैवयोग एकूण चांगला होता असा निर्णय देणे भाग आहे.

हा शेवटचा निझाम मीर उस्मान अलीखान बहादूर याचा जन्म इ.सं. १८८६ साली झाला आणि वयाच्या पंचविसाव्या वर्षी ह्याला गादी प्राप्त झाली. उस्मान

अलीखानचे व्यक्तित्व अतिशय गुंतागुंतीचे होते. अत्यंत धनलोभी आणि चिक्कू म्हणून प्रसिद्ध असणारा व साधी राहणी जतन करणारा हा जगातला अति धनाढ्य माणूस होता. पण त्याबरोबरच नवीन कापड गिरण्या काढणारा, नवे विद्यापीठ स्थापणारा, धरणे बांधणारा, साखर कारखाने काढणारा, कोळशाच्या खाणी आणि कागद उद्योग सुरू करणारा, हैदराबादला भव्य आणि सुंदर रूप देणारा असाही हा राजा होता. ह्याच निजामाने हैदराबादचे प्रशासन आधुनिक करण्याचा अहर्निश खटाटोप केला. अत्यंत चतुरपणे व धीमेपणे आपल्या इच्छिताकडे वाटचाल करणारा असाही हा अधिपती होता. आपण तुर्क आहोत असे तर निजामचे म्हणणे होतेच, पण आपण स्वतंत्र आहोत असाही त्याचा दावा होता.

एखाद्या राष्ट्राप्रमाणे निजामाने हैदराबादची व्यवस्था केली होती. संस्थानला स्वतःची वाहतूक व्यवस्था होती, स्वतःचे रेल्वे व पोस्ट होते, आपली चलन-वलन व्यवस्था होती, आपल्या बँका होत्या, स्वतःची सिव्हिल सर्व्हिस तर होतीच, पण स्वतःचे लष्करही होते. व्यवहारतः आपण स्वतंत्र आहोत ही भूमिका निजामने वेळोवेळी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला होता. हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र व्हायचे असेल तर त्या राष्ट्राचे समर्थकही असायला पाहिजेत, म्हणून निजामाने हैदराबादला इस्लामी राष्ट्राचे रूप देण्याचा अतिशय सर्वंकष असा प्रयत्न केलेला होता. एक तर राजभाषा उर्दू होती, पाचवीपासून वरचे सर्व शिक्षण उर्दूतून होत असे. जे अलिगढला जमले नाही ते निजामाने करून दाखविले. देशी भाषेतून इंजिनिअरिंग व मेडिकलचे शिक्षणसुद्धा देणारे, एम.एस्सी. पर्यंत सर्व विज्ञान शिकवणारे उस्मानिया हे एकमेव विद्यापीठ होते. संपूर्ण कायदा उर्दूत होता. हायकोर्ट उर्दूतून चाले. हा नुसता भाषेचा प्रश्न नव्हता, तर सुट्टी शुक्रवारी असे. अजूर, दय, बहमन हे इराणी महिने चालत. सुट्ट्या मुस्लिम संस्कृतीप्रमाणे असत. मुस्लिम विद्यार्थ्यांना सरकारी शाळेत धर्मशिक्षण मिळण्याची सोय होती. एक अनधिकृत धोरण असे की शिक्षणाचे प्रमाण कधी १० टक्क्यांच्या वर वाढता उपयोगी नाही. ह्या शिकणाऱ्या विद्यार्थ्यांत मुस्लिम विद्यार्थ्यांचे प्रमाण प्रचंड असले पाहिजे. निरुपद्रवी नोकऱ्यांत २५ टक्के हिंदू आणि ७५ टक्के मुसलमान असे प्रमाण असावे. महत्त्वाच्या सर्व नोकऱ्या - ह्यात पोलिस, लष्कर, प्रशासन असा भाग येई. ह्या क्षेत्रात मुसलमानांचे प्रमाण शेकडा ९५ पर्यंत टिकवून धरले जाई.

असे सर्व जीवनच मुस्लिम वर्चस्वाखाली असे. सगळ्या जीवनाला इस्लामी रूप

देण्याचाच निजामाचा प्रयत्न होता. हैदराबाद हे स्वतंत्र राष्ट्र, ह्या राष्ट्राचा सुलतान स्वतः निजाम आणि हे राष्ट्र इस्लामी राष्ट्रवाद अंगीकारणारे, असे निजामाचे स्वप्न होते. ८५ टक्के हिंदू अत्याचाराने पीडलेले आणि लाचार होते. १० टक्के मुसलमानांना हे राष्ट्र आपले आहे म्हणून तें आपण टिकवले पाहिजे असे वाटत होते. हिंदू समाज नेहमी विस्कळीत असतो. अतिजहालांच्या शेजारी निमजहाल, त्यांच्या शेजारी मवाळ, त्या शेजारी राजनिष्ठ अतिमवाळ असे अनेक प्रवाह हिंदू समाजात असतात. मागासलेल्या त्या लाचार जगात मवाळ-अतिमवाळांना हाती धरून निजाम स्वातंत्र्य आंदोलनाला शह देऊ शकला असता. अशाच प्रकारचे उद्योग त्याचे पूर्वज करीत आले. पण उस्मान अलीखानच्या डोक्यात इस्लामी राष्ट्रवादाचे भूत चढलेले असल्यामुळे सर्व मवाळांनाही जहालांच्या बरोबर जाणे भाग असे. निजामचे हे दूरदर्शित्व सर्वांच्या फायद्याचे ठरलेले आहे.

गादीवर आल्यापासून निजाम स्वतंत्र होण्यासाठी धडपडत होता. त्यानें ब्रिटिश गव्हर्नर जनरलला अशी सूचना दिली होती की, ज्याप्रमाणे त्यांचा रेसिडेंट हैदराबादला राहतो त्याचप्रमाणें हैदराबादचा एखादा वकील दिल्लीत ठेवायला काय हरकत आहे? एकदा निजामाने असाही मुद्दा मांडला होता की, त्याने स्वतःला हिज मॅजेस्टी म्हणवून घ्यायला काय हरकत आहे? संरक्षण आणि विदेशनीती सोडल्यास आपण अंतर्गत कारभारात सर्वथैव स्वतंत्र आहोत असेही त्याचे म्हणणें असे. जुन्या काळी निजामच्या ताब्यात असणारे वऱ्हाडचे चार जिल्हे मध्यप्रदेशला जोडण्यात आले होते. ते आपल्याला परत मिळावेत असा शेवटपर्यंत निजामाचा आग्रह होता. मीर उस्मान अलीखान ह्यांच्या ह्या सर्व हालचाली १९३५ पूर्वीच्या आहेत. भारतीय स्वातंत्र्याची संधी साधून निजाम स्वतंत्र होऊ इच्छीत होता हे अर्धसत्य आहे. नेहमीच निजामला स्वतंत्र राष्ट्राचा अधिपती होण्याची इच्छा राहिली, हाही ह्या सत्याचा भाग आहे. ब्रिटिश इंडियात क्रमाने मुस्लिम लीग बलवान होताना दिसत होती. हैदराबाद संस्थानात मुस्लिम लीगने कार्य करावे असे निजामाला अजीबात वाटत नव्हते. जीनांनाही संस्थानिक प्रदेशात काम करण्याची इच्छा नव्हती. अर्थातच निजाम आणि जीना यांची कारणे भिन्न होती. निजाम स्वतःला राष्ट्र समजत असल्यामुळे ब्रिटिश इंडियातील संस्था ह्या त्याच्यामते परराष्ट्रातील संस्था होत्या. परराष्ट्रीय संस्थांनी आपल्या राष्ट्रात काम केल्यामुळे आपल्या राष्ट्रवादाची हानी होते, असें निजामाचे मत होते. शिवाय लीगवर नेतृत्व

राहणार होते, कायदे-आझम जीना ह्यांचे. निजामाला आपल्या संस्थानात स्वतःच्या तंत्राने चालणारी मुस्लिम जातीयवाद्यांची संघटना हवी होती. निजामाच्या प्रेरणेने हैदराबाद संस्थानापुढे प्रसिद्धी पावलेल्या इत्तेहादुल मुसलमीन ह्या संघटनेची स्थापना झाली. ह्या संघटनेचे एक स्वयंसेवक दल होते. आरंभी ह्या दलाला खाकसार म्हणत. पुढे हेच दल रझाकार या नावाने प्रसिद्ध झाले. ह्या संघटनेचे नेते बहाद्दूर यार जंग होते.. उर्दू भाषेत अलौकिक वक्तृत्व करणारे असे ते नवाबी नेते होते. धर्मवेड त्यांच्यातही भरपूर होते. अगदी आरंभीच्या काळातच त्याने असे जाहीर केले की, मुसलमान हे ह्या देशाचे विजेते आहेत. ते तैमूर आणि बाबरचे वंशज आहेत. हैदराबाद ही इस्लामची विजित भूमी म्हणजे दार उस सालम आहे, आणि म्हणूनच जंगली लोकांना इस्लामच्या सुसंकृत धर्माची दीक्षा देण्याचा त्यांना हक्क आहे. त्याही जुन्या काळात आमचे नेते कै. गोपाळशास्त्री देव ह्यांनी केवळ वैयक्तिक बेछूटपणाच्या जोरावर बहाद्दूर यार जंग ह्यांना तोंडावर आपण त्याचे डोके फोडू अशी धमकी दिली होती. त्याही नंतर गोपाळशास्त्री देव जिवंत राहिले हेच आश्चर्य आहे.

राजकीय संघटनांचा एक नियम असतो. संघटना बलवान होतात, त्यांना निष्ठावंत अनुयायी लाभतात, त्यामुळे नेते बलवान होतात. जनतेचा पाठिंबा असणारे हे बलवान नेते फार काळ दुसऱ्याच्या तालावर नाचत असतात. ते सत्तेवर आपले प्रभुत्व निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. हेच बहाद्दूर यार जंगने केले. त्यामुळे त्याचा आकस्मिक मृत्यू झाला. बहाद्दूर यार जंग ह्यांचा खून झाला हे उघड सत्य होते. फक्त ह्या खुनाच्या मागे निझामाची मूकसंमती होती की त्याची साक्षात प्रेरणा होती एवढाच वादविषय आहे. नंतर ह्या संघटनेला निजामाने दुबळे नेते पुरविले. असाच एक दुबळा भरमसाट बोलणारा धर्मवेडा व अतिरेकी नेता कासिम रझवी होता. कासिम रझवीची बुद्धी बेताची, त्याची लायकीही बेताची म्हणून तो आपल्या तंत्राने चालेल अशी निजामची समजूत होती. पण आपले नेतृत्व बलवान झाल्यानंतर कासिम रझवी हाही निजामाला डोईजड दिसू लागला. शेवटच्या काही महिन्यांत हैदराबाद संस्थानावर प्रत्यक्ष ताबा कासिम रझवी ह्याचा होता; त्याला आवरणे निजामाच्या आटोक्यात राहिले नव्हते; असे सामान्यांना वाटू लागले. रझवीला आटोक्यात आणण्याचा एकच मार्ग होता. तो म्हणजे भारताचे साहाय्य घेणे, असेही काही मानू लागले. हा मार्ग स्वतंत्र राष्ट्र निर्माण करण्याच्या पिसेपणाने भारलेल्या निजामाला पटणारा नव्हता.

हैदरावाद पोलिस ॲक्शन झाले त्या वेळी रझाकारांची संख्या सुमारे दोन लक्ष होती. ही सशस्त्र संघटना होती. हैदराबादच्या फौजा बेचाळीस हजाराच्या होत्या. पोलिस ह्याहून निराळे होते. सारे प्रशासन मुसलमानांनी भरलेले होते. सोळा लक्ष लोकसंख्या असणाऱ्या जमातीचा हा हैदराबादच्या राजकारणातील वाटा म्हणजे जवळपास शेकडा शंभर लोकांचा वाटा होता. जे मुस्लिम सदस्य स्टेट कॉंग्रेसबरोबर होते त्यांची एकूण संख्या एका हाताच्या कांड्यावर मोजता येण्याजोगी इतकी अल्प होती.

आपण निजामाची माहिती घेत आलो आहोत. त्याशेजारी हैदराबादच्या जनता आंदोलनाचीही माहिती घेतली पाहिजे. हैदराबाद संस्थानात राजकीय जागृतीला आरंभ खऱ्या अर्थाने इ.स. १९२५ नंतर होतो. पण त्याला एका संघटनेचे स्वरूप आलेले नव्हते. संघटितपणे जनतेचे आंदोलन हैदरावाद स्टेट कॉंग्रेसच्या रूपाने उदयाला आले. ह्या संस्थेची प्रेरक व मार्गदर्शक व्यक्ती प्रत्यक्ष महात्मा गांधी ही होती. वीरगाथा लिहिणाऱ्या लेखकांना गांधी-नेहरूंची अवहेलना करणे सोपे असते. इतिहास नोंदविणाऱ्यांना असे करता येत नाही. भारतातील सर्व संस्थाने प्रतिगामी असून त्यांना स्वतंत्र भारतात जागा नाही. सर्व संस्थाने संपलीच पाहिजेत, ह्या निर्णयावर जवाहरलाल नेहरू इ.स. १९२५ पूर्वी येऊन पोचले होते. पण गांधीजींना कॉंग्रेसने संस्थानी राजकारणात लक्ष घालावे हे पसंत नव्हते. १९३५ च्या कायद्याच्या नंतर ह्या कायद्यातील फेडरल भाग अमलात आणण्याचा प्रश्न जेव्हा उभा राहिला तेव्हा गांधींना असे दिसू लागले की, संस्थानिकांना स्वातंत्र्याची आस्था नाही. त्यांच्यावर दाब असणाऱ्या जनतेच्या संघटना संस्थानातून अस्तित्वात आणल्या पाहिजेत. ह्यानंतर एकेका नेत्याने आपले कार्यक्षेत्र निवडले. बिहारच्या संस्थानी राजकारणाला राजेंद्रप्रसाद साक्षात मार्गदर्शन करीत. हैदराबादचे कॉंग्रेसचे राजकारण प्रत्यक्ष गांधीजींशी संबंध ठेवून केले जात असे. इ.स.१९४५ पर्यंत प्रत्येक बाब स्वतः गांधीजी पाहात. नंतर साक्षात मार्गदर्शन पंडित नेहरूंचे असे. हैदराबाद स्टेट कॉंग्रेसला सरदार पटेलांचे मार्गदर्शन प्रत्यक्षपणे घेण्याची वेळ पोलिस ॲक्शननंतर आली. हैदराबादच्या पुढच्या राजकारणावर ह्या घटनेचे गंभीर परिणाम झाले. सरदार पटेलही कॉंग्रेसचेच नेते होते. सर्वांच्या मनात त्यांच्याविषयी आदर असे. त्यांच्याशीही चर्चा होत; पण सरदारांनी नेहमीच आज्ञा घेण्यासाठी प्रथम गांधींकडे आणि नंतर नेहरूंच्याकडे वोट दाखविले. त्यांच्या स्वतःच्या आज्ञा जिथून सुरू झाल्या तिथून स्टेट कॉंग्रेसचा इतिहास सुरू होतो.

हैदराबादच्या राजकारणात काही चमत्कारिक बाबी आहेत. जनतेचे सत्याग्रही आंदोलन जेव्हा इ. स. १९३८ ला सुरू झाले तेव्हा त्याचे स्वरूप मोठे गुंतागुंतीचे होते. ह्या आंदोलनाचा एक भाग विद्यार्थ्यांच्या 'वंदेमातरम्' सत्याग्रहातून येतो. निजामाने 'वंदेमातरम्' म्हणण्यास बंदी घातली होती, ती अनेक विद्यार्थ्यांनी तोडली व सत्याग्रह केला. हैदराबाद येथील बहुतेक कम्युनिस्ट नेते आपला 'वंदेमातरम्' म्हणण्याचा हक्क बजावताना जन्माला आले आहेत. कम्युनिस्ट नसणारे आणि असणारे मार्क्सवादी हे हैदराबादेतील राष्ट्रवादी चळवळीचे प्रमुख नेते होते. इतरत्र भारतात असे घडले नाही. हैदराबाद आंदोलनातील दुसरी महत्त्वाची घटना वेदाचे अभिमानी आणि व्यवहारात कर्मठ असलेल्या आर्यसमाजाची चळवळ ही आहे. हे आर्यसमाजी लोक तत्त्वज्ञान काहीही सांगोत, प्रत्यक्ष व्यवहारात प्रखर राष्ट्रवादी, धर्मसुधारक व समाजसुधारक, कडवे मुस्लिमविरोधक आणि नेहमीच सशस्त्र क्रांतीच्या भूमिकेला अनुकूल मनोवृत्ती असणारे असे होते. प्रथम आर्यसमाजाची चळवळ स्वतंत्र सुरू झाली; पण नंतरच्या काळात हैदराबाद संस्थानातील बहुतेक आर्यसमाजी मंडळी संस्थानी काँग्रेसच्या नेतृत्वाखाली म्हणजेच गांधीजींच्या नेतृत्वाखाली होती. ह्या मंडळींची अधिक नावे नोंदविण्याचे कारण नाही. पुढील कथांमधून नोंद असणारे विनायकरावजी विद्यालंकार हे आर्यसमाजाचे प्रमुख नेते होते. ते पुढे प्रांतिक सरकारात अर्थमंत्री झाले. पंडित नरेंद्रजी हे ह्यापैकीच. उमरी बँकेच्या योजनेत ज्या माणसाचा अत्यंत महत्त्वाचा भाग होता तो धनजी पुरोहित आर्यसमाजीच होता. पूर्ण कम्युनिस्ट, अर्ध कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना हैदराबादेत आर्यसमाजाबरोबर राहण्यात किंवा आर्यसमाजाला ह्या मंडळींबरोबर राहण्यात व दोघांनाही गांधीजींचे नेतृत्व स्वीकारण्यात हैदराबादला अडचण आली नाही.

हैदराबाद संस्थानाचे स्वरूप लक्षात घेता येथील जनतेच्या आंदोलनांना हिंदुत्ववादी रंग चढणे अगदी स्वाभाविक होते. नेते काहीही बोलत, जनता मुस्लिम अत्याचारांना वैतागलेली होती, त्यामुळे हे क्षेत्र हिंदुत्ववाद्यांना अतिशय सोयीचे होते. जिथे बहुसंख्याक कार्यकर्त्यांचा अहिंसेवर विश्वास नसतो आणि जिथे मुसलमानांच्या धार्मिक व राजकीय वर्चस्वाविरुद्ध प्राणपणाने लढायचे असते तिथे निदान हिंदुमहासभा बळवान झालेली दिसावी अशी अपेक्षा असते. हैदराबाद संस्थानात इ. स. १९३८ साली हिंदुमहासभेने नि:शस्त्र प्रतिकार आंदोलनाला आरंभ केला होता. पण हिंदुमहासभेला ह्या संस्थानात कधीही फारसा पाठिंबा मिळाला नाही. असे दिसते की, हिंदू समाज इंग्रजांच्या विरुद्ध

लढो की मुसलमानांच्या विरुद्ध लढो, सशस्त्र लढो की निःशस्त्र लढो, आंदोलनग्रस्त कृतिमग्न हिंदू समाजाचे नेतृत्व भारतात कुठेच हिंदुमहासभेला घेता आले नाही. कारणे कोणतीही असोत, सत्य हे असेच आहे.

हैदराबादच्या आंदोलनात अजून एक महत्त्वाची गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की, ब्रिटिश इंडियात मुसलमानांची एक समजूत अशी होती की, भारत मुसलमानांच्या हातून इंग्रजांनी जिंकून घेतलेला आहे. म्हणून मुसलमान इंग्रजांच्या विरुद्ध लढणे भाग आहे. सुशिक्षित मुसलमान पुरेसे धर्मप्रेम असणारे होते. ते इंग्रजांच्या विरुद्ध आंदोलन न करता डावपेचांच्या राजकारणातून पाकिस्तान मिळविण्याच्या प्रयत्नात होते. बहुसंख्य मुसलमानांचा पाठिंबा ह्या गटाला होता. ह्यांचे नेते जीना होते. पण वास्तवाचे भान नसणाऱ्या कर्मठ, धर्मवेड्या मुसलमानांचा इंग्रजी राजवटीला विरोध होता. ते हिंदूंच्या सहकार्याने लढू इच्छीत होते. ह्या गटाला आपण त्या काळी राष्ट्रवादी मुसलमान म्हणत असू. अपवाद वगळता बहुतेक राष्ट्रवादी मुसलमानांच्या डोक्यात इंग्रज निघून गेल्यानंतर भारतावर इस्लामी वर्चस्व स्थापन करण्याचे स्वप्न रुजलेले असे. हैदराबादेत परिस्थिती त्याहून निराळी होती. हैदराबाद संस्थानात काँग्रेसच्या राजकारणात असणारा मुसलमान जाणीवपूर्वक एक मुसलमानी राज्य समाप्त करण्यास वचनबद्ध झालेला होता. मुसलमानांचे राजकीय वर्चस्व आणि मुसलमानांचे धार्मिक वर्चस्व दोन्हीही उद्ध्वस्त करण्याची मनाने तयारी करायची आणि त्या बेबंद राजवटीत ह्या स्वप्नासाठी आत्मबलिदान करायला तयार व्हायचे, असे ह्या कार्यकर्त्यांचे स्वरूप आहे. भारतातील राष्ट्रवादी मुसलमानांच्याबरोबर ह्या शंभर टक्के खऱ्या लोकशाहीने राष्ट्रवादाने भारलेल्या देशभक्तांची तुलना न करता नेहमीच ती आपल्याला भगतसिंह, चंद्रशेखर, आझाद इ. क्रांतिकारकांच्या रांगेत करावी लागेल. ह्या थोर देशभक्तांना आपण अजून न्याय दिलेला नाही. त्यांच्यातील प्रमुख दोन नावे नोंदविणे इथे भाग आहे. एक हुतात्मा शोईब उल्लाखान हे होते. ज्यांची कथा ह्या संग्रहात आलेली आहे. मला त्यांच्याइतकेच दुसरे नेते कै. सिराज उल हसन तिरमिजी हे दिसतात. तिरमिजी आमच्या शेवटच्या जनता आंदोलनाला आरंभ होण्याच्या पूर्वी काही महिने आकस्मिकपणे वारले. ज्या काँग्रेसच्या अधिवेशनाने जनता आंदोलनाची घोषणा केली त्या अधिवेशनाला ह्या नेत्याचे नाव देण्यात आले होते.

खिलाफतच्या आंदोलनात काँग्रेसच्या राजकारणाकडे काही मुसलमान खेचले गेले होते. ह्याच प्रभावातून तिरमिजींचा उदय होतो. गांधींचे आंदोलन मुस्लिम समाजाच्या आणि मुस्लिम धर्माच्या हिताचे नाही, हे चित्र जसजसे उघड झाले तसतसा एकेक मुस्लिम नेता गांधींना सोडून जीनांकडे गेला. पण तिरमिजी क्रमाने काँग्रेसच्या राजकारणात रमले. १९३८ च्या सत्याग्रहात ते होतेच. दीर्घकाळापर्यंत ते हैदराबाद शहर काँग्रेसचे अध्यक्ष होते. जातीयवादाच्या विरुद्ध लोकशाही स्वातंत्र्याचा आवाज वर्षानुवर्षे निजामाच्या नगरीत घुमवीत ठेवणारा हा एक लोकविलक्षण नेता होता. ज्याच्यासाठी आत्मसमर्पण ही सहज क्रीडा होती. हुतात्मा पानसरे मारले गेल्याची बातमी जेव्हा हैदराबादेत आली त्यानंतर भरलेल्या कंदास्वामीबाग येथील प्रचंड जाहीर सभेत तिरमिजींनी हैदराबादच्या एकूण राजकारणावर आग ओकणारे भाषण केले, त्याचा, मी श्रोता होतो. बोलताना भावनेच्या आवेगात तिरमिजी म्हणाले, "पानसरे भाग्यवान ठरले. कारण त्यांना एका विशिष्ट दिवशी हुतात्मा होता आले. मी गेले एक तप रोजच मरणाच्या सावलीखाली आहे. हे माझे व्याख्यान आपण माझ्याही शोकसभेचे व्याख्यान समजावे; पण ह्या बलिराजाचा शेवट बलिदान घेणाऱ्या शक्तीचा संपूर्ण अस्त होण्यात होणार आहे, हे अत्याचारी राजवटीने लक्षात ठेवावे!" आणि शेवटी उर्दू शेर म्हटला त्याचा अर्थ असा होता, कत्तल करणाऱ्या समशेरीत जोर किती आहे ह्याचीच आता परीक्षा सुरू झाली आहे. शोइब उल्लाखानच्या बरोबर तिरमिजींला अभिवादन केल्याशिवाय मला मार्ग नाही.

पारतंत्र्यातील संस्थानी काँग्रेसचे शेवटचे अधिवेशन जूनच्या मध्यावर इ. स. १९४७ साली झाले. ह्या वेळेपर्यंत काही बाबी स्पष्ट झाल्या होत्या. निजामाची इच्छा भारतात विलीन न होता स्वतंत्र राष्ट्र होण्याची आहे, हे स्पष्ट होत होते. ही घटना घडू दिली जाणार नाही, ह्याविरुद्ध प्रचंड आंदोलन काँग्रेस उभारील, हेही स्पष्ट झाले होते. ह्या अधिवेशनातच बीदर जिल्ह्यातील त्या वेळचे एक तरुण जहाल कार्यकर्ते मुरलीधर कामतीकर ह्यांनी निजामाला जाहीरपणे अशी धमकी दिली की, "हे निजाम, जनतेशी टक्कर घेण्याच्या भानगडीत तू पडू नकोस. आम्ही तुझे डोके फोडू." तेव्हा आंदोलन कसे चालणार हे उघडच होते. हैदराबाद संस्थानात कायद्याचे राज्य नाममात्रच होते. रझाकार कोणताही कायदा पाळण्यास तयार नव्हते. त्यांचे अत्याचार राजरोस चालू असत. ह्या आंदोलनाच्या विरुद्ध ही अत्याचारी शक्ती मोठ्या प्रमाणात वापरली

जाणार हे उघडच होते. अशा वेळी अहिंसक आंदोलन शक्य नव्हते. काँग्रेसने नि:शस्त्र आणि सशस्त्र अशा आंदोलनांचा दुहेरी विचार करून ठेवलेला होता. हा विचार करूनच जनतेला आंदोलनाची हाक देणारा प्रस्ताव अधिवेशनात मांडला.

सर्वच कार्यकर्त्यांना एका गोष्टीची जाणीव होती की, हा असामान्य लढा आहे. ह्या लढ्यात एक तर निजामाचे संस्थान समाप्त होईल अगर भारतीय राष्ट्राच्या ठिकऱ्या उडवल्या जातील; म्हणून तडजोडीला येथे वाव नव्हता. वाटाघाटींसाठी आंदोलन मागे घेण्याची शक्यता नाही. काही दिवस थांबून पुन्हा नव्याने आंदोलन सुरू करावे, हे येथे घडणार नाही. ह्या अधिवेशनातच बाबासाहेब परांजपे ह्यांनी तरुणांना बोलताना असे सांगितले, 'मित्रहो, महामृत्युंजयाचा जप रोज करीत राहा आणि आजपासून आपले शरीर साडेतीन हाताचे नसून तीनच हातांचे उरले आहे, ह्याची खूणगाठ बांधून ठेवा!' ह्याही सभेला मी उपस्थित होतो. तसा अधिकृतरीत्या लढा ७ ऑगस्ट १९४७ ला स्वामी रामानंद तीर्थ ह्यांच्या सत्याग्रहापासून सुरू होतो, पण त्यापूर्वीच अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले असून सशस्त्र आंदोलन चालवण्यासाठी एक कृतिसमिती नेमलेली होती. ह्या कृतिसमितीचे नेते भूमिगत होते व ते संस्थानाबाहेरून मार्गदर्शन करीत होते. काँग्रेसने अधिकृतपणे सशस्त्र आंदोलनाची तयारी केली, त्याचे मार्गदर्शन केले आणि आंदोलन संपल्यानंतर सुद्धा अधिकृतपणे ह्या आंदोलनाचे दायित्व जाहीरपणे स्वीकारले. मी ह्या ठिकाणी नमूद करू इच्छितो की, स्टेट काँग्रेस सशस्त्र आंदोलनाचे नेतृत्व करीत आहे, ही गोष्ट स्पष्टपणे महात्मा गांधींना काँग्रेसच्या अध्यक्षांनी म्हणजे स्वामीजींनी सांगितलेली होती, आणि गांधींनी भेकडपणे पळून जाण्यापेक्षा शक्य असेल त्या मार्गाने अत्याचाराचा प्रतिकार करण्याचा जनतेचा हक्क मान्य केलेला होता. ते म्हणत, हा लढा बलिदान करू इच्छिणाऱ्या श्रद्धावान अहिंसकांनी आपल्या बलिदानाने रंगविला असता तर मला आवडले असते; पण अशा बलिदानाची तयारी नसणाऱ्या मंडळींनी भेकडपणे पळून जाणे अगर लाचारी पत्करणे ह्यापेक्षा मी हे प्रतिकार करणारे लोक श्रेष्ठतर मानतो.

हैदराबादच्या जनता आंदोलनात एक भाग सत्याग्रहाचा आहे. फार मोठ्या प्रमाणात जनतेने सत्याग्रहाला प्रतिसाद दिला. लोकसंख्येच्या प्रमाणात विचार केला तर भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात लोकसंख्येशी सत्याग्रहाचे प्रमाण इतके कधीच नव्हते. एक भाग जंगल सत्याग्रहाचा आहे. त्याचेही स्वरूप प्रचंड होते. तिसरा भाग सशस्त्र

आंदोलनाचा आहे. ह्या मोठ्या प्रमाणावर हैदराबादेत सशस्त्र आंदोलन झाले तसे प्रमाण इतरत्र असणे शक्यच नव्हते. कारण संस्थानच्या चहूबाजूंनी भूमिगत कार्यकर्त्यांना आसरा घेण्यासाठी जमीनही होती आणि ती भारताची होती. सगळेच मोरारजी देसाईसारखे हटवादी नव्हते, काही द्वारकाप्रसाद मिश्रा ह्यासारखे जाणते होते. त्यामुळे शस्त्रसाह्य सुद्धा फार मोठ्या प्रमाणात असे.

हे सशस्त्र आंदोलन अधिकृत संघटनेच्या मार्गदर्शनाखाली अधिकृतपणे चाललेले असल्यामुळे त्यात काही ठळक महत्त्वाच्या बाबीही होत्या. एक म्हणजे आंदोलनाला शिस्तही होती. बँक लुटली गेली तरी लुटीत मिळालेला सर्व पैसा कार्यकर्त्यांनी पैची अफरातफर न करता मध्यवर्ती समितीकडे जमा केला. आंदोलन संपल्यानंतर सर्व पैशांचा हिशेव अधिकृत ऑडिटरकडून तपासून घेण्याच्या अवस्थेत सापडला. ह्या आंदोलनात अनेक प्रसंगी कार्यकर्तेही मारले जात, पण सामान्यपणे कधी भूमिगत कार्यकर्त्यांनी आपल्या सहकाऱ्याचे प्रेत विटंबनेसाठी शत्रूच्या हाती पडू दिले नाही. कधीही अयशस्वी झालेल्या कार्यक्रमानंतर कार्यकर्ते विस्कळितपणे पळाले नाहीत. आंदोलन संपल्यानंतर जागोजाग ह्या कार्यकर्त्यांनी संस्थानी हद्दीत जाहीर रीतीने प्रवेश करण्यापूर्वी समारंभपूर्वक भारतीय अधिकाऱ्यांना आपल्याजवळची एकूण एक शस्त्रे परत केली आणि त्यांनी त्या त्या ठिकाणच्या अधिकाऱ्याकडून पंचनामे करून पावत्या घेतल्या. १९४२ च्या आंदोलनानंतर काय घडले आणि आंदोलन चालू असताना काय घडले ह्याच्याशी याची तुलना करण्याजोगी आहे. अधिकृत, सुसूत्र, संघटित आंदोलन आणि ज्याने त्याने आपापल्या इच्छेनुसार आखलेला कार्यक्रम ह्यात इतका फरक राहणारच.

हैदराबादच्या जनतेच्या इच्छेने हे आंदोलन रोमहर्षक होते, हे खरे असले तरी एकूण परिस्थिती लक्षात घेता निजामाचे राज्य उलथून पाडण्यास ही शक्ती पुरेशी नव्हती. भारतीय फौजा जो चमत्कार चार दिवसांत घडवून आणू शकल्या तो चमत्कार वर्षभर लढूनही आम्ही घडवून आणू शकलो नसतो. दोन लक्ष सशस्त्र रझाकार आणि चाळीस हजारांच्या सशस्त्र फौजा ह्यांच्याशी उघड्या मैदानात प्रतिकार करण्याची व त्यांचा पाडाव करण्याची शक्ती आमच्या आंदोलनात नव्हती. भारतीय फौजांनी हस्तक्षेप केला नसता तरीही आमचे आंदोलन यशस्वी झालेच असते, पण मग तो प्रदीर्घ आणि रक्तरंजित इतिहास झाला असता. आहे त्या अवस्थेत सुद्धा रझाकारांनी

केलेल्या विविध अत्याचारांच्या कहाण्या कमी किळसवाण्या नाहीत. गावेच्या गावे जाळणे, बायकामुलांसह कत्तली करणे, स्त्रियांच्यावर बलात्कार करणे हा रझाकारांचा नित्याचा खेळ होता. आपल्या शस्त्रबळाच्या जोरावर जनतेला आपण भयभीत, लाचार आणि मूक करू शकू, त्यांच्या स्वाभिमानाचा कणा आपण मोडून टाकू व जनतेला गुलामगिरी स्वीकारणे भाग पाडू शकू, असा इत्तेहादुल मुसलमीनच्या नेत्यांचा अंदाज होता. ह्या प्रयत्नाला कधी यश येऊ नये एवढी ताकद आमच्या आंदोलनात निश्चित होती.

आंदोलनाच्या आरंभीच जुलै महिन्यात सरदार पटेलांनी कृतिसमितीचे अध्यक्ष श्री. दिगंबरराव बिंदू ह्यांना हे स्पष्टपणे सांगितले होते की, आम्ही एक वर्षभर तुम्हांला फारशी मदत करू शकणार नाही; पण त्यानंतर मात्र आम्ही हा प्रश्न शक्य तितक्या लवकर संपवू. सरदारांच्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट होता. १५ ऑगस्टला जरी भारत स्वतंत्र झाला तरी युरोपियन सेनापतीने सूत्रे खाली ठेवल्याशिवाय आणि इंग्रज गव्हर्नर जनरल माऊंटबॅटन निवृत्त झाल्याशिवाय सरदार लष्करी कारवाई करू शकले नसते; आणि दुसऱ्या कोणत्याही मार्गाने हा प्रश्न सुटणारा नव्हता. आपण तारखा पाहून घेतल्या तर असे दिसेल की, माऊंटबॅटन ह्यांनी निरोप घेतल्यानंतर सरदारांनी शब्द दिल्याप्रमाणे मोठ्या वेगाने हा प्रश्न सोडवून दाखवला. येथे सरदार म्हणताना, मला पंडित नेहरूही अभिप्रेत आहेत. कारण अंतिमतः पंतप्रधानांनी मान्यता दिल्याशिवाय प्रश्न सुटू शकत नव्हता. पंडित नेहरूंना निर्णयावर येण्यास फारसा उशीर लागत नसे. ते चटकन निर्णयावर येत; पण निर्णयाची अंमलबजावणी करीत असताना त्यांची चालढकल सुरू होत असे. हैदराबाद संस्थान संपले पाहिजे, हा नेहरूंचा निर्णय होता. तोच गांधीजींचाही निर्णय होता. सरदार वल्लभभाई पटेल हे फार विचार करून आणि अत्यंत धीमेपणाने उशिरा निर्णयावर येत. पण एकदा निर्णय ठरल्यानंतर अतिशय दृढपणे तो निर्णय ते तातडीने अंमलात आणीत. हैदराबाद-प्रकरणी निर्णय जुनेच ठरलेले होते, ते निर्दोषपणे व दृढपणे अंमलात आणण्याचे श्रेय मात्र सरदार पटेलांना दिले पाहिजे.

निजामाचा धूर्त डाव हा की, १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत हैदराबाद भारतात सामील करायचे नाही. १५ ऑगस्ट रोजी इंग्रजांचे प्रभुत्व संपले. त्या दिवशी भारत व पाकिस्तान ही दोन राष्ट्रे अस्तित्वात आली. ह्या दिवशी कुठेच विलीन न झालेले

एकमेव संस्थान हैदराबाद होते. इतरांची विलीनीकरणावर जाहीर सही झालेली होती, किंवा खाजगीरीत्या आतून एकमेकांना तसे शब्द दिले गेले होते. राहिले फक्त हैदराबाद संस्थान. ह्या संस्थानावरील ब्रिटिश प्रभुत्व संपले आणि हे संस्थान भारत व पाकिस्तान ह्यांपैकी कुठेच सामील झाले नाही. म्हणजे ते तत्त्वतः स्वतंत्रच आहे. हे हैदराबादचे स्वातंत्र्य व्यवहारातही सिद्ध झाले असते. निजामाला राष्ट्र स्वतंत्र करण्यासाठी ह्याहून अधिक काहीच करण्याची गरज नव्हती. कोणताही प्रश्न एकेरीवर आणून तातडीने चिघळवण्याची निजामाची इच्छा नव्हती. म्हणून १५ ऑगस्ट उलटून गेल्यानंतर हैदराबादच्या वतीने भारत सरकारला असे कळवण्यात आले की, हैदराबादची भारतीय राज्याशी मैत्रीचे व आत्मीयतेचे संबंध ठेवण्याची इच्छा आहे व त्या दृष्टीने वाटाघाटी करण्यास हैदराबाद तयार आहे.

हैदराबादच्या राजकारणात परस्परपूरक असे दोन प्रवाह होते. धूर्त, चतुर मुत्सद्द्यांचा एक प्रवाह. ह्या प्रवाहाचे सर्वश्रेष्ठ नेते स्वतः निजामच होते. झैनी यार जंग, मोईजनवाज जंग हे ह्या क्षेत्रातील अनुयायी आणि ब्रिटिश वकील सर वॉल्टर मॉक्टम हे निजामाचे तज्ज्ञ सल्लागार होते. हा एक प्रवाह होता. वाटाघाटी लांबवीत राहणे, वर्षानुवर्षे प्रश्न चिघळवीत ठेवणे व वहिवाटीने स्वातंत्र्य सिद्ध करणे हे ह्या प्रवाहाचे प्रयोजन होते. एक अत्याचारी पिसाट गट होता. कासिम रझवी हे ह्या गटाचे प्रमुख नेते होते. हे उघडपणे जाहीर सभांतून १ कोटी ४० लक्ष हिंदूंची आम्ही कत्तल करू असे सांगत असत. शिवाय हिंदुस्थानात असणारे आमचे साडेचार कोटी बांधव आम्हाला मदतनीस होतील, असेही ते जाहीरपणे बोलत. महमद रौफ लायक अली आणि इब्राहिम हे रझवीचे प्रमुख अनुयायी होते. भारत सरकारच्या वतीने वाटाघाटीच्या चिवटपणाला पंडित नेहरू हे उत्तर होते आणि धर्मवेड्या पिसाटपणाला सरदार पटेल हे उत्तर होते.

वाटाघाटीच्या पहिल्या फेरीतच पंडित नेहरूंनी हे स्पष्ट केले की, ब्रिटिश राज्याचे वारसदार भारत सरकार असल्यामुळे ब्रिटिश प्रभुत्वाचा वारसा भारत सरकारकडे आलेला आहे. हैदराबादने इतर सर्व संस्थानांप्रमाणे भारतात विलीन होणे अगर जनतेच्या सार्वमताला तयार होणे हे दोनच पर्याय शिल्लक आहेत. माऊंटबॅटन ह्यांनी खाजगीपणे ही गोष्ट नजरेस आणून दिली होती की, हैदराबादने दुबळी समजावी अशी भारतीय फौजांची परिस्थिती नाही. ऑगस्ट अखेरीपासून ह्या वाटाघाटींचा पहिला

टप्पा आरंभ होतो. ऑक्टोबरच्या मध्यापर्यंत जैसे थे कराराचा मसुदा तयार झालेला होता. ह्या कराराकडे हैदराबाद दोन स्वतंत्र राष्ट्रांतील करार म्हणून पाहात होते. हा मसुदा तयार होईपर्यंत हैदराबादच्या वतीने अलियावर जंग हे काम पाहात होते. ते व्यक्तिशः निजामाचे आणि हैदराबाद संस्थानचे त्या वेळी कायदेशीर सल्लागार होते. पण अलियावर जंग ह्यांचे मत जास्तीत जास्त सवलती मिळवून हैदराबादने भारतात विलीन व्हावे, असे पडले. त्यामुळे त्यांना जाहीर मारहाण करण्यात आली. पुढे अलियावर जंग अलिप्तच राहिले.

ऑक्टोबरच्या मध्यावर सिद्ध झालेल्या जैसे थे करारावर निजामाने सही केली नाही. उलट वाटाघाटी मोडल्या असे जर भारत सरकारने जाहीर केले तर आपण पाकिस्तानशी वाटाघाटी करू अशी घोषणा केली. काश्मीरवर ऑक्टोबरअखेर पाकिस्तानने हल्ला केला. त्याच्या प्रतिकारार्थ तातडीने भारतीय फौजा तिथे पोहोचल्या. अपेक्षेप्रमाणे पाकिस्तानचा विजय झाला नाही. उलट पाकिस्तानला महत्त्वपूर्ण माघार घ्यावी लागली. ह्याच वेळी जुनागढ पाकिस्तानात विलीन झाले अशीही पाकिस्तानने सप्टेंबर महिन्यात घोषणा केली होती. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात भारताने जुनागढवर पोलिस ॲक्शन घेतली. जर हैदराबादने पाकिस्तानशी वाटाघाटी सुरू केल्या तर भारत लष्करी हस्तक्षेप करील आणि पाकिस्तानकडून कोणतीही मदत मिळणार नाही, ह्याची खात्री झाल्यानंतर २९ नोव्हेंबर १९४७ ला हैदराबादने जैसे थे करारावर सही केली. कोणताही करार न करता वेळ काढण्याच्या हैदराबादच्या भूमिकेचा हा पराभव होता. या वेळापर्यंत रझवींचे मित्र लायकअली हैदराबादचे पंतप्रधान झालेले होते. त्यामुळे पोलिस आणि रझाकार ह्यांचे अत्याचारात जाहीर सहकार्य दिसू लागले.

जैसे थे कराराच्यानंतर अत्याचाराला ऊत आला. ह्याचे एक कारण तर हे की, हैदराबादचे स्वातंत्र्य वाटाघाटीच्या चातुर्यातून सिद्ध होणार नाही, हे आता हैदराबादच्या नेत्यांना कळून चुकले होते. दुसरे म्हणजे जैसे थे करारानंतर भारतीय फौजा हैदराबाद संस्थानातून काढून घेण्यात आल्या होत्या. त्यामुळे रझाकारांचा निर्भयपणा वाढलेला होता. कासिम रझवी हे सारखे युद्ध जास्त भडकावीतच चाललेले होते. हैदराबादेत जे अत्याचार झाले त्यात तुलनेने बिबीनगर येथील दरोडा हे किरकोळ प्रकरण आहे. पण ह्या दरोड्यांचे ऐतिहासिक महत्त्व ह्यात आहे की, ह्या प्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी कासिम रझवीच स्वतः हजर होते व हे निर्विवाद सिद्ध करण्याचा पुरावा उपलब्ध होता.

ह्या पुराव्यावरच पुढे कासिम रझवींना सात वर्षे सक्तमजुरीची शिक्षा झाली. एक आंतरराष्ट्रीय गुंड सिडने कॉटन ह्याने हैदराबादला चोरटी शस्त्रे पुरविण्याचा उद्योग सुरू केला होता. त्याला गोव्यात उतरण्याची परवानगी सालाझार सरकारने दिलेली होती. सिडने कॉटन भारतात फारशी शस्त्रे आणू शकला नाही, पण वातावरणनिर्मितीला त्याचा उपयोग झालाच. ह्या सर्व कारणांमुळेच क्रमाने जैसे थे करारानंतर हैदराबाद येथील अत्याचार वाढतच गेले. पैकी सर्वांत जास्त अत्याचार रझाकारांनी बीदर जिल्ह्यात केले.

खरे म्हणजे निजामाला शांततेचा मार्ग अधिक उपयोगी ठरू शकला असता. हैदराबादेतील मुसलमानांना तर हे स्वतंत्र राष्ट्र हवेच होते; पण त्याखेरीज सर्व प्रमुख वतनदार आणि जहागीरदारांना आपल्या इस्टेटीच्या संरक्षणार्थ हैदराबाद हवेच होते, संस्थान विलीन झाल्यानंतर ह्या जहागिरीही गेल्या - संपल्या, त्या तशा संपणार ह्याची वतनदारांना जाणीव होती. बी.एस.व्यंकटराव, श्यामसुंदर ह्यांच्यासारखे काही दलित नेते रझाकारांच्या बरोबर होतेच. ह्यामुळे सर्व दलित समाज आपल्याबरोबर आहे, असे सोंग आणता येणे शक्य होते. मुस्लिम वर्चस्व होतेच. काही भीती, काही सवलती ह्यांच्या जोरावर हिंदूंचा एक मोठा विभाग निजाम आपल्याबरोबर ठेवू शकत होता. विदर्भातील काही देशद्रोही नेत्यांना विदर्भही हैदराबादेत विलीन व्हावा असे वाटत होते, तसे प्रयत्न त्यांनी सुरू केले होते. ह्या गटात कोण होते ह्याचा अंदाज प्रकाशित झालेल्या सरदार पटेलांच्या पत्रव्यवहाराच्या हैदराबाद खंडावरून येऊ शकेलच. स्वतःला काँग्रेसमन म्हणवणारे जी. रामाचारीसारखे नेते निजामाला वश होतेच. स्वतः कन्हैय्यालाल मुन्शींच्याजवळ बोटचेपेपणा भरपूर होता. ते हैदराबादेत भारत सरकारचे प्रतिनिधी होते. इतरत्र मी ह्या विषयावर विस्ताराने लिहिलेले आहे तेव्हा निजामाला हिंदू सामील नव्हतेच असे समजण्याचे कारण नाही. पण ह्या पिसाट नेतृत्वाला ह्याचा फायदा घेता आला नाही; आणि तो घेता येऊ नये ह्याविषयी पंडित नेहरू दक्ष होते. सार्वमतापूर्वी शांतता प्रस्थापन आणि रझाकार संघटनेवर बंदी, ह्या संघटनेजवळची शस्त्रे काढून घेणे, ह्या काही अटी होत्या. जवळ जवळ सार्वमताची कल्पना स्वीकारणे त्यांनी निझामाला अशक्यच करून टाकले होते.

कासिम रझवी ह्यांच्याजवळ व त्यांच्या प्रभावामुळे सर्व इत्तेहादुल मुसलमीनजवळ अहंता, क्रौर्य व भित्रेपणा, मूर्खपणा ह्यांचे चमत्कारिक मिश्रण झालेले होते. आपण

मुंबई जिंकू, मद्रास जिंकू, हिंदूंच्या कत्तली करू, दिल्लीच्या लाल किल्ल्यावर निजामाचा झेंडा फडकवू, अशा घोषणा कासिम रझवी करीतच असत. ह्या घोषणांच्या बरोबर रझाकारांचे क्रौर्य व अत्याचार वाढतच असत, पण कासिम रझवी सुद्धा मुस्लिम समाजात धैर्य व शौर्य निर्माण करू शकत नसत. मनातून सगळा समाज बावरलेला, घाबरलेला असे. मध्येच एखादे गाव प्रतिकारासाठी सज्ज होई, हा प्रतिकार मोडून काढणे रझाकारांना फार कठीण जाई. पुढच्या कहाण्यामध्ये एक कहाणी हुतात्मा बहिरजींची आहे. हा माझ्याच तालुक्यातला हुतात्मा. त्याचे गाव वापटी. हे गाव तसे फारसे मोठे नव्हते. उणीपुरी तीन-चारशे ह्या गावची लोकसंख्या होती. लोकांच्या जवळ फारशी हत्यारे नव्हती. गोफण हे त्यांचे मुख्य हत्यार. असलेल्या लोकसंख्येत म्हातारे व मुले सोडल्यास प्रतिकारास सज्ज स्त्री-पुरुष ह्यांची संख्या दीडशेपेक्षाही कमी होती. ह्या गावावर दीडदीड हजार रझाकार बंदुका घेऊन हल्ला करण्यासाठी जात, आणि अयशस्वी होऊन परत येत. ह्या गावाने असे एकूण चार मोठे हल्ले त्या काळात परतवून लावले. एक तीनचारशे लोकसंख्येचे गाव अतिशय चिवटपणे सतत चार महिने टिकाव धरून राहते, ही गोष्ट रझाकारांच्या चिवटपणाची, धैर्याची, शौर्याची म्हणता येणार नाही. अशा घटना शेकडो ठिकाणी त्या काळी घडत. प्रत्यक्ष पोलिस ॲक्शन झाली, तेव्हाही प्रतिकार फारसा झालाच नाही. धैर्य सुटलेले रझाकार वाट सापडेल तसे पळतच राहिले. त्यांना विजय मिळवता आला नसताच, पण कुठे तरी चिवट प्रतिकार तर करता आला असता. पण ते घडलेले दिसत नाही. त्या पिसाट परंपरेत शांततेच्या काळात संयमाची प्रथा नाही; विजयात औदार्याची प्रथा नाही आणि प्रतिकूल परिस्थितीत मनाची जिद्द न गमावता चिवट प्रतिकार करण्याची प्रथा नाही. क्रौय आणि भेकडपणा, उद्दामपणा आणि हिंमत हरणे असा चमत्कारिक विसंवाद धर्मवेड्यांच्या ठिकाणी दिसावा हे आश्चर्य आहे. जैसे थे करार झाल्यानंतर वाटाघाटीचे दुसरे पर्व सुरू झाले. ह्या दुसऱ्या पर्वात मार्चअखेरपर्यंत फारसे काहीच घडले नाही. एप्रिलनंतर भारत सरकारच्या वतीने माऊन्टबॅटन ह्यांच्या आग्रहाखातर आणि सरदार पटेल ह्यांच्या संमतीने दर फेरीत काही नव्या सवलती देऊन हा प्रश्न मिटवावा अशी माऊंटबॅटनची इच्छा होती. प्रत्येक सवलतीबरोबर हैदराबादेतील भ्रम आणि उद्धटपणा वाढतच जाणार आहे म्हणून जगासमोर हैदराबाद हास्यास्पद करून दाखवावे ही सरदार पटेलांची इच्छा होती. पंडित नेहरू ह्यांना चालू आहे ते अजीबात मान्य नव्हते,

पण काय करावे ह्याविषयी निर्णायक भूमिका घेण्यास ते तयार नव्हते. जास्तीत जास्त सवलती देणारी शेवटीच माऊंटबॅटन योजना सुद्धा निजामाने फेटाळली आणि त्यानंतर माऊन्टबॅटन इंग्लंडला चालते झाले. हा प्रश्न लष्करी हस्तक्षेपाशिवाय सुटणार नाही हे नेहरूंनाही आता दिसू लागले आणि लष्करी हस्तक्षेप म्हटल्याबरोबर सर्व सूत्रे पटेलांच्या हाती आली.

परिस्थिती कोणते वळण घेते आहे ह्याचा अंदाज हैदराबादेतील चतुर मुस्लिमांना येतच होता. जास्तीत जास्त सवलती मिळवून हैदरबादने भारतात विलीन व्हावे असे ह्या चतुर मंडळींचे आता मत झाले होते. अलियावर जंग, ह्यांच्या प्रेरणेने मेहेंदी नवाज जंग, मंजूरयार जंग व इतर मंडळींनी दिलेल्या सवलती स्वीकारून हैदराबादने भारतात विलीन व्हावे असे जाहीर प्रतिपादन करणारे पत्रक काढले होते. ह्या भूमिकेला युवराज मौजम जहा आणि त्याची पत्नी ह्यांचाही पाठिंबा होता. ही मोठी देशभक्त मंडळी नव्हेत. अतिरेकी भूमिका घेऊन सर्वस्व गमावण्याचा 'जुव्वा' आपण खेळू नये. आपल्या सर्व सुखसोयी जास्तीत जास्त सांभाळून न पेलणारा डाव खेळणे टाळावे इतकेच ह्यांचे म्हणणे होते. पण असे सल्ले स्वीकारणे आता निजामाला सोपे नव्हते. कारण धर्मवेड्यांचे नेतृत्व आता पूर्णपणे रझवींच्या हाती गेले होते, आणि कासिम रझवी स्वतःला मुजाहिदे आझम म्हणजे श्रेष्ठ हुतात्मा व धर्मात्मा असे म्हणवून घेत होते. ते हैदराबादेत धर्मयुद्धाचा महान इतिहास लिहून घेऊ इच्छीत होते. पण स्वतःला धर्मवीर मानणारा हा माणूस आत्महत्या करण्याचे धैर्य सुद्धा दाखवू शकला नाही आणि सरदार पटेलांनी त्याला शत्रुपक्षाचा बंडखोर नेता म्हणून फासावर चढवले नाही. पटेलांच्या मते रझवीच्या लायकीला सामान्य डाकू म्हणून पाच-सात वर्षाची शिक्षा पुरेशी आहे. त्याने पळून जाऊन पाकिस्तानात मरावे हेच भवितव्य त्याला इष्ट आहे. त्याच्या जीवनात कोणतेही दिव्य उज्वल स्थान सरदार शिल्लक ठेवू इच्छीत नव्हते. हा महान धर्मवीर कैद भोगून सुटला. नंतर पाकिस्तानात गेला व तेथे एक किरकोळ प्रसिद्धखात्यातील अधिकाऱ्याची नोकरी करीत करीत वारला.

आज हैदराबादच्या पोलिस ॲक्शनकडे पाहिले म्हणजे निजामाने हा मूर्खपणा का केला हे समजतच नाही. पाकिस्तान मदतीला येऊ शकणार नाही हे जुनागढ प्रकरणी सिद्ध झाले होते. हैदराबाद भोवताली क्रमाने लष्करी वेढा आवळला जात होता. ही गोष्ट जूनपासून उघड होती. सरहद्दीवर लष्कर उभेच होते. २४ जुलै रोजी

नानज ह्या ठिकाणी भारतीय लष्कराने लष्करी हस्तक्षेप करून एक गाव ताब्यात घेतले होते. तिथे हल्ला करण्याची हिंमत रझवींही दाखवू शकत नव्हते. आपल्याजवळ रणगाडे नाहीत, रणगाडाविरोधी तोफा नाहीत, विमाने नाहीत, विमानविरोधी तोफा नाहीत, आपण चहू बाजूंनी घेरलेले आहोत, प्रतिकार आपल्याला शक्य नाही, अशा वेळी मिळतील त्या सवलती पदरात पाडून घेऊन भारतात विलीन होणे शहाणपणाचे ठरले असते. पण ते निजाम आणि रझवींनी पत्करले नाही. ६ सप्टेंबरपासून भारत सरकार हे बजावीत होते की, हैदराबादेत कायदा व सुव्यवस्था संपूर्णपणे कोसळलेली असून तिथे अराजक माजलेले आहे, हे आपण तटस्थपणे पाहू शकत नाही. तातडीने ही परिस्थिती सुधारली नाही तर आपण हस्तक्षेप करू. ह्यानंतर कोणत्याही क्षणी भारतीय फौजा हैदराबादेत घुसतील हे उघड होते. अशा वेळी निदान हैदराबाद संस्थानने प्रमुख पूल उडवून अडथळे उभारावेत. किमान प्रतिकार करावा. फौजांनी एखाद्या ठिकाणी एखादा दिवस तरी लढावे. हेही घडले नाही आणि शक्तीच नसेल तर तातडीने तडजोड करावी, हेही इथे घडले नाही. १३ सप्टेंबर १९४८ ला सकाळी पोलिस ॲक्शन सुरू झाली. त्याच दिवशी सायंकाळपर्यंत औरंगाबाद हे सुभ्याचे ठिकाण पडले. १६ ला संध्याकाळपर्यंत लढाई संपलेली होती. भारतीय फौजा हैदराबादशेजारी आलेल्या होत्या. १७ ला अधिकृतरीत्या हैदराबादेत शरणागती पत्करली व भारताच्या प्रादेशिक अखंडतेच्या युद्धाचा विजयी शेवट झाला.

हैदराबाद मुक्ति-संग्रामाची ही एक संक्षिप्त व ढोबळ रूपरेखा आहे. हिच्यातील सर्वच बाजूंचा अतिशय तपशिलाने आणि बारकाव्यानिशी आढावा घेतला जाण्याची जरूर आहे. कारण ह्या भूमीवर भारताच्या प्रादेशिक अखंडतेचा निर्णय लागणार होता. जनतेचे लढवय्ये व संस्थान विलीनीकरणाचा प्रश्न नसून राष्ट्राच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे, हे समजूनच लढत होते. पशुतुल्य क्रौर्य, अनन्वित अत्याचार, पिसाट धर्मवेड एकीकडे आणि आत्मबलिदानाच्या, पराक्रम-शौर्याच्या सहस्त्र घटना दुसरीकडे असा रोमहर्षक कालखंड आहे. त्यातील काही कहाण्या अशोक परळीकरांनी नोंदविल्या आहेत. मी प्रस्तावनेच्या रूपाने ह्या कहाण्यांची चौकट सांगत आहे. हा काल आपण कर्तव्यभावनेने जगलो ह्याचा अभिमान त्या लढ्यातील प्रत्येक कार्यकर्त्याला जीवनाच्या शेवटापर्यंत वाटत राहणार आहे. एवढेच समाधान लढ्यातील कार्यकर्त्यांना मिळत असते आणि इथेच कर्तव्य-भावनेचा शेवट झाला पाहिजे.

❋ ❋ ❋

(लेखन काळ इ. स. १९७५)

## १४.

# भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

**व्याख्यान पहिले :**

काही विचारवंतांनी सेलूच्या श्रोत्यांसमोर यावे म्हणजे महाराष्ट्रातल्या सर्व क्षेत्रातील विचारवंतांच्या विचाराचा लाभ सेलूकरांना होईल आणि भांगडिया यांच्या स्मरणार्थ विचारप्रवर्तनाचे कार्यही सतत चालू ठेवता येईल असा विचार मांडून या व्याख्यानमालेची सुरुवात माझ्यापासून व्हावी असे प्राचार्यांनी कळविले. बोलायचे ठरले ते आपल्या जवळिकीचा एखादा सामाजिक प्रश्न निवडावा हेही पक्के झाले. जवळिकीचे प्रश्न थोडे नाहीत, पण नंतर असे सुचले की जे अनेक विचारवंत येथे येऊन महाराष्ट्राच्या निरनिराळ्या समस्यांविषयी विचार मांडतील त्यांपैकी क्वचितच कोणी हैदराबादच्या मुक्तिसंग्रामाविषयी बोलणे संभवनीय आहे. कारण हे आंदोलन ज्या मंडळींनी चालविले त्यांनी सुद्धा त्याला अभ्यासाचा व लेखनाचा विषय केलेला नाही. तेव्हा मी असे ठरविले आहे की, इतर ज्वलंत समस्यांचा विचार पुढच्या वक्त्यांकडे सोपवून आपण हैदराबादच्या मुक्तिआंदोलनासंबंधी बोलावे. भांगडिया यांचा या आंदोलनाशी जवळचा संबंध राहिलेला आहे. त्यांचे व्यक्तिमत्त्वच या आंदोलनामधून उदयास आले आहे. आंदोलन नसते तर भांगडिया हे एखाद्या सर्वसामान्य माणसासारखे जगले असते. त्यांनी थोडासा व्यापार केला असता, काही पैसा मिळवला असता. याशिवाय बाकीच्या भानगडीत ते पडले नसते. राजकीय, सामाजिक अशा सगळ्याच कार्यकर्त्यांच्या बाबतीत आपण ध्यानात घेतले पाहिजे की त्यांचे स्वतःचे व्यक्तिमत्त्व ही एक बाजू

आहे व त्या वेळच्या परिस्थितीची मागणी ही दुसरी बाजू आहे. परिस्थिती तशीच असली तर अनुकूल व्यक्तिमत्त्व नसणारी माणसे त्याही परिस्थितीत जगत असतात. सेलूमध्ये एक भांगडियाच राहात होते अशातला भाग नाही. इतरही असंख्य माणसे होती. पण पाचपंचवीस माणसे सोडली तर इतर मंडळींतून कार्यकर्ते निर्माण झाले नाहीत. परिस्थिती असली की नेतृत्व निर्माण होतेच अशातला भाग नाही. पण जेव्हा नेतृत्व निर्माण होते तेव्हा त्याला पोषक परिस्थिती असतेच. भांगडियांच्या नेतृत्वाला हैदराबाद मुक्तिआंदोलनाची पोषक परिस्थिती होती. या आंदोलनावर इतर कोणी बोलण्याचा संभव कमी. त्यामुळे त्याच्यावर मी बोलणार आहे.

या विषयावर बोलण्यासाठी मी विचारवंत असण्याची आवश्यकता कमी आहे. मी विचारवंत असलो काय आणि नसलो काय, या मुक्तिआंदोलनावर बोलण्याचा माझा अधिकार स्वयंभू आहे. स्वतःचा असा स्वयंभू अधिकार मानणारे आणखी अनेक आहेत. मी त्यांतला एक. या 'सेलू' गावामध्ये आज जी माणसे आहेत त्यांनी ते आंदोलन जितक्या जवळून पाहिले तितक्या जवळून ते पाहण्याचा योग मला आलेला नाही; कारण मी वयाने लहान होतो. त्यांचा जेवढा सहभाग आंदोलनात आहे तेवढा माझा असणे शक्य नाही. पण वयाने त्या वेळी लहान असलो तरी आंदोलनात सहभागी होणाऱ्यांपैकी मी एक होतो. या सेलू गावात मी जो माझ्या आयुष्यात पहिल्यांदाच आलो तो, या आंदोलनाच्या निमित्तानेच आलो होतो. वेळ रात्रीची. पत्रकांचे गठ्ठे या गावातील एका घरी चोरून पोचविण्यासाठी मी आलेला. सप्टेंबर महिन्याचा शेवटचा भाग होता. यापूर्वी मी सेलू गाव पाहिलेले नव्हते. काम दुहेरी. आमच्याकडच्या पत्रकांची बंडले त्या घरी पोहोचवायची व अजून आमच्याकडे न पोचलेल्या पत्रकांची बंडले तेथून न्यायची. ती वसमतला माझ्या गावी नेऊन पोचती करायची, वाटायची. या कामाच्या निमित्ताने मी सेलूला एका रात्री साडेनऊ-दहाच्या सुमारास उतरलो. शांतपणे पत्ता विचारीत विचारीत जायचे त्या घरी गेलो. त्या गृहस्थांना बंडले दिली. त्यांच्याकडची बंडले घेतली. स्टेशनवर आलो. इकडून जाणाऱ्या-येणाऱ्या गाड्या नेहमी उशिरा चालतात. त्याही दिवशी गाडी उशिराच येणार होती. मी स्टेशनवर पावसाच्या झडीत बारा वाजल्यापासून सकाळी सहा वाजेपर्यंत नुसता बसून राहिलो होतो. नंतर गाडी आली. मी वसमतला गेलो. त्यानंतरही मी त्या काळात आंदोलनाच्या कामासाठी सेलूला काही वेळा आलो होतो. सेलूपेक्षाही माझा संबंध वसमत तालुक्याशी जास्त आलेला आहे; आणि त्याहीपेक्षा

जास्त हैदराबाद शहराशी.

मी या लढ्यातला नेता वगैरे कोणी नाही ही गोष्ट जितकी स्पष्ट आहे तितकीच मी या लढ्यात सहभागी झालेला एक सैनिक आहे, हीही स्पष्ट आहे. लढ्याच्या निमित्ताने ज्या विद्यार्थ्यांनी शाळांवर बहिष्कार टाकला त्या विद्यार्थ्यांपैकी मी एक आहे. त्यासाठी आयुष्याची जी काही वैयक्तिक किंमत मोजावयाची असते, ती मी मोजलेली आहे. या किमतीविषयी माझी तक्रार तर नाहीच, उलट असली तर थोडीफार शक्यता अशी आहे की, आयुष्यातील तितकेच दिवस उपयोगी पडून सार्थकी लागले असे मी मानतो. आणि त्यामुळेच मी विचारवंत असलो काय आणि नसलो काय, या विषयावर बोलण्याचा माझा हक्कही मी मानतो. आता श्रोत्यांमध्ये विनायकरावांसारखे कोणी समोर असले तर मी त्यांना नम्रतेने आणि सौजन्याने सांगेन की, त्यांनी या विषयावर तपशीलवार सांगावे. कारण ते जेवढे सांगू शकतील तेवढे मी सांगू शकणार नाही. यातला सौजन्याचा नम्रतेचा वगैरे भाग ठीक आहे; पण फक्त विनायकराव असले तरच. उरलेल्या सर्व मंडळीला मी सांगणार की तुम्ही मी सांगेन ते ऐका. कारण तुम्हाला काहीच माहीत नाही व मला बरेच माहीत आहे. दुसरी एक अतिशय महत्त्वाची बाब आहे. ती म्हणजे ही की या आंदोलनामध्ये वरच्या पातळीवर जे नेतृत्व होते, त्या नेतृत्वाच्या अत्यंत निकट राहण्याची संधी मला आयुष्यात लाभलेली आहे. विशेष करून स्वामी रामानंद तीर्थांच्या आयुष्यातील शेवटची दहा वर्षे म्हणजे इ.स. बासष्ट ते बहात्तर असा कालखंड. या कालखंडात स्वामीजींना राजकारणात करण्यासाठी काही काम उरले नव्हते. त्यांना गप्पा मारायला भरपूर वेळ होता आणि मला ऐकून घेण्याची जिज्ञासा होती. त्या वेळी हैदराबादच्या राजकारणाविषयी प्रत्येक बारीकसारीक गोष्टीवर स्वामीजी माझ्याशी विस्ताराने बोलले. स्वामींना बोलण्यासाठी माझ्यापेक्षा जास्त लायक अशी गोविंदभाई श्रॉफसारखी अनेक माणसे होती. पण शिष्यत्वाच्या नात्याने स्वामींजवळ शंका विचारीत बसायला त्यांना वेळ नव्हता. आणि स्वामीजी जे बोलतील ते भोवतीच्या पुराव्यांशी ताडून पाहणे आणि जरूर तर दुरुस्त करून घेणे यालाही कुणाजवळ वेळ नव्हता. गोविंदभाईंशीही माझा संबंध आलेला आहे. सन त्रेपन्न-चौपन्नपर्यंत तो अत्यंत घनिष्ट राहिला आहे. लीग ऑफ सोशियालिस्टस्मध्ये (L.S.W.) एक तरुण मुलगा म्हणून मी होतोच. निवडणुकीत उभे राहणाऱ्यांपैकी नसलो तरी सभासद होतो. लीगचे काम संपल्यावर गोविंदभाईंनाही गप्पा मारण्यासाठी

भरपूर मोकळीक मिळाली तेव्हापासून त्यांच्याशीही मी चर्चा करीत आलो आहे. श्री. दिगंबरराव बिंदूशीही तपशिलाने बोलण्याची संधी मला मिळाली. बी. रामकृष्णराव, डॉ. मेलकोटे यांच्याशीही तपशिलाने बोलण्याचा योग आला. हैदराबाद आंदोलनाचे जेवढे महत्त्वाचे ज्येष्ठ नेते आहेत त्या सर्वांशी निरनिराळ्या वेळी निरनिराळ्या प्रश्नांवर मी बोललो आहे. त्यामुळे या विषयासंबंधीची पुष्कळशी इकडची तिकडची आणि बरीवाईट माहिती माझ्याजवळ जमा झालेली आहे. ही सर्व माहिती तीन व्याख्यानांत सामावली जाईल इतकी थोडी नाही. ती पुष्कळच जास्त आहे. पण तीन व्याख्यानांच्या मानाने ती जास्त असली तरी प्रत्यक्षात असावयास हवी त्यापेक्षा पुष्कळच कमी आहे. असलेली माहिती व्याख्यानांत समाविष्ट व्हावी म्हणून काही गोष्टींचा मी संक्षेप करणार आहे. जो सर्वांनाच माहीत असावा अशी अपेक्षा आहे तो भाग, ज्या मुद्द्यासंबंधी माझ्याखेरीज इतर माणसेही तपशिलाने बोलू शकतील असा भाग, यांचा विस्तार मी करणार नाही. आंदोलनाची आकडेवारी मी शक्यतो कमी देणार आहे. आंदोलनामागचे ऐतिहासिक धागेदोरे, वरचे राजकारण, पडद्यामागची सत्ये, पिछाडीच्या बाबी अशा गोष्टींच्या तपशिलासंबंधी इथे असलेल्या मंडळींना काही माहिती असण्याचा अथवा त्यांनी मनातल्या मनात काही तर्क जुळविले असण्याचा संभव कमी. त्यामुळे याच बाबीसंबंधी मी जास्त तपशिलाने माहिती देणार आहे.

या माहितीकडे वळण्यापूर्वी दोन-तीन बाबींसंबंधी आपल्या मनात गैरसमज असतील तर-बहुधा नसावे-पण असतील तर ते आपण दूर करावे. नीट लक्ष द्या. कोल्हापूर संस्थान भारतात विलीन झाले पाहिजे हा विलीनीकरणाचा झगडा आहे. मिरज, सांगली ही संस्थाने भारतात विलीन झाली पाहिजेत हाही विलीनीकरणाचा संघर्ष आहे. पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले पाहिजे हा विलीनीकरणाचा झगडा नव्हे ही आमच्या नेत्यांच्या मनातील पक्की भूमिका होती. भारत स्वतंत्र झाला याला एकोणीसशे बहात्तर साली पंचवीस वर्षे झाली. स्वातंत्र्याचा रौप्यमहोत्सव साजरा करण्यात आला. या रौप्यमहोत्सवाच्या निमित्ताने ताम्रपट आले. ते स्वीकारण्यास गोविंदभाई श्रॉफ यांनी नकार दिला. त्यांनी सांगितले आम्ही दिल्लीला येणारही नाही आणि ताम्रपट घेणारही नाही. ज्या समितीच्या नेतृत्वाखाली हैदराबादचे आंदोलन झाले त्या समितीचे गोविंदभाई श्रॉफ हे सरचिटणीस (General Secretary) होते. आता सरचिटणीसच जर ताम्रपट घ्यायला नकार देत असेल तर उरलेल्या इतरांना ताम्रपटाचा

स्वीकार करणे शक्य नव्हते, आणि म्हणून त्या वेळचे हैदराबादचे मुख्यमंत्री पी. व्ही. नरसिंहराव यांनी केंद्र सरकारला असे कळविले की, जर गोविंदभाई ताम्रपट घ्यायला येऊ शकले नाहीत तर त्यांनाही - म्हणजे नरसिंहरावांनाही दिल्लीला हजर राहता येणार नाही. या भूमिकेमुळे संपूर्ण भारत सरकारला या मुद्द्याचा फेरविचार करावा लागला. मुद्दा कोणता हे लक्षात घ्या. भारत सरकारचे म्हणणे असे की, हैदराबाद संस्थान भारतात विलीन व्हावे हा झगडा विलीनीकरणाचा होता. आमचे म्हणणे असे की, हा लढा भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाचा एक भाग आहे; भारतीय स्वातंत्र्याच्या युद्धातील शेवटची लढाई हैदराबादच्या भूमीवर लढली गेली आहे. हैदराबादचे संस्थान संपविल्याशिवाय भारत नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशाची अविभाज्यता सिद्ध झाली नसती. हा प्रादेशिक संलग्नतेचा, अविभाज्यतेचा प्रश्न असल्यामुळे हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाल्याशिवाय भारताला प्रादेशिक संलग्नता मिळत नाही; भारताची घटनाही तयार करता येत नाही; भारताचा एकही प्रश्न सोडविता येत नाही. म्हणून हा लढा केवळ एका संस्थानाच्या विलीनीकरणाचा भाग नसून भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग आहे, अविभाज्य भाग आहे,. ही मान्यता तुम्ही द्या. ती देणार असाल तर आम्ही ताम्रपट घ्यायला येऊ. नाही तर येणार नाही. शेवटच्या आठवड्यामध्ये भारताच्या त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी हस्तक्षेप करून तशी मान्यता दिली. नंतरच आमची मंडळी ताम्रपट वगैरे घ्यायला गेली. मुद्दा सामान्य वाटेल, पण तो सामान्य नाही. त्याचे महत्त्वाचे कारण हे आहे की, जोपर्यंत हैदराबादचे आंदोलन हे स्वातंत्र्याचा लढा म्हणून मान्यता पावत नाही तोपर्यंत त्या आंदोलनात ज्यांनी शस्त्रे चालविली त्यांना आपण शस्त्रे चालविली हे सांगता येत नाही. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी जर शस्त्रे चालविली तर कायद्यानुसार स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर त्या शस्त्रांचे गुन्हे माफ होतात. नाही तर अमुक एका ठाण्यावर हल्ला झाला तेव्हा मी बंदूक घेऊन गेलो होतो; मला गोळीबार करावा लागला, त्यात एक माणूस मेला, हे सत्य कोणाला सांगावयाचे असेल तर सांगता येत नाही. इतरांनी हवे ते बोलावे. पण तो स्वतः बोलेल तर ते बोलणे गुन्ह्याचा कबुलीजबाब होईल. हैदराबादच्या इतक्या महत्त्वाच्या लढ्याबद्दल फारसे काही लिहिले गेलेले नाही ते का हे यावरून स्पष्ट व्हावे. कोणी स्वतः लिहीत नाही, कोणी दुसऱ्याला प्रोत्साहन देत नाही त्यामागे हे कारण आहे. कसे सांगावयाचे? अनंतराव भालेरावांनी कसे सांगावयाचे की, उमरी बँकेवर हल्ला

झाला आणि एकवीस लाख रुपये लुटले गेले, तेव्हा त्या हल्ला करणारांमध्ये आपण हातात शस्त्र घेऊन सामील होतो? दुसरे खूप म्हणतील अनंतराव हजर होते. अनंतराव म्हणतील, ती त्या सांगणाऱ्यांची माहिती आहे, मला स्वतःला काही माहीत नाही. अनंतरावांनी कसे सांगायचे की होय, मी हजर होतो. मी अनंतरावांचेच नाव एवढ्यासाठी घेतले की, ज्या शाळेत व्याख्याने चालू आहेत तिच्याशी त्यांचा एकेकाळी संबंध होता. या संस्थेची स्थापनाच त्या स्वातंत्र्य आंदोलनाच्या संदर्भात झाली. मी अमूक पूल उडविण्याचा प्रयत्न केला, अमूक ठिकाणची रेल्वे उखडण्यात मी होतो; अमूक ठिकाणी मी अमक्याला गोळी घातली हे सांगायचे कसे? जोपर्यंत लढ्याला स्वातंत्र्य-आंदोलन म्हणून मान्यता मिळत नाही तोपर्यंत हे सांगता येत नाही. सांगितले तर तो गुन्ह्याचा कबुलीजबाब होतो. ही मान्यता मिळायला स्वातंत्र्यात पंचवीस वर्षे जावी लागली. त्यामुळे अडचण अशी की ज्या काळात स्मृती ताज्या होत्या तेव्हा सांगण्याबोलण्याची संधीच नव्हती. आता सर्व सांगावयाची संधी आली तर सर्व स्मृती धूसर झालेल्या आहेत. इतक्या की त्यांतल्या पुष्कळ बाबी विसरून गेल्या आहेत.

या संदर्भात सरदार पटेल यांनी जी नोंद केली आहे ती मी आपल्याला सांगतो. सरदार पटेलांनी गृहखात्याला अशी सूचना दिली आहे की, सशस्त्र आंदोलन आम्ही कसे केले याविषयी सत्ताधारी पक्षाने बोलू नये. असे बोलणे देशात पुढे लोकशाही रुजविण्यासाठी हानिकारक आहे. यामुळे आम्ही आंदोलन कसे केले याविषयीचा वेगवेगळ्या पातळ्यांवरचा सर्व संवाद वेगवेगळ्या पद्धतीने बंद पाडला पाहिजे. एकदा तुम्ही स्वतंत्र झाल्यानंतर तुम्ही लोकशाही मार्गाने राज्य चालवायला लागता. त्यानंतर काल आम्ही बंदुका कशा हाताळल्या हे सांगणे हा धमकी देण्याचाच प्रकार होतो. 'बंधूंनो, मी आठ माणसांना गोळ्या घालून ठार मारलेले आहे, मी महापुरुष आहे; मला मत द्या,' हे सांगणे लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही. हिंसक क्रांतीचे गोडवे गाणारी भाषा बंद झालीच पाहिजे; अशा आशयाची नोंद वल्लभभाईंनी केलेली आहे. त्यामुळे वेगवेगळ्या पातळ्यांवरील या गोष्टीची चर्चा, बोलणे, लिहिणे यात मोडता घालण्यात आला. लीग ऑफ सोशियालिस्टस्‌चे जे कार्यकर्ते होते ते सर्व बावन्न सालच्या निवडणुकीला उभे होते. त्यांनी आपल्या निवडणूक प्रचारात आंदोलनातील स्वतःच्या हकीगती सांगितल्या नाहीत. ते सोशिॲलिझम्, कम्युनिझम याच गोष्टी बोलत राहिले. कुणी गफलतीने कुठे काही संदर्भ दिले पण या देणाऱ्यांतील एकही प्रथम श्रेणीचा नेता

नव्हता. कारण यावर बोलावयाचे नाही अशी कुठे तरी सूचना होती. काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वानेही या मुद्द्याची फारशी चर्चा केलेली नाही. त्यामुळे आता तुम्ही प्रथम ही गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, हैदराबादचा लढा हा केवळ संस्थानच्या विलीनीकरणाचा लढा नाही तर तो भारताच्या प्रादेशिक सलगतेचा आणि भारताच्या भारत म्हणून अस्तित्वात येण्याच्या प्रयत्नाचा भाग आहे. केवळ एका संस्थानाच्या विलीनीकरणाचा लढा या नात्याने आपण आता या लढ्याकडे पाहता कामा नये. भारताच्या कोणत्याही भूभागावर जेवढ्या उग्र स्वरूपामध्ये स्वातंत्र्याचे आंदोलन झाले तेवढ्या उग्र रूपात हैदराबादमध्ये झाले हे आपण विसरता कामा नये. कारण हा मुद्दा अतिशय आग्रहाने मांडावा अशी स्वामी रामानंद तीर्थांचीच इच्छा होती. आपण तो कसा मांडावा हे त्यांना कळत नव्हते. पण स्वामीजींचे आत्मवृत्त आपण वाचाल तर त्या आत्मवृत्तामध्ये तीन-चार ठिकाणी असा उल्लेख आहे की, वीस हजार सत्याग्रही तुरुंगात होते. खरे तर स्वामीजींच्या आत्मवृत्तात या आकडांना काहीही महत्त्व नाही तरीही वीस हजार सत्याग्रही तुरुंगात होते याचा उल्लेख त्यांनी पुन्हा पुन्हा केला आहे. मी स्वामीजींना विचारले की, हा आकडा पुन्हा पुन्हा लिहिण्यास पुनरुक्ती झाली असे आपणास वाटत नाही काय? किती हजार याची आवश्यकता तुमच्या आत्मवृत्तात का? तुमच्या ग्रंथात माहितीचा तपशील फारसा नाही. आकडेवारीत बोलण्यासाठी तुम्ही प्रसिद्ध नाही. मी असे प्रश्न विचारावे आणि स्वामीजींनी ते सहन करावे असेच आमचे गाढ आत्मीयतेचे संबंध होते. माझ्या प्रश्नावर स्वामीजी म्हणाले, "खरा मुद्दा पुनरुक्तीचा नाही. महात्मा गांधींनी या देशात चैतन्याची एक लाट निर्माण केली. ही लाट या टोकापासून त्या टोकापर्यंत पसरल्यावर आणि गांधींच्या पाठीशी अठराशे पंच्याऐंशी ते एकोणीसशे वीस एवढे दीर्घ स्वातंत्र्य आंदोलन असतानाही आणि ते स्वतः अलौकिक कर्तृत्वाचे असतानाही भारतीय स्वातंत्र्याच्या आंदोलनामध्ये एकोणीसशे तीस साली जे जास्तीत जास्त सत्याग्रही तुरुंगात गेले त्यांची संख्या दीड लक्ष आहे. चाळीस कोटी लोकसंख्येला दीड लक्ष हे प्रमाण घेतले तर चार कोटीला पंधरा हजार येतात. आमचे संस्थान एक कोटी साठ लक्ष वस्तीचे. आम्ही सहा हजार सत्याग्रही पाठविले असते तरीही आमच्या आंदोलनाची तीव्रता गांधींनी भारतभर केलेल्या आंदोलनाच्या बरोबर राहिली असती. या सहा हजारांची तिप्पट अठरा हजार होते. याहीपेक्षा आमचे सत्याग्रही दोन हजारांनी जास्त होते. त्यामुळे भारतीय स्वातंत्र्याचा लढा जेवढ्या उग्र स्वरूपात हैदराबादला

लढला गेला तेवढ्या उग्र स्वरूपात तो इतरत्र कुठेही लढला गेला नाही हे कुणी तरी लक्षात घ्यावे यासाठी मी वीस हजार हा आकडा पुन्हा पुन्हा लिहिला आहे."

मी विचारले, "हे तुम्हीच का नाही लिहिले?"

ते म्हणाले, "मीच या आंदोलनात नेता होतो. मी संन्यासी, संन्याशाने हे लिहिले तर त्यात त्याची अहंता दिसते."

असो. हा मुद्दा आता आपणासमोर स्पष्ट झाला असेल. आणखीही एक गोष्ट आपण लक्षात घ्यायला हवी. ती गोष्ट अशी, भारतामध्ये जे सशस्त्र आंदोलनाचे प्रयत्न झाले त्यातला सर्वव्यापी व सर्वांत मोठा असा प्रयत्न बेचाळीस सालचे आंदोलन हा होय. या आंदोलनासंबंधी त्या वेळच्या इंग्रजी सरकारचे म्हणणे असे की त्यात नेते, अनुयायी आणि चिल्लर म्हणून एकूण दहा हजार लोक समाविष्ट झाले होते. काँग्रेसचे म्हणणे असे की या आंदोलनात सुमारे चाळीस हजार लोकांनी सहभाग घेतला. ठीक आहे. आपण चाळीस हजार हीच संख्या मान्य करू. याच वेळी बाजूला सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेचाही संघर्ष चालू होता. या सेनेत बारा हजार लोकांचा सहभाग होता. शिवाय आठ-दहा हजार लोक सहानुभूती असणारे होते. हे सर्व गृहीत धरले तर सशस्त्र आंदोलनात सहभाग घेणाऱ्या भारतीयांची एका वेळची सर्वांत मोठी संख्या चाळीस हजार व एकूण संख्या साठ हजार येते. या आंदोलनाच्या तीव्रतेनुसार हैदराबाद संस्थानात एका वेळी दीड हजार अथवा एकूण अडीच हजार सशस्त्र लोकांनी सहभाग घेतला असता तर त्या आंदोलनाची उत्कटता आणि तीव्रता भारतीय पातळीपर्यंत गेली असती. प्रत्यक्षात हैदराबादच्या सशस्त्र आंदोलनात भाग घेणारांची संख्या एकवीस हजार होती. सत्याग्रह करणाऱ्यांतील बहुतेक सशस्त्र आंदोलनात सहभागी होते.* सशस्त्र आंदोलनाची अधिकृत जबाबदारी स्टेट काँग्रेसने स्वीकारली. अखिल भारतीय काँग्रेसच्या इतिहासात आंदोलनाची जबाबदारी काँग्रेसने स्वीकारली अथवा आंदोलनाला मार्गदर्शन काँग्रेसने केले असे एकमेव आंदोलन हैदराबादचे आहे. उरलेल्या सगळ्या ठिकाणी काँग्रेसमध्ये असणाऱ्या मंडळींनीच आंदोलन केले असले तरी काँग्रेसने त्या आंदोलनाची जबाबदारी नाकारलेली आहे. बेचाळीसचे आंदोलन आपण केले असे अखिल भारतीय काँग्रेसचे म्हणणे नाही. सरकारने नेत्यांना अटक

* कै. कुरुंदकरांचे या ठिकाणचे निवेदन मागे-पुढे झालेले आहे. प्रत्यक्षात सशस्त्र लढा नंतर झाला.

केल्यावर लोक प्रक्षुब्ध झाले आणि त्यांना आवरायला कोणीच नसल्याने त्यांच्या हातून जी हिंसा घडली असेल तिची जबाबदारी ब्रिटिशांवर आहे व त्या हिंसेला आपण जबाबदार नाही असे गांधींचे म्हणणे आहे. या उलट स्वामीजींचे म्हणणे आहे की, हिंसा त्यांच्या आज्ञेने झाली. आमच्या कृतिसमितीचे म्हणणे आहे की, झालेल्या सर्व हिंसेचे दायित्व आम्ही आमच्या डोक्यावर घेतो; कारण आम्ही सशस्त्र आंदोलन करीत असल्याने आमच्या आज्ञेने ती हिंसा झालेली आहे.

हैदराबादच्या आंदोलनाची ही ठळक वैशिष्ट्ये आहेत. ही यासाठी लक्षात ठेवायला पाहिजेत की, हा प्रश्न हिंसा-अहिंसेचा नव्हता. भारताची प्रादेशिक अखंडता शिल्लक राहते की नाही असा हा प्रश्न होता. जी उग्रता प्रश्नाची होती तीच आंदोलनाची होती. कृपया एक गोष्ट लक्षात घ्या, अखिल भारतीय नेत्यापेक्षा आमचे नेते योग्यतेने मोठे होते असे मला सुचवायचे नाही. आमचे सगळेच नेते अखिल भारतीय नेत्यांचेच अनुयायी होते. मी एवढेच सांगत आहे की, आमचे नेते भारतीय नेत्यांचे अनुयायी असल्याने का होईना, वातावरणाची अनुकूलता असल्याने का होईना, भोवताली भारतातून आम्हाला सारखे उत्तेजन मिळत होते म्हणून का असेना, कारणे कोणतीही असोत स्वातंत्र्याचा सगळ्यात उग्रतम असा लढा हैदराबादला झालेला आहे. तुलना होत आहे ती लढ्याची; नेत्यांची नव्हे.

या आंदोलनाबाबत दुसऱ्या काही लोकांच्या डोक्यात असणारा गैरसमज आपल्याही डोक्यात असेल तर तो दुरुस्त करून घ्यावा. हा गैरसमज असा की, हैदराबादचा प्रश्न सरदार पटेल यांच्यामुळे सुटला. सरदार पटेल हे भारताचे फार मोठे नेते होते असेच माझे मत आहे. ते चिल्लर नेते होते असे मला मुळीच म्हणावयाचे नाही. कोणतीही घटना ठराविक वेळेला ठराविक पद्धतीने अमलात आणण्याचे फार मोठे सामर्थ्य सरदार पटेलांकडे होते. माणसाचा विश्वास कमावण्याचे सामर्थ्यही त्यांच्यापाशी होते. वेळ येईपर्यंत वाट पाहून वेळ येताच आघात करण्याचे सामर्थ्यही त्यांच्यापाशी होते. सरदारांचे ऋण कोणीही नाकारीत नाही. पण हैदराबादच्या प्रश्नाशी सरदार पटेल यांचा संबंध विशेष नाही. जो काही थोडा बहुत आला तो स्वतंत्र भारतात पटेल गृहखात्याचे मंत्री होते म्हणून आला. एकोणीसशे सदतीस साली अखिल भारतीय काँग्रेसच्या कृतिसमितीने (Working Committee) ठरविले की, संस्थानांच्या प्रश्नात आता गंभीरपणे लक्ष घालायला पाहिजे. त्याच वेळी असेही ठरले की बिहार, ओरिसा,

आसाम या भागातील संस्थानांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी राजेंद्र प्रसादांनी घ्यावी. बंगालमधील संस्थानांना कोणी मार्गदर्शन करू नये. त्यांचे होईल ते होईल. पण बाबू सुभाषचंद्र बोस यांनी संस्थानांच्या राजकारणात पडू नये; कारण ते अखिल भारतीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. गुजराथ, राजस्थान, सिंध, जुना मुंबई प्रांत या भागातील संस्थानांना मार्गदर्शन सरदार पटेलांनी करावे. काश्मीर हा नेहरूंचा खास विभाग समजून त्यात दुसऱ्या कोणी लक्ष घालू नये. त्यांना वाटले तर नेहरू महात्मा गांधींचा सल्ला घेतील. सल्ला घ्यायचा का नाही हीही गोष्ट नेहरूंच्या इच्छेवरच सोडावी. दक्षिणेतील संस्थानांच्या लढ्यांचे मार्गदर्शन चक्रवर्ती राजगोपालाचारींनी करावे. महात्मा गांधी व मौलाना आझाद यांनी कोणत्याही संस्थानच्या लढ्याचे मार्गदर्शन करू नये. मुळात हैदराबाद संस्थानच्या लढ्याचे मार्गदर्शन मौलाना आझाद यांनी करावे असेच सदतीस साली ठरलेले होते. याला आता लेखी पुरावा नाही. पण ते ठरलेले होते यावर माझा पूर्ण विश्वास आहे. कारण हैदराबाद संस्थानच्या प्रजा परिषदेच्या कार्यकारिणीचे जे कायमचे निमंत्रित होते त्यांत मौलाना आझाद एक होते. परंतु आझादांनी हैदराबादकडे लक्ष देण्याचे नाकारले. त्यांनी कारण दिले की, हैदराबादच्या मुसलमानांचा त्यांच्यावर विश्वास नाही. शिवाय ते स्वतः मुसलमान असल्याने ते जे मार्गदर्शन करतील त्यावर विश्वास ठेवणे हैदराबादमधील हिंदूंना कठीण जाईल. दरवेळी त्यांची तक्रार येईल की मी निजामाचे संस्थान वाचविण्यासाठी अधिक नरम भूमिका घेत आहेत. त्यावर त्यांना विचारले की ते मार्गदर्शन करणार नसतील तर ते कुणी करावे? त्या वेळी हा प्रश्न स्वतः महात्मा गांधींनी हाताळावा असा सल्ला आझादांनी दिला व शेवटी महात्मा गांधींनी ते मान्य केले. हैदराबाद आंदोलनाचे मार्गदर्शन एकोणीसशे सदतीस ते पंचेचाळीस स्वतः महात्मा गांधींनी केले आहे. या संदर्भातील हैदराबादशी झालेला सर्व पत्रव्यवहार गांधींचा आहे. पंचेचाळीसपासून संस्थान खालसा होईपर्यंत म्हणजे थेट शेवटपर्यंत मार्गदर्शन नेहरूंचे आहे. पुढील सर्व राजकारणाशी नेहरूंचा संबंध राहिला ही गोष्ट स्वामीजींनी एकोणीसशे बावन्नच्या मराठवाड्याच्या दिवाळी अंकात लिहिलेली आहे. स्वामीजी म्हणतात की त्यांना सरदारांच्याबद्दल अतीव आदर असला तरी ते नेहरूंचे माणूस राहिले. एक तर ते नेहरूंच्या हाताखाली काम करीत होते आणि दुसरे नेहरूंचा ध्येयवाद त्यांना आवडत होता.

सरदार संस्थानी खात्याचे मंत्री नसते तर त्यांचा संबंध हैदराबादशी आला

नसता. पण जवाहरलाल नेहरूंची भूमिका हैदराबादच्या बाबतीत कठोर होती. कोणत्याही बाबतीत भारताच्या अखंडत्वाला बांधा येईल अशी कोणतीही सवलत हैदराबादच्या राज्यकर्त्यांना द्यायला नेहरू तयार नव्हते. शेवटच्या क्षणी जेव्हा हा प्रश्न हाताळायची दिशा ठरली तेव्हा सरदार पटेलांनी तो दृढपणे हाताळला. हे श्रेय पटेलांचे आहे प्रश्नाचे सर्वांगीण मार्गदर्शन हे गांधी आणि नेहरूंनी केले आहे व शेवटची कार्यवाही पटेलांची आहे. पटेलांचा हात अंमलबजावणीपुरताच आहे. ध्येयवाद, जनतेच्या चळवळीचे रूप हे सर्व गांधी-नेहरूंचे आहे.

तिसरी बाब म्हणजे हा जो संघर्ष आहे तो कासिम रझवी विरुद्ध स्वामी रामानंद तीर्थ असा नाही. त्या वेळी मुसलमानांची जी संघटना होती तिचे नाव इत्तेहादुल मुसलमीन या संस्थेचे नेते होते कासिम रझवी. हे मुळात लातूरचे वकील सय्यद कासिम रझवी. यांना पदवी होती मुझाहिदे आझम - म्हणजे हुतात्म्यांचे सम्राट. हे शिक्षा भोगून संपल्यावर पाकिस्तानमध्ये जाऊन खाटल्यावर मेले. कुठेही हुतात्मा झाले नाहीत. तात्त्विक पातळीवर संघर्ष हा रझवी आणि स्वामीजी यांत नव्हता, तर निजाम मीर उस्मान अली हे हैदराबादचे राजे व महात्मा गांधी हे भारतीय संग्रामाचे नेते यांच्यामध्ये हा सरळ सरळ संघर्ष होता. ही तत्त्वाची बाजू झाली. व्यावहारिक राजकारणाच्या बाजूने हा संघर्ष निजाम मीर उस्मान अली विरुद्ध पंडित नेहरू असा समजावयाचा.

या ठिकाणीच आपण मीर उस्मान अलीबद्दल असणाऱ्या सर्व चुकीच्या कल्पना बदलून घेणे आवश्यक आहे. आपली अशी कल्पना असते की, शेवटचा निजाम जुनाट मनोवृत्तीचा, धर्मांध, आधुनिक जगाचे भान नसणारा, अत्यंत अफूबाज, अत्यंत द्रव्यलोभी आणि कंजूष होता. हे बरोबर नाही. तो द्रव्यलोभी आणि कंजूष होता ही गोष्ट पुराव्याने खोटी ठरते. तो मागासलेल्या मनोवृत्तीचा होता ही गोष्टही खरी नाही. निजाम हा हैदराबादचे स्वतंत्र राष्ट्रात रूपांतर करून त्या राष्ट्राचा सम्राट होण्याच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित झालेला अतिशय चाणाक्ष, अत्यंत सावध, अत्यंत पाताळयंत्री असा बुद्धिमान सत्ताधीश होता. सत्ताधीश म्हणून अतिशय लायक असताही त्याचा पराभव का झाला? त्याची कारणे दोन, एक म्हणजे हिंदुस्थानचे लष्कर अधिक वरचट होते आणि दुसरे कारण म्हणजे या देशात जवाहरलाल नेहरू नावाचे एक गृहस्थ होते.

नेहरूंनी स्वतःची अशी प्रतिमा निर्माण केली आहे की, आपण फार साधेभोळे आहोत. आपल्याला फूल आणि मूल यांचीच जास्त आवड आहे. आपण अंतःकरणाने

कवी आहोत. ही नेहरूंची प्रतिमा पूर्ण नाही. नेहरू हे अतिशय धूर्त असे मुत्सद्दी आणि अतिशय दूरचा विचार करून आधीच नेमके पाऊल टाकणारे गृहस्थ होते. निजामाचा पराभव झालेला आहे तो नेहरूंच्या मुत्सद्देगिरीमुळे झालेला आहे आणि तो भारताच्या अधिक समर्थ असणाऱ्या सेनेने केलेला आहे. या दोहोंतूनही आपणाला शेवटी एकाच कारणाकडे यावयाचे असेल तर निजाम मुत्सद्देगिरीत अथवा दूरदृष्टीत कुठे तरी कमी पडला असे मानण्याऐवजी भारतीय सेना अधिक प्रबळ होती याच कारणाकडे येणे भाग आहे.

निजामाविषयीच्या भ्रामक कल्पना बदलून घेतल्याशिवाय आंदोलनाचे स्वरूपच आपल्या लक्षात येणार नाही. त्यासाठी शेवटच्या निजामाकडे येण्याअगोदर आपण थोडक्यात हैदराबादचा इतिहास पाहू * हैदराबाद संस्थान चिनकिलीझखान-मीर-कमरुद्दीन-असफजहा-अव्वल या माणसाने स्थापन केलेले आहे. कमरुद्दीन हे त्याचे मूळ नाव. हा कमरुद्दीन औरंगजेबाच्या फौजेमध्ये अगदी लहानपणीच गेला. लौकरच तो स्वतःच्या पराक्रमाने प्रसिद्धीस आला. औरंगजेबाने त्याला चिनकुलीझखान अशी पदवी दिली. या पदवीचा अर्थ छोटा तलवारबहाद्दर. हा चिनकुलीझखान वयाच्या एकविसाव्या वर्षीच औरंगजेबाच्या मोठ्या सरदारांत गणला जाऊ लागला. म्हणून त्याला मीर म्हणू लागले व त्याचे नाव चिनकिलीझखान मीर कमरुद्दीन झाले. औरंगजेब दक्षिणेला आल्यावर जेव्हा विजापूरची आदिलशाही संपली तेव्हा तिची सर्व व्यवस्था लावण्याचे काम कमरुद्दीनकडे आले. म्हणून त्याला 'निजाम' म्हणजे व्यवस्थापक म्हणून लागले. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर याची प्रतिष्ठा मोगलांच्या दरबारात वाढली व काही काळपर्यंत हा संपूर्ण मोगल साम्राज्याचा पंतप्रधान झाला. या पंतप्रधानाला आसफदौला ही पदवी असे. याने पंतप्रधानपद सोडले. पण आसफदौला ही पदवी न सोडता त्याच्या खालची आसफजहा ही पदवी निर्माण करून स्वतःला घेतली व तो दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला. नबाब मीर, उस्मानअली खान, मीरबहाद्दर, असफजहासाब, आसफदौला, निजाम या सगळ्या शब्दांचा उगम मीर कमरुद्दीनच्या पदव्यांमध्ये आहे. हा जो मूळचा मीर कमरुद्दीन तो मोठा चाणाक्ष माणूस. भारताच्या

---

* हा भाग या पुस्तकात पुनरुक्ती झालेला आहे. पण कुरुंदकरांच्या मूळ लेखनाला धक्का लावायचा नाही हे धोरण आम्ही स्वीकारले असल्यामुळे या ठिकाणची व अन्यत्रची पुनरुक्ती वाचकांनी त्या संदर्भात समजून घ्यावी व आम्हाला क्षमा करावी. - **संपादक**

इतिहासात विजयातून राज्ये निर्माण झाल्याची शेकडो उदाहरणे आहेत. सतत पराभवातून स्वतंत्र राज्य अस्तित्वात आल्याचे तुरळक उदाहरण निजामचे संस्थान हे एक आहे. कधीही विजय झाला नाही हे याचे वैशिष्ट्ये. मराठ्यांबरोबरची पहिली लढाई : हार. दुसरी : हार. तिसरी : हार. असे जे सतराशे तेवीस-चौवीसपासून चालले ते सतराशे ब्याण्णवपर्यंत. सर्व मोठ्या लढ्यांत निजामाची हार. प्रमुख हारीत सतराशे चोवीसची तालखेड, सतराशे सदतीसची भोपाळ, सतराशे सत्तावनची उदगीर, सतराशे बासष्टच्या सुमारास राक्षसभुवनची पहिली, सतराशे ऐंशीला दुसरी, सतराशे ब्याण्णवला खर्ड्याची, अशा या प्रमुख लढ्यांत निजामाचा पराभव. फ्रेंच व इंग्रज यांच्याशी याच्या जेवढ्या लढाया झाल्या त्यात याचा पराभव. एकट्या इंग्रजांशी लढाया झाल्या त्यात पराभव. टिपू सुलतानाशी याच्या जेवढ्या लढाया झाल्या त्यात याचा पराभव. प्रत्येक लढाईत सातत्याने पराभव होऊनही हैदराबादचे राज्य मात्र स्थिर झाले. विजयी झाला असता तर तो कदाचित सुभेदारच राहिला असता. तो सतत पराभवातून स्वतंत्र राजा झाला. पराभवातूनही राज्याची निर्मिती करणारा हा चाणाक्ष महापुरुष चिनकुलीझखान. या चिनकुलीझखानाच्या गादीवर आलेला सातवा पुरुष म्हणजे उस्मानअली. * याला मीर अलीखांबहाद्दुर, आसफदौला, आसफजहा या पदव्या होत्याच पण आधीच्या कुणालाही नसलेल्या दोन पदव्या याने स्वतःला लावून घेतलेल्या होत्या. त्या म्हणजे अरस्तू-ए-जहा व रुस्तुम-ए-जहा. अरस्तू म्हणजे ॲरिस्टॉटल, म्हणजे महान बुद्धिवान. रुस्तुम म्हणजे महान शौर्यवान. यापैकी हा रुस्तुम-ए-जहा होता की नाही हे सांगता येत नाही, पण आपल्या बुद्धीचा प्रभाव मात्र त्याने बराच दाखविला.

निजामाच्या कुळात एक काळजी घेण्याचा उपदेश पिढ्यानूपिढ्या चालत आला आहे. उस्मान अलीखां बहाद्दूरपर्यंत सर्वांनी ही काळजी घेतलेली आहे. ही काळजी

* १. पहिला निजाम कमरुद्दीनखान १७२४ - १७६२
२. दुसरा निजाम अली १७६२ - १८०३
३. तिसरा नबाब सिकंदर जहाँ १८०३ - १८२९
४. चौथा नबाव नासिरौद्दौला १८२९ - १८५७
५. पाचवा नबाब अफझुलौद्दौला १८५७ - १८६९
६. सहावा नबाव महबूब अलीखां १८६९ - १९११
७. सातवा नबाब उस्मान अलीखां १९११ - १९४७ मृत्यू १९६८

अशी की आपल्या प्रजेमध्ये सर्वांत दगलबाज कोणी असेल तर तो ब्राह्मण होय, त्याच्यावर कधीही विश्वास ठेवू नये. जूनार ए दारा दक्कन काबिल ए गर्दन जत म्हणजे हे जे दक्षिणेतले जानवेधारी आहेत ते तात्काल गर्दन छाटण्याच्या लायकीचे आहेत. यांना थोडीशीही सवलत देता कामा नये. कारण ते तुझ्या राज्याची समाप्ती करतील. हा आसफजहाचा उपदेश आहे. या सगळ्या उपदेशांचे भांडवल घेत घेत मीर उस्मान अली अठराशे पंच्यांऐंशीमध्ये जन्मले. अठराशे पंच्यांऐंशी हा काँग्रेसचा आरंभ. शाऐंशी हा मीर उस्मानअलीचा जन्म. हे उस्मानअली एकोणीसशे अकरामध्ये हैदराबादचे राजे झाले. ज्या दिवशी तो राजा झाला (इ.स. १९११) त्या दिवसापासूनच तो झपाटला की हैदराबादचे एका स्वतंत्र राज्यात रूपांतर करावयाचे. भारत एकोणीसशे सत्तेचाळीस साली स्वतंत्र होणार की नाही त्याच्याशी या स्वप्नाचा संबंध नाही. त्याला एकाच गोष्टीत रस आहे की, हैदराबाद स्वतंत्र राज्य करणे. त्यामुळे एकोणीसशे अकरामध्ये गादीवर आल्याबरोबर त्याने पहिला कार्यक्रम हाती घेतला तो म्हणजे प्रशासनाची सुधारणा. ही सुधारणा करण्यासाठी पहिला दिवाण त्याने नेमला तो हिंदू. राजा चंदुलाल. * तो उपयोगी पडत नाही म्हणून बदलून दुसरा हिंदू दिवाण नेमला. कृपया लक्षात घ्या. मी 'हिंदू दिवाण' असे मुद्दाम सांगत आहे. दुसराही दिवाण निरुपयोगी असे दिसताच याने मंत्रिमंडळ बरखास्त केले व सर्व सत्ता स्वतःच्या हातात घेतली. एकोणीसशे चौदा ते एकोणीसपर्यंत हैदराबादला मंत्रिमंडळ नव्हते. प्रधानमंत्री, खातेमंत्री आणि राजा स्वतः निजाम ह्यच होता. कारभार चालविण्याची केवढी प्रचंड पात्रता निजामाकडे होती हें आपण लक्षात घ्या. या वेळी प्रशासन यंत्रणा आधुनिक पायावर उभी करण्यासाठी निजामाने संस्थानातील सर्व तालुके आखून रेखून दिले. सर्व जिल्हे नीट आखले. सर्व विषय दप्तरे तयार केली. शिक्षकापासून सुभेदारापर्यंत सर्वांची पगारश्रेणी आखून दिली. खजिना (Treasury) व्यवस्थित केला. दळण-वळणाचे मार्ग शोधण्याची व्यवस्था केली. एकोणीसशे चौदा ते एकोणीस एवढ्याच काळात प्रशासनाच्या आधुनिकीकरणाचा हा सर्व पाया स्वतः एकट्याने भरून नंतर निजामाने एकोणीसमध्ये

---

* ही नावाची कै. कुरुंदकरांची गफलत आहे. हिंदू पंतप्रधान म्हणजे महाराजा सर किशन प्रशाद. त्यांनीच हिकमतीने उस्मान अलीला राजा बनविले होते. त्यांच्या सत्तीच्या निवृत्तीनंतर सालारजंग दुसरे यांची 'सदरुलमहाम' म्हणून अल्पकाळ नियुक्ती झाली. तेही न जुळल्यानंतर निजामाने कारभार आपल्या ताब्यात घेतला. – **संपादक**

नवे मंत्रिमंडळ नेमले. महाराज किशनप्रसाद बहादुर यांच्या नेतृत्वाखालील या नव्या मंत्रिमंडळाच्या साहाय्याने आता कारभार सुरू झाला. ** या मंत्रिमंडळाचा कारभारी मनाजोगता न वाटल्याने व दिल्लीहून व्हाइसरॉयही सतत आक्षेप घेत राहिल्याने निजामाने व्हाइसरॉयला कळविले की, कारभार व्यवस्थित चालवायला हवा असेल तर मंत्रिमंडळात युरोपियन मंत्री हवे आहेत. व्हाइसरॉयची संमती आल्यावर त्याने चार युरोपियन मंत्री आपल्या मंत्रिमंडळात मागून घेतले. हे चौघेही आपापल्या विषयाचे मोठे तज्ज्ञ होते. जवळजवळ शेवटपर्यंत म्हणजे चौरेचाळीस/ पंचेचाळीस सालापर्यंत टास्कर आणि हर्नर हे युरोपीय मंत्री निजामाच्या मंत्रिमंडळात होते. युरोपियनांच्या आधुनिक ज्ञानाचा राज्याच्या प्रशासनात उपयोग झाला पाहिजे ही काळजी निजामाने सतत घेतली. निजामाच्या राज्यातील पगारांच्या सर्व श्रेणी बाहेरच्या हिंदुस्थानमधील श्रेणीपेक्षा चांगल्या होत्या. त्यामुळे बाहेरची बुद्धिवान माणसे हैदराबादमध्ये आली. आकडेवारीनुसार पाहावयाचे तर निजामाने सत्ता हातात घेतली त्या दिवशी अकरा साली राज्यात प्राथमिक शाळा शंभर होत्या. चाळीस साली या प्राथमिक शाळांची संख्या चार हजार झाली. हा शिक्षणविरोधी धोरणाचा पुरावा नाही. भारतातील जे शिक्षणमंत्री फारच ज्ञानजिज्ञासू व ज्ञान वाढविणारे म्हणून ओळखले जातात त्यांच्या त्यांच्या कारकीर्दीमधे शिक्षणाचा विकास किती झाला त्याच्याशी एकदा निजामाने केलेल्या विकासाचे प्रमाण तुलना करून पाहायला पाहिजे. निजामाने आपल्या कारकीर्दीमधेच कॉलेज शिक्षण चालू केले. कला-विषयांच्या शिक्षणाबरोबरच तांत्रिक प्रगती व्हावी यासाठी मेडिकल कॉलेज, इंजिनियरिंग कॉलेज या सर्वांची व्यवस्था तर केलीच पण स्वतःच्या विद्यापीठाचीही स्थापना केली. हे विद्यापीठ अखिल भारतातील असे पहिलेच विद्यापीठ की जिथे देशी भाषेतूनच वैद्यकीयपर्यंतचे सर्व शिक्षण देण्याची सोय होती. आजपर्यंतच्या इतिहासातही असे दुसरे विद्यापीठ नाही. भारतात अठराशे छप्पनला विद्यापीठांची सुरुवात झाली. कलकत्ता, मुंबई, मद्रास ही पहिली विद्यापीठे. आज एकोणीसशे अठ्याहत्तर आहे. या एवढ्या प्रदीर्घ कालखंडात, काही काळपर्यंत का असेना एका देशी भाषेतून मेडिकल, इंजिनिअरिंगपर्यंतच्या सर्व कारभाराचे शिक्षण देणारे विद्यापीठ एकच आहे. ते म्हणजे

** यातही तपशिलाची गफलत आहे. १९२० ला सर इमाम पंतप्रधान झाले. अर्थात कुरुंदकरांचा मुद्दा बरोबर आहे. – **संपादक**

उस्मानिया विद्यापीठ. मी आपल्याला हे सांगत नाही की, निजाम हे मोठे पुरोगामी गृहस्थ होते. मी आपल्याला सांगतो ते हे की ज्याला तुम्ही पुरोगामित्व म्हणता त्याची निजामाला पक्की जाणीव होती आणि हे पुरोगामित्व कसे वापरायचे हे त्याला माहीत होते. पहिल्या दिवसापासूनची निजामाची भूमिका ही आहे की, जर आपणाला स्वतंत्र राष्ट्र म्हणून जगायचे असेल; आज नाही उद्या भारतात हैदराबादचे स्वतंत्र राष्ट्र करायचे असेल, तर आपली स्वतःची नोकरशाही (Bureaucracy) पाहिजे. म्हणून निजामाने भारतीय सनदी नोकरांच्या (I.C.S.) तोडीची गुणवत्ता असणारी H.C.S नावाची हैदराबाद सनदी नोकरशाही सुरू केली. यातून बाहेर पडलेले कित्येक अधिकारी भारतीय सनदी नोकरांना आणि मंत्रिमंडळांना भारी ठरलेले आहेत. वाटाघाटीच्या पातळीवर निजामाला या गोष्टीची जाणीव होती की, जागतिक मंचावर ज्या दिवशी तुम्हाला वाटाघाटी कराव्या लागतील त्या दिवशी मुत्सद्देगिरी (Diplomacy) नावाचे प्रकरण अस्तित्वात येणार आहे. त्यासाठी निजामाने ज्या व्यवस्था केल्या त्यातील एक अशी की, त्याने हैदराबादचे निजाम कॉलेज मद्रास विद्यापीठाला जोडले. या विद्यालयात इंग्रजी माध्यमातून शिक्षणाची व्यवस्था केली. संस्थानाबाहेर कोणत्याही कामासाठी जो मुसलमान पाठवायचा तो निजाम कॉलेज आणि मद्रास विद्यापीठ यातून बाहेर पडलेला असे. म्हणून हैदराबादमधून केंब्रिजला, गरज पडली तर ऑक्सफर्डला अथवा जगातील दुसऱ्या कोणत्याही विद्यापीठाला हैदराबादचा विद्यार्थी जाऊ शकत असे. यातून आमचे अनेक मुत्सद्दी बाहेर पडलेले आहेत. यात भारतातील अत्यंत बुद्धिमान मंडळी आहेत.

नवीन बुद्धिमत्ता शोधून जवळ करणे आणि तिला सतत उठाव देत राहणे यासाठी निजामाने एक नवीन वतनदारी तयार केली. ज्यांच्याशी निजामाच्या राजघराण्याचे सोयर संबंध होऊ शकतात अशांची ही वतनदारी होती. या मंडळीला मराठीत पायठ्याचे नवाब असे म्हणता येईल. यांना 'यारजंग' ही पदवी असे. निजामाने अनेक तरण्याताठ्या पोरांना यारजंग केलेले आहे. जी मंडळी परंपरेने नवाब नाहीत पण ज्यांची बुद्धिमत्ता अलौकिक आहे अशी ही मंडळी आहेत. निजामाने यातील अनेकांचे संपूर्ण शिक्षण युरोपमध्ये केलेले आहे. युरोपियन मुत्सद्यांसमोर टेबलावर बसून जी बरोबरीच्या नात्याने वाटाघाटी करू शकतील अशी ही बुद्धिवान मंडळी आहेत. यांपैकी दिनयारजंग, माईननबाबजंग, अलियावरजंग, होशियारजंग इत्यादी मंडळी ख्यातकीर्त आहेत. विश्वातील कुणाही बुद्धिवंताशी टक्कर घेईल अशी यांची बुद्धी आहे. आपणाला

माहीत असावे की अलियावरजंग नावाचा माणूस महाराष्ट्राच्या राज्यपालपदी चढून पैगंबरवासी झाला. हा जर भारतीय असता तर भारताचा राष्ट्रपती होऊन पैगंबरवासी झाला असता. केवळ शत्रूच्या प्रदेशातील होता म्हणूनच तो राष्ट्रपती होऊ शकला नाही. यांच्या बौद्धिक ताकदीचा विचार जर आपण करू लागलो तर एक जीनाचा अपवाद वगळता. याच्या बौद्धिक क्षमतेचा दुसरा मुसलमान भारतात नव्हता. याच्या जवळपास फिरकू शकेल असाही कोणी नव्हता. याची बौद्धिक क्षमता परमोच्च कोटीची होती. हाच तो माणूस की ज्याने सबंध इजिप्तचे राजकारण फिरविले आणि इजिप्त व भारत यात मैत्रीची पायाभरणी केली. हाच तो माणूस आहे की ज्याने अर्जेंटिना, चीनसारख्या अनेक देशांचे राजकारण अमेरिकेच्या विरोधात भारताला अनुकूल केले. हाच तो माणूस की ज्याने नाटो कराराच्या सर्व अटी गुंडाळून फ्रान्सला भारताच्या मदतीसाठी उद्युक्त केले. हाच तो माणूस की ज्याच्यावर नेहरूंचा खास विश्वास बसला आणि जो अमेरिकेत भारताचा वकील म्हणून पाठविला गेला. हा जर जास्त वेळ अमेरिकेत वकील म्हणून राहिला असता तर त्याने अनेक घडामोडी घडवून आणल्या असत्या. के.एम. पणिक्कर, गिरिजाशंकर वाजपई, के.पी.एस.मेनन इत्यादी मंडळी ज्या रांकेत बसतात त्या रांकेच्या तोलामोलाचा हा माणूस आहे. आणि हा निजामाने तयार केलेल्या मंडळीपैकी आहे.

निजामाने सर्व हैदराबाद संस्थानच्या औद्योगीकरणालाही आरंभ केला होता. त्याने कापडगिरण्या काढल्या, कोळशाच्या खाणी सुरू केल्या, सोन्याच्या खाणी सुरू केल्या, हिऱ्यांना पैलू पाडण्याचा उद्योग सुरू केला, सिमेंटचे कारखाने काढले, कागदाचे कारखाने काढले. जे लक्षणीय आहे असे औद्योगीकरण निझामाने स्वतःच्या कारकीर्दीत घडवून आणले.

निजामाला आणखीही एका गोष्टीची जाणीव होती. जर शेवटी एक ना एक दिवस आपल्याला स्वातंत्र्य मिळवायचे असेल आणि ते टिकवायचे असेल तर आपल्या पाठीशी आंतरराष्ट्रीय मतकक्ष (International Lobby) हवा. हा कक्ष निर्माण करायचा असेल तर मध्य आशियामध्ये तुर्कस्थान, अरब राष्ट्रांमध्ये सौदी अरेबिया, शिया राष्ट्रांमध्ये इराण या तीनही ठिकाणी आपले संबंध असले पाहिजेत. यासाठी इराणच्या शहाची मुलगी निजामाने आपली सून करून घेतली. इराणच्या तेलाच्या खाणीत ब्रिटिश सरकारच्या परवानगीने त्या वेळेच्या दराने वीस कोटी रुपये गुंतविले. तुर्कस्थानची

एक राजकन्याही त्याने आपल्या घरी आणली. तुर्कस्थानच्या निरनिराळ्या उद्योगांत दहा कोटी रुपये गुंतविले. अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका, फ्रान्स या सर्व देशांत त्याने मोठाल्या रकमा गुंतविल्या. त्यामुळे ज्या कोण्या दिवशी गरज पडेल त्या दिवशी अरेबिया, तुर्कस्थान, इराण आणि त्यांच्याबरोबर शेजारची दहाबारा मुस्लिम राष्ट्रे, फ्रान्स, इंग्लंड, पोर्तुगाल व त्यांच्याबरोबर युरोपातील काही राष्ट्रे, अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, अमेरिका एवढा प्रचंड आंतरराष्ट्रीय पाठिंबा आपणास मिळेल याची निजामाने सोय केली. हैदराबादच्या स्वातंत्र्याचा प्रश्न युनोमध्ये जाऊन त्याची चर्चा घडण्याचा संभव आहे हे ओळखून सत्तेचाळीस सालच्या आधीच पंधरावीस वर्षे * कोट्यवधी रुपये खर्च करून स्वतःसाठी पाठिंब्याची शाश्वती तयार करणारा निजाम हा माणूस चिक्कू नव्हे हे आपण लक्षात घ्या. कोट्यवधी रुपयाचा खर्च करूनच एवढा मतकक्ष (Lobby) मिळविता येतो.

अजूनही आणखी एक महत्त्वाची गोष्ट मी आपणास सांगतो. युनोमधे प्रश्न गेल्यावर नकारघंटा (Veto) वाजविण्याचा अधिकार असणारी जी राष्ट्रे आहेत त्यांतील कुणीही आपल्याविरुद्ध मत देता कामा नये याची काळजी निजाम घेत होता. अमेरिका, चीन, इंग्लंड, फ्रान्स हे जर हैदराबादच्या बाजूला असले तर रशिया विरोधी मत देण्याची शक्यता होती. तसे मत रशियाने देऊ नये यासाठी निजामाने भारतीय कम्युनिस्ट लोकांशी वाटाघाटी करून, हैदराबाद हे भारतात विलीन न होता स्वतंत्र राष्ट्र राहावे या भूमिकेला अखिल भारतीय कम्युनिस्ट पार्टीचा आणि हैदराबद कम्युनिस्ट पार्टीचा पाठिंबा मिळविला. या पाठिंब्याच्या जोरावर निजामाने तीस दशलक्ष पौंड किमतीच्या शस्त्रास्त्रांची मागणी रशिया आणि झेकोस्लोवाकिया या देशांत नोंदविली. म्हणजे निजामाच्या जागतिक दूरदर्शीपणाला काही कमी पडलेले आहे असे मुळीच मानता कामा नये. ज्या आपल्या शत्रूचा निकाल आता लागलेला आहे तो शत्रू सामान्य माणूस होता असे मानू नका. बुरसटलेले मध्ययुगीन विचार असलेला, रोज चुरगाळलेले पायजमे घालून हिंडणारा, चिक्कू, बावळट माणूस हे जे निजामाचे चित्र आहे ते मुळीच बरोबर नाही. युरोपियन मुत्सद्द्यांच्या मंडळात बरोबरीच्या नात्याने बोलण्याची पात्रता असणारी माणसे पदरी बाळगणारा हा माणूस. त्यांना धाकात ठेवण्याची पात्रता

---

* नव्हे जवळ जवळ ३० वर्षे. यासंबंधी भरपूर तपशील - मजेदार - उपलब्ध आहे.
- संपादक

असणारा हा माणूस. इंग्रजांच्या समोर कोणताही औपचारिक वेश न करता मळकट पायजमे घालून फिरणे आणि कोणताही शिष्टाचार न पाळणे ही केवळ त्याची वैशिष्ट्ये होती. के.एम.पणिक्करांचे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. ते वाचल्यास निजामाच्या शिष्टाचाराच्या अभावाची एक गोष्ट कळून येईल. निजामाने एकदा इच्छा व्यक्त केली : प्रांतांची पुनर्रचना करणाऱ्या समितीच्या (States Reorganization Committee) सर्व सदस्यांनी एकदा चहाला यावे. पणिक्कर म्हणाले, आमंत्रण द्या, येऊ. चहा प्यायला काहीच हरकत नाही. तेव्हा निजामाच्या वैयक्तिक सचिवाने सांगितले की, गेल्या दीड पावणे दोनशे वर्षांत निजामाकडून कुणालाही आमंत्रण गेलेले नाही. प्रथाच तशी नाही. आम्ही अनौपचारिक रीतीने तुमच्या कानावर घालणार की तुम्हाला चहाला बोलावण्याची आमची इच्छा आहे. मग तुम्ही औपचारिकपणे अर्ज करावयाचा की हुजुरांच्या पायाशी पाच मिनिटे बसण्याची तुमची इच्छा आहे. तुम्हाला परवानगी मिळावी, असा तुमचा विनंती अर्ज आल्यावरच हुजुरांची तुम्हाला मान्यता मिळते, असा हा निजाम. पणिक्करांनी लिहिले आहे की ते सहा दिवस हैदराबादला राहिले, पण त्यांची व निजामाची भेट होऊ शकली नाही.

एवंगुणविशिष्ट हा जो निजाम, त्याच्या डोक्यात सतत एकच कल्पना असते की, हैदराबाद स्वतंत्र व्हायला पाहिजे. सगळी पावले या दिशेने टाकली जातात. त्या दृष्टीने स्वतःची रेल्वे, स्वतःचे पोस्ट खाते, स्वतःची बँक, स्वतःचे नाणे, त्या नाण्याला आंतरराष्ट्रीय मान्यता, स्वतःचे पोलिस खाते, स्वतःचे सनदी नोकर अशी सगळी व्यवस्था आणि साऱ्या जगभर स्वतःला पाठिंबा देणारा मतकक्ष, या गोष्टी तो क्रमाने सातत्याने करीत आला आहे. आणि हे करीत असतानाच त्याने एकोणीसशे पंचवीस साली - की जेव्हा हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा काही प्रश्न नव्हता - त्याने व्हाइसरॉयला कळविले आहे की, ब्रिटिश सरकारशी झालेल्या त्याच्या सर्व करारांचे अक्षर न् अक्षर पालन करण्याची त्याची तयारी आहे. पण या सर्व करारांचा अभ्यास केल्यावर त्याच्या लक्षात असे आले आहे की, हे करार दोन समपातळीवरील राष्ट्रांनी आपापसात केलेले करार आहेत. ईस्ट इंडिया कंपनी व हैदराबाद यांचे जे करार आहेत त्यामधे मांडलिकत्वाचा उल्लेख कोठेही नाही. त्यामुळे हैदराबादचे व्हाइसरॉयशी असणारे संबंध हे कनिष्ठांच्या वरिष्ठांशी असणाऱ्या संबंधासारखे नाहीत. हिज मॅजेस्टी, किंग ऑफ इंग्लंड ॲण्ड एंपरर ऑफ इंडिया आणि हिज एक्झाल्टेड हायनेस निजाम यांमध्ये जे

संबंध आहेत ते समतेचे आहेत. आणि त्यामुळेच त्याला म्हणजे निजामाला हिज मॅजेस्टी ही पदवी लावण्याचा अधिकार आहे. पणिक्करांच्या पत्रातून असे दिसते की अखिल भारतीय काँग्रेसने एकोणीसशे तेवीस साली एक ठराव पास केला आहे. त्याचा आशय असा आहे की, जेव्हा भारतीय संस्थानिक स्वतःच्या हक्कासाठी ब्रिटिश सत्तेशी भांडतील तेव्हा काँग्रेस त्यांची बाजू घेईल व त्यांच्यासाठी ब्रिटिश सत्तेशी भांडेल. या दृष्टीने जर मागील करारात मांडलिकत्वाचा मुद्दा नसेल तर आपण मांडलिक नाही या निजामाच्या मुद्द्याला काँग्रेसने पाठिंबा दिला पाहिजे. या बाजूने अखिल भारतीय काँग्रेसचा कल होता. पणिक्कर पुढे असेही म्हणतात की, या बाबतीत काँग्रेसमधीलच एक अनुल्लेखनीय आणि नगण्य पण बोलभांड अल्पमत याला विरोधी असल्याने काँग्रेसला उघड भूमिका घेता आली नाही. एकोणीसशे पंचवीस साली निजामाला विरोध करणारे हे बोलभांड नगण्य अल्पमत म्हणजे पंडित जवाहरलाल नेहरू. कारण त्यांचाच याला विरोध होता. नेहरूंचे म्हणणे असे होते की संस्थानिकांची ब्रिटिशांच्या विरोधी जी भांडणे असतील त्यातील काही भांडणांच्या बाबतीत आपण संस्थानिकांची बाजू घेऊच, पण ज्या भांडणातील मुद्दे प्रजेशी निगडित आहेत त्या भांडणात इंग्रज व संस्थानिक हे एका बाजूला मानून आपण त्यांच्या विरुद्ध प्रजेची बाजू घेऊ. या दृष्टीनेच नेहरूंनी संस्थानी राजकारणातील पहिले पदार्पण नाभा या संस्थानात एकोणीसशे तेवीस साली सत्याग्रह करून केलेले होते. एकोणीसशे पंचवीस साली ते निजामाचे विरोधक होते. एकोणीसशे सत्तावीस साली संस्थानी प्रजा परिषदेची (States People Conference) स्थापना झाल्यावर नेहरूंनी संस्थानी राजकारणाला मार्गदर्शन करायला सुरुवात केली. पण निजामाचा जो उद्योग चालू होता त्याला व्हाइसरॉयने असे उत्तर दिलेले दिसते की, ब्रिटिशांनी भारतात जी सार्वभौमता आहे ती सर्वोच्च आहे आणि तिच्याशी समान काहीही नाही. त्यामुळे ब्रिटिश सम्राटाशी तुल्य असे कोणी असू शकत नाही. ही सार्वभौमता जी आधारलेली आहे, तीमागचे करार अथवा कायद्यातील कलमे यांचा आशय अगर अर्थ यावर आधारलेली नसून ती फारच वेगळ्या बाबीवर (म्हणजे आमच्या बंदुकीच्या ताकदीवर) अवलंबून आहे. त्यामुळे तुम्हाला 'हिज मॅजेस्टी' ही पदवी लावण्याची परवानगी देता येत नाही. उलट 'हिज एक्झाल्टेड हायनेस' ही पदवी लावण्यासाठी तुम्ही आमची परवानगी घेतली यातच तुम्हाला तुमचे स्थान कळून यावे.

निजामाच्या जेव्हा हे लक्षात आले की, हा प्रश्न सहजासहजी सुटणारा नाही तेव्हा त्याने एक नवी भूमिका घेतली. ती अशी की, हैदराबाद संस्थानात जनतेची एक संघटना पाहिजे, आणि ती संघटना आपल्याशी हितसंबंध ठेवणारी असली पाहिजे. हे ठरविल्यावर निजामाने काही नवी रचना सुरू केली. जे जहागिरदार होते त्यांच्याशी नव्याने संबंध प्रस्थापित करायला आरंभ केला. राजा किसनप्रसाद, राजा रायरायान, महेबूब करवा बहाद्दूर, इंद्र करुणबहाद्दूर यांशी त्याने नवे संबंध जोडले. हैदराबादमध्ये पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या वर्गाचे कितीतरी हिंदू जहागीरदार आहेत. यांतील एकही हिंदू कधी निमाजाच्या विरुद्ध गेला नाही. हे सारेच्या सारे सदैव निजामाचे राज्य व जहागीरपद्धती कायम असावी याच बाजूचे राहिले.

प्रत्यक्ष आंदोलन चालू झाले तेव्हा देशमुख आणि पाटील या आडनावाची मंडळी मात्र आंदोलनात आपापले घरवतन सोडून आली. माझी माहिती बरोबर असेल तर परभणी जिल्ह्यामधे वाशिमला भूमिगतांचे एक केंद्र चालू होते. या वाशिममध्ये एक पत्रक निघालेले आहे ते मीच वाटलेले आहे. या पत्रकात उल्लेख आहे की परभणी जिल्ह्यातील तीनशे पाटील / पांडे मंडळी आपली घरेदारे सोडून लढ्याला पाठिंबा देऊन आपणात सहभागी झालेली आहेत. हे जे वतनदार आमच्याबरोबर आले ते कोणते आले? पांडे, कुलकर्णी, पाटील, पोलिस–पाटील, नुसत्या आडनावाचे देशमुख. यापेक्षा जास्त मोटा हिंदू वतनदार आमच्याबरोबर कोणी नव्हता. राजे सोमेश्वरराव, वनपातींचे राजे यांची सहानुभूती आम्हालाच होती असे निरनिराळ्या लोकांनी आम्हाला सांगायला सुरुवात केली, पण ते पोलिस कारवाई यशस्वी होऊन निजाम संपल्यावर. पण प्रत्यक्षात एकही मोठा वतनदार आमच्याबरोबर आला नाही. एकही मोठा जमीनदार आला नाही. कारण या हिंदू प्रजेची सहानुभूती गमावली जाणार नाही याची काळजी निजामाने घेतलेली होती. याचे एक गमक म्हणून अगदी शेवटची गोष्ट सांगायची असेल तर एक सप्टेंबर ते तीस सप्टेंबर या काळात भारत सरकारचे त्या वेळचे गव्हर्नर जनरल चक्रवर्ती राजगोपालाचारी यांना हैदराबादमधून दहा हजार तारा गेलेल्या आहेत. त्या सर्व संस्थानातील प्रमुख हिंदूंच्या सह्यांच्या आहेत. तारांमध्ये एकच मजकूर आहे की येथे शांतता आहे. वर्तमानपत्रातील वातम्या चुकीच्या आहेत. आम्ही निजामाच्या राज्यात अत्यंत सुखी आहोत. राजकीय भूमिका कशीही सोडवा. पण येथे जनतेचे जीवन धोक्यात आहे ही भूमिका चुकीची आहे. हे लक्षात घ्या.

विशेष म्हणजे पुढे कॉंग्रेसच्या राजकारणात जी मंडळी फार मोठ्या पदावर गेली त्यांतील अनेकांच्या सह्या या तारांवर आहेत. ती माणसे हयात असल्याने त्यांची नावे सांगणे शिष्टाचाराला सोडून होईल. नाही तर त्यातील नांदेड, परभणी जिल्ह्यांतील पाच-पन्नास जणांची यादी माझ्याजवळ तयार आहे. मुद्दा एवढाच आहे की, निजामाने बड्या हिंदूंची सहानुभूती सांभाळलेली होती. काही उदाहरणे म्हणजे हैदराबाद संस्थानातील आपल्यातील प्रमुख व्यापारी म्हणजे पित्ती घराणे. यात पन्नालाल पित्ती हे निजामाच्या खास विश्वासातले. इतके की त्यांना निजामाने अनेकदा मंत्रिमंडळात बोलाविले. आरंभी ते आले नाहीत. पण शेवटी आले तेव्हा शेवटचे मंत्रिमंडळ शपथ घेऊच शकले नाही. प्रत्यक्ष स्टेट कॉंग्रेसच्या आतच निजामाचा पाठीराखा एक मतकक्ष होता. हा स्टेट कॉंग्रेसमधूनच निजामाच्या बाजूने विचार करीत असे. या कक्षातील हे निजामाचे पाठराखे कोण होते हे आता सांगणे बरोबर होणार नाही. कारण आपल्यापैकी कोणी कोणी मित्रांच्या पाठीत खंजीर खुपसले याची यादी देणे योग्य होणार नाही. पण एका माणसाचे नाव सांगितलेच पाहिजे. आमचा लढा चालू होता. वीस हजार सत्याग्रही तुरुगांत होते. स्वतः स्वामीजी कैदेत होते. तेव्हा लायक अली यांच्या नेतृत्वाखाली रझाकारांचे जे मंत्रिमंडळ अस्तित्वात आले त्यात जुन्या कॉंग्रेसचे जी. रामाचार हे मंत्री म्हणून गेले. हे कॉंग्रेसमध्ये होते तेव्हा अर्थातच निजामाचा पंचमस्तंभी मतकक्ष म्हणूनच होते. मुसलमानांत निजामाचा मतकक्ष होता हे तर सांगायला नकोच. असाच एक मतकक्ष त्याने वऱ्हाडमध्येही तयार केला होता. वऱ्हाडात निजामाचा भाट होता तो असे म्हणत होता की, विदर्भाचे अकोला, यवतमाळ, बुलढाणा, अमरावती हे जे चार जिल्हे आहेत ते अठराशे त्रेपन्न सालापर्यंत निजामाच्या राज्याचे भाग होते. मूळचे रघुजी भोसल्यांचे हे राज्य. हे जेव्हा खालसा करण्यात आले तेव्हा त्यातले आठ जिल्हे निजामाला देण्यात आले. उरलेला भाग मध्यप्रदेशाला जोडला. निजामाच्या ताब्यात हे जिल्हे अठराशेतीनला आले. या आठातील अमरावती, यवतमाळ, बुलढाणा, अकोला हे चार जिल्हे अठराशे त्रेपन्न साली फौजेचा खर्च म्हणून इंग्रजांनी कापून घेतले. या चारही जिल्ह्यांत निजामाचा मतकक्ष होता. ते म्हणत होते की आम्ही मूळचे निजामांचे आहोत. तेव्हा इंग्रजांनी जाण्यापूर्वी आम्हाला निजामाच्या हवाली करून जावे. हे म्हणणारांतील काही माणसे आता मृत आहेत. काही अजून हयात आहेत. या आघाडीचे जे नेते होते त्यांत प्रसिद्ध हिंदुत्ववादी खापर्डेसुद्धा होते. हे प्रसिद्ध हिंदुत्ववादी

खापर्डे म्हणजे कविभूषण असणारे खापर्डे नव्हेत. त्यांचे वडील बंधू टिळकांचे सहकारी खापर्डे नव्हेत. हे जे बाबासाहेब खापर्डे होते ते हैदराबादचे वतनदार असल्यामुळे त्यांची एक गोष्ट सांगतो. निजामाच्या कालगणनेप्रमाणे 'बावीस अजूर' हा दिवस आझादे रियासती हैदराबाद म्हणून सर्व हैदराबादमध्ये सुटीचा असे. ही सुटी इंग्रजी तारखेने ऑक्टोबरच्या मध्याच्या सुमारास यावयाची. या सुटीला बाबासाहेब खापर्डे आपल्या गढीवर झेंडा लावीत. तो त्यांनी सत्तेचाळीस साली भारताच्या स्वातंत्र्यानंतरही लावला. नंतर यावर गोळीबारापर्यंत पाळी आली. पंजाबराव देशमुखांचे मत होते की निजामाला वऱ्हाड परत मिळाला पाहिजे. ब्रिजलाल बियाणी यांचेही असेच मत होते. म्हणून निजामाने अकोल्याच्या बाबूराव देशमुख वाचनालयाला इमारत व जागा यासाठी दहा हजार रुपये, शिवाजी शिक्षण संस्थेला काही एकर जागा व इमारती बांधायला तीस हजार रुपये, असे पैसे देणगी म्हणून दिलेले आहेत.

चालू असणाऱ्या मुद्द्याचे अवधान आपणाला असेलच. या वेळी आपण निजामाच्या उदारतेचा विचार करीत नाही. त्याला हिज मॅजेस्टी पदवी लावावयास व्हाइसरॉयने नकार दिल्यावर त्याने संस्थानातील व बाहेरच्याही जनतेत स्वतःसाठी मतकक्ष बांधावयास सुरुवात केली हे आपण पाहात आहोत. हा मतकक्ष ऐनवेळी निजामाला कसा उपयोगी पडला व आंदोलनाच्या कसा पायात अडमडला याचे एक उदाहरण सांगतो. एकोणचाळीस साली वंदेमातरम् सत्याग्रह झाला. त्या सत्याग्रहात अनेक तरुण मुलांनी भाग घेतला. यांच्या शिक्षणाचा संबंध उस्मानिया विद्यापीठाशी होता. ते त्यांना सोडावे लागले. सत्याग्रहाचा भाग म्हणून त्यांनी त्याच्यावर बहिष्कारच टाकला. त्यांच्या मनात होते, मुसलमान राजाशी लढून मुसलमान विद्यापीठावर बहिष्कार टाकीत आहोत. साहजिकच हिंदू विद्यापीठ आपले हात पसरून स्वागत करणार, म्हणून ते बनारसला मालवीयांच्या हिंदू विद्यापीठाकडे गेले. तर त्या विद्यापीठाने स्वतःचे दरवाजे या विद्यार्थ्यांना बंद केले. कारण मदनमोहन मालवीयांच्या हिंदू विद्यापीठाला निजामाची एक लाखांची देणगी पोहोचली होती. हे चिक्कू माणसाचे चित्र नसून चौरस विचार करणाऱ्या धूर्त माणसाचे चित्र आहे. पैशाने मिंधे हिंदू विद्यापीठ मुसलमान राजाच्या पाठीशी राहिले. त्याने हिंदू आंदोलनाचा पाय ओढला. मतकक्ष (Lobby) उपयोगी पडतो तो अशा रीतीने पडतो.

निजामाने त्याची या संदर्भातील भूमिकाही नीट बांधलेली होती. हैदराबाद हे

स्वतंत्र राष्ट्र. त्यामुळे भारत (ब्रिटिश इंडिया) हे परराष्ट्र. परराष्ट्रीय संघटनांच्या शाखांना कोणी आपल्या भूमीवर काम करू देत नाही. परराष्ट्रीय मंडळीला तो अधिकारच नाही. उद्या जर अमेरिकेने सांगितले की तेथील डेमॉक्रॅटिक पक्षाच्या चारदोन शाखा हिंदुस्थानात काढू द्या, तर आपण त्या काढू देणार नाही. या भूमिकेनुसारच अखिल भारतीय काँग्रेसची शाखा हैदराबादमध्ये निघूच शकत नाही असे निजामाचे म्हणणे. त्याच न्यायाने अखिल भारतीय मुस्लिम लीगचीही शाखा हैदराबादमध्ये असू शकत नाही. हिंदू असोत की मुसलमान, ही मंडळी परराष्ट्रीय आहेत. याच मुद्द्यामुळे निजाम आणि जीना यांचे नेहमी बिनसत आले. जीनांना हैदराबाद संस्थानात काम करायला निजामाने कधीही परवानगी दिली नाही. स्वतःच्या राष्ट्रापुरती व्यवस्था म्हणून त्याने दोन नव्या मुसलमान संघटना अस्तित्वात आणल्या. त्यातील पहिली दिन दार सिद्दिक अंजुमान ही एकोणीसशे सव्वीसला स्थापन झाली. हिचे काम धर्मप्रचार करणे. या संघटनेला हवे तेवढे पैसे मिळत. सर्वसामान्यपणे त्या वेळच्या दराने वर्षाला एक लाख रुपयांत तिचे काम भागे. धर्मप्रचारासाठी तुम्ही व्याख्यानापलीकडे जाऊ नका आणि बाटवाबाटवी करू नका, अशी प्रकट सूचना असे. धर्मप्रचार याचा अर्थ हिंदू बाटवून मुसलमान करणे हा नव्हे. यासाठी उघड मारामाऱ्या नकोत हे यामागचे धोरण. आतून हवे ते करा.

दुसरी संघटना इत्तेहादुल मुसलमीन. ही मुसलमानांना संघटित करण्यासाठी एकोणीसशे सत्तावीस साली स्थापन झाली. या संघटनेची उभारणी करण्याचे काम एका निवृत्त अधिकाऱ्याकडे सोपविले. त्याने निरनिराळ्या मशिदींत फिरून शोध घेतला की, उत्तम वक्ते कोण कोठे आहेत, नंतर या वक्त्यांतून बहाद्दुर या वक्त्याची निवड केली. हा ज्वलंत उर्दू भाषेत अतिशय सुंदर बोलत असे. या बहाद्दुरखानाला निजामाने एकोणीसशे एकोणतीसला यारजंग ही पदवी दिली; पायग्याचा नबाब बनविले आणि इत्तेहादुल मुसलमीनचा अध्यक्ष केले. याने वायव्य सरहद्द प्रांतातून गफारखानांचा खाकसार हा स्वयंसेवक या अर्थाचा शब्द उचलला आणि स्वतःचे स्वयंसेवक दल उभारले. खाकसार म्हणजे जनतेचा विनम्र सेवक. अहिंसा हे गफारखानांच्या संघटनेचे व्रत होते ते बहादुर यारजंग याचे नव्हते. क्रमाक्रमाने इत्तेहादुल मुसलमीन संघटना वाढली. तिच्याबरोबरच एका मुद्द्यावर निजाम आणि बहादुर यारजंग यांत मतभेदही वाढू लागले. बहादूर यारजंग याचे म्हणणे असे होते : हैदराबाद हा मुसलमानांनी


विजित केलेला भाग आहे आणि पाकिस्तान ही नुसती कल्पना आहे, हे खरे नव्हे. खरे म्हणजे तीन वेगवेगळी मुसलमान राष्ट्रे आहेत. एक पंजाब, सिंध, वगैरेचा पाकिस्तान. दुसरे बंगाल, ओरिसा, आसाम इत्यादींचे वजिदिस्तान, आणि तिसरे हैदराबादचे उस्मानिस्तान. एकोणीसशे बत्तीस साली गोलमेज परिषद झाली त्या वेळी अखिल भारतीय मुस्लिम लीगने उस्मानिस्तानला मान्यता दिली. चौतीस साली चौधरी रहमतअली यांनी पाकिस्तानसंबंधी पहिली पुस्तिका लिहिली व इंग्लंडमधे वाटली. या पुस्तिकेमध्येही उस्मानिस्तानला मान्यता दिलेली आहे. भारतीय मुस्लिम लीगने हैदराबाद हे विजित राष्ट्र आहे या भूमिकेलाही मान्यता दिलेली आहे. त्यांचे पुढे जाऊन म्हणणे असे की, सार्वभौमता जी आहे ती मुसलमानांची आहे. अधिराज्य आहे ते मुसलमानांचे. निजामाला सार्वभौमता लाभते ती तो मुसलमानांचा प्रतिनिधी म्हणून, घटनात्मक सम्राट म्हणून. बहादुर यारजंगने या भूमिकेचा पाठपुरावा केला. ती भूमिका लोकमान्य होऊ लागली. निजामाला ती मान्य नव्हती. त्याच्या मते तो स्वयंभू सार्वभौम होता, मुसलमानांचा प्रतिनिधी म्हणून नव्हे. त्यामुळे बहादुर यारजंगची प्रतिष्ठा वाढू लागली तेव्हा निजामाने त्याला सांगितले की, त्याने इत्तेहादुल मुसलमीनचे अध्यक्षपद सोडावे. बहादुरला सोडायला लावलेले हे अध्यक्षपद नंतर निजामाने अब्दुल हसन सय्यदअली याला दिले. नंतर बहादुर यारजंगला सांगण्यात आले की त्याने यारजंग पदवी परत करावी. त्याने ती पदवी परत केल्यावर संशयास्पद स्थितीत एकोणीसशे त्रेचाळीस साली त्याचा मृत्यू झाला. सर्वसामान्य भूमिका ही आहे की स्वतःला गैरसोईच्या असणाऱ्या माणसाचा खून करविण्यात निजाम पटाईत होता. निजामाची सार्वभौमता स्वयंभू नसून तो मुसलमानांचा घटनात्मक प्रतिनिधी म्हणून ती त्याला लाभलेली आहे. ही भूमिका बहादुर यारजंगनंतर यापुढे कोणी घेतली नाही; ती पुन्हा शेवटच्या दोनतीन महिन्यांत, पोलिस कारवाईच्या आधी कासिम रझवीने घेतली. जर पोलिस कारवाई झाली नसती, जर स्वतंत्र राष्ट्र म्हणून हैदराबाद उरले असते तर मुझाहिदे आझम कासिम रझवी हैदराबादच्या रस्त्यावर कुत्र्याच्या मौतीने मेले असते. कारण सार्वभौमता निजामाची नसून मुसलमानांची आहे हे कबूल करावयास निजाम कधीच तयार नव्हता. पण सबंध इत्तेहादुल मुसलमीनची निर्मिती त्याची आहे. मूळच्या खाकसार संघटनेचे सशस्त्र रझाकार संघटनेत रूपांतर निजामाने केलेले आहे. या संघटनेचे शास्त्रशुद्ध लष्करी शिक्षण निजामाच्या आज्ञेने झालेले आहे. सगळ्या नाड्या निजामाच्या हाती असत. कासिम

रझवी हे कळसूत्री बाहुले. सूत्रे निजामाच्या हाती. एल. इद्रूस हे निजामाचे सरसेनापती. ते कासिम रझवीला मूर्ख समजत. माईननबाबजंग हे निजामाचे थोर मुत्सद्दी. ते कासिम रझवीला मूर्ख समजत. अलियावरजंग तर रझवीला जवळ बसवून घ्यायलाही तयार नसत. होशियारजंग रझवीला मूर्ख समजत. दीनयारजंग रझवीला मूर्ख समजत. स्वतः निजामसुद्धा रझवीला मूर्खच समजत असे. कासिम रझवी हा व्याख्यान देण्यासाठी चांगला माणूस एवढीच निजामाची भूमिका. पूर्वीचीच अडचण पुन्हा उभी राहात होती की, रझवीला खूप मोठी लोकप्रियता लाभलेली होती; त्यामुळे त्याला वजनही आलेले होते. पण निजामाच्या लेखी तो फक्त एक हत्यार होता आणि हे हत्यार वापरणारे कुशल हात उस्मानअलिखां बहादुर निजाम यांचे होते.

ज्या वाटाघाटी व्हावयाच्या त्यांच्या दिल्लीच्या टोकाला माऊंटबॅटन असल्याने निजामाने माऊंटबॅटन यांच्या घराण्याशी ज्यांचे अत्यंत निकट संबंध होते अशा सर वॉल्टर मॉक्टनला प्रचंड पैसे देऊन आपल्या बाजूने वाटाघाटी करण्यासाठी बोलविले होते. हेच सर वॉल्टर हैदराबादचे प्रतिनिधी म्हणून दिल्लीला जात. गंमत पाहा. सर वॉल्टर मॉक्टन हे अर्ल ऑफ माऊंटबॅटन यांच्या घराण्याचे इंग्लंडमधील वकील. म्हणजे हिंदुस्थानच्या वतीने जो गव्हर्नर जनरल वाटाघाटीत बसतोय त्याचाच स्वतःचा वकील निजामाच्या बाजूने वाटाघाटीला बसतोय. निजाम इतका धूर्त होता. ही सगळी रचना लक्षात घेतल्याशिवाय हैदराबादच्या राजकारणाच्या खाचा-खोचा कळणार नाहीत. या राजकारणाचे सगळे टप्पे नीट पाहायला पाहिजेत. या राजकारणाला क्रमाक्रमाने गती घेत गेलेली आहे. एका टप्प्यामधे सत्तावीस-अठ्ठावीसच्या घटना येतात. पुढच्या टप्प्यावर आपण तीस-बत्तीसपर्यंत येतो. या काळामधे भारताचे धोरण सुद्धा बदलतच असते. आज आपण इथे थांबू. भारताचे बदलते धोरण, हैदराबादच्या राजकारणाची बदलती भूमिका, निजामाची बदलती भूमिका या क्रमाने कशा साकार होत गेल्या या घटनेकडे आपण उद्या जाऊ.

❀ ❀ ❀

(सेलूच्या नूतन महाविद्यालयात दि. ३,४ व ५ जुलै १९७८ या दिवसात भांगडिया व्याख्यानमाला संपन्न झाली. त्याचे शब्दांकन प्रा. प्रकाश कामतीकर व प्रा. कुलकर्णी यांनी केले असून परिष्करण महाकवी कै. आनंद साधले यांनी केलेले आहे.)



हैदराबाद मुक्ति संग्रामाचे सेनानी
स्वामी रामानंद तीर्थ व
त्यांचे सहकारी दिगंबरराव बिंदू



हाच तो कासिम रझवी, रझाकारांचा नेता. हैदराबाद मुक्तिलढ्यातील खलनायक. मूळचा लातूरचा रहिवासी असलेला कासिम रझवी हा चांगला वकील व सद्गृहस्थ होता, अशी माहिती अन्य प्रकाशित ग्रंथावरून मिळते. परंतु निझामाच्या संपर्कात आल्याने तो या आंदोलनातील खलनायक बनला.

## १५.

# भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

**व्याख्यान दुसरे :**

आज सुरुवात करण्यापूर्वी आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे. हैदराबाद संस्थानमधील सगळी जहागिरदारी, वतनदारी, जमीनदारी निजामाच्या पक्षाची होती. संस्थानी काँग्रेसमध्ये छुपी निजामाची माणसे होती. निजामाच्या बाजूचा हा काँग्रेसमधील मतकक्ष प्रबल होता. संस्थानातील संघर्षाचे स्वरूप भांडवलशाही विरुद्ध मजूर असे फारसे नव्हते. पण जमीनदार आणि कुळे यातील तीव्र संघर्ष असे त्याचे स्वरूप आरंभापासून शेवटपर्यंत होते. वतनदार, जमीनदार, जहागिरदार हे निजामाच्या बाजूचे आणि सामान्य शेतकरी कुळे-म्हणजे प्रजा निजामाच्या विरुद्ध. निजाम हा प्रजेचा शत्रू. केवळ हिंदू प्रजेचा असेच नव्हे. राज्यामध्ये असणारी मुस्लिम प्रजा तिचाही-तिला कल्पना नसली तरी-निजाम हा शत्रूच. प्रजा हिंदू असो अगर मुसलमान असो. सर्वच प्रजेचा जबरदस्त प्रतिस्पर्धी आणि शत्रू; जनतेच्या साऱ्या कल्याणाचा आणि स्वातंत्र्याचा शत्रू असे आता निजामाचे रूप आहे. पण आपल्या सगळ्या चिंतनाचा एक कच्चा दुवा असतो. तो हा की आपण आपल्या शत्रूचे सामर्थ्य पूर्णपणे ओळखत नाही. ज्या शत्रूचा आपण पाडाव केलेला आहे त्याचेही स्वरूप आपण इतिहास शिकताना समजून घेतले पाहिजे. हा शत्रू होता तरी कोण? याची ताकद किती? याचा मुत्सद्दीपणा किती? याचा पाताळयंत्रीपणा किती? याचे कर्तृत्व किती? हे आपण समजून घेतले नाही तर आपल्या विजयाचे स्वरूपही आपणास समजणार नाही. तुम्ही त्याच्याविषयी काही प्रेम बाळगावे, आदर बाळगावा असा त्याचा अर्थ

नसतो, तर भारताच्या इतिहासातील ही नेहमीची कच्ची बाब आहे की, आपण आपला शत्रू समजून घेण्यात कमी पडतो, ती या वेळी टाळली पाहिजे. शिवाजीने ही चूक कधीही केली नाही. पण आलमगीर औरंगजेब समजून घेण्याच्या बाबतीत पुढच्या काळात नेहमी चूकच झाली. पेशवेही ज्या शक्तींच्या विरुद्ध झगडत होते त्या शक्तींच्या सामर्थ्याचा अंदाज त्यांना नेमका कधीही झाला नाही. आजच्या भारतीय नेत्यांमधील अगदी वरिष्ठ नेते जर सोडले तर इतरांना आपण ज्या शत्रूशी झगडतो आहोत त्या शत्रूच्या सामर्थ्याचा अंदाज, त्याच्या कर्तृत्वाचा अंदाज कधीच आला नाही. आणि त्यातूनच मग नानाविध प्रकारच्या दंतकथा निर्माण झाल्या. चुकीच्या प्रतिमा निर्माण झाल्या. आपल्या मनातील निजामाची चुकीची प्रतिमा काढून टाकावी याचा प्रयत्न मी काल केला आहे.

आता पुढे जावयाचे म्हणजे निजामाचे हे जे राज्य होते ते सोळा जिल्ह्यांचे' होते. ते चोवीस जिल्ह्यांचे झाले पाहिजे हा निजामाचा एक प्रयत्न राहिला; जे सोळा जिल्हे होते त्यांतील आठ जिल्हे तेलुगू भाषिक, पाच जिल्हे मराठी भाषिक आणि तीन जिल्हे कानडी भाषिक होते. पूर्वी जेव्हा निजामाने तैनाती फौजेचा अंमल स्वीकारला होता तेव्हा त्याला रायलसीमेचे दोन जिल्हे सोडून द्यावे लागले होते. हे सर्व पूर्वजांनी केलेले. हे दोन जिल्हे आता आपले आपणाला मिळावे अशी निजामाची मागणी होती, म्हणजे सोळाचे अठरा झाले. अठराशे त्रेपन्नमध्ये रघूजी भोसले यांच्या जहागिरीत जो वाटा मिळाला त्यातील चार जिल्हे ब्रिटिशांसाठी सोडून द्यावे लागले होते. ते परत मिळावे ही निजामाची मागणी होती. म्हणजे अठराचे बावीस झाले. टिपू सुलतानाविरुद्ध जी लढाई झाली त्या लढाईत रास्त वाट्यापेक्षा आपल्याला दोन जिल्हे कमी मिळाले अशी निजामाची तक्रार. तेही दोन जिल्हे आता मिळावे ही निजामाची तिसरी मागणी. म्हणजे बाविसाचे चोवीस झाले. निजामाच्या मागणीचा हा एक टप्पा झाला. हैदराबादला बंदर नाही, तेव्हा बंदर मिळावे हा दुसरा टप्पा. हैदराबाद संस्थान स्वतंत्र असे मानून भारत आणि पाकिस्तान यापेक्षा निराळे असे त्याचे स्वतंत्र राष्ट्र हवे हा तिसरा टप्पा. ही निजामाच्या भूमिकेची एक बाजू झाली.

हैदराबाद संस्थानचा बराच भाग जहागिरींनी व्यापलेला होता. यातील सर्वांत मोठी जहागीर स्वतः निजामाची वैयक्तिक जहागीर होती. प्रत्येक जिल्ह्यात एक तालुका असे सोळा जिल्ह्यांत निजामाचे सोळा तालुके होते. यांना 'सर्फे खास' म्हणत असत.

संस्थानच्या एकूण उत्पन्नाचा बराच मोठा लचका निजाम स्वतःच्या वैयक्तिक उत्पन्नासाठी घेत असे आणि त्या पैशाची जगभर व्यापारासाठी गुंतवणूक करीत असे. या मार्गाने संस्थानची सरकारी संपत्ती वगळता निजामाने स्वतःची वैयक्तिक संपत्ती म्हणून प्रचंड साठा केलेला होता. जगातला सर्वांत सधन माणूस म्हणून निजाम ओळखला जात असे. निजामाची ही वैयक्तिक संपत्ती तीन अब्जांच्या आसपास होती. यांपैकी दोन अब्ज भारताच्या बाहेर निरनिराळ्या उद्योगधंद्यांत गुंतविले होते. ही गुंतवणूक सर्व जगभर केलेली होती.

श्रीमंती हा निजामाचा एक भाग झाला. दुसरा भाग असा की संपूर्ण संस्थानामध्ये मुसलमानांचे वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयोग निजामाने पद्धतशीरपणे पार पाडला होता. मुसलमानांविषयी त्याला फार प्रेम वाटत होते असा याचा अर्थ नव्हे. निजामाच्या कारकीर्दीतसुद्धा मुसलमान समाजाचा फार मोठा भाग हमाली करणे, मजुरी करणे, टांगे चालविणे, घरकाम करणे, पानाचे दुकान चालविणे, चपराशी बनणे असेच व्यवसाय करीत असे. मुसलमान संस्कृतीला नपुसकांची आवश्यकता असते. यासाठी हैदराबादमध्ये दहा हजार हिजडेही गोळा केलेले होते. या सर्वांच्या प्रेमाने मुसलमान समाजाच्या उन्नतीसाठी निजामाने काही प्रयत्न केले असे नाही. पण त्याने असा आभास निर्माण केला की, हे राज्य मुसलमानांचे आहे. हा आभास निर्माण करतानाच त्याने मुस्लिम प्रभुत्व निर्माण करण्यासाठी कोणते पद्धतशीर प्रयत्न केले? संस्थानात जे मुसलमान जहागिरदार होते त्यांच्या बाजूला नवे मुसलमान जमीनदार तयार करण्याची त्याने योजना आखली. यासाठी त्याने सावकारीच्या क्षेत्रात मुसलमानांना प्रवेश करायला उत्तेजन दिले. निजामाच्या पूर्वी संस्थानात अरब, पठाण, रोहिले यांची सावकारी फारशी नव्हती. असलीच तर किरकोळ होती. परंतु ही सावकारी, शेतकऱ्यांना अंकित करण्यासाठी, जहागिरदारांशी संबंध ठेवण्यासाठी व नवा जमीनदार वर्ग उत्पन्न करण्यासाठी उपयोगी आहे हे ओळखून निजामाने अरब, रोहिले, पठाण यांची सावकारी सर्व संस्थानात विकसित होऊ दिली आणि एकेका सावकाराकडे पाचशे, सातशे, हजार एकर जमीन गोळा होऊ दिली. मुसलमान जहागिरदार हा जमीनदार वर्गावर वर्चस्व गाजविणार. मुसलमान सावकार हा जनतेच्या संस्कृतीवर वर्चस्व गाजविणार. या दोन गोष्टी झाल्या. आता सरकारी नोकरांची स्थिती काय होती ते पाहू. ज्या दिवशी निजामाने सत्ता हाती घेतली त्या दिवशी नोकरवर्गामध्ये सुमारे

सदुसष्ट टक्के हिंदू होते आणि तेहतीस टक्के मुसलमान होते. निजामाने नव्याने सुशिक्षित झालेल्या मुसलमानांची नोकरभरती करावयास सुरुवात केली. एकोणीसशे तीसपर्यंत निजामाने सर्व परिस्थितीची उलटापालट केली. हिंदूंचे प्रमाण तीस टक्क्यांपर्यंत खाली आणले. मुसलमानांचे प्रमाण सत्तर टक्क्यापर्यंत वर चढविले. आठराशे त्रेपन्न साली तेव्हाच्या निजामाचे लष्कर वीस हजाराच्या आसपास असावे. याची वाढ उस्मानअलीच्या वेळपर्यंत सत्तर हजारापर्यंत झाली होती. पण हे सर्व लष्कर बिनकवायतीचे, बुणग्याच्या स्वरूपाचे होते. निजामाने हे लष्कर बरखास्त केले. या लष्करामध्येच अरब, रोहिले, पठाण यांची भरती होती. त्यांना निवृत्त केल्यावर पूर्वी सांगितल्याप्रमाणे निजामाने सावकारीचे प्रोत्साहन देऊन सर्व संस्थानात पसरविले आणि सावकार मुसलमानांचे एक साम्राज्यच निर्माण केले. आपण सावकारीतून नोकराकडे व नोकराकडून सावकाराकडे असे आंदोलन करीत आहो. आता आधी नोकरांचा विचार पुरा करू. तीस साली हिंदू नोकऱ्यांत तीस टक्क्यांपर्यंत घसरले. निजाम नोकरांच्या प्रमाणावरील नियंत्रण शिक्षणावरील नियंत्रणातून अंमलात आणीत होता. त्याचा आता विचार करू.

निजामाच्या काळात शंभर प्राथमिक शाळांच्या चार हजार प्राथमिक शाळा झाल्या हे पूर्वी सांगितले, हे खरे आहे. पण याचा अर्थ शिक्षणाला मुक्त स्वातंत्र्य होते असा नाही. शिक्षणाचे प्रमाणं काय असावे हे निजामाने मनात पक्के ठरविले होते. हे अलिखित व अनधिकृत असे आदर्श प्रमाण दहा टक्के प्रजा शिक्षित असावी असे होते. प्रत्यक्षात हे प्रमाण दहा टक्क्यांपर्यंत त्याने कधी पोचू दिले नाही. परंतु ती आदर्श प्रमाणाची त्याची मर्यादा होती. आता हे दहा टक्के प्रमाण कशाचे? तर प्राथमिक शिक्षणाचे. प्राथमिक शिक्षणाचेच हे प्रमाण मर्यादित केल्यावर त्यातून माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण खाली घसरणार व त्यातून उच्च शिक्षणाचे प्रमाण आणखी खाली घसरणार. उच्च कॉलेज शिक्षणाचे हे प्रमाण पाव टक्क्याच्या (१/४%) वर जाऊ नये असेच धोरण निजामाने आखलेले होते. या धोरणासाठीच उस्मानिया विद्यापीठ अस्तित्वात आले; निजाम कॉलेज अस्तित्वात आले. पण सर्व संस्थानात पदवी घेण्याची अथवा उच्चतर शिक्षण घेण्याची सोय फक्त या दोनच ठिकाणी ठेवण्यात आली. इतर कुठेही पदवीचे कॉलेज नव्हते. काही ठिकाणी इंटरमीजिएट कॉलेजे होती. उच्च शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्ही शहरात या. शिवाय शिक्षण फक्त उर्दूमधून. म्हणजे

मुसलमानांना अधिक सुगम. या धोरणाने आपोआपच असे नियंत्रण राहिले की, साक्षरांच्या मध्ये हिंदू व मुसलमान यांचे प्रमाण सारखे. मॅट्रिक पातळीवर मुसलमानांचे प्रमाण काही टक्के जास्त, उच्च शिक्षणात दोन भाग मुसलमान तर एक भाग हिंदू असे प्रमाण आपोआपच स्थिर झाले. हिंदूंना तर सगळ्या शहाणे करावयाचे नाहीच पण मुसलमानांनाही सगळ्याच शहाणे करावयाचे नाही. कारभाराला आवश्यक तेवढेच लोक उच्च शिक्षित होऊ द्यायचे. गरज असेल तेवढे लष्कर, गरज पडेल तेवढेच पोलिस. गरज पडेल तेवढेच बँकर्स! सर्वच जनतेला शहाणे करून राजसत्ता धोक्यात आणण्याच्या भानगडीत पडावयाचे नाही.

यापुढे जाऊन नोकरवर्गाच्या दोन जाती ठरविल्या. एक ओहदे कुलिया आणि दुसरी ओहदे गैरकुलिया. ओहदे कुलिया म्हणजे मोक्याची पदे. (Key Posts, Gazetted Posts) तहसिलदार, त्यांच्या वरचे अधिकारी, पोलिसांचे ज्येष्ठ अधिकारी, जमिनीची खरेदी-विक्री नोंदणारे रजिस्ट्रार्स, न्यायालयाचे अधिकारी सगळेच मोठे अधिकारी हे ओहदे कुलिया. यात पंचाण्णव टक्के प्रमाण मुसलमानांचे व पाच टक्के प्रमाण मुसलमानेतरांचे ठरले. हैदराबाद शब्दांच्या कोशात हिंदू असा शब्द नव्हता. मुसलमान आणि मुसलमानेतर अशी सारी रचना चालावयाची. मुसलमानेतरांमध्ये हिंदूही येत, लिंगायतही येत, पारशी येत, जैन येत, शीख येत, ख्रिश्चन येत, अस्पृश्यही येत. जितके येणार असतील तितके येतील. हे सगळे मुसलमानेतर धरायचे व पाच टक्क्यांत बसवायचे. प्रत्यक्ष लोकसंख्येत हिंदूंचे प्रमाण शहाऐंशी टक्के होते. मुसलमान अकरा टक्के होते. इतर तीन टक्के होते. मोक्याच्या नोकऱ्यांत मुसलमान पंचाण्णव टक्के आणि इतर सारे पाच टक्के अशी वाटणी होती. इतर ज्या शाळामास्तर, चपराशी असल्या पातळीच्या म्हणजे ओहदे गैरकुलिया जागा होत्या त्यात हिंदूंना वाव द्यायचा. तो अधिकृत भाषेत पंचाहत्तर टक्के मुसलमान आणि पंचवीस टक्के मुसलमानेतर. म्हणजे एकूण शिक्षण आणि नोकऱ्या याची परिस्थिती पाहा. साक्षरतेचे प्रमाण दहा टक्के. उच्च शिक्षणाचे प्रमाण पाव टक्का. हा आदर्श तसाच नोकरीच्या प्रमाणातील टक्केवारीचाही आदर्श. जनतेत जास्त जागृती येऊ द्यावयाची नाही. तरीही साऱ्या जगातील सारे आधुनिक ज्ञान स्वतःच्या संस्थानची सत्ता वाढविण्यासाठी वापरायचे अशी ही अत्यंत धोरणाने आखलेली व अंमलात आणलेली योजना आहे. ती रचना जनतेचे कल्याण कसे करता येईल यासाठी नाही.

म्हणायचेच असेल तर निजामाला सोशियालिस्ट सुद्धा म्हणता येईल. याचे कारण असे की निजामाने जे कारखाने वाढविले ते सर्व सरकारी मालकीत होते. त्यामुळे साराच पब्लिक सेक्टर होता. प्रायव्हेट सेक्टर निपजूच द्यायचा नाही व निपजला तर वाढू द्यायचा नाही ही त्याची भूमिका होती. त्यामुळे कापड गिरण्या राष्ट्रीय करण्याची गरजच नाही; साखर कारखाने राष्ट्रीय करण्याची गरजच नाही. कागदाच्या गिरण्या, कोळशाच्या खाणी, रेल्वे जे जे काही आहे ते सारे सरकारी. म्हणजे पब्लिक सेक्टरचे धोरण निजामाने फार प्रामाणिकपणे अंमलात आणले होते. पण यातला अधेलाही जनतेच्या कल्याणासाठी खर्चिला जाणार नाही यावर निजामाची नजर असे. निजामाची बुद्धिमत्ता पाहायला पाहिजे. त्याचे कर्तृत्व पाहायला पाहिजे. त्याचप्रमाणे त्याचा पाताळयंत्रीपणा आणि जनताद्रोही दुष्ट वृत्तीही समजून घेतली पाहिजे. निजामाचा अभ्यास म्हणजे मित्राचा अभ्यास नव्हे; शत्रूचा अभ्यास आहे. ही जी संपूर्ण रचना आहे त्याला निजामाची काही सूत्रे होती. आझादे हैदराबाद या नावाची एक सुटी सुरू केली. संपूर्ण राज्यकारभाराची आणि शिक्षणयंत्रणेची रचना उर्दू माध्यमातून केली. या निजामाच्या पूर्वी संस्थानात उर्दू माध्यम नव्हते. हे संपूर्ण उर्दू माध्यमात रूपांतर करण्याचा कारभार त्याने स्वतः एकोणीसशे पंधरा ते एकोणीसशे वीस एवढ्याच काळात पुरा पाडला.

हैदराबादचे राज्य व्यवस्थितपणे चालविण्याचे असे हे निजामाचे काम एकीकडे चालू आहे. एकीकडे इत्तेहादुल मुसलमीन संघटना वाढविण्याचा, खाकसारांचे रझाकार करण्याचा, धर्मप्रसार करण्याचा हाही उद्योग चालू आहे. अंजुमान पस्तारख्याम ही संघटना, अस्पृश्यांच्या संघटना हिंदूहून वेगळ्या असाव्या म्हणून काढली आहे, वाढविली आहे. ब्राह्मणेतरांच्या संस्था ब्राह्मणांहून वेगळ्या पडाव्या हाही प्रयत्न चालू आहे. आदिवासी वेगळे पडावे म्हणून त्यांचीही एक संस्था काढली आहे. असे हे सगळे निजामाचे उद्योग चालू होते.

इकडे भारतीय राजकारणात एकोणीसशे वीस पासून महात्मा गांधींचा उदय झाला आहे. महात्मा गांधी हे भारतीय राजकारणातील एक चमत्कारिक प्रकरण आहे. महाभारताप्रमाणे महात्मा गांधींच्या वाङ्मयातून कोणत्याही भूमिकेला पाठिंबा देणारे वचन आपल्याला उद्धृत करून दाखविता येते. कारण महात्मा गांधींची मते राजकारणाबरोबर क्रमाने विकसित होत गेलेली आहेत. एकोणीसशे अठ्ठेचाळीसचे

गांधी अठराशे ब्याण्णवसाली सापडणार नाहीत. ब्याण्णव ते अठ्याण्णव महात्मा गांधी आफ्रिकेत होते. या काळात गांधींची भूमिका ही राहिली आहे की आम्ही ब्रिटिशांचे अत्यंत इमानदार सेवक आहोत. रानडे, गोखल्यांची भूमिका ही होती की आम्ही ब्रिटिश सत्तेचे चाहते आहोत व ती सत्ता लोकप्रिय करू इच्छितो. या राज्यामुळे आमच्या देशाचे आधुनिकीकरण होईल म्हणून आम्ही इंग्रजांच्या राज्याचे कौतुक करतो. या वेळेपर्यंत गांधींची भूमिका अशी बदललेली आहे की, तुम्ही आमचे कल्याण करा की न करा, आधुनिकीकरण करा की न करा, या देशाचे राज्य तुम्हाला दिलेले आहे. ईश्वराची इच्छाच ती आहे की हिंदुस्थानवर राज्य तुम्ही करावे. आम्ही तुमचे नागरिक आहोत. आमची अशंक निष्ठा संपूर्णपणे (Undoubted Absolute Loyalty) इंग्रजांच्या राज्याशी आहे. ही गांधींची भूमिका आहे. या भूमिकेने इंग्रजांना फार त्रास झाला. कारण 'आमची तुमच्यावर निष्ठा आहे व तुम्ही न्यायी आहात' असे म्हणताच इंग्लंडमध्ये इंग्रज प्रजेचे जे अधिकार आहेत तेच भारतीय प्रजेला हवेत असा अर्थ निघाला. भारतीयांना हे अधिकार द्यावेत अशी इंग्रजांची इच्छा आहेच, परंतु ते दिले जात नाहीत कारण इंग्रजी अधिकारी अडाणी आहेत. यासाठी इंग्लंडचा राजा आणि प्रजा यांच्या आत्म्याला जागृत करण्याची आवश्यकता आहे; ही गांधींच्या भूमिकेची पुढची व्याप्ती. इंग्रजांचे हक्क भारतीयांना पाहिजेत या निर्णयावर गांधी कळत न कळत बावीस सालपर्यंत आहेत. आता ते आफ्रिकेचे नेते नाहीत. भारताचे नेते आहेत. ही गांधींची उपरिनिर्दिष्ट भूमिका बावीस नंतर लगेच बदलली असून त्या वेळी त्यांनी न्यायालयात असे सांगितले आहे की, इंग्रजांचे राज्य हे देवाचे नसून सैतानाचे आहे असे त्यांचे मत आहे. हे राज्य मोडून टाकून समाप्त केल्याशिवाय भारताचेही कल्याण होणार नाही व इंग्रजांचेही कल्याण होणार नाही. हे मत प्रकट करून गांधी म्हणतात, "तुमच्या कायद्यात जी सर्वांत जास्त शिक्षा दिलेली असेल ती मला द्या. तुम्ही जर मला सोडले तर तुमचे राज्य कसे मोडावे याचे शिक्षण मी जनतेला देईन. माझी भूमिका बरोबर आहे असे जर तुमचे मत असेल तर मग न्यायाधीश महाराज तुम्ही इकडे माझ्या बाजूला या. तुमच्या पदाचा राजीनामा देऊन या. म्हणजे दुसरा कोणीतरी तुमच्या आसनावर बसून आम्हा दोघांना शिक्षा देईल." हे बावीस सालाअखेर गांधींचे मत. अठ्याण्णव - नव्व्याण्णव सालापासून हे क्रमाने बदलत इथे आले.

संस्थानिकांविषयीचे गांधीजींचे वीस सालच्या सुमाराचे मत पाहा : हे जे सारे

संस्थानिक आहेत ते आपल्या प्रिय भारतभूमीने जे स्वातंत्र्य गमावले त्या स्वातंत्र्याचे अवशेष आहेत. संस्थाने स्वतंत्र आहेत असे गृहीत धरले पाहिजे. त्यांच्या डोक्यावर असणारा इंग्रजांचा हात काढून घेतला पाहिजे. म्हणजे भारताचा तेवढा प्रदेश स्वतंत्र झाला, आणि उरलेल्या प्रदेशावरचे इंग्रजांचे राज्य काढून टाकले म्हणजे सगळा भारत स्वतंत्र झाला. हे करीत असताना एका संस्थानिकाच्या ताब्यात जरी सर्व हिंदुस्थान द्यावा लागला तरी ते इंग्रजांच्या राजवटीपेक्षा चांगले आहे. कारण जो संस्थानिक हिंदुस्थानचा ताबा घेईल तो शेवटी भारताचाच राहील. गांधींनी एका लेखात असे म्हटले आहे की, निजामांच्या हातात सर्व हिंदुस्थान सोडून जरी इंग्रज जाणार असले तरी त्यांची (म्हणजे गांधींची) तयारी आहे. गांधींनी असेही म्हटले आहे की, अफगाणिस्तानचा अमीर जर भारतावर हल्ला करणार असेल आणि लष्करी बळावर इंग्रजांचा पाडाव करून भारताला स्वतःचा गुलाम करणार असेल तर इंग्रजांचा गुलाम होण्यापेक्षा अफगाणिस्तानचा गुलाम होणे मी पत्करीन. ही सारी गांधींचीच वचने आहेत. ती उद्धृत करून गांधी हे कसे राष्ट्रद्रोही होते हे सिद्ध करता येईल. सत्तावीसपर्यंत गांधीजी या मताचे होते की, संस्थानामध्ये आपण लक्ष घालू नये. संस्थानात आपण लक्ष घातलेच पाहिजे असा निर्णय ज्या बड्या बड्या तरुण मंडळींचा होता त्या सर्वांत प्रमुख जवाहरलाल नेहरू होते. नंतर तीस साली गांधींना नेहरूंच्यामुळे असे वाटायला लागले की सगळेच संस्थानिक चांगले नाहीत. काही बरे होते; काही चांगले. काही अगदीच वाईट आहेत. जेवढे चांगले आहेत तेवढेच स्वातंत्र्याचे अवशेष आहेत. जेवढे बरे आहेत त्यांच्यात काही भ्रम निर्माण झालेले आहेत. जे वाईट आहेत ते इंग्रजांच्यापैकीच आहेत. तेव्हा त्यांना काढून टाकले पाहिजे. पस्तीस साली गांधीजी या निर्णयावर आले की जेवढे म्हणून संस्थानिक आहेत त्यांतून कोणीच भारतीय स्वातंत्र्याचा अवशेष नाही. हे सारे आपल्यावर लादल्या गेलेल्या पारतंत्र्याचे खांब आहेत. म्हणून हे सारे संस्थानिक, पहिल्यापासून शेवटपर्यंत, बरे असोत, चांगले असोत की वाईट असोत पण या साऱ्यांना निकालात काढल्याशिवाय, सगळ्यांची एकजात समाप्ती केल्याशिवाय भारताचा अभ्युदय होणार नाही. पस्तीसच्या नंतर छत्तीस-सदतीसच्या सुमारास ज्या दिवशी गांधी या निर्णयावर आले त्या वेळीच हैदराबादमध्ये जनतेचे आंदोलन सुरू झाले पाहिजे व ते सुरू झाले तर त्याचे नेतृत्व आपण करू याही निर्णयावर गांधी आले. गांधीजी ही अशी एक अलौकिक विभूती आहे की, सतत योग्य दिशेने विकसित होत

गेली आहे; आणि अशी चमत्कारिक विभूती आहे की तिची आदल्या दिवसाची मते आजच्या मतांच्या संपूर्ण विरोधी आहेत.

म्हणून गांधींचे उतारे देऊन सगळेच भारतीय आंदोलन बदनाम करणे सोपे आहे. गांधी हे वर्णाश्रमधर्माचे पुरस्कर्ते होते असे उतारे एकोणीसशे बावीस साली सापडतील. अनेकजण हे उतारे देऊन गांधी हे वर्णाश्रमाचे पुरस्कर्ते होते असे सांगतही असतात. तीस साली गांधी हे, सर्वच स्मृतिग्रंथ जाळून टाकण्याच्या लायकीचे आहेत या निर्णयावर आले होते. बावीस सालचे गांधी तीस साली शिल्लक नाहीत. ही जी गांधींची परिस्थिती आहे त्याचा परिणाम हैदराबादमधील भिन्न भिन्न मतांच्या मंडळींना गांधींच्या लेखनात आधार मिळण्यात झाला. यातून ज्या मंडळींचे असे मत होते की, हैदराबाद संस्थानात राजकीय चळवळ व्हावयास हवी याला गांधींचा पाठिंबा आहे, अशा मंडळींत केशवराव कोरटकर या नावाचे एक गृहस्थ होते. हे जिल्हा परभणी, तालुका वसमतचे होते. अतिशय उद्योगशील व विलक्षण मते असणारे गृहस्थ. हे फक्त चवथी पास. गृहस्थ स्वतःच्या कर्तृत्वावर वाढत वाढत हायकोर्टाचे वकील झाले. निजामाची मेहरबानी पत्करून त्याच्या मर्जीमधले होऊन बसले. शेवटच्या काळात निजामाच्याच मेहेरबानीने हे हायकोर्ट जज्ज़सुद्धा झाले. हैदराबादमध्ये पहिले लोकनियुक्त मंत्रिमंडळ बावन्न साली आले. या मंत्रिमंडळातील पहिले अर्थमंत्री विनायकराव विद्यालंकार यांचे केशवराव कोरटकर हे वडील. आणि लोकनियुक्त मंत्रिमंडळाचे पहिले मुख्यमंत्री बी. रामकृष्णराव हे केशवरावांच्या घरी असणारे विद्यार्थी. यांचे सर्व शिक्षण केशवराव कोरटकर यांनी केलेले. हे लक्षात ठेवले तर विनायकराव विद्यालंकारांना आपल्याबरोबर मंत्रिमंडळात घेण्याची घाई बी. रामकृष्णराव यांना का झाली याचा पत्ता आपणास लागेल. हा पत्ता शोधण्याचे कारण विनायकराव विद्यालंकार यांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात कधीही भाग घेतलेला नव्हता. याला अपवाद असलाच तर पोलिस कारवाई आधीचे दोन महिने. अधूनमधून इकडची आणि तिकडची म्हणून दोन्हीकडची नातीगोती आपणाला पाहायला पाहिजेत. अशीच तिकडची काही नाती सांगतो. अखिल भारतीय काँग्रेसच्या स्थापनेत पुढाकार घेणाऱ्यांत एक तय्यबजी होते. हे बद्रुद्दिन तैयबजी*

* बहुधा हे बद्रुद्दिन हसन असावेत. ते काँग्रेस चळवळीत १९२० च्या आसपास होते. पण ते अध्यक्ष नसून कोषाध्यक्ष होते अशी माहिती आढळते. ते खादीसंबंधी व्यवहाराचे प्रमुख होते. पण यासंबंधी अधिक तपास होणे आवश्यक आहे. .

अखिल भारतीय काँग्रेस कमिटीच्या पहिल्या, दुसऱ्या आणि तिसऱ्याही वर्षाचे अध्यक्ष होते. या तय्यबजींची मुलगी बिलग्रामींना दिलेली होती. तिची म्हणजे बिलग्रामींची मुलगी ही नबाब अलियावरजंग यांची बायको. त्यामुळे अलियावरजंग हे असे मनुष्य होते की त्यांचे सर्व भारतातील राष्ट्रीय मुसलमानांशी नाते तरी पोहोचत होते नाहीतर वाडवडिलांची ओळख तरी पोचत होती. हे अलियावरजंग निजामाचे खास सल्लागार. हे संबंध लक्षात ठेवायलाच पाहिजेत. आणखीही एक नाते सांगतो. मधल्या काळात मिर्झा इस्माईल यांना निजामाचे दिवाण म्हणून बोलावले होते. काही काळ हे मिर्झा इस्माईल वजीरे आझम म्हणजे पंतप्रधान होते. या मिर्झा इस्माईलना बिलग्रामींची दुसरी मुलगी दिली होती. म्हणजे हे अलियावरजंगांचे साडू. ही सारी नाती लक्षात ठेवल्यावरच अनेक राजकीय हालचालींचा नेमका अर्थ समजतो.

अठराशे ब्याण्णवमध्ये हैदराबादला आर्य समाजाची स्थापना झाली. ही कुणी केली हे अज्ञात आहे. वर केशवराव कोरटकरांचा उल्लेख आला. वीस सालापासून केशवरावांनी आर्यसमाज आपल्या हाती घेतला. नंतर संपूर्ण हैदराबादभर मुसलमानविरोधी चळवळ करण्यासाठी ज्यांची ताकद उपयोगी पडेल असे वाटले. अशा आर्यसमाजाच्या शाखांची साखळी उभी करण्याचा प्रयत्न केला. एकीकडे हे निजामाच्या विश्वासातील. दुसरीकडे सबंध संस्थानभर आर्यसमाजाच्या शाखा कायम करीत हिंडले. आर्यसमाज हीच हैदराबाद संस्थानातील अशी पहिली संघटना की जिने हातात हत्यार घेऊन मुसलमानाविरुद्ध लढण्याची पहिली प्रेरणा हिंदूंना दिली. पहिल्या सगळ्या मारामाऱ्या आर्यसमाजाच्या नेतृत्वाखाली झालेल्या आहेत. आणि या समाजाचा संपूर्ण विकास निजामाचे अत्यंत विश्वासू केशवराव कोरटकर यांनी केलेला आहे. या केशवराव कोरटकरांच्या सगळ्या साहित्य संमेलनांशी संबंध. तेव्हा सगळे साहित्यिक यांच्यापुढे हात जोडून उभे. यांचे गांधीजींना सतत सांगणे असे की, हैदराबादमध्ये राजकीय आंदोलन सुरू झाले पाहिजे, मी मात्र त्याचा सभासद होणार नाही. लागणारा सर्व पैसा मी मिळवून देईन. गांधींचे म्हणणे असे होते की, हैदराबादमध्ये राजकीय आंदोलन करण्याची अवस्था अजून आलेली नाही. तुम्ही शैक्षणिक आंदोलनाने सुरुवात करावी. याच काळामध्ये आंध्र प्रदेशातील एक दारूचे मक्तेदार आणि जुन्या निजामातील एक

वतनदार वामनराव नाईक हे हैदराबादला आले.* निजामाच्या आतल्या गोटात प्रवेश, काही इतर व्यापारी उद्योग आणि दारूचे मक्ते यांच्या जोरावर त्यांचा उद्योग सुरू झाला. हे वामनराव नाईक मुसलमानांचे कडवे द्वेष्टे होते. हेही निजामाच्या अत्यंत विश्वासातले. यांनी जागोजाग हिंदूंचे व्यायामाचे आखाडे स्थापण्यास मदत केली. जिथे लाठ्याकाठ्या शिकणारे हिंदू असतील तिथे शेपन्नास लाठ्या, शेपन्नास लेझिम आणि दोनचार तरवारी पुरविण्यास आरंभ केला. हैदराबाद संस्थानात हिंदुमहासभा स्थापन झाली त्या वेळी हजर राहणाऱ्यात एक नेते वामनराव होते. म्हणून हैदराबाद संस्थानची हिंदुमहासभा वामनरावांना आपले संस्थापक पितामह मानते. या वामनराव नाईकांचाही गांधींना सतत आग्रह चालू होता की तुम्ही हैदराबादमध्ये राजकीय आंदोलन सुरू करा. हे जर तुम्ही सुरू केलेत व त्याला नेतृत्व आणि मार्गदर्शन केलेत तर मी माझे सारे आयुष्य त्याला समर्पण करीन. मग माझे काहीही होवो. या वामनराव नाईकांचा परभणीशी अत्यंत निकटचा संबंध. कारण त्यांची दारू गाळण्याची यंत्रणा (Distillery) परभणीला होती. त्यांची एक कापडाची गिरणी अजूनही परभणीत आहे. एक गिरणी नांदेडमध्ये आहे. सेलूमधील कापसाच्या व्यापाराशी त्यांचा संबंध आहे. असे हे वामनराव नाईक. यांचे चिरंजीव बॅरिस्टर श्रीधर नाईक हे महाराष्ट्र प्रांतिक बरोबर** आणि स्वामीजींच्याबरोबर मरेपर्यंत राहिले. त्यांनी दुसरा काहीही उद्योग केला नाही. स्वामीजींच्या सहवासाचे काही फायदे त्यांना व त्यांच्या सहवासाचे काही फायदे स्वामींना म्हणजे आंदोलकांना मिळाले. याच तरुण मंडळींच्या कंपूत रामचंद्र नाईक नावाचा एक युवक होता. हा नुकताच बॅरिस्टर होऊन आला होता. हा वामन नाईकांचा पुतण्या. हा चांगला वक्ता होता. निजामी राजवटीविरुद्ध बेछूट बोलावयाचे काम याचे. वामनरावांनी याला सांगितले होते, तुझी वकिली चालो अथवा न चालो, तुला पाचशे रुपये महिना घरपोच येतील. काम एकच. रोज निजामाला शिव्या देत राहावयाचे. या उद्योगात तुला तुरुंगात जावे लागले तर जा. वर्ष दोन वर्षांत तुला

---

* हेही चूक आहे. वामन नाईकांचे आजोबा वनपर्ति संस्थानचे जहागीरदार होते. ते येण्याचा प्रश्न नव्हता. त्यांचा स्वतंत्र व्यवसाय १९०५ ला आरंभ झाला. आरंभी ते रेल्वेचे कंत्राटदार, नंतर तांदूळ वगैरेचे व्यापारी होते.

(जन्म इ.स. १८७८ मृत्यू ६ नोव्हेंबर १९३६) - **संपादक.**

** १९४२ च्या औरंगाबाद येथील महाराष्ट्र प्रांतिकचे अध्यक्ष - **संपादक.**

सोडवून आणण्याचे काम माझे. बायकामुलांना पाचशे रुपये घरपोच मिळतील. दरमहा पुतण्याची काकावर भरपूर श्रद्धा होती. पण निजामाचे त्यांच्याकडे लक्ष जाताच त्याने आपल्या दूताकरवी त्यांना बोलावून घेतले आणि सांगितले. तुम्ही जर तीन वर्षे गप्प बसाल तर मी तुम्हाला हायकोर्टाचे न्यायमूर्ती करीन. यांनी ते मान्य केले आणि ते हायकोर्टाचे न्यायाधीश झाले.

निजामाचे संस्थान संपवण्याच्या दृष्टीने राजकीय आंदोलन झालेच पाहिजे असा आग्रह गांधींकडे धरणारे तिसरे गृहस्थ दत्तो अप्पाजी तुळजापूरकर. यांना वरखाली सांभाळणारे कुणी नसल्याने अटक झाली व ते हद्दपार झाले. उर्वरित सर्व आयुष्य हैदराबाद संस्थानच्या बाहेर राहून त्यांनी 'माझे रामायण' सारख्या कादंबऱ्या लिहिल्या. अच्युत बळवंत कोल्हटकरांच्या वृत्तपत्रामध्ये जे 'वहिनीची पत्रे' असे सदर आहे त्यांतील बहुसंख्य पत्रे दत्तो अप्पाजी तुळजापूरकरांची आहेत. यांची हद्दपारी आहे: तिचे महत्त्व असे की; राजकीय कारणासाठी हैदराबाद संस्थानच्या हद्दपार होणारे हे पहिले मुलकी गृहस्थ. या अशा गडबडी चालू होत्या पण हैदराबाद संस्थानमध्ये राजकीय संघटना उभी करायला गांधी परवानगी देत नव्हते. गांधींची परवानगी नाही म्हणून संघटना नाही, मग हैदराबादच्या लोकांनी करावयाचे काय? शैक्षणिक उद्योग करा. शाळा काढा. यातूनच विवेकवर्धिनी संस्था निघाली आहे. वामनराव नाईकांनी ही शाळा काढण्यात पुढाकार घेतला, पण ते स्वतः संस्थेचे अध्यक्ष झाले नाहीत. त्यांनी पन्नालाल पित्ती यांना संस्थापक-अध्यक्ष केले. पन्नालाल पित्ती निजामाच्या परवानगीशिवाय अध्यक्ष व्हायला तयार नव्हते. म्हणून वामनराव नाईकांनी राममनोहर लोहिया यांच्या वडिलांकडून पित्तींवर वजन आणले. राममनोहर लोहियांचे वडील उत्तरेकडील बडे भांडवलदार, कारखानदार वगैरे होते. मुलगा समाजवादी निघाला हा प्रश्न वेगळा. आपल्यापैकी अनेकांना हे माहीत असेल की लोहियांची काही पुस्तके हैदराबादहून प्रकाशित झाली आहेत. हैदराबादमध्ये लोहिया दोन-दोन तीन-तीन महिने सलग राहात. त्यांच्या वडिलांच्या इस्टेटीचा जो विश्वस्तनिधी (Trust) होता त्याचे प्रमुख विश्वस्त पन्नालाल पित्ती होते. पित्तींची मुले हैदराबादला. तेव्हा हाही नातेसंबंध लक्षात घ्या. पित्ती विवेकवर्धिनीचे अध्यक्ष झाले* आणि प्रताप गिरींना त्यांनी उपाध्यक्ष

* कोषाध्यक्ष

केले. नंतर निरनिराळ्या ठिकाणी खाजगी शाळा काढण्याचे उद्योग सुरू झाले. ही सरस्वतीभुवन शाळा त्याच वेळी जन्माला आली आहे. याच उद्योगातून उस्मानाबाद जिल्ह्यातील हिप्परगा येथे एक छोटीशी प्राथमिक शाळा जन्माला आली आहे. अप्पासाहेब कुलकर्णी व अनंतराव कुळकर्णी हे दोघे मिळून ती शाळा चालवीत असत. या शाळेच्यामुळेच स्वामी रामानंद तीर्थ, बाबासाहेब परांजपे, आचार्य ग.धों.देशपांडे यांचे आगमन झाले. अजूनही राजकीय संघटना करायला परवानगी नव्हतीच. धर्मसुधारणेच्या मागण्या कराव्यात, आपल्यावर जी धार्मिक आक्रमणे होतात त्याविरुद्ध तक्रारी कराव्या अशी परवानगी होती. ही धार्मिक आक्रमणेही थोडी होती अशातला भाग नाही. नानाविध आक्रमणांतील एक असे हे मोहरमच्या काळात कुठेही वाद्यच वाजवायचे नाही. मोहरम नसेल तर मशिदीच्या इकडे तिकडे तीनशे पावले पलीकडे वाद्याला परवानगी होती. पण मोहरमच्या काळात संपूर्ण हैदराबाद संस्थानमध्ये कुठेही (घराच्या बाहेर) वाद्य वाजवायचे नाही. यांचा मोहरम केव्हाही येत असतो. तो वैशाखात आला की आमची सर्व लग्नकार्ये दार बंद करून करावयाची. हे असे अनंत धार्मिक अत्याचार. गांधींचे म्हणणे याविरुद्ध दाद मागा. धर्मसुधारणेची आंदोलने करा. म्हणजे हिंदूत कोणत्या उणिवा आहेत त्या सुधारण्याचा उपदेश करण्याच्या निमित्ताने जागृती करा. शैक्षणिक चळवळी चालवा. पण या वेळी राजकीय चळवळी नकोत. धार्मिक चळवळीचे जे उद्योग चालले त्यातून आणखी काही माणसे पुढे आली. त्यातील एक गुलाबचंद नागोरी. यांनी सबंध संस्थानभर मारवाडी समाजाने बुरखा बंद करावा अशी व्याख्याने देण्याचा उद्योग केला. सर्व मारवाडी समाज संस्थानभर संघटित करण्याचा प्रयत्न या एकाच माणसाचा आहे. या उद्योगातून जे नवे नेते पुढे आले त्यातील हरिश्चंद्र हेडा हे पुढे लोकसभेचे सभासदही झाले. दुसरे बिद्रिजीचंद्र चौधरी. हे पुढे स्वामीजींच्या निकटवर्ती मंडळातील एक होते. या सर्वांना मार्गदर्शन जमनालाल बजाज यांचे. आपण सेलूत आहोत. भांगडियांच्या स्मरणातून व्याख्याने देत आहोत. तर भांगडिया आणि जमनालाल बजाज यांच्या संबंधाचे भान आपणाला असू द्या.

असो. तर हे सर्व उद्योग आहेत. पण राजकीय उद्योग नाही. यासाठी गांधीजींची योजना त्रिस्तरीय (Three Tier) होती. धार्मिक सुधारणा हा पहिला स्तर. बालविवाह नसावे, प्रौढ विवाह असावे, विधवाविवाह असावे. हिंदूंनी बुरखा पाळू नये.

मारवाड्यांचा बुरखा घालवावा. मुलींना शाळेत घालावे. अशा अनंत चळवळी या स्तरांमध्ये येतात. दुसरा स्तर शैक्षणिक. आम्हाला शैक्षणिक हक्क हवेत. आम्हाला प्राथमिक शाळा पाहिजेत. आम्हाला हायस्कुले पाहिजेत. या असंख्य विषयावर बोला. पण राजकारणावर या स्तरांमध्ये काही बोलायचे नाही. बोलणार असाल तर माझ्याकडून मार्गदर्शनाची अपेक्षा करावयाची नाही हा गांधींचा आदेश.

यामुळे शैक्षणिक परिषदा भरण्याचे वेगवेगळे प्रयत्न झाले. हैदराबाद संस्थानची निजाम प्रदेशीय शैक्षणिक परिषद आपले पहिले अधिवेशन एकूणचाळीस साली परतूरला भरविती झाली. या अधिवेशनाला परवानगीही मिळाली. हे एक पाऊल पचनी पडले तेव्हा गांधींनी असा सल्ला दिला की, आता शैक्षणिक सुधारणा कशा कराव्या याचा विचार करणारे अधिवेशन भरवा.

सदतीस साली बाहेर संपूर्ण हिंदुस्थानभर पस्तीसच्या कायद्यावर आधारलेल्या निवडणुका झाल्या होत्या. या निवडणुका काँग्रेसने जिंकल्या व हैदराबादच्या चारही बाजूला काँग्रेसची मंत्रिमंडळे आली. आता गांधींनी ही भूमिका घेतली की हैदराबाद संस्थानमध्ये राजकीय आंदोलन संघटित करण्याची वेळ आलेली आहे. यासाठी गांधींना विशिष्ट लायकीचे दोन मुसलमान हवे होते. गांधी हे एका बाजूला थोर, साधुसंत आणि महात्मा. तर दुसऱ्या बाजूला अत्यंत धूर्त असे मुत्सद्दी. भगवान श्रीकृष्णात जसे अत्यंत रंगेलपण आणि अनासक्त ब्रह्मचाऱ्याची विरक्ती हे परस्परविरोधी गुण तसेच गांधीत. विश्ववंदनीय अशी ही महात्म्याची विभूती खेकड्यासारख्या वाकड्या चालीचा दुष्ट (Crooked) बॅरिस्टरही होती. तर या वाकड्या माणसाला मुसलमान समाजावर वजन असणाऱ्या दोन व्यक्तींची गरज होती. या व्यक्ती मिळाल्या तरच मुसलमानांना काँग्रेसमध्ये आणणे शक्य होणार होते. ही राजकारणाची दूरदर्शी गती होती. काँग्रेसमध्ये हिंदू हवेत त्यापेक्षा जास्त गरजेने मुसलमान हवेत. बंगाल, पंजाब, सरहद्दप्रांत आणि सिंध इथे जर काँग्रेस निवडणूक हरली तर स्वतंत्र भारतात हे चार प्रांत असणार नाहीत याची जाणीव गांधींनाच होती. खरे तर 'हिंदुस्थान हिंदुओंका' या घोषणा ज्यांनी दिल्या त्यांनीच पाकिस्तान प्रथम मान्य केले. जो हिंदूंचा तोच हिंदुस्थान असाही त्या घोषणेचा ध्वनी निघतो आणि मग जो भाग हिंदूंच्या ताब्यात नाही तो हिंदुस्थान नाही हे तुमच्याच मुखाने सिद्ध होते. राजकीय भूमिकेवर अतिरेकी घोषणा देताना खूप विचार करावा लागतो. नाही तर त्या घोषणा तुमच्यावरच

उलटतात. या खुळ्या घोषणा देणाऱ्यांनी अखंड भारताची लढाई सुरू होण्याआधीच ती राजकारणाच्या पातळीवर हरलेली आहे; आणि या चार प्रांतांवरचा अधिकार सोडून फाळणी येण्याआधीच ती पत्करली आहे. मुसलमानांचे अस्तित्व ही वस्तुस्थिती आहे. तिच्याकडे आंधळेपणाने पाहून चालणार नाही. गांधींनी हे चार प्रांत भारतात राहावेत यासाठी सातत्याने उद्योग केला. त्यात गांधींना अपयश आले यामागे हिंदुस्थान हिंदूंचा ही घोषणा करणारेही साधनीभूत आहेत. अखंड भारताची लढाई लढताना हरलेला नेता याच दृष्टिने गांधींकडे पाहावे लागेल.

मुसलमान समाजावर ज्याचे वजन आहे असा मुसलमान नेता हाती लागेपर्यंत हैदराबादला राजकीय आंदोलन सुरू करणे महात्मा गांधींना धोक्याचे वाटे. चौतीस साली गांधींचा मार्ग काहीसा मोकळा झाला. सरहद्द प्रांतामध्ये इंग्रजांच्या विरोधी जे आंदोलन सुरू झाले त्यात दोन मुसलमान नेते उदयास आले. एक सरहद्द गांधीअब्दुल गफारखान आणि दुसरे त्यांचे बंधू बादशहाखान. हे दोन नेते असे होते की सत्याण्णव टक्के मुस्लिम लोकसंख्या असणाऱ्या प्रांतात त्यांचे बहुमत होते आणि ते दोघेही महात्माजींचे अनुयायी होते. याप्रमाणे काश्मीरमध्ये अनसार चळवळीतून शेख अब्दुल्ला उदयाला आले. त्यांचे काश्मीरच्या बहुसंख्य मुसलमानांवर प्रचंड वजन होते. ते काश्मीरच्या हिंदू राजाच्या विरूद्ध लढत होते. एक मुसलमान नेता (हिंदू राजाच्या विरोधी लढणाराही) मिळाला की त्याला संस्थानी प्रजा परिषदेचे अध्यक्ष करता येते. आणि त्याच्याच हातून एका मुसलमान राजाच्या विरुद्ध लढायला हिंदूंची संघटना उभी करता येते. तोंडाने तुम्ही निधर्मीपणाच्या कितीही गोष्टी बोला. व्यवहारामध्ये हैदराबादमध्ये काँग्रेस ही हिंदूंची संघटना. तिला मुसलमानांचे नेतृत्व असले तर दहावीस मुसलमान तरी तुमच्याबरोबर राहतील. निधर्मी देखाव्याला हे आवश्यक आहेत. हे सारे लोकशाहीच्या आधुनिक राजकारणाचे स्वरूप आहे. निजामाची निंदाच केली पाहिजे असे म्हणणारे दोन तरी मुसलमान हैदराबादमध्ये हवेतच. त्यांचे मुसलमान समाजावर वजनही असले पाहिजे. छत्तीस-सदतीसपर्यंत असे मुसलमान नेते गांधींना मिळत नव्हते. ते आता मिळाले. गांधीजी स्वतःही संस्थानिक संपविलेच पाहिजे या निर्णयावर आले. त्यामुळे सत्तावीस सालापासून रेंगाळत असणारे संस्थानी प्रजा परिषदेचे प्रकरण आता गतिमान करण्याचा निर्णय गांधींनी घेतला. सदतीस सालापासून या परिषदेची अधिवेशने अखिल भारतीय काँग्रेसच्या अधिवेशनाप्रमाणे प्रचंड तोलामोलावर घडायला सुरूवात

झाली. नेहरू, पटेल आदी जी नेतेमंडळी अधिवेशनाला येत असत त्यांनी मार्गदर्शनासाठी भारतीय संस्थाने आपणात वाटून घेतली हे मी काल सांगितलेच. अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदेचे अध्यक्ष शेख अब्दुल्ला आणि उपाध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ असा जोड बनविण्यात गांधीजींना यश आले. तेव्हा गांधींनी हैदराबादच्या पुढाऱ्यांना सल्ला दिला की, आता राजकीय संघटनेची वेळ आली आहे. तरी तुम्ही हैदराबाद स्टेट काँग्रेस स्थापन करा. या संस्थेला परवानगी मिळणार नाही. तरी कायदेभंग करून, सत्याग्रह करून तुम्हाला ही काँग्रेस स्थापन करावी लागेल. हा धोका घ्यावयाचा की नाही याचा विचार करण्यासाठी मनमाडला एक सभा बोलविण्यात आली. या सभेत असे ठरले की, हैदराबाद स्टेट काँग्रेस स्थापन करावयाची. गोविंदराव नानल यांना तिचे अध्यक्ष करावयाचे. सरकारने तिच्यावर बंदी घातली तर पहिला सत्याग्रह गोविंदराव नानल यांनीच करावयाचा. ही सर्व चर्चा हैदराबादच्या सीमेबाहेर मनमाडला करून लगेच मंडळी सीमेच्या आत आली आणि त्यांनी हैदराबाद स्टेट काँग्रेस स्थापन करण्याचा मनोदय जाहीर केला. हैदराबाद शहरातील सुलतान बझारमधील एका जागी काँग्रेसची औपचारिक स्थापना केली. त्याच्या आदल्याच दिवशी हैदराबाद सरकारने एक आदेश काढून संस्थानमध्ये काँग्रेसची स्थापना करायला बंदी घातली होती. स्टेट काँग्रेस स्थापनेची ही मनाई स्थापना होण्याच्या आदल्या दिवशी झाली. हा मनाई हुकूम मोडूनच स्थापना करण्याचा निर्णय झाला व स्थापना घडून कार्यक्रमाला आरंभही झाला. हा हैदराबाद संस्थानात राजकीय आंदोलन जाहीरपणे सुरू करण्याचा पहिला कार्यक्रम आहे. या कार्यक्रमातूनच पुढे सर्व घटना क्रमाक्रमाने विकसित झाल्या आहेत.

ही घटना घडण्याच्या सुमारासच एक तरुण पुण्यातून शिकून नुकताच औरंगाबादला आला होता. याच्याजवळ वक्तृत्व फारसे नव्हते. पण हा अतिशय बुद्धिमान आहे अशी सर्वांची खात्री पटलेली होती. हा माणूस पुण्याहून आला तरी गुजराथी होता. गुजराथी होताच शिवाय सरदार पटेलापर्यंत सर्व गुजराथ्यांशी त्याचे संबंध होते. हा विचाराने अत्यंत पुरोगामी होता. या कार्यकर्त्याला काही वाव देता आला पाहिजे या दृष्टीने औरंगाबादेला विचार सुरू झाला. औरंगाबादच्या तरुणांमध्ये काही सभा घेण्यात आल्या व त्यांना सांगण्यात आले की त्यांनी 'वंदे मातरम्' म्हणावे. वंदे मातरम्चे आंदोलन अशा प्रकारे संस्थानात औरंगाबादेहून सुरू झाले आणि पुढे संस्थानभर पसरले. वंदे-मातरमच्या सभांसाठी औरंगाबादला तरुणांची बौद्धिके घेणारा

हा तरुण पुढारी म्हणजेच आजचे गोविंदभाई श्रॉफ. त्यांचा उदय या बौद्धिकांतूनच झाला. याच वेळी म्हणजे अडतीस सालच्या सुमारास विद्यार्थ्यांनी म्हणजे हिंदू विद्यार्थ्यांनी शिक्षणावर बहिष्कार टाकायला सुरुवात केली. ज्यांनी बहिष्कार टाकला ते सर्वच संस्थानाबाहेर गेले नाहीत. जे असे बाहेर गेले त्यांना उस्मानिया विद्यापीठाची पदवी मिळाली नाही. त्यामुळे ते सरकारी व इतरही नोकऱ्यांना वर्ज्य ठरले आणि त्यामुळे आपोआपच पुष्कळसे राजकीय कार्यकर्ते उपलब्ध झाले. अडतीसमध्ये शिक्षण संपलेल्या अशा कार्यकर्त्यांपैकी एक अनंतराव भालेराव आहेत. दुसरे गोविंदराव देशमुख आहेत. तिसरे व्ही.डी.देशपांडेही आहेत. असे अनेक आहेत. सर्वांची नावे घ्यायला वेळ पुरणार नाही. तर मुद्दा हा चालू आहे की 'वंदे मातरम्' ही जी विद्यार्थ्यांची चळवळ आहे ती याच वेळी सुरू झाली. संस्थानातील वंदे मातरम् चळवळीचे हे मूळ.

आर्यसमाजानेही याच वेळी म्हणजे अडतीस साली असे ठरविले की आमच्यावर फार मोठे अन्याय होतात म्हणून ओरडायला सुरुवात करायची. त्यामुळे आर्यसमाजाचे सत्याग्रह आंदोलन याच वेळी झाले. आर्यसमाजाने सत्याग्रह करण्यासाठी म्हणून जो मार्ग स्वीकारला तोही मोठा लोकविलक्षण आहे. त्याने एक अगदीच साधी भूमिका घेतली. ती अशी की ज्या ज्या ठिकाणी शक्य असेल तिथे मुसलमानांना प्रतिकार करा. या भूमिकेमुळे गुलबर्गा, उदगीर, निलंगा, या तीन ठिकाणी मुसलमानांनी ज्या हिंदू बायकांना पळवून नेण्याचा प्रयत्न केला त्यांना सोडवून आणण्याच्या निमित्ताने प्रचंड मारामाऱ्या झाल्या. त्यांच्या परिणामी अटक होऊन माणसे तुरुंगात गेली. या अटक झालेल्यांपैकी शामराव उदगीरकर जेलमध्ये वारले. (ही मृत्यूची घटना व दंगलीची घटना अडतीसच्या जरा आधीची म्हणजे सदतीसची. पण -) त्यानंतर आर्यसमाजाने सत्याग्रहाची भूमिका घेतली व त्यांचाही सत्याग्रह सुरू झाला. आर्यसमाजाच्या सत्याग्रहामुळे हिंदूमहासभेनेही सत्याग्रह आरंभला. त्यामुळे अडतीस साली एकाच वेळी, वंदे मातरमूची विद्यार्थ्यांची चळवळ, स्टेट कॉंग्रेसचा सत्याग्रह, आर्यसमाजाचा सत्याग्रह आणि हिंदुमहासभेचा सत्याग्रह अशी चार आंदोलने झाली. यातील एका आंदोलनावर इथे चर्चा करावयाची नाही. कारण आर्यसमाज ही संस्थाच फार वेगळी आहे. एका बाजूला वेदांवर कठोर श्रद्धा ठेवणारे आणि जगात वेदांशिवाय दुसरे काहीच नाही असे मानणारी ही मंडळी कर्मठ सनातनी. दुसऱ्या बाजूला वेदात जातिभेद नाहीत म्हणून हे जातिभेद पाळणार नाहीत. वेदात आंतरजातीय विवाहाला, प्रौढ विवाहाला मान्यता

आहे म्हणून तसे विवाह करणार. वेदात विधवाविवाहाला मान्यता आहे म्हणून तसे विवाह करणार. वेदात अस्पृश्यता नाही म्हणून ती पाळणार नाहीत. वेदात अस्पृश्याच्या मुंजीला विरोध नाही म्हणून तशा मुंजी करणार. असे समाजसुधारणांचे सगळेच कार्यक्रम त्यांनी वेदातून आणले. हे स्वतः उठणार आणि मूर्तीला शिव्या देणार. देव-देवतांना शिव्या देणार. आणि हे उद्योग चालू असतानाच मुसलमानांनी कोणत्याही मूर्तीवर अथवा देवळावर आक्रमण केले की आर्यसमाज हातात काठ्या घेऊन देवळाच्या रक्षणाला सिद्ध होणार. असा हा आर्यसमाज. गांधींना काहीही कळत नाही; निधर्मवाद कळत नाही; अहिंसा कळत नाही. सगळे जे काही आहे ते महर्षी दयानंदांनाच कळते हा यांचा दावा. आणि हे असतानाच गांधींच्या सर्व आज्ञेचे तंतोतंत पालन करण्यात हा समाज सर्वांत पुढे. त्यामुळे आर्यसमाज ही काँग्रेसची एक शाखा असावी तसेच होते. त्यांचे पहिले प्रमुख नेते लाला लजपतराय हे काँग्रेसचे अनुयायी होते. आर्यसमाजाचे तेवढेच प्रमुख नेते स्वामी श्रद्धानंदही काँग्रेसचे अनुयायीच होते. त्या भूमिकेवरून हिंदू-मुसलमान ऐक्याचा प्रचार करीत असतानाच एका माथेफिरू मुसलमानाने त्यांचा खून केला. आर्यसमाजाचे तिसरे प्रमुख नेते चंद्रभानू गुप्ता काँग्रेसमनच होते, आणि ज्यांच्याविषयी सध्या उदंड चर्चा चालू आहे ते गेल्या बारा वर्षांतील अखिल भारतीय आर्यसमाजाचे सर्वांत मोठे नेता चरणसिंग हेही काँग्रेसमनच होते. त्यामुळे आर्यसमाज ही एका अर्थाने काँग्रेसमध्येच असणारी संघटना. आर्यसमाजाने हैदराबादमधील स्वतःच्या आंदोलनाला काँग्रेसच्या आंदोलनाच्या काही महिने आधी सुरुवात केली. काँग्रेसने आपले आंदोलन समाप्त केल्यावर एकदोन महिन्यांनी आर्यसमाजाने त्याचे आंदोलनही समाप्त केले. या आंदोलनात भाग घेणाऱ्या सत्याग्रहींचे पुढे काय झाले या दृष्टीने तुम्ही शोध घेऊ लागलात तर तुमच्या असे लक्षात येईल की आर्यसमाजाचे बहुतेक सगळे सत्याग्रही सत्तेचाळीसमध्ये काँग्रेसबरोबरीने लढत आहेत. इथे सेलूचे काय आहे मला माहीत नाही. परभणी जिल्ह्याचे चित्र मला माहीत नाही. पण नांदेड जिल्ह्यामध्ये आर्यसमाजात प्रारंभी कार्य करणारे प्रमुख कार्यकर्ते काँग्रेसमध्ये आले. नांदेड शहरातच शामराव बोधनकर, भगवानराव गांजवे, गोपाळरावशास्त्री देव हे तिघेही काँग्रेसमध्ये आले. उमरी बँक प्रकरणातील सर्व माहिती गोळा करणारे उद्यमशील धनजी पुरोहित, पंडित नरेन्द्रजी (आता मुक्काम हैदराबाद) काँग्रेसमध्येच आले. अहमदपूर, निलंगा, उदगीर हे जुन्या बिदर जिल्ह्याचे भाग आहेत. आजच्या

उस्मानाबाद जिल्ह्यातील केंद्र हे आर्यसमाजाचे फार मोठे केन्द्र होते. कामतीकर घराणे, शेषराव वाघमारे आणि त्यांचे भाऊबंद, मुरलीधरराव कामतीकर व त्यांचे सर्व घराणे हे आर्यसमाजाचे प्रमुख नेते. ही सर्वच मंडळी काँग्रेसची. तेव्हा आर्यसमाजाने आंदोलन सुरू कसे केले, मागे कसे घेतले याची वेगळी चर्चा करण्याचे कारण नाही. ही थोर मंडळी काँग्रेसची अनौपचारिक शाखा होती. गरजेनुसार काँग्रेसला शिव्या देण्याचे आणि प्रसंग येताच काँग्रेसच्या मदतीला जाऊन लढावयाचे असे आर्यसमाजाचे रूप आहे. हे रूप विशद करण्यासाठी एवढा वेळ घेतल्यावर मी त्यांच्या आंदोलनाची वेगळी चर्चा करत नाही.

विद्यार्थी आंदोलनाचीही वेगळी चर्चा करण्याचे कारण नाही. कारण विद्यार्थी आंदोलनातून चालून जी मंडळी आली ती पुढे चालून काँग्रेसमध्ये गेली. अडतीसच्या वंदे मातरम् चळवळीतील बहुसंख्य मंडळी काँग्रेसमध्ये आली आहे.

हिंदु महासभेने हैदराबादमध्ये काही काळ आंदोलन केले पण नंतर संस्थानच्या राजकारणात काहीही लक्ष घातले नाही. ज्या ठिकाणी लोक अहिंसेने लढत होते तिथे हिंदुमहासभा प्रभावी होऊ शकली नाही हे मी समजू शकतो. पण जिथे मुसलमानांच्या विरुद्ध सरळ सरळ सशस्त्र लढाई चालू होती तिथे हिंदुमहासभा कधीच काही काम करू शकली नाही याचा विचार हिंदुत्ववादी राजकारणांच्या अभ्यासकांनी जरूर केला पाहिजे. हैदरावादच्या लढ्याबद्दल तुम्ही कसेही, कितीही आणि काहीही म्हणालात तरी मुसलमान ज्या अर्थी निजामाच्या साथीला होते त्या अर्थी तो लढा मुसलमानांच्या विरुद्ध होता; तो लढा हिंदूंचा होता; तो लढा हत्यारी होता. पुढे तर सशस्त्र आंदोलनाची उघड जबाबदारीच संस्थानी काँग्रेसने घेतली. तेंव्हा जिथे आंदोलन मुसलमानविरोधी आणि सशस्त्र होते तिथेही काँग्रेसचे निधर्मी राजकीय तत्त्वज्ञानच विजयी झाले; हिंदुत्ववाद विजयी झाला नाही. याच्या कारणांचा शोध केव्हातरी एकदा आपण घेतलाच पाहिजे. अडतीस हा आंदोलनाचा आरंभ असला तरी काँग्रेससाठी नऊशे सत्याग्रही तुरुंगात गेले. आणखी पुढचे शंभर लोक तुरुंगात जाण्यासाठी तयार राहिले तर अचानक एके दिवशी गांधींनी आज्ञा काढून आंदोलन बंद केले. ही गोष्ट कुणालाही आवडली नाही. अनेकांनी गांधींना सांगितले की, असे आंदोलन मध्येच बंद केले तर तो आमचा विश्वासघात होईल. हिंदुमहासभेने गांधीजींचा धिक्कार केला, आर्यसमाजाने धिक्कार केला, काँग्रेसमधील लोकांनी जाहीर धिक्कार केला नाही पण वर्ध्याला जाऊन गांधींना

खासगीत शिव्या दिल्या. पण गांधी तसूभरही बधले नाहीत. तेव्हा सर्वांनी ही भूमिका घेतली की गांधी नको म्हणतात तर आंदोलन बंद करा. गांधींनी तळच्या मंडळींना खुलासा केला की अजून तुमच्यात जागृती पुरेशी नाही. तेव्हा व्यर्थ आंदोलन चालविण्याची गरज नाही. वरच्या पुढाऱ्यांना त्यांनी समजावून दिले की, त्यांनी दोन बाबी लक्षात घ्याव्यात. एक म्हणजे या आंदोलनाबरोबर जर जातीयवादी राजकारण सुरू झाले तर हेतू आणि धोरणे यांचा गुंता होईल. त्याचा अखिल भारतीय राजकारणावर विपरीत परिणाम होईल. आपल्याला जर ध्येयधोरणाचा गोंधळ करावयाचा नसेल तर हिंदुमहासभा आणि आपण यांची आंदोलने एकाच वेळी चालता कामा नयेत. आता आपले आंदोलन राजकीय आहे. ते धार्मिक उरलेले नाही. त्यामुळे आंदोलन स्थगित. दुसरा मुद्दा मला स्वतः गोविंदभाईंनी समजावून दिला. गांधींना भेटायला आणि वाटाघाटी करायला गोविंदभाईच गेले होते. ते औरंगाबादहून मुंबईला डांगे यांच्यांकडे आणि तेथून डांगे यांच्या सल्ल्याने वर्ध्याला गांधींकडे गेले होते. (डांगे तेव्हा कॉंग्रेसमध्ये होते व गांधींचे नेतृत्व मानीत होते.) गांधींनी गोविंदभाईंना विचारले ते हे की या आंदोलनातून निजामाचा पूर्ण पाडाव होईल असे गोविंदभाईंना वाटते का? हे पहिले आंदोलन आहे. अशी अनेक आंदोलने तुम्हाला करावी लागतील. नंतरच निजामाचा पाडाव होईल. हा केवळ आरंभ आहे. शहाण्या नेतृत्वाचे हे काम आहे की एकदा लढाईला आरंभ केल्यावर आपली सर्व शक्ती संपून जाण्याच्या आत आंदोलन थांबले पाहिजे. आंदोलनात शिक्षा झालेले सत्याग्रही त्यांची निराशा होण्याच्या आत सोडविले पाहिजेत. हे सत्याग्रहीच पुढचे कार्यकर्ते होतील याची काळजी घेतली पाहिजे. आज तुमच्याजवळ कार्यकर्त्यांची चमू आहे ती आठनऊशे लोकांची आहे. यांना तुम्ही नीट सांभाळले तर समजा अजून दोन वर्षांनी आपण नवे आंदोलन सुरू करू तेव्हा चार-पाच हजार लोक तुरुंगात पाठवणे तुम्हाला शक्य होईल. तेही आंदोलन निर्णायक ठरेल असे नाही, म्हणून त्या वेळेलाही तुम्हाला योग्य वेळी माघार घ्यावी लागेल. पुन्हा जास्त शक्ती संघटित करून नवे आंदोलन उभारावे लागेल. असे करीत करीत तुम्हाला एखादा दिवस असा निर्माण करावा लागेल की, जेव्हा आपण सत्याग्रह करणाऱ्या मंडळींची नोंद लोकसंख्येच्या टक्केवारीत करू शकू. निदान एक टक्का माणसे तरी तुरुंगात घालण्याची आपली ताकद असली पाहिजे. म्हणजे गांधीजींचे लक्ष्य आहे एक लाख साठ हजार माणसे सत्याग्रह करायला संस्थानात तयार हवी. एक टक्का माणसे

तुरुंगात गेली म्हणजे त्या प्रत्येक माणसामागे सहानुभूती असणारी पाच-सात तरी माणसे असतात. आणि त्यांची बायकामुले व नातेवाईक धरले तर दहा टक्के लोक तुमच्या मागे आहेत अशी खात्री असते. यश शेवटच्या आंदोलनात येत असते. पहिली आंदोलने अपयशीच असतात. तुमचा माझ्यावर विश्वास असेल तर ही वेळ आता आंदोलन मागे घेण्याची आहे. आपली ताकद आपण दाखविलेली आहे, पण संपू दिलेली नाही. कार्यकर्ते निराश होण्याच्या आत आपण त्यांना सोडवून आणणार आहोत. तेच पुढच्या वेळी नेते, कार्यकर्ते बनणार आहेत. अशी गांधींनी गोविंदभाईंची समजूत घातल्याचे, त्यांनी मला समजावून दिले.

गांधींचे हे मार्गदर्शन बरोबर होते. ते जे म्हणाले तसेच झाले. तुरुंगात गेलेली माणसे सहा–सात महिन्यांत सुटली. त्यांतील काही वकील झाले. काही शिक्षक झाले व उरलेले पूर्ण वेळचे राजकीय नेते झाले. अशा रीतीने आमची पहिली संघटना तयार झाली. यानंतर गोविंदराव नानल लौकरच वारले. स्वामी रामानंद तीर्थांचा दीर्घ पत्रव्यवहार निजामाच्या पंतप्रधानाशी चालू झाला, की संस्थानी काँग्रेसवरची बंदी उठावी. हैदरी त्या वेळेस हैदराबादचे पंतप्रधान होते. हैदरींचे म्हणणे असे की संस्थानी काँग्रेसमुळे हैदराबादेत जातीयवादाचा तणाव वाढतो. हिंदु-मुसलमानांचे दंगे होतात. ऐक्याचा भंग होतो. हिंदु-मुसलमान ऐक्य ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. त्यामुळे काँग्रेसला परवानगी देता येत नाही.

याच सरकारने इत्तेहादुल मुसलमीन या संस्थेला मात्र परवानगी दिली होती. त्या संस्थेमुळे हिंदु-मुसलमानांचे ऐक्य भंगण्याची भीती सरकारला वाटत नव्हती. या परिस्थितीत जर संस्थानी काँग्रेस म्हणून काम करता येत नसेल तर आपण काय करावयाचे? जुनी महाराष्ट्र परिषद आहे ती पुनर्जीवित करा. काम तिच्याद्वारे करा. एक पथ्य सांभाळावयाचे. मुद्दा एक राजकीय भूमिका घ्यावयाची नाही. पहिले अधिवेशन परतुडला झाले. दुसरे अधिवेशन उमरीला झाले. या अधिवेशनात राजकीय प्रश्न सोडून इतर प्रश्नांची चर्चा सुरू झाली. शिक्षण मातृभाषेतून पाहिजे. त्याचा विकास असा व्हायला पाहिजे. नोकरीचे नियम असे असायला हवेत. शेतीचे कायदे तसे असायला हवेत. इत्यादी.

या उमरीच्या अधिवेशनात एक गोष्ट लक्षात आली की, संस्थानी काँग्रेसने जे तरुण तयार केलेले आहेत त्या सर्वांमध्ये गोविंदभाई श्रॉफ यांचे बौद्धिक वजन फारच

आहे. श्रॉफ जमीनदारीच्या विरोधी आहेत हेही तेव्हा उघड झाले. उमरीला श्रॉफ यांनी भूमिकाच अशी घेतली की, राजकीय प्रश्न जरी आपण सोडले असले तरी आपणाला कसेल त्याची जमीन, शेतीची सुधारणा, सावकारशाहीची सुधारणा, सावकारी पाशातून शेतकऱ्यांची मुक्ती अशा जनहितकारक व लोकहितैषी उद्योगाकडे राजकारण वळवायला पाहिजे. गोविंदभाईच्या या मतामुळे काँग्रेसमध्ये जुने आणि नवे अशा संघर्षाला सुरुवात झाली. हा संघर्ष उघड नव्हता पण होता. उमरीच्या परिषदेचे अध्यक्ष काशिनाथराव वैद्य होते. वैद्य परत गेले आणि त्यांनी आंध्र परिषदेचे अधिवेशन घेतले. तेथे त्यांच्या लक्षात आले की, या परिषदेवर रविनारायण रेड्डींचा प्रचंड प्रभाव आहे. रेड्डी हेही जमीनदारांचे कडवे विरोधक. तेथून ते कर्नाटक परिषदेच्या अधिवेशनाला गेले. तेथे काही तरुण जमीनदारविरोधाच्या घोषणा देत होते. पण त्यांचा परिषदेवर फारसा भरवसा नव्हता. तिथून काशिनाथराव वैद्यांनी ही भूमिका घेतली की, काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चालणाऱ्या महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक प्रांतिक परिषदांमध्ये कम्युनिस्टांनी शिरकाव करून घेतलेला आहे. त्यांना आपण बाहेर काढावयास पाहिजे. या भूमिकेत वैद्यांना जनार्दनराव देसाई, बी.रामकृष्णराव इत्यादींची सहमती होती. एकूणचाळीस सालापासून ही भूमिका सुरू झाली. तिचा परिणाम म्हणून चाळीस साली आंध्र परिषदेचे दोन तुकडे पडले. एक कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखाली असणारी आंध्र परिषद, दुसरी जमीनदारांना अनुकूल असणाऱ्या नेतृत्वाखालील आंध्र परिषद. एक बिगरकाँग्रेसवाल्यांची आंध्र परिषद, एक काँग्रेसवाल्यांची. असे चित्र तयार झाले. बिगरकाँग्रेस परिषदेमध्ये रविनारायण रेड्डींच्या बरोबर पिव्याळ राघवाराय, राजबहादुर गौड, हैदराबाद शहरचे गुरवा रेड्डी, मकदुम मोईनिद्दिन इत्यादी मंडळी होती. यातील शेवटचे दोघे माझे शिक्षक होते हीही वैयक्तिक गोष्ट ओघात सांगून टाकतो. हे दोघे सिटी कॉलेजमधून नोकरीचा राजीनामा देऊन कम्युनिस्ट पक्षाच्या राजकारणात गेले.

आंध्र परिषदेप्रमाणे महाराष्ट्र परिषदेमध्येही अशी काही मंडळी होती. मधून मधून असा सूर काढला जात असे की तुम्ही मंडळी आगाऊ धंदे फार करायला लागलात. जमीनदारीच्या विरोधी बोलून आपल्याला करावयाचे काय? जबाबदार राज्यपद्धतीविषयी बोलून आपणाला करावयाचे काय? हैदराबादच्या आरंभीच्या राजकीय जागृतीपासूनच महाराष्ट्रात जमीनदारविरोधी, वतनविरोधी असा विचार प्रभावी होता. आमच्याकडे अडचणींची गोष्ट ही होती की मराठवाड्यातील नेत्यांमधले गोविंदभाई

श्रॉफ हे बोलून चालून मार्क्सवादी होते. वैशंपायन मार्क्सवादी होते. जी.डी.; आर.डी. आणि व्ही.डी. असे तीन महत्त्वाचे 'डी' त्यावेळी महाराष्ट्र परिषदेमध्ये होते. हे तिघेही मार्क्सवादी होते. पण मार्क्सवादी नसणारी बाबासाहेबांसारखी मंडळीही जमीनदाराच्या विरोधी होती. स्वामी रामानंद तीर्थ हेही जमीनदार विरोधी होते.

इथे परभणीच्या मुकुंदराव पेडगावकरांचीही आठवण व्हावी. तेही तरुणांच्या बरोबरच होते. 'ठीक आहे. आताच वेळ आलेली आहे. मग आताच बोलायला काय हरकत?' अशी मुकुंदरावांची भूमिका. ते मार्क्सवादी नव्हते पण उदारमतवादी होते. जमीनदारांविरुद्ध बोलायला काहीच हरकत नाही असे त्यांचे मत होते. मुकुंदरावांचे शालेय शिक्षण फारसे नव्हते. ते सनातनीही होते. तरीही त्यांची मते जमीनदारीविरोधी होती. दुसरे प्रभावी नेते औरंगाबादचे माणिकचंद पहाडे. हेही मार्क्सवादी नव्हते. पण गोरगरिबांचे कनवाळू होते. त्यामुळे जमीनदार विरुद्ध अशी त्यांची भूमिका होती. त्यांचे असेही मत होते की अरब, रोहिले, पठाण यांच्या सावकारीला परिणामकारी शह देण्यासाठी सावकार, जमीनदार यांच्या विरोधी भूमिका हवी. महाराष्ट्र प्रांतिक परिषदेमध्ये जमीनदारविरोधी प्रवाह असा होता. याविरुद्ध स्पष्टपणे उभे राहून संघटनेचे दोन तुकडे करण्याची ताकद असलेला प्रभावी विरोध नव्हता. त्यामुळे महाराष्ट्र प्रांतिक चालू राहिली. कर्नाटक प्रांतिकमध्ये पुरोगामी लोकांचा प्रभाव नव्हता; म्हणून तीही चालू राहिली. आंध्र प्रांतिकचे मात्र दोन तुकडे झाले. या प्रांतिक परिषदांची अधिवेशने क्रमाने चालत राहिली. ही चालत असताना हैदराबादमध्ये पुन्हा आंदोलन चालू करायला गांधींनी परवानगी दिली नाही. काही प्रमाणात चाळीसला वैयक्तिक सत्याग्रही, काही प्रमाणात बेचाळीसचे आंदोलन हैदराबादमध्येही झाले, पण संस्थांनी काँग्रेसचे अधिकृत कामकाज चालू नव्हते. महाराष्ट्र प्रांतिक परिषदेने अधिकृतपणे राजकीय भूमिका घेतलेली नव्हती. मात्र दर पावलावर ही परिषद राजकीय भूमिकेपर्यंत जाऊन पोचत असे.

या अवस्थेत पंचेचाळीस साल उघडले. बेचाळीसच्या चळवळीनंतर पंचेचाळीस साली अखिल भारतीय काँग्रेसमधून कम्युनिस्टांना बाहेर काढले. ही हकालपट्टी जवाहरलाल नेहरूंच्या अध्यक्षतेखाली झाली. कारण दुसऱ्या महायुद्धामध्ये देश स्वातंत्र्यासाठी लढत असताना रशिया इंग्लंडबरोबर होता म्हणून महायुद्धाला लोकयुद्ध ठरवून कम्युनिस्टांनी भारतीयांविरुद्ध इंग्लंडला पाठिंबा दिला. यानंतर संस्थानी प्रजापरिषदेच्या जयपूरच्या

अधिवेशनामध्ये या परिषदेच्यामधूनही कम्युनिस्टांना हाकलून देण्याचा ठराव पंडित नेहरूंच्या आग्रहाने मांडण्यात आला. असा प्रयोग करू नये असा आग्रह तिथे गोविंदभाईंनी धरला. पण त्यांचा सल्ला डावलून परिषदेतून कम्युनिस्टांना हाकून द्यावयाचे असेच ठरले. याच्या परिणामी मराठवाड्यात जे मार्क्सवादी होते त्यांना राष्ट्रीय आंदोलनाच्या बाहेर पडण्याचा निर्णय घ्यावा लागला. सी.डी.; व्ही.डी.; आर.डी. या त्रिकुटाने हा निर्णय घेतला व ते संस्थानी काँग्रेसमध्ये आलेच नाहीत. त्यांनी महाराष्ट्र प्रांतिकपासूनसुद्धा फटकून वागायला सुरुवात केली. भाऊसाहेब वैशंपायन, गोविंदभाई श्रॉफ आणि त्यांचे अनुयायी यांनी राष्ट्रीय आंदोलनात राहावयाचे असे ठरविले. गांधींनी हे सगळे चालू दिले आणि पंचेचाळीस साली सांगितले की यापुढे मी हैदराबादला सल्ला देणार नाही; सल्ल्याची गरज असेल तर तो पंडित नेहरूंकडून घ्यावा. त्याप्रमाणे पंडित नेहरूंना सल्ला विचारण्यासाठी ही हैदराबादी मंडळी गेली. नेहरू म्हणाले की आता स्वातंत्र्याच्या वाटाघाटी चालू आहेत. आता वेगवेगळ्या संकल्पना पुढे येतील. आता हीच वेळ आहे. महाराष्ट्र प्रांतिक आणि आंध्र प्रांतिक यांनी आता स्पष्टपणे राजकीय भूमिका घ्यावी. हे ठरल्यावर महाराष्ट्र प्रांतिकचे अधिवेशन लातूरला झाले. त्याचे अध्यक्ष आ.कृ.वाघमारे होते. या अधिवेशनात ही भूमिका घेण्यात आली : हैदराबाद संस्थानमध्ये प्रौढ मतावर आधारलेली लोकशाही आणि संपूर्ण जबाबदार अशी राज्यपद्धती स्थापन करण्यात आली पाहिजे. ज्या मागणीसाठी संस्थानी काँग्रेसवर बंदी पडली तीच मागणी महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसने केली. पुढे दोन महिन्यांनी हीच मागणी आंध्र प्रांतिक आणि कर्नाटक प्रांतिक यांनी केली. आता निजामापुढे प्रश्न हा की या सगळ्या संघटनांना नव्याने पुन्हा बंदी घालायची की नाही? हा एक प्रश्न. दुसरे असे की अखिल भारतीय संस्थानी प्रजा परिषदेने असा आदेश दिला की निजामाने संस्थानी काँग्रेसवरची बंदी त्याच्याशी नानाप्रकारे पत्रव्यवहार करूनही उठविलेली नाही. संस्थानी काँग्रेसला असे वाटते की निजामाला अशी बंदी घालण्याचा अधिकारच नाही. म्हणून ही बंदी तातडीने उठविण्यात आली नाही तर ती बंदी अस्तित्वातच नाही असे काँग्रेसने मानावे व जाहीरपणे आपला कारभार सुरू करावा. म्हणजे नव्या सत्याग्रहाचे अंतिमोत्तरच! आता सबंध भारतभर स्वातंत्र्याच्या वाटाघाटी चालू आहेत. भोवती चोहीकडे सर्व प्रांतांत काँग्रेसची मंत्रिमंडळे चालू आहेत. केंद्रात काँग्रेसचे हंगामी सरकार यायचे घाटत आहे. अशा वेळी नव्या सत्याग्रहाच्या

आंदोलनाला तोंड द्यावयाची निजामाची तयारी नव्हती. म्हणून मिर्झा इस्माईल यांना पंतप्रधान म्हणून बोलावण्यात आले आणि ते कामावर रुजू होण्याआधी एक महिना, जुलै शेचाळीसला संस्थानी काँग्रेसवरची बंदी उठविण्यात आली. ही बंदी उठताच महाराष्ट्र प्रांतिक, आंध्र प्रांतिक, कर्नाटक प्रांतिक साऱ्या एकत्र आल्या आणि त्यांनी संस्थानी काँग्रेस स्थापन करण्याचे ठरविले. हे ठरल्यावर संस्थानी काँग्रेसचा अध्यक्ष कोणी व्हावे याचा विचार आला. सर्वांना हे माहीतच होते की आरंभापासून इथपर्यंत निजामाविरोधी लढा आणि जमीनदारविरोधी प्रखर भूमिका स्वामीच घेतात. म्हणून त्यांनाच अध्यक्ष बनवावे. प्रत्यक्षात वेळ आली तेव्हा निवडणूक झाली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्याविरुद्ध बी.रामकृष्णराव यांनी निवडणूक लढविली. अर्थात निवडणुकीच्या कामाला सगळ्याच हंगामी कमिट्या होत्या. त्यामुळे तिथे मतदानाला कोण आले, कोण नाही याचा पत्ता नव्हता. निवडणुकीत बहात्तर मते स्वामींना व एकूणसत्तर मते रामकृष्णरावांना पडली. तीन मतांनी स्वामीजी संस्थानी काँग्रेसचे अध्यक्ष झाले. अध्यक्ष निवडून आल्यावर लगेच सभासद नोंदणीला सुरुवात झाली. सभासद नोंदणी झाल्यावर खालपासून वरपर्यंत संघटना बांधण्याचे काम चालले. नंतर या संघटनेचे अधिवेशन हैदराबादला घ्यावे असे ठरले. अर्थात पुन्हा अध्यक्षपदाची निवडणूक. ती मे महिन्यात झाली. तेच दोघे प्रतिस्पर्धी उमेदवार. या निवडणुकीत स्वामींना एक हजार चारशे त्रेचाळीस मते मिळाली व रामकृष्णरावांना फक्त दोनशे एकूणपन्नास मते मिळाली. केवढा प्रचंड फरक या प्रत्यक्ष निवडणुकीत! हंगामी समित्या आणि संघटना यांत केवढा फरक! पण काँग्रेसमध्येच हा एक गट होता की ज्याचे मत : जमीनदाऱ्या जाऊ नयेत, सावकारविरोधी कायदे येऊ नयेत, निजामाचे राज्य बुडू नये. फक्त धोरण उदार झाले म्हणजे पुरे, हिंदूंनाही वाव मिळाला म्हणजे पुरे; असे होते. त्याने स्वतःची माणसे हंगामी समित्यांत भरविली होती. काशिनाथराव वैद्य, बी.रामकृष्णराव, जनार्दनराव देसाई, लक्ष्मीनारायण गजरेवाला, लक्ष्मणराव गानू, माडपाटी, हणमंतराव ताताचार ही सगळी या गटातली मंडळी. या मंडळींमुळेच मूळ आंध्रप्रदेशात म्हणजे तेलंगणात काँग्रेसची संघटना नेहमी दुबळीच असे. ग्रामीण भागात बळकट होते कम्युनिस्ट. काँग्रेस ही पुढे बलवान झाली तरी तिचे स्वरूप त्या बाजूला मध्यमवर्गीय सुशिक्षित तरुणाची आणि वरिष्ठ वर्णीयांची संघटना असेच होते. इकडे काँग्रेस ग्रामीण भागात पसरण्याची धडपड मोठ्या प्रमाणात करीत होती. तेव्हा महाराष्ट्रात

काँग्रेसचे स्वरूप जनतेची चळवळ हे होते. कर्नाटकात काही ठिकाणी असे स्वरूप होते, काही ठिकाणी नव्हते. बिदर जिल्ह्यात तर मूळ हेतूला विपरीत असे मुसलमानविरोधी झगड्याचेच रूप होते. मुसलमानांना विरोध यापलीकडे तिथे तत्त्वज्ञानात्मक स्पष्टताच नव्हती. असे हे चित्र सत्तेचाळीस सालापर्यंत येते. सत्तेचाळीसचे अधिवेशन हे हैदराबाद संस्थानी काँग्रेसचे स्वातंत्र्यपूर्व इतिहासातील सर्वांत मोठे अधिवेशन. हे हैदराबादला झाले. सोळा, सतरा आणि अठरा जून या त्या अधिवेशनाच्या तारखा होत्या. अध्यक्ष स्वामी रामानंद तीर्थ होते. अधिवेशनाला दीड लक्ष लोक हजर होते (म्हणजे गांधीजींना अपेक्षित असा लोकसंख्येचा एक टक्का). या अधिवेशनाने हैदराबाद संस्थानाने संपूर्णपणे भारतात विलीन व्हावे अशी मागणी केली. ही मागणी जर मान्य झाली नाही तर आंदोलन सुरू करावे असा निर्णयही घेण्यात आला. हे घडेपर्यंत मधल्या काही महत्त्वाच्या घटना आहेत त्या आता लक्षात घेऊया.

पहिली महत्त्वाची घटना लक्षात घ्यायला हवी ती ही की, लॉर्ड वेव्हेल व्हाइसराय असताना ज्या वाटाघाटी भारत व इंग्रज सरकार यांत चालू होत्या त्याचे गुऱ्हाळ (Deadlock) संपतच नव्हते. हे लक्षात आल्यावर वेव्हेल यांना परत बोलावून माऊंटबॅटन यांना हिंदुस्थानात पाठविण्यात आले. माऊंटबॅटन हे शेवटचे गव्हर्नर जनरल आणि व्हाइसराय. मार्च सत्तेचाळीसमध्ये त्यांनी कामाचा ताबा घ्यायचा होता. फेब्रुवारी सत्तेचाळीसमध्ये त्या वेळचे ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांनी पार्लमेंटमध्ये एक घोषणा केली. कारण ती घोषणा केल्याशिवाय आपण शेवटचे ब्रिटिश गव्हर्नर जनरल म्हणून जाणार नाही असे माऊंटबॅटन म्हणाले होते. ती घोषणा अशी की ब्रिटनने आपले भारतावरील साम्राज्य संपविण्याचा निर्णय घेतलेला आहे. भारतीय जनतेचे प्रश्न भारताच्या हवाली होतील. हिंदुस्थानवरचा ताबा आणि आमचे सार्वभौमत्व आम्ही संपवीत आहोत. प्रश्न जर नीट सुटला नाही तर आम्हाला वाटेल त्या मार्गाने आम्ही तो सोडवू. पण कोणत्याही परिस्थितीत जून अठ्ठेचाळीसच्या नंतर भारताच्या भूमीवर इंग्रजांचे राज्य व इंग्रजांच्या सेना राहणार नाहीत.

कालमर्यादा एक वर्षाची आहे. त्यामुळे जे वाटाघाटी करीत होते त्यांना त्वरा उत्पन्न झाली. नाहीतर वर्षानंतर सर्व अंधाधुंदी होणार. ॲटली असा गोंधळ निर्माण करू इच्छितील असे जीनांना वाटत नव्हते. त्यामुळे त्यांच्या डोक्यावर या घोषणेचा प्रचंड असा आघात झाला. या सर्वांचा अर्थ काय? अर्थ असा की काँग्रेस व मुस्लिम

लीग, गांधी व जीना यांच्यात तडजोड झाली नाही तर फेब्रुवारी अठ्ठावीसला सगळे प्रांत स्वतंत्र होतील. वायव्य सरहद्द प्रांत जर पाकिस्तानात न येता स्वतंत्र झाला तर तो मागाहून पाकिस्तानात येणार नाही. तो अफगाणिस्तानातही जाईल. अशीच परिस्थिती आली तर मग पंजाब व सिंध एकत्र राहतील याची खात्री नाही. म्हणजे पाकिस्तानचे अस्तित्वच संपले. हिंदुस्थानची फाळणी होईलच पण पाकिस्तानची निर्मिती होणार नाही. त्यामुळे जीनांना घाई सुटली. त्यानंतर वाटाघाटीची सत्रे घडली. काँग्रेसने आणि जीनांनी फाळणीला मान्यता दिली. माऊंटबॅटनने दोन जूनला त्याची योजना मांडली होती. अखिल भारतीय काँग्रेसची बैठक अकरा जूनला मुंबईला भरून तिने माऊंटबॅटन योजनेला मान्यता घोषित केली होती. दोन आणि अकरा जूनच्या या घोषणेनंतर असे ठरले की पंजाबची व बंगालची विभागणी केली जाईल. अर्धा पंजाब आणि अर्धा बंगाल पाकिस्तानला दिला जाईल. पाकिस्तान नावाचे नवे राज्य तयार केले जाईल. सर्व संस्थानांवरचे ब्रिटिश सार्वभौमत्व संपेल. संस्थानांना सर्व करारांतून मोकळे केले जाईल. नंतर या संस्थानिकांना योग्य वाटेल ते त्यांनी करावे. कुठल्याही राज्यात जावे अगर स्वतंत्र राहावे. याच तारखांना हीही घोषणा करण्यात आली की, तेरा ऑगस्ट सत्तेचाळीसला ब्रिटिश अधिसत्ता संपुष्टात येते आहे. हे अशासाठी लक्षात घ्यावयाचे की भारतीय स्वातंत्र्य पंधरा ऑगस्टला अस्तित्वात येणार हे दोन जून व अकरा जून या कालावधीत सर्वांना स्पष्ट झाले होते. यानंतर सहा दिवसांनी सोळा, सतरा, अठरा जूनला संस्थानी काँग्रेसचे पहिले अधिवेशन झाले. या पहिल्या अधिवेशनाच्या वेळी पाकिस्तान दोन महिन्यात निर्माण होणार हे निजामासह सर्वांना माहीत झाले होते. हिंदुस्थानही स्वतंत्र होणार, पंडित नेहरू त्याचे पंतप्रधान होणार याही गोष्टी स्पष्ट होत्या. फक्त पहिले गव्हर्नर जनरल कोण होणार हे स्पष्ट नव्हते. स्वतंत्र राहण्याचा हक्क हैदराबादला मिळालेला आहे हे स्पष्ट होते. दोन जूनला माऊंटबॅटनची घोषणा, अकरा जूनला काँग्रेसने केलेला त्या घोषणेचा स्वीकार, यानंतर बारा जूनला निजामांनी फर्मान काढले. यात निजामाची भूमिका होती की हैदराबाद, हिंदुस्थान अथवा पाकिस्तान यात कुठेच जाणार नाही व स्वतंत्रच राहणार आहे. नवे राष्ट्र निर्माण करण्याचा व टिकविण्याचा त्यांचा निर्णय आहे. त्यामुळे सोळा, सतरा, अठराला जेव्हा आंदोलन करण्याचा निर्णय आमच्या अधिवेशनात होत होता तेव्हा त्या ठरावाच्या मागे हैदराबादने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतलेला आहे ही पार्श्वभूमी होती. त्यामुळे समोर

आलेला लढा प्राणांतिक आहे हे आम्हाला दिसत होते. या अधिवेशनात बाबासाहेब परांजपे यांनी मराठवाड्यातील तरुणांना उद्देशून व्याख्यान दिले आहे. त्या व्याख्यानात ते म्हणाले की 'देहाची उंची साडेतीन हात आहे हे यानंतर तुम्ही विसरावे. ती उंची तीनच हात आहे, अर्ध्या हात उंचीचे डोके देहावर नाही असे समजून महामृत्युंजयाचा जप करीत तुम्ही निर्भयपणे चाला. या लढ्यात तुमच्यापैकी किती लोक मारले जातील याचा नेम नाही. जिवंत राहतील त्यांना साडेतीन हातांचा देह मिळेल. जे मरतील ते देशाच्या कारणासाठी मेले असे मानावयाचे.' या व्याख्यानाला मी स्वतः हजर होतो आणि त्या काळात बाबासाहेब फारच जाज्वल्य बोलत असत. त्यांचे श्रोते भयंकर भडकून उठत असत.

ही आंदोलनाची तयारी एका बाजूने झाली होती. दुसऱ्या बाजूने वाटाघाटी चालू होत्या. दोन जूनला माऊंटबॅटनची घोषणा झाली. अकरा जूनला काँग्रेसने ती स्वीकारली. बारा जूनला निजामाच्या स्वातंत्र्याचे फर्मान त्याने काढले. चौदा जूनला निजामाने माऊंटबॅटनला कळविले. पंधरा ऑगस्टला भारतात तुम्ही नसाल. तेरालाच तुम्ही जाल. त्याच्या आत पुढील व्यवस्थेच्या दृष्टीने तात्पुरता करार व्हावा असे आम्हाला वाटते. वाटाघाटी करायला आम्ही येऊ इच्छितो. इकडे आम्ही म्हणजे संस्थानी काँग्रेसने अठरा जूनला लढ्याचा ठराव हैदराबादला पास केला. ज्या अवस्थेत हे आंदोलन झाले त्याच्या मागेपुढे असणाऱ्या ठळक ठळक बाबी मी आपल्याला सांगितल्या. इथून पुढे जाण्यापूर्वी, मी आपल्याला काल जे सांगितले ते आपण लक्षात ठेवले पाहिजे. ते असे की हैदराबादच्या या मुक्ति-आंदोलनात जनतेचा वाटा फार मोठा आहे. या लढ्याला जेवढी तीव्रता आणि उग्रता हैदराबादमध्ये होती तेवढीच भारताच्या संपूर्ण लढ्यात दुसऱ्या कुठल्या एका जागी होती असे दाखविता येणार नाही. तुरुंगातील सत्याग्रहींची संख्या वीस हजार होती. ज्यांनी भूमिगत काम केले, सशस्त्र आंदोलनात भाग घेतला, अशा कार्यकर्त्यांची संख्या आणखी वीस हजारांच्या जवळपास होती. या सशस्त्र आंदोलनाचे सारे तपशील मी आपल्याला सांगणार नाही. कारण ते सांगायचा अधिकार असणारी माणसे वेगळी आहेत. त्यांनीच तो सांगितला पाहिजे, मी फक्त त्याचा धावता आढावा घेत आहे.

❋ ❋ ❋

## १६.
# भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

**व्याख्यान तिसरे :**

हैदराबाद शहरी जे जनतेचे आंदोलन होते त्याच्या बाजू दोन. एक बाजू म्हणजे हैदराबाद संस्थानात असणारी इत्तेहादूल मुसलमीन ही संस्था. या संघटनेचे नेते कासीम रझवी आणि त्यांची भूमिका, आणि या संघटनेकडे असणारे रझाकार या सशस्त्र स्वयंसेवकांचे दल ही एक बाजू झाली. ही बाजू पूर्ण करण्यासाठी आणखी काही बाबी हव्यात. हैदराबाद संस्थानची जी शहाजोग फौज होती तिची संख्या बारा हजार. रझाकारांची जी छुपी फौज होती तीत हे बारा हजार मिसळले की निजामाचे एकूण सैन्य साठ हजारांच्या दरम्यान येते. यातील बारा हजार शास्त्रोक्त शिक्षण झालेले. उरलेले हडेलहप्पी सैनिक. यात पुन्हा संस्थानचे पोलिसदल समाविष्ट नाही. पोलिसाकडे फार मोठी शस्त्रे होती अशातला प्रकार नसला तरी ते हत्यारबंद होतेच. हे हत्यारबंद पोलिस चौदा हजार होते. ही लढ्याच्या आरंभीची व्यवस्था. लढा सुरू झाला तशी रझाकारांची संख्या भराभर वाढत गेली. अठ्ठेचाळीसच्या सप्टेंबरपर्यंत ही वाढतच होती. शेवटच्या काळात ती दीड लक्षापर्यंत वाढली होती. यांच्याजवळ तरवारी, कट्यारी, जंबिये, भाले, सुरे, भरावाच्या बंदुका आणि पिस्तुले अशी हत्यारे होती. तरीही यांच्याजवळ मशिनगन, स्टेनगन, ब्रेनगन अशी हत्यारे नव्हती हेही ध्यानात असावे. पण जी हत्यारे होती ती सर्व संस्थानभर अत्याचार करणे आणि भीतीचे वातावरण तयार करणे या कामाला पुरून उरणार होती. अत्याचार करण्यासाठी

अशिक्षित सैन्याची आवश्यकता नसते. फक्त अत्याचारांना प्रेरित करणारा नेता हवा असतो. तसा कासिम रझवी होता. याच्या बाजूला सर्व सैन्याचे नेतृत्व ज्यांच्याकडे होते ते एल.इद्रुस हे सरसेनापती होते. त्याच्याच बाजूला इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिस दिनयारजंग होते. ही अशी निजामाची संरक्षणयंत्रणा होती. या संरक्षणफळीच्या द्वारे आंदोलन सुरू होण्याच्या आधीपासून जनतेवर अत्याचार चालू होते आणि आंदोलन सुरू झाल्यावर ते वाढत गेले. म्हणून जून सत्तेचाळीसपेक्षा लढा सुरू झाल्यावर ऑगस्ट/सप्टेंबर सत्तेचाळीसमध्ये अत्याचारांचे प्रमाण एकदम फारच वाढले. असे वाढत वाढत अठ्ठेचाळीसच्या एप्रिलमध्ये अत्याचारांचा कळस झाल्यावर त्या वेळच्या भारत सरकारने एक श्वेतपत्रिका प्रकाशित केली.* यापेक्षा जास्त अत्याचार होणेच शक्य नाही. हैदराबादमध्ये फक्त गुंडांचे आणि अत्याचारांचे राज्यच चालू आहे अशा जाणिवेने हिचे प्रकाशन झालेले आहे. कासिम रझवीच्या रझाकार दलावर कोणतेही कायदेशीर बंधन नव्हते. त्याने केलेल्या अत्याचाराबाबत जनतेची बाजू पाहिली तर निरनिराळ्या जिल्ह्यांत निरनिराळ्या गावी घडलेल्या अत्याचारांची यादी वाचायला तीन दिवसही पुरणार नाहीत. तेव्हा श्वेतपत्रिकेत ज्या अत्याचारांच्या बाबी नोंदलेल्या आहेत, ज्यांची खातरजमा भारत सरकारने स्वतः करून घेतलेली आहे, त्यांच्यापैकीच मी एक-दोन सांगतो. आपल्या परभणी जिल्ह्यातल्या वसमत तालुक्यात गुडा नावाचे गाव आहे. एके दिवशी शेकडो रझाकार त्या गावावर चाल करून गेले. त्यांनी सगळे गाव घेरले. त्या गावामध्ये जेवढी माणसे सापडली तेवढी सगळी त्यांनी एका विहिरीत टाकली. नंतर त्यांच्यावर कडबा टाकला आणि तो पेटवून दिला. कडबा पेटला आणि त्याखाली पडलेली सगळी माणसेही मेली. नंतर रझाकारांनी सर्व गाव जाळून टाकले. गावातील चारपाच लोक त्या दिवशी बाहेरगावी गेले होते तेवढे वाचले. बाकी सर्व गाव संपले.

श्वेतपत्रिकेत नोंदलेली दुसरी घटना बिदर जिल्ह्यातली आहे. या जिल्ह्यातील एक

---

* ही श्वेतपत्रिका तयार करण्यात हैदराबादेतील Pleaders' Protest Committee चे सभासद कारणीभूत होते. किंबहुना सरदारांनी जशी सशस्त्र चळवळ सांभाळली तशीच सनदशीर चळवळ देखील सांभाळली.

**– संपादक**

गाव रझाकारांनी घेरले आणि लुटले. गावात म्हाताऱ्या आणि मुली सोडून सव्वीस बायका होत्या. त्या सर्वांना रझाकारांनी नागवे केले आणि त्यांची गावातून धिंड काढली. नंतर या बायांना चौकात आणून उभे केले. नंतर गावातल्या सर्व पुरुषांना आणले. बायांसमोर रांगेत उभे केले आणि गोळ्या घालून ठार मारले. अशा प्रकारचे हे अत्याचार आहेत. हे आपणाला सर्वत्र पाहावयास मिळतील. अमक्या ठिकाणी अमक्याला ठार मारले. तमक्या गावी तमकीवर बलात्कार केला. फलाण्या ठिकाणी अमुक गाव जाळले. हे रोजचेच झाले. गाव जाळणे, शेत जाळणे, माणसे मारणे, अब्रू लुटणे असे हे सत्र जून सत्तेचाळीसच्या थोड्याआधी सुरू झाले ते पोलिस कारवाईपर्यंत चालले. या अत्याचारातील खुनाला, वधाला, मृत्युसत्राला आरंभ झाला तो नांदेड जिल्ह्यापासून. या जिल्ह्यात बिलोलीजवळ अर्जापूर नावाचे गाव आहे. या गावी गोविंदराव पानसरे नावाचे कॉंग्रेसचे कार्यकर्ते होते. त्यांना रझाकारांनी घेरले आणि मारले. या हौतात्म्याची कहाणी मी तपशिलाने सांगतो. महत्वाची गोष्ट अशी आहे की गोविंदराव वाचू शकले असते व त्यांना वाचविण्याचा प्रयत्नही झाला. त्याचे असे झाले. गोविंदराव बिलोलीतून निघाले आणि अर्जापूरच्या दिशेने चालू लागले. त्यांच्यावरोबर चारपाच कार्यकर्ते होते. या कार्यकर्त्यांपैकी एक पुंडलीकराव पाटील नावाचे होते. (हे पाटील पुढे बावन्नच्या निवडणुकीत दिगंबरराव बिंदूंच्या विरोधी उभे होते). तर हे पानसरे, पाटील आणि कार्यकर्ते जात असताना गावाच्या बाहेर तीन-चार मैलांवर त्यांना शेपन्नास रझाकारांनी घेरले आणि विचारले, "तुमच्यामध्ये पानसरे कोण आहेत?" तेव्हा पुंडलीकराव पाटील पुढे झाले आणि म्हणाले, "मी पानसरे, पाहा. माझ्या अंगावर खादीचे कपडे आहेत. डोक्यावर खादीची टोपी आहे." हे म्हटल्याक्षणी तरवारीचे अनेक घाव पुंडलीकराव पाटलांच्यावर पडले. पाटील खाली कोसळले. त्यांच्या हातातील कंदीलही खाली पडला. तो उचलून गोविंदराव उभे राहिले व रझाकारांना म्हणाले, "तुम्हाला काही अकला आहेत की नाहीत? पानसरेच्या डोक्यावर कधी टोपी नसते. बोडखा मी आहे. पत्र माझ्याजवळ आहे. अंगावरचे माझे कपडे पाहा. हा कंदील घ्या. चेहरे नीट पाहून घ्या. भलत्याच माणसाला मारू नका. पानसरे मी आहे." त्यातला एक रझाकार पानसरेंना ओळखत होता. तेवढ्यात पुंडलीकराव पडल्या पडल्या धडपडत ओरडत होता. "तो मला वाचविण्यासाठी खोटे बोलतो आहे. पानसरे मी आहे." पण ओळखणाऱ्या रझाकाराने खरी ओळख दिली व पानसरे मारले

गेले. नाहीतर ते वाचण्याचा संभव होता.

लोकविलक्षण गोष्ट अहे ती याच्या पुढेच घडली. पुंडलीक पाटलांना लोकांनी घरी नेले व पानसरे वारले हे सांगितले तेव्हा पाटलांच्या आईने त्यांचे तोंड पाहायला नकार दिला. तिने निरोप पाठविला, "पानसरे मेला व तू जिवंत परतलास. मला तुझे तोंड पाहायचे नाही. तूही प्राण का दिले नाहीस?" पुंडलीकराव अनेक महिने हॉस्पिटलमध्ये होते. आईची समजूत पटवून तिला भेटीला नेण्यासाठी पुरते तीन महिने लागले. एवढी या बाईची पानसरेवर निष्ठा होती. असो. पुढे पुंडलिकरावांनी निवडणूक लढविली तीत ते हरले. आणि नंतर एका मोटर अपघातात ते मृत्यू पावले. याच अपघातात जीवनराव बोधनकर जखमी झाले. ते वर्षभराच्या औषधोपचारानंतर मुष्किलीने वाचले. या गोविंदराव पानसऱ्यांपासून आमच्या लढ्यातील हौतात्म्य चालू होते. अत्याचाराचे पर्व इथूनच चालू होते. किती माणसे गेली त्याची गणती नाही. याच मालेतील शेवटचा अत्याचार म्हणजे शोईबुल्लाखान यांचा बावीस ऑगस्ट अठ्ठेचाळीसला हैदराबादेत भर रस्त्यावर झालेला खून.

शोईबुल्लाखान हे मुसलमानांतील अपवाद होते. संस्थानी काँग्रेसबरोबर फारशी मुसलमान मंडळी कोणी नव्हती. पण हे शोईबुल्ला होते. दुसरा एक मोठा मुसलमान नेता म्हणजे सिराजुल हुसेन तिरमिजी. या तिरमिजींना ऐन आंदोलनाआधी शांतपणे मरण्याची संधी लाभली. हे स्वामीजीं पेक्षा मोठे होते. त्यांच्या सहकाऱ्यांपैकी होते. जून सत्तेचाळीसला हे आजारी पडून वारले. ज्या जागी आंदोलनाचा ठराव पास झाला त्या जागेचे नाव तिरमिजीनगर असे ठेवलेले होते ते यांच्या स्मरणासाठी. हे तिरमिजी खिलाफतच्या चळवळीमधून गांधींच्याकडे आकृष्ट झाले होते. पुढच्या काळात सातत्याने काँग्रेसबरोबर राहिले होते. ते तेव्हा वारले नसते तर त्यांना शांतपणे मरण्याची संधी लाभली असती असे नाही. त्यांचा खून झाला असता. तिरमिजी यांच्याबरोबर एक पठाण गांधीजींचा भक्त झाला होता. ज्या शोईबुल्लाखानकडे आपण जात आहोत तो या पठाणाचा मुलगा. तिरमिजींच्या भोवती असणारे शिया पठाण यांच्यापैकी एक. हा शोईबुल्लाखान ऐन हैदराबाद शहरामध्ये कासिम रझवीच्या मताविरुद्ध एक इंग्रजी साप्ताहिक काढीत असे. या साप्ताहिकात निजामाने मूर्खपणा सोडून भारतात सामील व्हावे या धोरणाचा पाठपुरावा आणि कासिम रझवीवर कठोर टीका असे. याला कासिम रझवीने एकदा ताकीद दिली की, आमच्या विरुद्ध जी जीभ उच्चार करील ती

आम्ही खतम करून टाकू. आमच्या विरुद्ध जे हात लेखणी उचलतील ते आम्ही कापून टाकू. त्याच्या दुसऱ्या दिवशी शोईबुल्लाखान यांनी अग्रलेख लिहिला. त्यात म्हटले की शोईबुल्लाखानाला मृत्यूची भीती दाखविणारा कासिम रझवी हा मूर्ख माणूस असला पाहिजे. शोईबुल्लाखान मृत्यूची तयारी ठेवूनच बसला आहे. त्याला मृत्यूची भीती असती तर तो भूमिगत झाला असता. तो सत्याग्रह करून तुरुंगात गेलेला नाही. भूमिगत झालेला नाही. उघड्यावर बसला आहे. सडकेवर हिंडतो आहे. तो जाणीवपूर्वक मृत्यूला तयार आहे. तेव्हा आपले शौर्य दाखविण्यासाठी रझवीने त्याला मृत्यूची भीती दाखवू नये. शौर्य दाखविण्याची इच्छा असेल तर रझवीने तो जे हैदराबादला बोलतो ते दिल्लीला येऊन बोलण्याची हिम्मत दाखवावी. या अग्रलेखाचा परिणाम असा झाला की कासिम रझवीने आपल्या पित्तूंना सांगितले, "याला ठार मारा". म्हणून रझाकारांनी शोईबुल्लाखानवर भर रस्त्यावर हल्ला करून त्यांचा खून केला. हे शोईबुल्ला आमचे शेवटचे हुतात्मे. पहिले पानसरे. पानसरे यांपासून शोईबुल्लापर्यंत हुतात्म्याची एक मोठी लांबरुंद परंपरा आहे. आपण मरायला तयार नाही असे सांगत असताना ज्यांना रझाकारांनी मारले त्यांनाही आपण शिष्टाचार म्हणून हुतात्मे म्हणतो. मी जी नावे सांगत आहे त्यांनी स्वेच्छेने मागून मृत्यू पत्करला आहे. जे इच्छा नसताना मारले गेले त्यांच्याविषयीही मला आदरच आहे. पण त्यांची नावनिशीवार यादी सांगता येणार नाही.

मुस्लिम लीग हिंदुस्थानच्या राजकारणात होती. जीना लीगचे नेते होते. ते पुरेसे जातीयवादी होते, कर्मठही होते. पण जीनांची जाहीर सभेतील व्याख्याने नेहमी कायद्याच्या चौकटीत बसणारी असत. त्यांच्या धमक्या शर्करावगुंठित छुप्या भाषेत असत. चौपाटीवर उभ्या असलेल्या बेजबाबदार दारुड्या मुसलमानाच्या भाषेत जीना कधी बोलले नाहीत. पण कासिम रझवी आयुष्यभर त्याच भाषेत बोलला. तो गांधींना उद्देशून म्हणाला, "जे बनिये आणि व्यापारी आहेत त्यांना सत्ता सांभाळता येणेच शक्य नाही. त्यांनी आपला कास्टा सांभाळला तरी पुरे." पुढे चालून त्याने असेही सांगितले की : "तुम्ही हैदराबादकडे वाकडी नजर करण्याची ताकद दाखविणे बरोबर नाही. तशी नजर तुम्ही केली तर आम्ही संतापल्यावर इकडे घुसू की मद्रास जिंकू, तिकडे घुसू की मुंबईच जिंकू. यानंतर आमच्या फौजा चालत निघतील त्या दिल्लीपर्यंत येतील. दिल्लीच्या किल्ल्यावर आसफजाही झेंडा फडकावणे हे माझ्या जीवनाचे ध्येय

आहे." त्याने असेही सांगितले की : "मूर्तिपूजा करणारे, जनावरांची पूजा करणारे, जनावरांचे शेण खाणारे जे हिंदू लोक आहेत त्यांची गणना आम्ही माणसांत करणार नाही. या माणसांची गणना जनावरात करणे आवश्यक आहे." रझवीने जाहीर सभेमध्ये हेही सांगितले होते की "तुम्ही हैदराबादमध्ये यायचा प्रयत्न केला तर आमचे वीस लक्ष मुसलमान (हा आकडा रझवीचा. मुसलमान वीस लक्ष नव्हते.) एक कोटी चाळीस लाख हिंदूंची कत्तल करतील. आणि त्यानंतर रक्ताचा शेवटचा थेंब संपेपर्यंत लढतील. यानंतर कधीकाळी हैदराबाद जिंकून आत आलात तर आतमध्ये प्रेतांच्या ढिगाऱ्याशिवाय काही दिसणार नाही." रझवीने कोणतीही गोष्ट लपवून ठेवलेली नाही. तो जीनाप्रमाणे बॅरिस्टर नव्हता, की चतुरभाषी नव्हता. तो बेजबाबदार बोलण्यासाठीच होता. खरे तर वडवडण्यापलीकडे कासिम रझवीच्या हातात काही नव्हते. मागच्या सगळ्या नाड्या मंत्रिमंडळात असणारे लायकअली (मुख्यमंत्री), त्यांच्या सहकाऱ्यांमधील रऊफ महमद यामीन झुबेरी आणि मोईन नबाव जंग यांच्या हातात होत्या. आणि याखेरीज झैनयार जंग, दीनयार जंग व शेवटी या सर्वांच्या नाड्या धरणारे स्वतः निजाम उस्मान अलीखा बहादुर यांच्या हातात. तेव्हा खरे सूत्रधार निजामच होते. कासिम रझवी हा फक्त बेजबाबदार व्याख्याने देण्यासाठीच होता.

रझवी किती मूर्ख होता याचे एक उत्तम उदाहरण मी सांगतो. रझवी एके दिवशी उठला आणि वल्लभभाई पटेलांच्या भेटीला गेला. रझवी आणि वल्लभभाई यांची ही जी भेट झाली तिची माहिती कन्हैयालाल मुनशी यांनी 'End of an Era' या पुस्तकात नोंदलेली आहे. पण मुन्शी यांनी ही जी माहिती नोंदलेली आहे त्यापेक्षा माझ्याकडे असलेली माहिती वेगळी आहे. मुन्शींनी काय नोंदविले होते ते त्यांच्या पुस्तकात वाचा. माझ्याकडे काय माहिती आहे ती मी आपल्याला सांगतो. ही माहिती कोणत्याही पुस्तकात नोंदविलेली नाही. कार्यकर्त्यांच्याद्वारे आलेली आहे. अधिक स्पष्ट बोलायलाही हरकत नाही. रामानंद तीर्थांना जी माहिती होती ती मी तुम्हाला सांगतो. ती माहिती अशी आहे : कासिम रझवी अचानकच विमानात बसले आणि दिल्लीला जाऊन पोहोचले. एका हॉटेलात जाऊन उतरले. त्यांच्याबरोबर मंत्रिमंडळात असणारे जोशी नावाचे गृहस्थ होते. हे ते जोशी ते जालन्याचे व्यापारी आणि गुजराथी होते. हे लायकअली मंत्रिमंडळात हिंदूंचे प्रतिनिधी होते. हे दोघे हॉटेलमध्ये उतरले आणि त्यांनी वल्लभभाईना फोन केला. जोशी फोनवर म्हणाले की रझवीचे असे मत आहे की एकदा

तुम्हाला ठणठणीतपणे सांगितले पाहिजे की तुम्ही हैदराबादला यायचा प्रयत्न कराल तर फुकट मराल. कारण इकडे आम्ही सगळे हुतात्मे व्हायला बसलो आहोत. कासीम रझवीचे प्रसिद्ध वाक्य असे - 'सरको कफन बांधे मुजाहिद वन बैठे है.' म्हणजे आम्ही प्रेतवस्त्रच डोक्याला गुंडाळून हुतात्मे होण्याकरिता बसलो आहोत.

रझवीचा फोन वल्लभभाईचे सचिव शंकर यांनी घेतला. नंतर त्यांनी रझवीचे म्हणणे वल्लभभाईंच्या कानावर घातले. वल्लभभाईंसंबंधी आपणा सर्वांच्या डोक्यात असलेली प्रतिमा आपण बदलून घ्यायला पाहिजे. वल्लभभाई अतिशय खंबीर, दृढनिश्चयी होते. पण शिष्टाचाराचे सर्व नियम पाळणारे होते. त्यांनी शंकरना सांगितले : शहरात जातीय दंगली चालू आहेत. रझवी हॉटेलमध्ये उतरले आहेत ही वातमी बाहेर फुटली तर फुकट मारले जातील. तरी हत्यारबंद पोलिसांची चिलखती गाडी पाठवा. त्यांना सरकारी अतिथिगृहावर आणा. शाही पाहुणे म्हणून वागवा. दिवस शुक्रवारचा आहे. त्यांना विचारा नमाज पढायला जायचे का? जाणार म्हणाले तर जामा मसजिदमधील दुपारच्या नमाजाला त्यांना हजर ठेवा. त्यांचे जेवणखाण, विश्रांती नीट सांभाळा, मी त्यांना रात्री भेटेन.

त्याप्रमाणे कासिम रझवी हा वल्लभभाईंच्या भेटीला आला. वल्लभभाई दरवाज्यामध्ये रझवीच्या स्वागताला उभे होते. वल्लभभाईंनी रझवीच्या मोटारीचा दरवाजा उघडला आणि त्याला खाली उतरण्याची विनंती केली. रझवी खाली उतरल्याबरोबर बोलू लागला. तेव्हा वल्लभभाई म्हणाले, "तुम्हाला बोलण्यासाठी वेळ मिळेल. आपण आधी शिष्टाचार पुरे करू." वल्लभभाईंच्या बंगल्याच्या एका बाजूला हिरवळ होती तेथे वल्लभभाई त्याला घेऊन गेले. त्यानंतर वल्लभभाई म्हणाले, "ही जागा मोठी प्रेक्षणीय आहे. इथून निसर्गदृश्ये चांगली दिसतात. कधीकाळी आपण दिवसा आलात तर मी ती दाखवीन." मग त्यांनी रझवीच्या बायकामुलांच्या प्रकृतीची चौकशी केली. त्याला प्यायला सरबत दिले आणि चांदीचा वर्ख लावलेला एक विडा स्वतःच्या हाताने त्याला दिला. नंतर वल्लभभाई म्हणाले, "ठीक आहे. आता बोला."

रझवी उभा राहिला आणि बोलायला लागला. तेव्हा सरदार पटेल म्हणाले, "तुम्ही बसून बोलू शकता." "मला उभ्याने बोलण्याची सवय आहे. तेव्हा मी बसून बोलत नाही." म्हणून रझवी बोलू लागला. तो एक तासभर व्याख्यान देण्याच्या आवाजात बोलत होता. या बोलण्यात त्याने हिंदुस्थान सरकारला धमक्या दिल्या. त्या

सरकारवर टीकास्त्र सोडले. निजामाचे मोठेपण सांगितले. कत्तलीच्या धमक्या दिल्या. हे सारे तासभर चालल्यावर तो खाली बसला. वल्लभभाई त्याचे सर्व व्याख्यान एकही शब्द न उच्चारता ऐकत होते. तो खाली बसल्यावर वल्लभभाई म्हणाले, "तुमचे काय म्हणणे आहे ते मी ऐकले. पण माझ्या मनात काही शंका आहेत त्या विचारतो."

"विचारा".

"तुमच्या म्हणण्यात एक असा मुद्दा आहे की तुम्ही हैदराबादमधील एक कोटी चाळीस लक्ष हिंदूंची कत्तल कराल."

"हो. ती माझी प्रतिज्ञा आहे."

"एक कोटी चाळीस लाख हिंदूंची कत्तल तुम्ही करीत असाल तेव्हा आम्ही काय करू अशी तुमची कल्पना आहे?"

तेव्हा रझवी एकदम घाबरला.

तो म्हणाला, "तुम्ही मला धमकी देत आहा. हे बरोबर नाही. तुम्ही मला हैदराबादला जाऊ दिले पाहिजे."

"उद्याच्या विमानात तुमची जागा राखीव असेल. तुम्हाला विमानात बसवून दिले जाईल. तुम्ही हैदराबादला सुरक्षित उतरावे अशी माझी इच्छा आहे. नंतर तुम्ही निजामाची भेट घ्याल तेव्हा त्यांची मुलेबाळे आणि प्रकृती यांची चौकशी मी केली असे त्यांना सांगा. त्यांचे कल्याण व्हावे अशीच माझी भूमिका आहे. त्यांना माझा निरोप सांगा की हिंदूंच्या कत्तलीचा विचार त्यांच्या डोक्यात येईल तेव्हा ती सुरू झाली तर आम्ही काय करू याचा विचारही त्यांनी करावा. आता या. मला आणखी काही बोलायचे नाही."

रझवी आणि पटेल यांच्या या भेटीची माझी माहिती अशी आहे. कन्हैयालाल मुन्शींनी जी माहिती दिली आहे त्याप्रमाणे रझवी गेला आणि सरदार पटेलांना म्हणाला, "मी तुमचे हृदयपरिवर्तन करायला आलो आहे."

"ज्याचे हृदय विषाने भरलेले आहे त्याला हृदयपरिवर्तनाची गरज असते. मला हृदयपरिवर्तनाची गरज आहे असे मला वाटत नाही."

"माझे अंतःकरण शुद्ध आहे असे पटवून द्यायला मी आलो आहे."

यावर वल्लभभाई पटेल गप्प बसले. शब्दांच्यापेक्षा मौन अत्यंत कडवट कसे करावे याचे वल्लभभाई हे तज्ज्ञ होते.

असे मुन्शींचे वर्णन आहे. यापैकी नेमके काय घडले? मी तिथे हजर नव्हतो. मुनशींही हजर नव्हते. माझी माहिती ऐकीव तशीच त्यांचीही ऐकीव. फक्त फरक एवढाच की आमची माहिती स्वामीजींच्याकडून आलेली आहे. आमचा विश्वास स्वामीजींवर आहे. ज्यांचा कन्हैयालाल मुन्शींवर विश्वास असेल त्यांनी तो ठेवायला आमची हरकत नाही.

या सर्व आंदोलनात रझाकारांनी केलेल्या अत्याचारी घटनांची जशी मालिका आहे तसेच आमच्याकडूनही सशस्त्र आंदोलक लढत होते. आमच्या मंडळींनी ठाण्यावर हल्ले केलेले आहे. ठाणी लुटलेली आहेत. सगळ्या तऱ्हेच्या हकिकती आहेत. या हकिकतीसुद्धा मी मोठ्या प्रमाणात सांगू शकेन. पण त्या मी सांगणार नाही. त्यातील एकच हकीकत मी थोडक्यात सांगतो. कारण तिच्याविषयी अनेकांच्या मनात गैरसमज आहेत. मी सांगणार आहे ती घटना उमरी बँकेच्या लुटीची आहे. उमरी बँकेची लूट तीही या लक्ष्यातील एक अशीच लोकविलक्षण घटना आहे. संपूर्ण भारताच्या स्वातंत्र्याच्या या जवळजवळ शंभर वर्षांच्या आंदोलनात या घटनेला समांतर दुसरी घटना नाही. ज्या ठिकाणी भारतीय स्वयंसेवकांनी ठाणे अथवा बँक लुटण्याचा प्रयत्न केला त्यातले बहुतेक सगळे प्रयत्न अयशस्वी झाले. कोणत्या ना कोणत्या कारणाने त्यांना बँकेतला पैसा बाहेर काढावयास अपयश आलेले आहे. चार दोन ठिकाणी हा पैसा ताब्यात घेण्यात त्यांना यश मिळाले. हा ताब्यात आलेला पैसा कधीही सुरक्षित जागी जाऊन पोहोचला नाही. त्याचे काय झाले याचा हिशोब पुढच्या काळात लागलेला नाही. उमरी बँक लूट ही मात्र एक वेगळीच अशी घटना आहे.

आखणीच्या दृष्टीने या लुटीची तयारी दीड वर्ष चाललेली होती. धनजी पुरोहित हे गृहस्थ उमरी बँक लुटण्याच्या कल्पनेचे नीट प्रवर्तक. त्यांच्या सर्व आयुष्याची धुळधाण या लढ्यामध्ये झाली. आठ-दहा लाखांचे स्वतःचे उत्पन्न असणारा हा मारवाडी व्यापारी. त्यांनी महिनोगणती हिशोब ठेवून उमरी बँकेची माहिती जमा केली. बँकेच्या सर्व मॅनेजरांना आपल्या घरी चहापाण्याला नेहमी बोलावून, त्यांच्याशी स्नेहाच्या गप्पा करून पुरोहितांनी सारी गणिते मांडली. कोणत्या काळात उमरी बँकेत जास्तीत जास्त पैसा असतो आणि एका वेळेला रोख रक्कम किती असू शकते, कोणत्या वेळेला ती लुटणे फायद्याचे ठरेल हे सर्व नक्की केले. हे धनजी पुरोहित बँक लुटल्याच्या नंतर लूट घेऊन जाणाऱ्या मंडळींच्या बरोबरच स्वतःचे घरदार सोडून उमरखेडपर्यंत आले.

तेथून ते सोलापूरला गेले. त्यापूर्वीच त्यांनी त्यांची इस्टेट विकून सोलापूरच्या बँकेत पैसे जमा करून ठेवलेले होते. ते पैसे काढले आणि कापसाच्या व्यापारास आरंभ केला. त्यात ते बुडाले. दहाबारा लाखांचे उत्पन्न असणारा हा आर्यसमाजी व्यापारी संपूर्ण दरिद्री झाला. नांदेडला पीपल्स कॉलेज स्थापन झाल्यावर हे त्या कॉलेजात स्वयंपाक करणाऱ्यांचा प्रमुख म्हणून वर्ष-सहा महिने होते. तिथून त्यांनी गुजराथेत हॉटेल काढले. परवा स्वातंत्र्य संग्रामाच्या रौप्य महोत्सवाच्या निमित्ताने आम्ही धनजी पुरोहितांना गुजराथेतून उमरीला बोलावून घेतले, त्यांचा सत्कार केला. पण त्यांचे म्हणणे असे की तुम्ही दिलेले पैसे आणि फंड मी घेणार नाही. मी लाखो रुपये कमावणारा आणि कार्यकर्ते जगविणारा माणूस आहे. माझ्या नशिबाने फटका खाल्लेला आहे. मी आता माझ्या खेड्यात माझे हॉटेल चालवत उरलेले आयुष्य काढीन. मला कशाचीही गरज नाही; राजकीय महत्त्वाकांक्षा नाही. तर असा हा थोर माणूस.

नांदेड जिल्ह्यामध्ये लष्करातून नुकतेच निवृत्त झालेले एक गृहस्थ रघुनाथ रांजणीकर. त्यांनी ठरविले की बँक लुटायची हा धनजी पुरोहित यांचा मुद्दा बरोबर आहे. तेव्हा बँक कशी लुटायची याचा संपूर्ण अभ्यास केला पाहिजे. हे लष्करातले विद्वान असल्यामुळे कोणताही हल्ला करायचा असेल तर नियोजन कसे पाहिजे याचे तज्ज्ञ. म्हणून त्यांनी नकाशे डोळ्यांपुढे ठेवले. सडका कुठून कुठे जातात, गाड्या कोठून कोठे जातात; रेल्वे कोठून कोठे जातात; तारा कोठून येतात-जातात याचा तक्ता तयार केला. या साऱ्या घटना चाळीस साली घडणार असून अजून आमचा लढा सुरू झालेला नाही. पण सुरू होईल तेव्हा तो सशस्त्र असणार. सशस्त्र लढा असेल तर त्याला शस्त्रासाठी पैसा लागणार. पैसे लागणार असतील तर उमरी बँक लुटून पैसा घेणार, हे या कार्यकर्त्यांचे मत आहे. या हिशोबात आखणी चालू आहे. त्यामुळे जेव्हा सशस्त्र आंदोलनाला आरंभ झाला तेव्हा उमरी बँक लुटण्याला वरून परवानगी मिळाली. तेव्हा आमच्याजवळ गाड्या केव्हा येतात, जातात; तारा कुठे आहेत, सडका कुठे आहेत, त्या अडविण्यासाठी कुठे झाडे तोडावयाची, बँक लुटल्याची बातमी बारा तासपर्यंत नांदेड अगर निझामाबाद येथे पोचू नये यासाठी काय करायचे याची योजना तयार होती. कारण लुटलेला सगळा पैसा बैलगाडीमध्ये घालून उमरखेडपर्यंत नेणे आवश्यक होते. कुणाजवळ जीप अगर मोटारी नव्हत्या. आनंदाची गोष्ट होती की निजामाच्या फौजेजवळही जीप गाड्या नव्हत्या. कार्यकर्त्यांच्या पाच तुकड्या या

कारवाईसाठी नियुक्त झाल्या. एका तुकडीचे नेते आवासाहेब लहानकर (हे पुढे चालून नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष, लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद (M.L.C.) आणि डोंगरखेडा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष झाले.) दुसऱ्या तुकडीचे नेते साहेबराव वारडकर. (हे कित्येक वर्ष नांदेड जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते व सध्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे सभासद आहेत.) तिसऱ्या युनिटचे नेते नागनाथ परांजपे. चौथ्या युनिटचे नेते रघुनाथ रांजणीकर. पाचव्या तुकडीचे नेते अनंत भालेराव. हे तेव्हा सेलूमध्येच शिक्षक होते. या सगळ्या मंडळींनी ठरलेल्या योजनेनुसार संपूर्ण कार्यवाही पार पाडली. सगळे पैसे बैलगाड्यांत भरले आणि उमरखेडला सुरक्षित नेऊन पोचविले. त्या वेळी सतत रेडिओ लावून बसण्याचे काम भगवंतराव गांजवे आणि भुरवरे यांच्याकडे होते. मुद्दा हा होता की पंचनामा झाल्याच्या नंतर इतके पैसे लुटले गेले अशी बातमी आकाशवाणीवर येईल तेवढे पैसे तुम्ही आम्हाला आणून दिले पाहिजेत. मध्ये एकही पैसा आम्ही तुम्हाला खाऊ देणार नाही. हे जे पैसे आपल्याबरोबर या सर्व मंडळींनी नेले ते भगवानराव गांजवे यांच्या हवाली केले. भगवानरावांनी ते सर्व मोजून यांना लेखी पावती दिली. पंचनाम्याच्या नंतर जी बातमी आली तीत अमुक पैसे लुटले गेले असा उल्लेख आहे. गांजवे यांच्याकडे आलेल्या रकमेची बेरीज एवढी आहे. या दोघांत तीनशेतीस रुपयांचा फरक होता. हे तीनशेतीस रुपये काय झाले याचा शोध करता असे सिद्ध झाले की ते चिल्लरच्या रूपात होते. आमच्या मंडळींनी फक्त नोटाच आणल्या होत्या. मग चिल्लरचे काय झाले? बँक उघडल्यावर पंचनामा होण्याच्या आत चिल्लर ज्याच्या नजरेला पडली त्यांनी ती खिशात घातली असणार.

आमच्या मंडळींना बँकेमध्ये सोने असते हे माहीत नव्हते. त्या दिवशी बँकेत दीड हजार तोळे होते. हे तिजोरीत (Vault) होते. आमची मंडळी हे न लुटता आली. कारण ते लुटण्याचा आदेश नव्हता. त्यांना जेवढा आदेश होता तेवढेच त्यांनी लुटले. सारे सोने बँकेत सुरक्षित सापडले. आलेले पैसे होते त्याची मोजणी, मी आता ज्या कॉलेजचा प्राचार्य आहे ते कॉलेज चालविणाऱ्या संस्थेचे सचिव भगवानराव गांजवे यांनी गोधाजीराव मुरवरे, त्यांच्या पत्नी माई मुरवरे आणि त्यांची विधवा बहीण यांच्यासमोर केली. नंतर ते पैसे तिथून उचलून पुण्याच्या मार्गे सोलापूरला नेले. सोलापूरला आमच्या कृतिसमितीचे प्रमुख कार्यालय होते. तेथे फुलचंद गांधी आणि दुसरे साक्षीदार यांच्या साक्षीने ते पैसे दिगंबरराव बिंदू आणि गोविंदराव श्रॉफ यांच्या

स्वाधीन मोजून केले व त्याची पावती घेतली. पोलिस कारवाई संपल्याच्या नंतर या सर्व पैशाचा हिशोब पैन् पैपर्यंत आम्ही घेणार असे वल्लभभाईंनी कार्यकर्त्यांना सांगितले होते. त्यामुळे कारवाई संपल्यानंतर पुण्याची एक हिशोबतपासनीस कंपनी बाळ आणि आगळे यांनी काँग्रेसचे त्या वेळचे सरचिटणीस शंकरराव देव यांच्या साक्षीने, हैदराबादमधील श्रीधर नाईक यांच्या बंगल्यात हे हिशोब तपासले आणि प्रत्येक पैचा हिशोब आहे असा दाखला दिला. या दाखल्याच्या प्रती करून ज्यांनी पैसे मोजून दिले त्या भगवानराव गांजवे यांनी एक प्रत, दिगंबरराव बिंदू यांनी एक प्रत व तीन प्रती शंकरराव देव यांनी घेतल्या. त्यातील एक अखिल भारतीय काँग्रेसला दिली. एक सरदार पटेलांना दिली. एक स्वतःपाशी ठेवली. हे प्रामाणिकपणाचे एक महान लोकविलक्षण पर्व आंदोलनात घडले.*

आमच्या सर्वच माणसांचे चारित्र्य आणि निष्ठा या पातळीच्या होत्या असे नाही. कारवाई संपल्यावर आमचे कार्यकर्ते आत आले आणि त्यांनी वेगवेगळ्या मुसलमानांकडून त्यांचा जीव वाचवण्यासाठी पैसे घेतले. यश मिळाल्यावर चारित्र्याची पातळी शिल्लक राहिली नाही. दहा हजार, वीस हजार, पंचवीस हजार असे पैसे घेऊन कार्यकर्त्यांनी चोरांचे जीव वाचविले. ते लोक जेव्हा हे पैसे खर्चू लागले तेव्हा जो तो म्हणू लागला की ही उमरी बँकेची लूट आहे. आंदोलनानंतर अनेक वर्षे, मराठवाड्यातील जो कार्यकर्ता आंदोलनापूर्वी गरीब होता तो जरा चलता फिरता झाला की लोकांनी म्हणावे ही उमरी बँकेची लूट आहे. पण उमरी बँकेचा एक आधलाही कुणाला मिळालेला नाही. आता जी मंडळी सांगतात की उमरी बँक लुटत असताना आपण तिथे हजर होतो, त्यांतील फारच थोडे तिथे होते. जे तिथे होते त्यांना साहेबराव आबासाहेब लहानकर, रघुनाथ रांजणीकर, नागनाथ परांजपे, अनंत भालेराव इत्यादींनी दाखला दिला पाहिजे. इतरांवर कुणी विश्वास ठेवू नये. काशीनाथ शेट्टी आता हयात नाहीत. धनजी पुरोहित गुजराथमध्ये आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात लुटीची योजना आखून ती आखलेल्या योजनेप्रमाणे पार पाडणे आणि पैन् पैचा हिशोब चुकता करणे ही घटना

---

* ही पावती आपल्या साक्षीने व माहितीने झाली व सर्व व्यवहार चोखपणे पूर्ण झाला ही जाहीर घोषणा माजी मजूरमंत्री श्री. र.के.खाडिलकर यांनी हैदराबादेत एका व्याख्यानात १९७२ ला केली होती.

**- संपादक**

भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासात एकच आहे हे आपण लक्षात घ्या. उरलेली जी जनतेची चळवळ आहे तिच्याबद्दल मी फारसे सांगणार नाही. फक्त अजून एक गोष्ट सांगून मी दुसऱ्या प्रश्नाकडे वळणार आहे.

उमरी बँकेतील लुटीचे पैसे आले एकवीस लाख. ही रक्कम आमच्या लढ्याच्या दृष्टीने अत्यंत अपुरी होती. एकटे नांदेडचेच घेतले तर उमरखेड या ठिकाणी दोन हजार कार्यकर्ते होते. या दोन हजार लोकांचे खाणेपिणे, कपडे, इतर गरजा आणि कार्यालय यांचा खर्च गांजवे हे व्यापारी असल्याने त्यांनी नोंदलेला आहे. हा खर्च दरमहा साठ हजारांच्या घरात जातो. एकटे उमरखेड कार्यालय सांभाळण्याचा फेब्रुवारी अठ्ठेचाळीस ते सप्टेंबर अठ्ठेचाळीसपर्यंतचा खर्च दरमहा साठ हजारांच्या घरात होता. यामध्ये माणसांचे कपडे, अंथरुणे, रहायचे घराचे भाडे, दोन वेळचे जेवण, कार्यालय खर्च, जाण्यायेण्याचा खर्च समाविष्ट आहे. दोन हजार माणसांना माणशी तीस रुपये महिन्याला असे स्थूल प्रमाण पडते. सकाळ-संध्याकाळ भाकरी, आठवड्यातून एक दिवस भात-भाकरी आणि भाजी, पंधरा दिवसांतून एकदा डोक्याला लावायला तेल, पंधरा दिवसांनी एकदा हजामत, एक घोंगडी, पांघरायला एक चादर, एका खोलीत दहा माणसे अशा निकृष्ट जीवनात कार्यकर्ते राहात असत. तरीसुद्धा फक्त एका उमरखेडचा खर्च साठ हजार महिना होता. यात शस्त्रास्त्र खरेदी नाही. त्या खरेदीचा खर्च वेगळा. आमच्याकडे जी शस्त्रे होती ती कोण्या ठिकाणी किती होती याचे आकडे नाहीत. उमरखेड कार्यालयाने किती शस्त्रास्त्रे पोलिस आणि कलेक्टर यांच्या स्वाधीन केली यांचा पंचनामा केलेला आहे. जी अधिकृत वैयक्तिक शस्त्रास्त्रे होती त्यांचा यात समावेश नाही. यामध्येसुद्धा दोनशेपन्नास रायफली होत्या; हातबॉम्ब होते. माझे मधले मामा रामचंद्रराव नांदापूरकर यांनी भारत सरकारला शस्त्रास्त्रे सादर केलेली आहेत. त्यात चौतीसशे हातबॉंब होते. आमच्या कार्यकर्त्यांनी जी एकूण शस्त्रे भारत सरकारच्या स्वाधीन केली त्यांची किंमत साठ लक्ष रुपयांहून जास्त आहे. तसेच वर एका शिबिराचा हिशोब सांगितला त्याप्रमाणे कार्यकर्त्यांच्या अनेक शिबिरांचा जो खर्च होईल तो लाखात मोजण्याच्या पलीकडचा आहे. हे सर्व लक्षात घेतले तर एकवीस लाखांनी काहीही भागत नाही हेही आपल्या लक्षात येईल. स.का.पाटील, जयप्रकाश नारायण, द्वारकाप्रसाद मिश्रा यांनी प्रचंड मदत केली. संस्थानी हद्दीतून मदत आली. कार्यकर्त्यांनी भिक्षा मागून कितीतरी पैसा मिळविला. हा सर्व या प्रचंड भुकेत संपलेला आहे. आंदोलने

चालवायला किती अफाट प्रचंड खर्च येतो याची जाणीवही आपणाला नाही. वीस हजार भूमिगत कार्यकर्ते शस्त्रास्त्रानिशी नऊ महिने पोसायचे तर किती खर्च लागतो याचा हिशोब प्रत्येकाने थोडे गणित करून मनाशी करावा.

आता मी जनतेच्या आंदोलनाचा निरोप घेऊन वाटाघाटीकडे वळतो. वाटाघाटीही महत्त्वाच्या आहेत. वाटाघाटीसाठी हैदराबादहून गेलेल्या निजामी शिष्टमंडळाचे अध्यक्ष निजामाचे पंतप्रधान छत्तारीचे नबाब होते आणि जनरल सेक्रेटरी नबाब अलियावर जंग होते. हे त्या वेळी पुढील पदे भूषवीत होते. घटना समितीचे सचिव, कायदे मंडळाचे सचिव, निजामाचे खास सल्लागार, निजामाचे रेसिडेंटच्या दरबारातील खास वकील, निजामाचे व्हाइसरॉयच्या दरबारातील खास वकील इ.इ. असे हे लोकविलक्षण कर्तृत्वाचे गृहस्थ त्या शिष्टमंडळाचे जनरल सेक्रेटरी होते. मोईन नबाबजंग एक सभासद. हिंदूंच्या वतीने पिंगल व्यंकटराम रेड्डी हे सभासद. या वाटाघाटी जून अठरापासून सुरू झाल्या. अठरा जूनलाच आमचा लढ्याचा ठराव, अठरा जूनलाच वाटाघाटीची पहिली फेरी. या वाटाघाटी ज्या चालल्या त्या हैदराबाद भारतात विलीन व्हावे या मुद्द्यावर चालल्या नाहीत तर आम्हाला वऱ्हाड द्या, आम्हाला रायलसीमा द्या, आम्हाला हे द्या, आम्हाला ते द्या या मुद्द्यावर चालल्या. या वाटाघाटी फसल्या आहेत हे तीन ऑगस्टला स्पष्ट झाले. तेव्हा माऊंटबॅटन यांनी निर्णय घेतला की हिंदुस्थान स्वतंत्र होईपर्यंत हैदराबादचा प्रश्न सुटू शकत नाही.

एक गोष्ट सांगावयाची राहून गेली. ती जनता आंदोलनाचाच भाग आहे. फसलेल्या वाटाघाटी सोडून ती मध्येच सांगतो. आंदोलन सुरू होण्यापूर्वी संस्थानी काँग्रेसने काही कार्यकर्ते वल्लभभाईंच्या भेटीस पाठविले. जे पुढच्या कृतिसमितीचे अध्यक्ष होणार हे ठरलेले होते ते दिगंबरराव बिंदू यात होते. जे सत्याग्रह करून तुरुंगात जाऊन बसणार असे आधीच ठरलेले होते ते रामानंद तीर्थ यात होते. लढ्यात ठराव पास करण्याच्या आठ-दहा दिवस अगोदर ही मंडळी दिल्लीला जाऊन वल्लभभाईंना भेटली. पुढच्या अधिवेशनात ठराव पास करून आम्ही आंदोलन सुरू करीत आहोत. तुम्ही आम्हाला आशीर्वाद द्या असे त्यांनी वल्लभभाईंना सांगितले. सरदार म्हणाले, मी तुम्हाला आशीर्वाद देणार नाही. याचे कारण असे की तुमचे आंदोलन सुरू झाल्यावर प्रचंड अत्याचार होतील आणि मी तुम्हाला वाचवू शकणार नाही. तुमच्या सर्व जनतेला प्रचंड प्रमाणात अत्याचारांना तोंड द्यावे लागेल. आम्ही इथे

बसून खेद व्यक्त करण्यापलीकडे काहीही करू शकणार नाही. ज्या अनुयायांचे संरक्षण मी करू शकत नाही त्यांना लढा सुरू करा असा आशीर्वादही मी देऊ शकत नाही. म्हणून तुमच्या आंदोलनाला माझा आशीर्वाद नाही. यावर बिंदूंनी विचारले, मग तुमचे म्हणणे असे आहे काय की आम्ही आंदोलन सुरूच करू नये? यावर वल्लभभाई म्हणाले, असाही सल्ला मी देऊ शकत नाही. कारण जनतेचे आंदोलनच जर नसेल तर हैदराबाद भारतात कधीच येणार नाही. यासाठी तुम्ही लढा सुरू केलाच पाहिजे, अत्याचार सहन केलेच पाहिजेत. त्यावर बिंदू म्हणाले, आम्ही जाणीवपूर्वक सर्व अत्याचार सहन करायचे ठरविले आहे. तसे आम्ही अत्याचार सहन करतो. पण तुम्ही आम्हाला आशेचा एखादा शब्द तरी द्याल? की आम्ही नुसताच निराशेच्या वातावरणात लढा सुरू करावा? तेव्हा वल्लभभाई म्हणाले, मी जर जिवंत असेन (वल्लभभाई अत्यंत आजारी अवस्थेत होते.) तर मी तुम्हाला एक शब्द देतो. हा लढा एक वर्षभर संपणार नाही. किमान एक वर्ष तुम्हाला अत्याचार सहन करणे भाग आहे. पण हा लढा मी दोन वर्षे शिल्लक राहू देणार नाही. एक वर्ष तुम्हालाच सर्व भोगले पाहिजे. जास्तीत जास्त दोन वर्ष. दोन वर्षांच्या आंत म्हणजे पंधरा ऑगस्ट एकोणपन्नासच्या आत हा प्रश्न संपला नाही व तोवर मी जिवंत राहिलो तर तो सोडविण्याची हमी मी देतो. पंधरा ऑगस्ट अठ्ठेचाळीसपर्यंत हा प्रश्न का सुटणार नाही ते लक्षात घेण्याची जबाबदारी तुमची. आता लढा सुरू करायचा की नाही याचा निर्णय तुम्ही घ्या.

हे ऐकून कार्यकर्ते परत आलेले होते. लढ्याचा जो ठराव स्वामी रामानंद तीर्थांनी मांडलेला आहे त्यावर बोलताना ते म्हणाले आहेत की एखाद्या फेरीमध्ये हा लढा संपेल असे कुणी मानू नये. कमीत कमी वर्षभर हा लढा चालणार आहे. हे लक्षात घेऊन वर्षभर अत्याचार सहन करायला तुम्ही तयार आहात का? तशी तयारी असेल तर मला सांगा. नाहीतर आपण हा ठराव पास करायला नको.

मी बिंदूंना नंतर विचारले होते या सर्वांचा अर्थ काय? वल्लभभाई काय म्हणत होते? बिंदू म्हणाले, त्या वेळेस अर्थ कळला नव्हता. नंतर कळला. मी स्वामीजींनाही विचारले होते त्यांना वल्लभभाईंचे म्हणणे कळले होते का? स्वामीजीही म्हणाले, त्या वेळेस कळले नव्हते, नंतर कळले. त्या वेळेस अर्थ कळला नाही याविषयी तक्रार नाही. पण त्या पुढाऱ्यांना नंतर जो अर्थ कळला तो आपण समजून घेतला पाहिजे. वल्लभभाई असे सुचवीत होते की भारत स्वतंत्र झाल्यावरही लॉर्ड माऊंटबॅटन हेच गव्हर्नर जनरल

राहतील आणि अचिनलेक हा इंग्रजच भारताचा सरसेनापती राहील. जोवर गव्हर्नर जनरल आणि सरसेनापती इंग्रज आहे तोवर हैदराबादला सैन्य पाठविता येणार नाही. हे दोघे इंग्रज जायला कमीत कमी एक वर्ष लागेल. ते गेले की गव्हर्नर जनरल भारतीय येईल. सरसेनापती भारतीय येईल. त्यानंतर वर्षाच्या आत हा प्रश्न आम्ही सोडवू. तोवर मात्र अत्याचार सहन करावयाचे. अशी ही सरदारांची भूमिका स्पष्ट व्यवहारवादी होती. आमच्या हातातच सैन्य लौकर आले नाही तर पाठवायचे काय? हैदराबादचा प्रश्न चौदा महिने का चालला हे आता आपल्या लक्षात यावे. माऊंटबॅटनचे मत हैदराबादचा प्रश्न युनोकडे न्यावा असे होते. निजामाचीही इच्छा हैदराबादचा प्रश्न युनोकडे नेण्याचीच होती. एकदा हा प्रश्न युनोकडे गेला असता तर हैदराबादचे स्वातंत्र्य वहिवाटीतच सिद्ध झाले असते. त्यामुळे सर्वांचा त्याला विरोध होता. आता प्रश्न होता तो हा की पंधरा ऑगस्टपर्यंत हैदराबादचा प्रश्न सुटला नाही तर पुढे काय करावयाचे? त्यामुळे हिंदुस्थान सरकारचे सर्व लोक आतून सचिंत होते. मेननने या सचिंततेचे वर्णन करून ठेवलेले आहे.

याच सुमारास सोळा ऑगस्टला हैदराबाद सरकारचे भारत सरकारला पत्र आले, की आता ब्रिटिश सार्वभौमता संपलेली आहे. नवीन अस्तित्वात आलेले जे भारतीय सरकार आहे त्याला आम्ही शुभेच्छा व्यक्त करतो. दीर्घकाल हे सरकार आपल्या प्रजेचे कल्याण करीत राहील अशी आम्ही आशा व्यक्त करतो. हैदराबादही पंधरा ऑगस्टपासून स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात आलेले आहे. आमच्या मनात तुमच्याबद्दल व तुमच्या मनात आमच्याबद्दल स्नेह असावा अशी आमची अपेक्षा आहे. दोन स्वतंत्र राष्ट्रे जरी असली तरी आपल्या सरहद्दी एकमेकांत गुंतलेल्या आहेत. म्हणून आपण मित्रत्वाच्या नात्याने शेजारी राहावयास शिकले पाहिजे. म्हणून हिंदुस्थान बरोबर सर्वांगीण मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध असावेत अशी आमची इच्छा आहे. त्या दृष्टिने आम्ही वाटाघाटी करायला तयार आहोत.

निजामाचे धोरण असे की वाटाघाटीचे गुऱ्हाळ चालवीत राहावयाचे. वर्ष दोन वर्षे वाटाघाटी मिटत नाहीतच. मग युनोत दोन-चार वर्षे काढावयाची. एवढी वर्षे लोटली तर मध्ये जगातील इतर राष्ट्रांची मान्यता त्याला मिळायला लागते. लष्करी मदत मिळायला लागते. शिवाय तोवर वहिवाटीने स्वातंत्र्य सिद्धही होते. त्यामुळे घाई निजामाला नव्हती, आम्हाला होती. निजाम हा अत्यंत चतुर माणूस. म्हणून स्वातंत्र्योत्तर

काळात पुन्हा वाटाघाटी चालू झाल्या. या वाटाघाटीत स्पष्ट भूमिका घेतली असेल तर ती जवाहरलाल नेहरूंनी. त्यांनी हैदराबाद शिष्टमंडळाला सांगितले, तुमच्या समोर पर्याय दोन. एक, तुम्ही उरलेल्या संस्थानिकांबरोबर भारतात विलीन होऊन जावे. दुसरा, रझाकार संघटनेवर तात्काल बंदी आणावी. संस्थानी काँग्रेसचे सर्व कार्यकर्ते सोडावेत. कायदा तयार करून प्रौढ मतदानावर आधारलेली निवडणूक घ्यावी. हे जे जनतेने लोकनियुक्त मंत्रिमंडळ येईल त्या मंत्रिमंडळाने हैदराबादचे भवितव्य ठरवावे. ते जे ठरवतील ते आम्ही मान्य करू. तिसरा पर्याय नाही. त्यावर छत्तारीचे नबाव म्हणाले, दोन्ही पर्यायांचा अर्थ हैदराबादने भारतात विलीन झाले पाहिजे हाच आहे. नेहरू म्हणाले, हैदराबाद जर भारतात विलीन झाले नाही तर भारतीय प्रदेशाची सलगताच निर्माण होत नाही. आमच्या प्रादेशिक सलगतेवर आम्ही तडजोड करू ही तुमची अपेक्षाच चुकीची आहे.

सगळ्यात मृदू मनाचे म्हणून विख्यात जे भारतीय नेते, त्यांचे हे मत. नेहरू हे सौम्य बोलण्यासाठीच प्रसिद्ध. अधिकृत वाटाघाटीत सामान्यपणे सरदार पटेल गप्पच राहात. हैदराबादची शिष्टमंडळे कधी खासगी बैठकीत त्यांना भेटली तर ते म्हणत : तुम्ही ही वेळ वाया घालवीत आहात. माऊंटबॅटन वेळ घालवीत आहेत व आमचे मेननही निरर्थक गोष्टी करीत आहेत. माऊंटबॅटनच्या हाती काहीही नाही. तुमच्या हाती काही नाही, माझ्या हाती काही नाही. जवाहरलाल नेहरूंच्या हाती काही नाही. सगळे प्रश्न कासिम रझवीच्या हाती आहेत. ते काही तुमच्या या शिष्टमंडळाचे सभासद नाहीत. त्या माणसाने काही प्रतिज्ञा केलेल्या आहेत. आपला शब्द दिला आहे. काय करायचे ते त्यांचे ठरलेले आहे. शिष्टाचार म्हणून वाटाघाटी करून ते आता काय ते करणार आहेत. अशा प्रकारे वल्लभभाई शिष्टमंडळांना टिंगलीने खाजगीत बोलत. सूचना मेनन, माऊंटबॅटन यांच्याकडून येत. हैदराबादच्या निजामाकडून, अलियावर जंगकडून येत.

वाटाघाटीत अलियावर जंग यांनी एक महत्त्वाचा प्रस्ताव दिला. त्यानंतरच्यां काळात मीर लायकअलींनी तोच प्रस्ताव दिला. मुन्शींच्या पुस्तकात माऊंटबॅटन प्रस्ताव म्हणून त्याचा उल्लेख आहे, पण तो मुळात अलियावर जंगचा प्रस्ताव. हा महत्त्वाचा प्रस्ताव मी पुढे तुम्हाला सांगतो. पण या वाटाघाटी हलेचनात. त्यांना कोठे सीमाच नव्हती. यात मधे एकदा असे ठरले की विलीनीकरणाच्या वाटाघाटी (Instrument of

Accession) हे शब्द बदलावेत आणि सहकार्याच्या वाटाघाटी (Instrument of Association) हे शब्द वापरावे. हेही भारत सरकारने मान्य केले. पण निजामाचे म्हणणे असे की सहकार्य (Association) या शब्दाने गैरसमज होण्याचा संभव आहे. त्यामुळे जैसे थे (Stand still Agreement) असे शब्द वापरावे. तेही हिंदुस्थान सरकारने मान्य केले. या जैसे थे कराराची कलमे काय असावीत हे ठरले. ऑक्टोबर वीसला हैदराबादचे शिष्टमंडळ सर्व कलमे घेऊन परत आले. पंचवीस ऑक्टोबरला हैदराबाद सरकार आणि दिल्ली येथून एकाच वेळी सह्या केल्या जातील असे ठरले. आणि बावीस ऑक्टोबरला निजामाने माऊंटबॅटनला तार पाठविली. अजून शंकेच्या काही जागा आहेत. वाटाघाटीची एक फेरी अजून झाल्याशिवाय सही करता येत नाही. मेननने त्यांना उत्तर दिले : वाटाघाटी संपल्या असून सहीचा दिवसही ठरला आहे. आता फेरविचार करता येणार नाही असे आमचे मत आहे. तरीही काही बोलावयाचे असेल तर पंतप्रधान छत्तारींना पाठविण्याची तारीख कळवायला निजामाने टाळाटाळ केली. नंतर अठ्ठावीस ऑक्टोबरला निजामाने भारत सरकारला कळविले की वाटाघाटी पुन्हा उघडण्याचे तुम्ही मान्य केल्याशिवाय छत्तारी येणार नाहीत. भारत सरकारने कळविले, मग वाटाघाटी फिसकटल्या असे आम्ही जाहीर करतो. त्यावर निजामाने कळविले तुम्ही असे जाहीर केलेत तर लगेच आमचे शिष्टमंडळ पाकिस्तानशी वाटाघाटी करण्यासाठी जाईल. तेव्हा वाटाघाटी फिसकटल्या असे जाहीर करणे आम्हास संमत नाही. आपणाला वाटेल हा काय तमाशा चालू आहे? वाटाघाटी अशाच चालतात. त्या लक्षात यायला हव्या असतील तर सर्व तारखा लक्षात घ्या. वीस ऑक्टोबर, बावीस ऑक्टोबर, चोवीस ऑक्टोबर, पंचवीस ऑक्टोबर, सव्वीस ऑक्टोबर अशा या क्रमाने चालून तारखा आहेत. चोवीस ऑक्टोबरचे सांगायचे राहिले. या दिवशी सरदार पटेलांनी निजामाला पत्राने कळविले आहे - तुमचे ताजे पत्र पोचले. त्याचा अभ्यास करायला पंधरा दिवस लागतील. तेव्हा वाटाघाटी फिसकटल्या की नाही हे ठरवायलाही पंधरा दिवस लागतील. आपण तूर्त थांबू. बावीस ऑक्टोबरला (सत्तेचाळीस) पाकिस्तानी फौजेने काश्मीरवर हल्ला केला आहे. पाकिस्तान हल्ला करणार याची माहिती निजामाला वीस ऑक्टोबरला नाही. त्यामुळे शिष्टमंडळ वाटाघाटी पूर्ण करून आणि सहीची तारीख ठरवून परतते. पण पाकिस्तानचे सैन्य शिरले हे कळताच निजाम ठरवितो की आता कदाचित पाकिस्तान भारताचा पराभव करील. तर

या युद्धाचा निकाल लागण्यापूर्वी भारताशी कोणताच करार न करणे बरे. म्हणून निजामाची चालढकल की वाटाघाटींची संधी द्या. वाटाघाटींना संधी देण्याच्या आत भारताच्या फौजा काश्मीरमध्ये जाऊन पोहोचल्या पाहिजेत, या फौजा पोचल्या आणि श्रीनगरच्या बाहेर पुंच येथे भारत-पाकिस्तानची पहिली लढाई जुंपली. तेव्हा सरदारांनी निजामाला कळविले की आता आम्हाला विचाराला पंधरा दिवस लागतील. याच दरम्यान जुनागढने पाकिस्तानात विलीन व्हायचे ठरविले आहे. पाकिस्तानने ते विलीनीकरण मान्यही केले आहे. त्यामुळे भारत सरकारने पाकिस्तानची लढाई चालू असतानाच जुनागढवर सैन्य पाठवून पोलिस कारवाई करावयाचे ठरविले. सहा नोव्हेंबरला पोलिस कारवाई ठरली. आठ नोव्हेंबरला जुनागढच्या हद्दीवर फौजा उभ्या राहिल्या. नऊ नोव्हेंबरला पोलिस कारवाई संपली. अकरा नोव्हेंबरला काश्मिरात पाकिस्तान सैन्याची पिछेहाट सुरू झाली. पाकिस्तानने भारतीय भूमीवर हल्ला करताच भारताला पाकिस्तान भूमीवर जुनागढला हल्ला करणे साहजिकच झाले. भारताने चाल केली तिथे भारत जिंकले. पाकिस्तानने चाल केली तिथेही भारत जिंकला. तेव्हा मध्य सरकारच्या संस्थान मंत्रालयातून मेननची कळविले की वाटाघाटी मोडल्या असे जाहीर झाले तर परिणाम अत्यंत गंभीर होतील. तेव्हा काय करता ते कळवा. त्यावर निजामाने अशी चाल केली की; इथल्या दंगलीच्यामुळे मंत्रिमंडळ बदलले आहे. (नबाव ऑफ छत्तारीला घेरणे, त्याच्या मिश्या उपटणे, त्या जाळणे, अलियावर जंगला मारणे अशा घटना झाल्या होत्या.) तेव्हा मागे काय ठरले हे समजून घेण्यासाठी नवे मंडळ दिल्लीला पाठवीत आहे. म्हणून लायकअली यांच्या नेतृत्वाखालील मंडळ गेले. आता आमची समजूत पटली. आम्ही जैसे थे करारावर सही करावयास तयार आहोत म्हणून सह्या करायचे ठरले आणि एकोणतीस नोव्हेंबरला 'जैसे थे' करारावर सह्या झाल्या. या सह्यासुद्धा निजामाने काश्मीरमध्ये पाकिस्तानचा नक्की पराभव होतो आहे हे स्पष्ट झाल्यावर व आपण मस्ती केली तर जुनागढप्रमाणे हैदराबादमध्ये सैन्य येईल ही भीती वाटल्यावरच केल्या. अजूनही त्याने एक व्याप पार पाडला. पाकिस्तानला विचारले, हैदराबादवर हल्ला झाला तर तुम्ही मदत कराल का? पाकिस्तानने अधिकृतरीत्या कळविलेले आहे की आपण तुम्हाला काहीही मदत करू शकणार नाही. पाकिस्तान मदत करणार नाही हे कळल्यावर भारत सरकार जुनागढप्रमाणे सैन्य पाठवील हे कळल्यावर आणि काश्मिरात पाकिस्तानचा पराभव झाल्यावर निजामाने 'जैसे थे'

करारावर सह्या केलेल्या आहेत. या सह्या झाल्यावर स्वामीजींना तुरुंगातून सोडण्यात आले. स्वामीजी दिल्लीला गेले. सर्वांना भेटले. परत आले आणि पुन्हा अटकेत पडले. तेव्हा निजामाने नव्या वाटाघाटीचे चक्र प्रवर्तित केले. पुन्हा एकदा तेच. वाटाघाटी... वाटाघाटी. आता त्यांचे म्हणणे म्हणजे दोन स्वतंत्र राष्ट्रांची मैत्री झाली. आता आमचा विदर्भ तुमच्याकडे आहे, तो परत केव्हा द्यायचा याचा विचार सुरू करू. या वाटाघाटी कधी संपत नव्हत्या. संपणाऱ्या नव्हत्या. याच वेळी मुन्शींचा माऊंटबॅटन प्रस्ताव येतो. वस्तुतः हा माऊंटबॅटनचा नसून मुळात अलियावर जंगांचा आहे. हा प्रस्ताव असा : विदेश, लष्कर, नाणी आणि दळणवळण या चार बाबी हैदराबादने भारतावर सोपवाव्या. हैदराबाद हा यापुढे भारतीय प्रशासनाचा भाग असे समजावे. सार्वभौमता भारताची असावी. भारताने हैदराबादकडे एक प्रांत म्हणून पाहावे. हे कलम पहिले. दुसरे कलम असे : हैदराबादला संपूर्ण अंतर्गत स्वायतत्ता असावी. आणीबाणीखेरीज भारताने हैदराबादच्या अंतर्गत व्यवस्थेत हात घालू नये. हैदराबादच्या मंत्रिमंडळात साठ टक्के हिंदू व चाळीस टक्के मुसलमान असावेत. हे मंत्रिमंडळ दहा वर्षे चालावे. दहा वर्षानंतर ते मंत्रिमंडळ जाऊन दुसरे मंत्रिमंडळ यावे. यात ऐंशी टक्के हिंदू व वीस टक्के मुसलमान असावेत. हेही मंत्रिमंडळ दहा वर्षे चालावे. त्यानंतर लोकसंख्यांच्या प्रमाणात प्रतिनिधीत्व यावे. नंतरच भारताचे संविधान हैदराबादमध्ये लागू करावे की नाही हे वाटाघाटी करून ठरवावे. या दरम्यानच्या काळात आर्थिक, सामाजिक रचनेत बदल करण्यात येऊ नये. मुसलमानांचे नोकऱ्यातील प्रमाण दर दहा वर्षांना दहा टक्के कमी करावे. यात एकदम बदल करण्यात येऊ नये. हैदराबादला सर्व जगातील देशांत व्यापारी प्रतिनिधी ठेवण्याचा अधिकार असावा. हे प्रतिनिधी राजकीय कार्य करणार नाहीत. आणि करावयाचे असेल तर भारत सरकारच्या नेतृत्वाखाली करतील आणि हे सर्व हैदराबादमध्ये करावयाचे असल्याने भारत सरकारने हैदराबादच्या सरहद्दी बदलू नयेत.

जर हा अलियावर जंग प्रस्ताव मान्य झाला असता तर संयुक्त महाराष्ट्र नाही, विशाल आंध्र नाही, कर्नाटक नाही, म्हणून देशाची भाषावार प्रांतरचना नाही. भारतीय घटना हैदराबादला लागू नाही, तिथून दहा दहा वर्षे जात जात आज आपण संविधान लागू करावयाचे की नाही याचा विचार करीत बसलो असतो. तोपर्यंत हैदराबादवर मुसलमान जमीनदारांचे वर्चस्व कायम राहते. उर्दू माध्यम शिल्लक राहिले असते.

मोहरमला घरेदारे बंद करून आपले मंगल सोहळे चोरासारखे उरकावे लागले असते. हे सारे अलियावर जंग प्रस्तावात होते. या प्रस्तावाला सरदार पटेल आणि नेहरू यांनी शेवटच्या क्षणी अत्यंत दुःखाने मान्यता दिली. पटेलांनी मान्यता द्यावी याचे मेननना अत्यंत आश्चर्य वाटले. मेनन पटेलांना म्हणाले, "जरा थांबा, हा प्रस्ताव निजामच फेटाळील अशी माझी खात्री आहे. तुम्ही जरा गंमत पाहा." माऊंटबॅटन आणि पटेल यांना प्रस्ताव मान्य असल्यामुळे नेहरूंनी त्याच्यावर एक टिपण लिहिले आहे - 'मला हा प्रस्ताव मुळीच मान्य नाही. पण माऊंटबॅटन व सरदार यांना तो मान्य असल्याने मी याला संमती देतो आहे. पण माझी सर्व बुद्धी मी या प्रस्तावातून अंग कसे काढून घ्यावे यासाठी वापरीन.' म्हणजे कुरकुरत का होईना सर्वांची संमती झाली. या संदर्भात सरळ निजामाशी वाटाघाटी केल्या पाहिजेत यासाठी माऊंटबॅटन यांनी आपला निजी सचिव कॅम्बल जॉन्सन याला मार्चच्या पहिल्या आठवड्यात हैदराबादला पाठविले, त्याच्या व निजामाच्या अठ्ठेचाळीस मार्चच्या पहिल्या आठवड्यात वाटाघाटी झाल्या. कॅम्बल जॉन्सन यांनी असें स्वच्छ लिहिले आहे की आजही हैदराबादची सर्व सूत्रे निजामाच्या स्वतःच्या हातात आहेत. हे मी आपल्याला मुद्दाम अशासाठी सांगतोय की कन्हैयालाल मुन्शींनी जे सातत्याने सांगितले आहे की एक नोव्हेंबर सत्तेचाळीस नंतर हैदराबांदची सूत्रे निजामाच्या हाती नव्हती; जे घडले, त्यासाठी पोलिस कारवाई करावी लागली, त्याचा दोष निजामाच्या माथी मारू नका. त्या बिचाऱ्याचे काही चालत नव्हते. तो हतबल होता, वगैरे वगैरे. ते खरे नाही. हा वकील भारताचा, पण हैदराबादमध्ये बसून निजामाचे हितसंबंध कसे सांभाळता येतील याचा विचार करीत होता. ही आमच्याच वकिलाची देशद्रोही कृती होती. या देशद्रोहीपणाची तपशिलवार सर्व माहिती मी 'पोलिटिकल एजंट' या माझ्या लेखात काही वर्षांपूर्वी दिली आहे. (प्रस्तुत लेख याच पुस्तकात आहे - संपादक) हे मी अशासाठी सांगतोय की, माऊंटबॅटन प्रस्तावाला काँग्रेसने मान्यता दिली असा प्रचार करणारा एक गट काँग्रेसमध्येच होता. त्यात जनार्दनराव देसाई, काशिनाथराव वैद्य, बी. रामकृष्णराव अशी बडी मंडळी होती. ही साठ/चाळीस प्रमाण मान्य असणारी मंडळी. यांनी हा प्रस्ताव आमचे नेते तुरुंगात असताना मान्य केला. नंतर याच्यासाठी वल्लभभाईंवर दबाव आणण्याचा प्रयत्न झाला. हा दबाव एन.गोपाळस्वामी अयंगार यांचे मार्फत या ज्या मंडळीने आणला त्यांत कन्हैयालाल मुन्शीही होते. याला निजामाची मान्यता मिळावी असा प्रयत्न हिंदुस्थान

सरकार करीत होते. हिंदुस्थान सरकारची मान्यता मिळवी असा प्रयत्न अलियावर जंग करीत होते. काँग्रेसची मान्यता मिळावी असा प्रयत्न कन्हैयालाल मुन्शी करीत होते. तोवर धूर्त निजामाने आणखी एक पिल्लू सोडून दिले होते. इथपर्यंत आलोच आहोत तर आपणाला ब्रिटिश कॉमनवेल्थचा सभासद व्हायला मान्यता मिळावी. वा रे वा धूर्त निजाम! म्हणजे हैदराबादला ब्रिटिश कॉमनवेल्थचे सभासदत्वही मिळाले, पाकिस्तान-भारत असे युद्ध झाले तर तटस्थ राहण्याचा अधिकारही मिळाला आणि इंग्लंड व भारत यांचे फाटले व भारत कॉमनवेल्थमून बाहेर पडला तर हैदराबादला भारतातून बाहेर पडण्याचा संभव मिळाला. निजाम हे धाडस करतो कारण त्याला माऊंटबॅटन यांची सहानुभूती मिळणार ही त्याची खात्री; कारण माऊंटबॅटन इंग्रज. याला ब्रिटिश सरकारचीही सहानुभूती असणार, कारण ते सारे इंग्रज. इंग्रजांची सहानुभूती आपल्याच बाजूला राहील याची काळजी निजामाने घेतलेली. म्हणून हैदराबादचा प्रश्न इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये तीन दिवस चर्चिला गेला. हैदराबादचे स्वातंत्र्य जतन करण्याच्या दृष्टीने ब्रिटिश सरकारने पावले टाकावी अशी मागणी विरोधी पक्षाचे नेते चर्चिल यांनी केली. पण ॲटलींनी जे प्रश्न विचारले त्यांना चर्चिलजवळ उत्तर नव्हते. नेहरू हे अतिशय धूर्त राजकारणी व मुत्सद्दी होते हे मी पहिल्या व्याख्यानात सांगितले. स्वातंत्र्याचा कायदा होत असतानाच पंडित नेहरूंनी सर्व सावधगिरी आधीच घेऊन ठेवलेली होती. ती अशी - इंग्रजांचे राज्य संपून भारत आणि पाकिस्तान अशी दोन नवी राष्ट्रे निर्माण होत आहेत हे त्यांनी नाकारले. नवे निर्माण होत आहे ते फक्त पाकिस्तान. तेही ब्रिटिश इंडियाचा काही भाग वेगळा होऊन. ब्रिटिश इंडियाची इतर सर्व वारसदारी ज्याच्याकडे येऊन पोहोचते असे भारत हे राष्ट्र पूर्वापार चालते आहे. नेहरूंची ही भूमिका प्रतिगामी मानली गेली. नवीन भारत निर्माण झाला असे नेहरू मानीतच नाहीत. जुन्या ब्रिटिश सरकारच्या पाकिस्तान सोडून उरलेल्या सर्व वारशाचे वारसदार जुने भारत आहे, अशी नेहरूंची भूमिका. त्या भूमिकेला चर्चिलने मान्यता दिलेली. कारण इंग्लंडच्या प्रथेप्रमाणे नवा कायदा बनताना विरोधी पक्षनेत्याचा सल्ला घेतला जात असे. तिथे आजच्या भारतासारखे नाही. इथल्या आजच्या पंतप्रधान स्वतःच्या मंत्रिमंडळालाही न विचारता कामे करतात, तिथे विरोधी पक्षाचे काय? इंग्लंडमध्ये विरोधी पक्षनेत्याला विचारले जाते. चर्चिलला विचारले गेले होते व त्यांने संमती दिली होती. ॲटलीने चर्चिलला विचारले, जुन्या ब्रिटिश सरकारचे सर्व संस्थानांवर

संपूर्ण सार्वभौमत्व होते. ते अधिकार कायद्याने नव्या भारत सरकारच्या स्वाधीन झालेले आहेत, हे आपण नाकारता काय? जुन्या ब्रिटिश इंडियाच्या व्हाइसरॉयला, राजाला पदच्युत करण्याचे, संस्थान खालसा करण्याचे अधिकार होते हे तुम्ही नाकारता काय? संस्थानात फौजा नेण्याचे अधिकार ब्रिटिश सरकारला होते, हेही तुम्ही नाकारता काय? शस्त्रे घ्यावयाची असतील तर ती कोणत्याही राष्ट्राचे निजामाशी संबंध भारत सरकारच्या मर्जीने व त्याच्या मार्फतच राहावे लागतील. भारताच्या स्वातंत्र्याच्या कायद्याचा हा जो भाग पंडित नेहरूंनी अट्टाहासाने घडवून घेतला त्यावर तुमच्या आमच्या सह्या आहेत हे ॲटलीने चर्चिलला पटविले. अशा अवस्थेत आपला हैदराबादशी आता संबंध नाही असे ॲटलीने म्हटल्यावर चर्चिलकडे उत्तर नव्हते. निजाम, चर्चिल आणि उपद्व्यापी जग यांच्यावर नेहरूंनी आधीच मात करून ठेवलेली होती. चर्चिलकडे उत्तर नसल्याने 'सरकार हटवादी आहे' असे म्हणून त्याने सभात्याग केला. त्यानंतर हैदराबादचा प्रश्न ब्रिटिश पार्लमेंटमध्ये कधीच निघाला नाही.

पंडित नेहरूंनी हे जे उद्योग मुत्सद्दीपणाने आणि दूरदर्शीपणाने गुपचूप केले आहेत, त्यामुळे जगातील कोणत्याही राष्ट्राला हैदराबादला सैन्य/शस्त्रे पाठविणे अधिकृतपणे शक्य नाही. ते भारत सरकारच्या व्दारेच पाठविली जाऊ शकतात. इंग्लंडमधून निजामाला मदत जात नाही हे पाहण्याची जबाबदारीच ब्रिटिश सरकारची होती. दुसऱ्या कोणत्या मार्गाने जर हैदराबादमध्ये शस्त्रास्त्रे जाणार असतील तर तेही हाणून पाडणे हेही काम ब्रिटिश सरकारवर आलेले होते. त्यामुळे इंग्लंड अडकून पडले. चर्चिलला सभात्यागाने प्रतिष्ठा सांभाळावी लागली. तुर्कस्तान, इराण, सौदी अरेबिया, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, पोर्तुगाल, झेकोस्लोव्हाकिया इतक्या देशांमध्ये निजामाने शस्त्रास्त्रांची मागणी केली. पण ती शस्त्रास्त्रे हैदराबादला पोचायला अधिकृत मार्गच नव्हता. हा पंडित नेहरूंचा शहाणपणा.

सामान्यत्वे आपली पद्धत अशी आहे की, ज्यांनी आपल्या देशार्थ जीवन घालविले त्यांना स्वातंत्र्याविषयी आस्था नाही असे आपण मानतो, व ज्याचा आपला स्वातंत्र्याशी काही संबंध नाही त्यांचा स्वातंत्र्यावर हक्क जास्त आहे असे आपण मानतो. ज्यांनी राजकारणासाठी बुद्धीचा यज्ञ केला त्यांना बुद्धीच नाही असे आपण घरबसल्या म्हणतो. पंडित नेहरू अशा अनधिकारी टीकेचे अनेकदा बळी झाले आहेत. अशी टीका करण्यापूर्वी त्यांनी किती सुबुद्ध दूरदर्शीपणाने हा प्रश्न सांभाळला होता याचा

अभ्यास आपण केला तर बरे.

नेहरूंनी काळजी घेतली होती म्हणून निजामाला चोरट्या मार्गाने शस्त्रे आयात करावी लागली. झेकोस्लोव्हाकियाने पोर्तुगालला शस्त्रे दिली. पोर्तुगालने ती आपली भूमी गोवा इथे उतरवून घेतली. गोव्यातून ती शस्त्रे विमानाने हैदराबादला चोरून पोचविण्याचे काम प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय तस्कर सिडने कॉटन याने केले. विमानातून जातील अशीच हत्यारे निजाम आणू शकला. तोफा, रणगाडे, रणगाडेविरोधी तोफा, विमान विरोधी तोफा अशी अवजड हत्यारे निजामाला मिळू शकली नाहीत. ती अधिकृतरीत्या आणायला परवानगी नव्हती. चोरून आणता येत नव्हती म्हणून निजामाची कोंडी झाली. या अवस्थेमध्ये एकवीस मार्च अठ्ठेचाळीसला शेवटी माऊंटबॅटन गेले. राजगोपालाचारी गव्हर्नर जनरल झाले. त्याच्या पुढच्या आठवड्यात अचिनलेक गेले व जनरल करिअप्पा हे भारताचे सरसेनापती झाले. हे सरसेनापती झाल्याबरोबर पुढच्याच आठवड्यात हैदराबादभोवती प्रचंड आर्थिक कोंडी उभारण्यात आली. हैदराबादचे नाणे हे हिंदुस्थानात व आंतरराष्ट्रीय बाजारात बेकायदा करण्यात आले. निजामाचे म्हणणे पडले की त्याच्या नाण्याला जगभर मान्यता असल्याने ते बेकायदा ठरविण्याचा अधिकार भारत सरकारला नाही. भारत सरकारचे म्हणणे की हैदराबाद हे एक संस्थान असल्यामुळे त्याचे हिंदुस्थानबाहेरचे सर्वच संबंध नियंत्रित करण्याचे संपूर्ण अधिकार भारत सरकारला आहेत. हैदराबादचे वीस कोटी रुपये स्वीस बँकेत होते. ते त्याने पाकिस्तानला मदत म्हणून देऊ केले होते. भारत सरकारने स्वित्झर्लंडला कळविले की त्यातला अधेलाही जर पाकिस्तानला गेला तर तुम्हाला आंतरराष्ट्रीय करारांचा भंग केला म्हणून राष्ट्रसंघापुढे खेचू. स्वित्झर्लंडच्या भूमिकेला जी राष्ट्रे पाठिंबा देतील त्या सर्वांशी व्यापारी संबंध तोडू. इंग्लंडने या भूमिकेत आम्हाला पाठिंबा दिला नाही तर ब्रिटिश राष्ट्रकुलातून बाहेर पडू. त्यामुळे इंग्लंडने स्वित्झर्लंडला सांगितले की यातली एकही पै पाकिस्तानला स्वित्झर्लंडने वर्ग केली तर ते स्वित्झर्लंडचे कृत्य इंग्लंड व भारत विरोधी शत्रुत्वाचे कृत्य मानले जाईल. क्लेमंट ॲटलीला असे सांगण्यात आले की, संस्थानला विदेश संबंध जोडता येणार नाहीत हा तुमचा करार आहे. आम्ही त्याचे वारस आहो. तुमचाच करार तुम्ही मोडला तर भारतात जे तीनशेप्रंचेचाळीस कोटी ब्रिटिश भांडवल आहे त्याचे आम्ही राष्ट्रीयीकरण करून टाकू. त्याचा कोणताही मोबदला देणार नाही. इंग्लंडसमोर प्रश्न असा की हिंदुस्थानला राष्ट्रकुलाबाहेर जाऊ

द्यायचे, स्वतःचे तीनशेपंचेचाळीस कोटी रुपये बुडवायचे, हे कशाकरिता? निजामाचे वीस कोटी रुपये पाकिस्तानला मिळावे म्हणून. सांगितला आहे कोणी हा अव्यापारेषु व्यापार? हे नेहरूंचे शहाणपण, निजाम, पाकिस्तान, ॲटली चर्चिल, इंग्लंड, स्वित्झर्लंड आणि सारे जग यांना अंगठा चोखत बसविणारे. आणि आपण घराच्या पागोळीला बसून टीका करणार की नेहरूंना अक्कल नाही.

हिंदुस्थान सरकारचे हे सगळे उद्योग चालू होते. पण अजून सैन्य पाठविता येत नव्हते, कारण अजून माऊंटबॅटन होता. तो जाताच नाकेबंदी सुरू झाली. इथवर आपण पूर्वीच आलो होतो. नाकेबंदी होताच निजामाला परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना आली. त्याचे डोळे उघडले. त्याने भारत सरकारला लिहिले : माऊंटबॅटन प्रस्तावाला माऊंटबॅटन, नेहरू आणि वल्लभभाई यांनी संमती दिलेली होतीच. करार करण्याचे ठरलेलेच होते. आम्ही तयारच होतो. काही किरकोळ मुद्दे स्पष्ट व्हायचे राहिले होते. एवढ्या प्रदीर्घ वाटाघाटीनंतर किरकोळ मुद्द्यासाठी करार अडकणे बरे नाही. तेव्हा आमचे शिष्टमंडळ वाटाघाटी करायला तयार आहे. आम्ही देवाणघेवाण करायला तयार आहोत. यावर वल्लभभाईंनी निजामाला कळविले : माऊंटबॅटन प्रस्ताव आता इंग्लंडला निघून गेला आहे. बिनशर्त भारतात विलीनीकरण एवढेच आता बाकी आहे. वल्लभभाईंचे प्रसिद्ध वाक्य असे आहे : Mountbatten proposal has been sent in March to England. What remains now is unconditional accession to India. हे उत्तर वल्लभभाई जाहीर बोललेले नाहीत. ते लेखी कळविले आहे. पण ते कळविण्यापूर्वी त्यांनी नेहरूंची संमती घेतली होती असे दिसते. कारण एप्रिल महिन्यामध्ये काँग्रेसचे अधिवेशन मुंबईला भरले होते. या अधिवेशनात बोलताना नेहरूंनी लष्करी कारवाईचा पहिला सूतोवाच केला. हा सूतोवाच वल्लभभाईंनी केलेला नाही. नेहरूंनी केलेला आहे. या अधिवेशनात नेहरूंनी जाहीर रीतीने सांगितले : आम्ही शांततावादी आहोत. सर्व प्रश्न शांततेने सुटावे असा आमचा प्रयत्न राहिलेला आहे. याहीपुढे सर्व प्रश्न शांततेने सुटतील याचा आम्ही प्रयत्न करू. पण वाटाघाटी आणि वाट पाहणे याला मर्यादा आहेत. हैदराबादला स्वतंत्र होण्याची संधी कधीही मिळणार नाही. हैदराबादने भारतात विलीन झालेच पाहिजे. बिनशर्त. कारण हैदराबाद हे अखेर एक संस्थान आहे. प्रश्न वाटाघाटीने आणि शांततेने सुटावा या आमच्या इच्छेबाबत काही मंडळींच्या मनात गैरसमज दिसतो. ते विचारतात प्रश्न वाटाघाटींनी सुटलाच नाही, तर पुढे काय?

या सर्वांनी हे लक्षात ठेवावे, लष्करी कारवाईची शक्यता आम्ही नाकारलेली नाही. नेहरू मुंबईत बोलले. त्याच्या पुढच्या आठवड्यात पटेलांनी दिल्लीत जाहीर केले की आता शहाणपणा लवकर शिकणे निजामाच्या हिताचे आहे. नाहीतर माझे हे जाहीर आश्वासन आहे की, हैदराबाद जुनागडच्या मार्गे जाईल. मे महिन्यात त्यांनी अंतिम इशारा दिलेला आहे : 'जैसे थे' कराराचे भंग इतके आहेत की त्याचे परिणाम गंभीर होतील. आता निजाम वाटाघाटीचे वेगवेगळे प्रस्ताव मांडीत आहे. पण आता वाटाघाटीला कोणीही तयार नाही. या अवस्थेमध्येच नानज प्रकरण घडलेले आहे. हे नानज प्रकरण काय आहे? हे नानज प्रकरण असे - काही गावे अशी होती की ती निजामाच्या मालकीची होती पण भारताच्या सरहद्दीत होती. सर्व बाजूने भारतीय प्रदेशाने वेढलेली होती. या उलट काही गावे भारताच्या मालकीची पण निजामाच्या हद्दीने वेढलेली होती. आणि हे सगळे सरहद्दीच्या प्रदेशात इकडे एखादा मैल - तिकडे एखादा मैल असे होते. यातील जी गावे निजामाची पण भारताच्या हद्दीत होती ती भारत सरकारने ताब्यात घेतली. प्रादेशिक सलगतेसाठी ही ताब्यात घेण्याचा आपणास अधिकार आहे असे जाहीर केले. त्यावर निजाम सरकारने असे जाहीर केले की आमच्या हद्दीत असणारे भारताचे नानज गाव आम्ही ताब्यात घेत आहोत. असे जाहीर झाल्यावर रझाकार तिथे जाऊन बसले. लगेच भारतीय सैन्याची एक तुकडी नानजवर चालून गेली. सव्वीस रझाकार ठार झाले. बाकीचे पळून गेले. भारताने नानज ताब्यात घेतले आणि असे जाहीर केले की नानज तर आम्ही ताब्यात घेतलेच आहे पण मध्ये जो दोन मैलांचा निजामाचा प्रदेश आहे तोही आम्ही ताब्यात घेतलेला आहे. तो सोडण्याचा आमचा इरादा नाही. जे आमचे प्रदेश आहेत ते आमच्याच ताब्यात आहेत. पण जे तुमचे प्रदेश आहेत तेही ताब्यात घेण्याचा आमचा हक्क आहे. कारण आम्ही सार्वभौम आहोत. हे हैदराबादला कळवले मे/जून महिन्याच्या संधिकाली. त्यावर कासिम रझवी म्हणाला, नानजवर हैदराबादच्या लष्कराने ताबा बसविला पाहिजे. सेनापती एल.इद्रुस यांनी सांगितले हैदराबादचे लष्कर नानजवर स्वारी करणार नाही. हिंदुस्थानने जो प्रदेश ताब्यात घेतला तो घेऊ द्या. मी त्या लढ्यात पडणार नाही. कारण भारताशी लढण्याइतके सैन्य आपल्यापाशी नाही. तेव्हा निजामाने विनंती केली की हा प्रश्न राष्ट्रसंघात नेऊ द्यावा. भारताने उत्तर दिले, तुम्हाला राष्ट्रसंघात जाऊ दिले जाणार नाही. पाकिस्तान म्हणाले, हैदराबादचा प्रश्न राष्ट्रसंघात न्यायला आम्ही तयार आहोत.

द्याय-

पोर्तुगाल, फ्रान्सनी सांगितले की आम्ही राष्ट्रसंघात हैदराबादला पाठिंबा द्यायला तयार आहोत. त्या वेळी प्रश्न राष्ट्रसंघात चर्चेला घ्यावा की नाही यासाठी तेरा मतांचा पाठिंबा लागत असे. समजा हैदराबादला एवढा पाठिंबा मिळाला तर अशा अवस्थेत भारताची भूमिका काय? वल्लभभाईंनी सांगितले, निरनिराळे जमीनदार त्यांच्या जमीनदारीचे उच्चाटन करताच राष्ट्रसंघात जातो असे म्हणू लागले आहेत. भारत कोणत्याही जमीनदाराला राष्ट्रसंघात जाण्याची परवानगी देणार नाही. निजाम हा एक मोठा जमीनदार असेच आम्ही मानतो, संस्थानिक मानतच नाही. या वेळी हे उघडच झाले की लष्करी कारवाई होणार. त्याचबरोबर हैदराबादहून तारांनी सुरुवात झाली की, इकडे सर्व शांतता आहे. शेवटच्या महिन्यात ज्या तारा गेल्या त्यांत दहा हजार तारा हिंदूंच्या आहेत. शेवटी निजामाला अंतिमोत्तर देण्यात आले की, चोवीस तासांच्या आत तुम्ही अमुक गोष्ट करा, नाहीतर भारतीय फौजा संस्थानात घुसतील.

तेरा सप्टेंबर अठ्ठेचाळीसला भारतीय फौजा हैदराबादच्या सरहद्दीत घुसल्या.

हैदराबाद संपू नये, निजाम संपू नये, शरणागती झाल्याच्या नंतर नव्या शांततेच्या वातावरणात भारत आणि निजाम यांच्या वाटाघाटी विलीनीकरणासाठी सुरू व्हाव्या अशी कन्हैयालाल मुन्शींची इच्छा होती. या दृष्टीने त्यांनी पावले टाकायला सुरूवात केली तेव्हा त्यांना बडतर्फ करून परत घेतले. मुन्शींनी त्यांच्या पुस्तकात मूळ तारच उद्धृत केलेली आहे. त्यात मुन्शींना पुढील आज्ञा आहेत : यापुढे आपण कोणत्याच चर्चा करू नयेत. कोणत्याही रीतीने आश्वासने देऊ नयेत. तुमचे काम संपले आहे. तुम्ही गप्प बसावे. शरणागतीचा समारंभ लष्करी आहे. त्याला तुम्ही हजर राहता कामा नये. तुमची प्रकृती बरी नसल्यामुळे तुम्हाला दिल्लीला नेण्यासाठी विमान येत आहे, इत्यादी. ही तार जवाहरलाल नेहरूंची आहे. या तारेचा अर्थ स्पष्टच आहे.

आणखी नेहरूंची एक तार स्वामीजींना आहे, ती अशी : तुम्ही तुरुंगातून सुटलात, अभिनंदन, माझ्याशी चर्चा केल्याशिवाय कोणत्याही प्रश्नावर मत देऊ नये. फक्त लोकांना शांततेचा विचार समजावून सांगावा.

हा जो मुद्दा आहे तो असा. पोलिसी कारवाईत हैदराबाद संपले. यापुढे हैदराबाद नाही. निजाम नाही. मंत्रिमंडळ नाही, वाटाघाटी नाहीत. नव्या वाटाघाटी नाहीत ही नाजूक बाब, सर्वांच्या लक्षात येईल असे नाही. कोणीतरी पटकन असे म्हणेल की निजाम सरकारने जे उपद्व्याप केले, त्याचे गंभीर परिणाम त्याने भोगले.

आता निजाम सरकार लौकरच भारतात विलीन होईल अशी आम्हाला अपे
म्हणजे विलीन व्हायचे अजून शिल्लक राहिले आहे. असेही स्वयंशहाणे अस
कारण मुन्शींनी रेडिओवर बोलण्यासाठी जे भाषण निजामाला लिहून दिले त्यात
लिहिले आहे की, भारताच्या फौजा या मित्रराष्ट्राच्या फौजा असल्यामुळे आम्ही त्य
स्वागत करतो. लौकरच शांततेच्या वातावरणात भारत आणि हैदराबाद यांचे चिरंत
संबंध कसे होतील याच्या वाटाघाटी चालू होतील. या दृष्टीने मी जुन्या मंत्रिमंडळाचा राजीनामा स्वीकारून नवे मंत्रिमंडळ प्रिन्स ऑफ बेरार याच्या पंतप्रधानत्वाखाली जाहीर करीत आहे. इत्यादी.

या मंत्रिमंडळात मुसलमान सदस्य कोण घ्यावेत असा सल्ला निजामाने मुन्शींना विचारला. त्यांनी तो दिलाही. एक सेनापती एल.इद्रूस. दुसरे होशियारजंग. तिसरे अबुल हसन सैयदअली. हे अली का? तर सज्जन आणि संयमशील आहेत म्हणून. कोण हे अली? तर इत्तेहादुल मुसलमीनच्या अध्यक्षपदावरून निजामाने बहादुर यारजंग यांना दूर केल्यावर व कासिम रझवीच्या आधी हे त्या संस्थेचे अध्यक्ष होते. कन्हैयालाल मुन्शींनी आपले प्रतिनिधी म्हणून मंत्रिमंडळात सुचविले ते हे. असो. मुन्शींची राजकारणी पात्रता आणि निष्ठा याविषयी एवढे पुरे. त्यांना बडतर्फ करावे लागले यात सारे आले.

आता या मुन्शींनी जे पुस्तक लिहिले आहे त्यात अनेक आरोप आहेत. त्याच्या विश्वासार्हतेविषयी पाहू. हे आरोप म्हणजे पुस्तकाचा 'सुरस' भाग आहे. मुन्शी म्हणतात जनता बी.रामकृष्णराव यांच्याबरोबर होती. हे खोटे आहे. मुन्शी म्हणतात स्वामीजींची लोकप्रियता घसरली होती. हे त्याहून साफ खोटे आहे. मुन्शी म्हणतात, स्वामीजींनी अहिंसक लढ्याचे आश्वासन पटेलांना दिले होते. हे धादांत असत्य आहे. मुन्शी म्हणतात हिंसक लढे कॉंग्रेसला बदनाम करण्यासाठी आत शिरलेले कम्युनिस्ट करीत होते. ही शुद्ध थाप आहे. मुन्शींनी त्यांचा इतिहास बहुधा निजामाच्या गोटातच जमा केला असावा.

भारतामध्ये ज्या सशस्त्र आंदोलनाची जबाबदारी संस्थानी कॉंग्रेसने जाहीरपणे आपली म्हटली असा एकमेव लढा हैदराबादचा आहे. या सशस्त्र लढ्याला स्वामी रामानंद तीर्थांनी गांधींची संमती मिळविली होती. गांधींनी हे सांगितले होते : इतर सर्व लोक अत्याचारापुढे भेकडासारखे पळून जात असताना तुम्ही अहिंसेने लढलात आणि

ध्याय
पोर्तुगाल, फ्रान्सनी सांगित

आहोत. त्या वेळी प्रश्न पत्करले तर ते मला आवडेल. पण हातात शस्त्र घेऊन तुम्ही ते न्यायासाठी लागत असे. समजा त तर तीही गोष्ट उचित आणि रास्त कारणासाठी होती असे मी मानीन. कन्हैयालाल मुन्शी काय सांगतात त्या प्रश्नाला यापुढे मुळीच किंमत नाही.

इथवर मी ठळक ठळक बाबी सांगत आलो. सर्व आंदोलनाचा तपशीलवार इतिहास यापेक्षा फार मोठा आहे. तो सर्व लिहावयाचा तर सात-आठशे पानांचा ग्रंथच लिहावा लागेल. तो लिहिला जाईल तेव्हा जावो. पण त्यातला ठळक भाग तरी आपल्यापुढे मांडणे आवश्यक आहे असे मला वाटते. मी तो यथाशक्ति मांडला आहे. महत्त्वाचा असाही पुष्कळ भाग अनुल्लेखित राहिला. कारण वेळ नाही. जो राहिला तो भाग महत्त्वाचा नाही असे मी मानत नाही; तुम्ही मानू नये. या व्याख्यानामुळे काहीजणांना तरी जुना काळ स्मरला असावा. त्या काळची जी मंडळी, केवळ अंधारच समोर दिसत असताना बलिदानासाठी लढ्यात उतरली होती त्यामध्येच आमचे भांगडियाजी होते. त्यांच्या स्मृतीस वंदन करून मी इथे थांबतो.

❋ ❋ ❋

**(समाप्त)**

बालकुमार वाचकांसाठी
आमची महत्त्वाकांक्षी
प्रकाशने

✦ कोल्होबाची रेलगाडी
बाबुराव शिंदे

✦ गरिबाचा कैवारी बाबुराव यादव
सुरेश सावंत

✦ गोष्ट एका राजाची
अशोक कुमठेकर

✦ राजाचा वायदा जन्माला आला कायदा
राजाभाऊ भोंजाळ

✦ समझोता
जगदीश अभ्यंकर

✦ गुण मिळता घ्यावा
सौ.अलका गो. वंगाळे

✦ धावला अभ्यासाचा घोडा
सौ. सुशीला मुरंबीकर

✦ गाऊ गाणी
धोंडिरामसिंह राजपूत

✦ भ्रमंती
व्यं. ना. वळसंगकर

✦ नावेत बुडालेला समुद्र
जगदीश पिंगळे

✦ पिंकीचे खगोलशास्त्र
एल. के. कुलकर्णी

✦ देणं सृष्टीचं लेणं लहानांचं
व्यं. ना. वळसंगकर

✦ माझ्या गं तान्हुल्याला
सौ. सरस्वतीबाई कुमठेकर

✦ गट्टी फू
अंजली भयवाल

हैदराबाद स्वातंत्र्यसंग्रामाचा तो काळ म्हणजे आमच्या जीवनातील चैतन्यमय क्रांतीपर्व होते. आमची संपूर्ण पिढी त्या लढ्याने भारावलेली होती. कितीतरी स्वातंत्र्यसैनिक आहेत, त्यांच्या कार्याची, धाडसाची आठवण झाली तरी संपूर्ण मुक्तिलढ्याचा चित्रपटच जणू नजरेसमोर तरळून जातो. यावर्षीच्या १७ सप्टेंबरला हैदराबाद मुक्तिलढ्याचा सुवर्णमहोत्सव सुरू होत आहे. त्यानिमित्त औरंगाबादच्या रजत प्रकाशनच्या सौ. अनिता अ. कुमठेकर ह्यांनी कै. प्रा. नरहर कुरुंदकर यांचा ''हैदराबाद विमोचन आणि विसर्जन'' हा ग्रंथ पुनःप्रकाशित करून औचित्य साधले आहे. त्यांच्या या कार्याला, योजनेला शुभेच्छा देतांना मला आनंद होत आहे.

कै. नरहर कुरुंदकरांबद्दल काय सांगणार? सांगावे तेवढे कमीच आहे. ''हैदराबाद : विमोचन आणि विसर्जन'' हा त्यांच्या भाषणांचा संग्रह म्हणजे कुरुंदकरांच्या वाक्‌चातुर्याचा आणि चिकित्सक दृष्टीचा परिपाक आहे. कुरुंदकरांच्या मृत्यूनंतर १९८५ साली हा संग्रह प्रथम हैदराबादच्या श्री. द. पं. जोशी यांनी संपादित करून प्रकाशित केला. तोच संग्रह रजत प्रकाशनने जसाच्या तसा पुन्हा प्रकाशित केला आहे.

हैदराबाद मुक्तिलढ्यावर गेल्या वीस-पंचेवीस वर्षात विपुल लेखन झालेले आहे. या ग्रंथात कुरुंदकरांनी व्यक्त केलेल्या मताशी अन्य लेखक, विचारवंत सहमत होतीलच, असे सांगता येत नसले तरी त्यामुळे कुरुंदकरांनी व्यक्तविलेले मत गैरलागू होईल, असे म्हणता येणार नाही. नवनवीन मतप्रवाह, विचार पुढे येत असले तरी जुन्याचे महत्त्व घटत नसते, हेही लक्षात घेणे आवश्यक आहे. कुरुंदकरांसारख्या विचारवंताने त्याकाळी मांडलेला विचार जशाच्या तसा वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न प्रकाशिकेने केला आहे आणि कुरुंदकरांबद्दलच्या आदरभावना व्यक्त केल्या आहेत. तसेच वाचकांसाठी कुरुंदकरांच्या दृष्टीकोनातून मुक्तिलढ्याचा अर्थ उलगडून दाखविला आहे, म्हणून त्यांना शुभेच्छा देतो व भावी काळासाठी सुयश चिंतितो.

गोविंदभाऊ

(पद्मविभूषण गोविंदभाई श्रॉफ)